म. ग्रं. सं. ठाणे.
विषय ... निबंध ...
सं. क्र. 3390



REFBK-0026245

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, ल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे ंणी भरावी लागले.

8 NOV 1990

JAN 1991

7 APR 1991

1991

AY 1991

11 MAY 1991


12 JAN 1992

6 MAR 1993

10 MAR 1993

(क्र. मा. पहा)
१००००-११-८९

સંસ્કૃત વિભાગ
૩૩૯
૨૬૨૪૫
૬૧૧૧૯૦



भारतीय स्त्री-जीवन

डॉ. लीला पाटील

REFBK-0026245

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०

प्रकाशक :
अनिलकुमार मेहता
मेहता पब्लिशिंग हाऊस
१२१६ सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०

मुद्रक :
हरीश विनायक चौधरी
अंजीश कर्मशियल आर्ट प्रिंटर्स
६६९ ई, शाहूपुरी,
कोल्हापूर ४१६ ००१


सप्टेंबर, १९९०

© लेखिकेकडे

किंमत ५० रुपये

ISBN 81-7161-093-5

या पुस्तकास महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने अनुदान दिले आ



प्रस्तावना

डॉ. लीला पाटील यानी लिहिलेल्या स्त्रीविषयक लेखांमधून ग्रंथासाठी लेख निवडणे अवघड काम होते. एक अर्थशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ, शिक्षिका आणि व्यासंगी विद्यार्थिनी म्हणून सातत्याने स्त्रीविषयी लिहिताना अश्मयुगापासून अणु-संगणक युगापर्यंतच्या भारतातीलच नव्हे तर अवघ्या जगातील मानवाच्या सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक, औद्योगिक, कौटुंबिक इ. परिवर्तनाचा अभ्यास डॉ. पाटील यानी मनःपूर्वक केला आहे.

संस्कृतीविकसनाचे तीन महत्त्वपूर्ण टप्पे मानले जातात.

१) कृषिपूर्व संस्कृती–वनसंस्कृती : वन्यावस्था ते शेतीचा शोध. या काळात स्त्री पुरुषांच्या पुढे होती. पुरुषांपेक्षा प्रगत होती. सार्वभौम होती. २) कृषि-संस्कृती पूर्वकाल : स्त्री पुरुषांच्या बरोबर होती. ३) कृषिसंस्कृती उत्तरकाल : स्त्री पुरुषांच्या मागे पडली. दासी बनली. पितृसत्ताक कुटुंबपद्धतीचा प्रारंभ झाला.

अप्रगत अवस्थेतील मानवी संस्कृतीला स्त्रीमुळेच समृद्धी लाभली. भांडी घडविणे, भांड्यांवर नक्षी काढणे, भाषानिर्मिती, अपत्यांना भाषा शिकविणे, विणकाम, वस्त्रनिर्मिती, समाजधारणा आणि धर्म या सर्वांमध्ये स्त्रीचा वाटा सिंहाचा आढळतो. विल ड्यूरंट या समाजशास्त्रज्ञाच्या 'स्टोरी ऑफ सिव्हि-लायझेशन' ग्रंथामध्ये धान्य पेरण्याचा, शेतीचा शोध स्त्रीच्या निरीक्षणशक्तीमुळेच लागला आहे हे स्पष्ट केले आहे. पितृत्वाचे कोडे उलगडले नव्हते. मूल जन्माला घालण्यामधील पित्याची भूमिका पुरुषाला ज्ञातही नव्हती. Motherhood is a fact and fatherhood is a belief हे वचन सर्वार्थाने सार्थ होते. त्या काळात स्त्री मानवाचा वंश वाढवीत, जोपासत होती.

कृषिसंस्कृती उत्तर काळामध्ये मानवसमाज नद्यांच्या विस्तीर्ण खोऱ्यामध्ये स्थिर झाला. शेतीमुळे शांतता, स्थिरता, समृद्धी, उसंत–फुरसद लाभली. शेतीची कष्टाची, वेळखाऊ, जड, कंटाळा–थकवा आणणारी कामे करण्यास स्त्री–गुलाम–नोकरांना वेठीस धरले गेले. सक्ती, दंडुकेशाही, हडेलहप्पी करण्यापेक्षा स्वतःचे

कर्तव्य करण्यासाठी, अत्यावश्यक, नोकर-मालकांना सुखदायी-स्थैर्यदायी, नवी व्यवस्था, नवे जीवन टिकविण्यासाठी नोकर-गुलाम-स्त्री वर्गाला आवाहन करणारा, प्रेरणा देणारा वर्ग निर्माण झाला. बंधनांना धार्मिक--नैतिक स्वरूप देणारी व्यवस्था अस्तित्वात आली. ' प्राथमिक अवस्थेतील समाजाचे नियमन--नियंत्रण करणारी ही प्राथमिक अवस्थेतील नियमन संस्था म्हणजेच प्राथमिक अवस्थेतील धर्मसंस्था होय. '

पितृसत्ताक कुटुंब पद्धती, मालमत्ता मालकी हक्क, गुलामगिरी आणि धर्म या संस्थांचे स्वरूप जसजशी मानवाला शांती, स्वास्थ्य, उसंत, स्थैर्य आणि भरभराट लाभली तसतसे अधिक रेखीव, प्रमाणबद्ध, काटेकोर, कडक-कठोर होत गेले. स्त्री मानव न राहता ' वस्तू ' बनली. केवळ चामडचाची पिशवी ठरली. स्त्री आणि पुरुषाच्या नीतिमत्तेच्या कल्पनांमध्ये फरक पडत गेला. ' विवाहपूर्व कौमार्यबंधन आणि विवाहोत्तर पतिनिष्ठा ' या चार शब्दांमध्ये स्त्रीची नीतिमत्ताच नव्हे तर प्रगल्भता, पात्रता, कार्यक्षमता, सामर्थ्य, कर्तृत्व, गुणवत्ता, इ. कोंडल्या गेल्या. स्त्रीने पुरुषप्रणित समाजव्यवस्था ठोकरू नये म्हणून पातिव्रत्य संकल्पनेचा उदोउदो झाला.

१) पातिव्रत्यामध्ये स्त्रीच्या बौद्धिक, आत्मिक, आध्यात्मिक आकांक्षा विलिन झाल्या. २) पातिव्रत्य हे कृषिप्रधान संस्कृतीतील स्त्रीचे जीवनध्येय बनले. ३) पतिव्रता स्त्री आदर्श, प्रातःस्मरणीय ठरली. ४) पातिव्रत्य कल्पनेने स्त्री-जीवनावर पद्धतशीरपणे आक्रमण करीत केवळ स्त्रीने आचरणात आणावेत असे जीवनमूल्य तप्त लोहरसाने जणू तिच्या व्यक्तिमत्त्वावर कोरले गेले. ५) पितृसत्ताक आग्रही आणि मालकी हक्कांच्या कल्पनेतूनच पातिव्रत्य कल्पना अंकुरली व स्त्रीला तिने जखडून टाकले. ६) दुसऱ्या मानवाच्या जीवितावर सत्ता मिळविण्याचे सर्व नृशंस-भयानक मार्ग फिके वाटतील अशी सतीची चाल अस्तित्वात आली.

पंधराव्या शतकानंतर उद्योगसंस्कृतिकालामध्ये विज्ञान व समाजशास्त्राची अविरत वाढ होत राहिली. गुलाम-नोकर-स्त्रीच्या भयावह अवस्थेसंबंधीचा विचार सहृदयी-सुसंस्कृत व्यक्ती करू लागल्या. १४४३ साली मुस्लिमांनी युद्धा-मध्ये कॉन्स्टॅटिनोपल शहर जिंकल्यानंतर ख्रिश्चन पंडित जगभर पसरले. त्यांनी विद्याप्रसार केला. कॅथॉलिक पंथातील कठोर बंधनांमुळे ख्रिश्चन धर्मसुधारणा चळवळी सुरू झाल्या. प्रोटेस्टंट पंथाच्या उदयामुळे स्त्रीभोवतीची बंधने शिथिल होण्यास वातावरण निर्माण झाले. १७८९ च्या विषमता-गुलामगिरीविरुद्धच्या फ्रेंच राज्यक्रांतीमुळे समता-बंधुभाव आणि स्वातंत्र्याच्या घोषणा जगभर दुमदुमल्या. १७९२ साली मेरी बल्स्टोने क्राफ्ट यानी स्त्री-हक्कांचे समर्थन (Vinidication of Rights of Women) हे पुस्तक लिहून स्त्री-जागृतीची बीजे

पेरली. हे पुस्तक १) स्त्री–हक्काचा जाहिरनामा होते. २) जागृत व्यक्तीची स्त्री-स्वातंत्र्यासंबंधी सद्‌विवेकबुद्धी जागृत झाली. ३) स्त्री विरुद्धच्या अन्याया-विरुद्ध सहानुभूती निर्माण केली. ४) स्त्री–हक्कांच्या चळवळीची मुहूतमेढ या पुस्तकांतील विचारांमुळे रोवली गेली.

मात्र लेखिकेची भूमिका समाजमन वळविण्याची, अजीजीची होती. त्या काळातील स्त्री–दास्याची निर्घृण विविधता म्हणजे १) स्त्रीला आर्थिक स्वातंत्र्य नव्हते. २) स्त्रीची व्यक्ती म्हणून दखल घेतलेली नव्हती. ३) अर्जित संपत्तीवर तिचा अधिकार नव्हता. ४) स्वत:च्या मुलांवरही अधिकार नसे. ५) उच्च वर्ग–वर्ण समाजात पुनर्विवाहास परवानगी नसे. ६) घृणास्पद रूढी-परंपरांनी गुरा-ढोरांपेक्षा कमी ठरविलेले. ७) पत्नी, कन्या, माता, सून, गृहिणी इ. भूमिका-संबंधीच्या कर्तव्यांची सतत जाणीव दिली जाई. कर्तव्यक्षेत्र फक्त घरच होते. हक्क, अधिकार मात्र नव्हतेच. ८) मतदान व वारसा शिक्षणाच्या हक्कांपासून वंचित ठेवलेले होते.

१७८९ साली एका इंग्रज सरदाराच्या कन्येला अथवा जावयाला वारसा–हक्क असावा ह्या खासगी प्रश्नामुळे स्त्री-हक्कासंबंधी न्यायालयीन, सामाजिक विचारमंथन सुरू झाले. १८३८ साली स्त्रीला मतदान हक्क मागण्यात आले. १८४८ साली अमेरिकेत पहिली स्त्री–हक्क करार परिषद संपन्न झाली. १८६७ साली जे. एल. मिल यानी स्त्रीला मतदान हक्क यासंबंधी पार्लमेंटमध्ये पहिले सुधारणा बिल मांडले. १८८७ साली नॅशनल युनियन वुमेन्स सफरेज स्थापन झाली. स्त्री–जागृतीचे हे महत्त्वाचे टप्पे पहिले पर्व मानतात. पहिले व दुसरे महायुद्ध आणि संततीनियमनाचा शोध यांमुळे स्त्री-मुक्ती विचार अधिक डोळस झाला. संततीनियमनाच्या, १) निसर्गाला रोखणे–बांधणे, २) विवाहसंस्थेला धक्का, ३) स्त्री-पुरुष संबंधातील दडपण, भीती नष्ट, ४) गर्भधारणा प्रतिबंध, या परिणामांमुळे पति–पत्नी, स्त्री–पुरुष संबंधास नवे वळण लाभले.

स्त्री-पुरुषांमधील आदिम आकर्षणामुळे दलित चळवळ, निग्रोंची चळवळ या समानतेच्या लढ्यांपेक्षा स्त्री–पुरुष समानता चळवळ वेगळी असली तरी अस्पृश्य-दुर्बल घटकांच्या चळवळींमुळे स्त्री-मुक्तीस पोषक वातावरण मिळाले. ब्रिटिश राजवटीमुळे भारतातील स्त्रीची ' कायदेशीर दुर्दशा ' थांबविण्याचा प्रयत्न सुरू झाला होता, त्याला वेग मिळाला. सतीबंदी, बालविवाह प्रतिबंध, घटस्फोट, आंतरजातीय विवाह, स्त्रीला वारसा हक्क, हुंडाबंदी इ. कायदे स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळामध्ये अस्तित्वात आले. पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धांनी स्त्रीविषयक बुरसट–जुनाट विचार-दृष्टिकोन असलेल्यांना ' शॉक ट्रीटमेंट ' दिली.

महागाईमुळे व महायुद्धांमुळे स्त्रीला 'नोकरी' करण्याची संधी मिळाली.

राजा राममोहन रॉय, पं. ईश्वरचंद्र विद्यासागर, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, न्या. रानडे, आगरकर, महर्षी कर्वे, डॉ. आंबेडकर, महात्मा गांधी, पं. नेहरू इत्यादींच्या उदार-विशाल दृष्टिकोनामुळे 'स्त्री-जागृती'ची पहाट झाली. स्त्री-शिक्षणाच्या विचारास कृतीची जोड मिळाली. औद्योगीकरण, शहरीकरणामुळे विभक्त कुटुंबपद्धती अपरिहार्य बनली. स्त्रीभोवतीचे कडक पहारे सदय झाले. आंतरराष्ट्रीय महिला वर्ष आणि महिला दशकांमुळे स्त्रीविषयक विचारांचे मोहोळ जागे झाले.

या सर्व पार्श्वभूमीवर ग्रामीण-शहरी स्त्री-जीवनाकडे सखोल दृष्टीने पाहण्याचा प्रयत्न डॉ. लीला पाटील सातत्याने करीत आहेत. त्यांच्या स्त्री-पुरुष समानतेसंबंधी अभ्यासाला सूक्ष्म निरीक्षणाची, प्रत्यक्ष अनुभवांची जोड मिळालेली आहे. आर्थिक परावलंबित्व, दुय्यम दर्जा, स्त्रीत्वाची जबाबदारी, कौटुंबिक बंधने, बांधिलकी, अज्ञान, दारिद्र्य आणि अस्पृश्यत्व इ. बंधनांनी जखडलेली स्त्री जीवनातील वेदना, प्रश्न, अंधराशी कशा टकरा घेते, शोषणाला कसकशी सामोरी जाते, हे प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहून त्यानी लोकप्रभा, दै. पुढारी इत्यादींमधून स्त्री-कहाण्या, महाराष्ट्र टाईम्स, लोकसत्ता, दै. सकाळ, दै. केसरी, दै. तरुण भारत, साप्ताहिक स्वराज्य, सकाळ, महाराष्ट्रभरच्या प्रकाशनांचे विविध खास अंक, दिवाळी अंक, इ. मधून स्त्री-जीवनाला अनेकांगी स्पर्श करणारे, स्त्री-समस्यांचा परामर्श घेणारे सांगोपांग लेख लिहिले. आंतरराष्ट्रीय महिला वर्षानंतर टी. व्ही., रेडिओ, मेळावे, सभा इ. मधून सातत्याने दिलेल्या विचारसंपृक्त व्याख्यानांचे शब्दरूप टाचण ठेवले.

शेकडयांमध्ये असलेले लेख, व्याख्याने, टिपणे, संशोधन, शोधनिबंध यांमधून महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडे निवडक लेखन पाठविण्याची जबाबदारी जिकीरीची होती. राजकीय कारणांसाठी अथवा राजकीय प्रेरणांमुळे स्त्रीविषयक कार्याची आस्था असणाऱ्या कार्यकर्त्यांच्या स्त्रीविषयक विचारांना काही वेळा टोकेरी, एकेरी, एकांगी, एकसूरी, मतलबी, भडक आणि आकांडतांडवी प्रासंगिक स्वरूप येण्याचा धोका असतो. डॉ. लीला पाटील यांच्या राजकीय प्रणालीशी स्वतःला बांधून न ठेवण्याच्या वृत्तीमुळे त्यांचे स्त्री-जीवन समस्या-विषयक विश्लेषण नेहमीच निखळ, अनुभवनिष्ठ, वस्तुनिष्ठ, वास्तवाशी प्रामाणिक आणि संतुलित स्वरूपाचे असल्याने त्यांचे कोणते कोणते लेख वगळावे हे समजणे कठीण ठरत होते.

डॉ. लीला पाटील या आणि त्यांची लेखणी भूतकाळ-इतिहासापेक्षा वर्तमान काळ आणि भविष्यकालीन समस्यांमध्ये अधिक समरस होताना आढळते; त्यामुळे

१) ग्रामीण स्त्री–मुक्तीच्या शोधात २) आजचे स्त्री–जीवन ३) मिळवती स्त्री ४) स्त्री–शिक्षण ५) तरुणींविषयी थोडेसे... आणि ६) स्त्री–मुक्तीविषयी अल्पसे अशा प्रमुख शीर्षकांखाली लेखिकेच्या लेखांचे वर्गीकरण करणे सोयीचे वाटले. त्यामुळे विधवा, घटस्फोटिता, परित्यक्ता, प्रौढ कुमारिका, कुमारी माता, बलात्कारिता, वेश्या, देवदासी या समस्याग्रस्त स्त्रियांप्रमाणे ग्रामीण, मिळवती, शिक्षित, ग्रामीण शिक्षित तरुणी, ग्रामीण शिक्षित विवाहात्सुक तरुणी, मुक्तीचा ध्यास घेतलेली तरुणी इत्यादींसंबंधीचे डॉ. पाटील यांच्या वैचारिक मंथनाचे अनमोल नवनीत सुजाण वाचकांच्या हाती अलगदपणे ठेवण्याचा प्रयत्न निवडक लेखांद्वारे केलेला आहे.

पदवी परीक्षेमध्ये अर्थशास्त्रामध्ये विद्यापीठीय पातळीवर प्रथम क्रमांक, तसेच अर्थशास्त्राची पीएच. डी. मिळविलेल्या, पीएच. डी., एम. फिल्. इ. चे मार्गदर्शक असलेल्या आणि अर्थशास्त्र, समाजशास्त्र, शिक्षणशास्त्र, उद्योग, कृषी इत्यादींविषयी गेली २५ वर्षे दमदारपणे, सातत्याने व्यासंगपूर्वक लेखन करणाऱ्या डॉ. लीला पाटील यानी स्त्री–जीवनासंबंधी आवश्यक आणि अनुषंगिक आकडेवारी अवतरणे, उद्धरणे, वचने दिल्याने त्यांच्या विवेचनाला आलेला भरीवपणा, ठोसपणा आणि भरभक्कमपणा ह्या ग्रंथाचे वैशिष्ट्य ठरावे.

प्रत्येक लेखावर भाष्य करण्याची इच्छा, प्रत्येक लेखातील विचारावर साधक-बाधक चर्चा करण्याचा मोह स्थलाभावाने आवरावा लागला आहे, याची विलक्षण खंत वाटते; पण सर्व लेख एवढ्या सुलभ, साध्या, सरळ भाषेमध्ये लिहिले आहेत की मूल्यमापनासाठी ते कोणत्याही समीक्षेच्या ताजव्यात तोलण्याची गरज वाटू नये.

आर्थिक, औद्योगिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक, कौटुंबिक, श्रद्धा–परंपराविषयक आणि नीतिमत्ताविषयक समस्यांशी स्त्री-जीवन समस्या अनेक प्रकारांनी निगडित असल्याने त्यांचे स्वरूप अनेकपदरी, विलक्षण गुंतागुंतीचे, जटिल होत आहे. स्त्री-पुरुष समानतेचा आग्रह धारदार होईल तसा विरोध अधिक प्रखर होत जाणार आहे. या अतिशय हळव्या, धोक्याच्या आणि संक्रमणाच्या काळामध्ये 'भारतीय स्त्री-जीवन' हा स्त्री–जीवन समस्यांविषयक ग्रंथ सुज्ञ, व्यासंगी, अभ्यासू वाचकांना एक महत्त्वपूर्ण आधार ठरेल ह्याबद्दल संदेह वाटत नाही.

प्रा. सौ. अनुराधा गुरव
प्रभारी संचालक, प्रौढ शिक्षण विभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६००४

अनुक्रमणिका

१ ग्रामीण स्त्री : मुक्तीच्या शोधात १

सासुरवास आणि छळ १ । पतीचा दृष्टिकोन : भोगवस्तू ३ । अंधश्रद्धेच्या अंधारात ५ । कायदे कागदावरच राहिले ७ । ग्रामीण स्त्री–मुक्तीसाठी १० ।

२ आजचे स्त्री–जीवन १२

आजच्या स्त्री–जीवन समस्या १२ । विवाहित स्त्रियांनी 'जगावे' कसे ? १७ । चुरगळलेले वैधव्य : मरगळलेला समाज २५ । घटस्फोटाचा प्रश्न ३३ । परित्यक्ता स्त्रियांचा प्रश्न ३९ । स्त्री–शरीर विक्रेत्या वेश्या ४३ । पुनर्विवाह ५४ । प्रौढ कुमारिकांचे प्रश्न ५९ । कुमारी मातांची समस्या ६६ । बलात्कार ७० । देवदासी ७४ ।

३ मिळवती स्त्री ८२

समस्यांचे बदलते स्वरूप ८२ । स्त्री गमावते, स्त्री कमावते : काही प्रतिक्रिया ८८ । आर्थिक स्वावलंबनाचा प्रश्न ९६ । अर्थार्जन क्षेत्रात स्त्रियांना असमान संधी १०१ । स्त्रियांचा रिकामपणाचा वेळ १०६ । भारतीय स्त्रीची उपेक्षा भविष्यकाळातही कायम ? ११० ।

४ स्त्री–शिक्षण ११६


मुलींच्या प्राथमिक शिक्षणाकडे पाहण्याचा ग्रामीण स्त्रियांचा दृष्टिकोन ११६ । स्त्री–शिक्षणाची वाटचाल : समस्या व उपाय १२२ ।

५ तरुणींविषयी थोडेसे ... १३७

विवाह कसे व्हावेत ? महाविद्यालयीन तरुणींच्या अपेक्षा १३७ । सुशिक्षित तरुणी सुयोग्य वधू होतील काय ? १४२ । तरुणींना निखळ आरोग्याची जाण हवी १४८ । हुंडाविरोधात तरुणींचेही बंड आवश्यक १५४ । आजच्या तरुणींची कोंडी । १५८

६ स्त्री-मुक्तीविषयी अल्पसे १६७

स्त्री-मुक्ती म्हणजे काय ? १६७ । निर्भेळ कौटुंबिक सुखासाठी १६८ । समानतेसाठी १६९ । सौभाग्य अलंकाराचे स्तोम १७० । स्त्री-मुक्ती : पण कुणापासून ? १७२ । स्त्री–स्वातंत्र्याची दिशा १७८ । अंधश्रद्धेच्या अंधारात १८५ ।



१ ग्रामीण स्त्री : मुक्तीच्या शोधात

स्त्रियांचा जन्म हा । नको घालू सख्याहरी ।
रात्र ना दिवस । परक्याची ताबेदारी ।।
नाचण्याचा कोंडा । नाही कशाच्या कामाचा ।
देऊ नये । मुलींचा जन्म रामा ।।

ग्रामीण स्त्रियांना स्त्री जन्म नको असे म्हणण्यासारखी परिस्थिती आढळते. संसार म्हणजे सुखदुःखाचे मिश्रण. अमृताचे व विषाचे प्याले. मात्र ग्रामीण स्त्रियांच्या वाट्याला येते फक्त दुःख. त्यांचे जिणे म्हणजे लाजिरवाणे. उपेक्षा व कनिष्ठ दर्जा यातच त्या कोंडलेल्या. त्यांचे उसासे, दुःखाचे कढ, आयुष्याची परवड हीच त्यांची संपत्ती. रात्रंदिवस कष्ट. अज्ञानाच्या अंधःकाराने त्या वेढलेल्या. अंधश्रद्धेत गुरफटलेल्या. मुळातच मुलीचा जन्म ही कुटुंबाची काळजी. परक्याचे धन म्हणून तिच्याकडे पाहून तसेच संस्कार केले जातात. मुलगी वाढू लागली की आईबापाच्या आनंदापेक्षाही तिची चिंता अधिक सतावत राहते. मग शब्द असे –

मुलगी वाढते । जशी चंद्रम्याची कोर ।
अंतरंगी । बापाला पडे घोर ।।

ग्रामीण भागात मुलींच्या लग्नाची घाई फार. मुलीचा विवाह हा तसा १८ वर्षे वयानंतर करण्यात यावा हा कायदा केला गेला तरी तो कागदावर राहिलेला आहे. मुलगी न्हातीधुती होण्याच्या वयाकडे झुकते न झुकते तो लग्नाची गडबड. लग्नाचा अर्थ, विवाहानंतरच्या जबाबदाऱ्या, गर्भारपण, बाळंतपण, अपत्य संगोपनाविषयी जाण करून घेण्याची मानसिक, बौद्धिक आणि शारीरिक कुवत नसतानाही ते त्यांच्यावर सामाजिक सक्तीने लादणारी कौटुंबिक नीती फार अशास्त्रीय व अमानुष म्हणावी लागेल.

सासुरवास आणि छळ

सासरचे बोल म्हणजे काऱ्याचे वेल, रेशमाच्या गाठी, वळचणीला येता जाता लागणारा वासा, सडसड येणारे पाण्याचे शितोडे, मिरच्यांचे वा निवडुंगाचे

काटेरी घोस, विषाचे प्याले, कोणती द्यावी उपमा ? परंतु असे हे सासरचे हाल ग्रामीण स्त्री का सोसते ? सारी कटु बोलणी मुकाट्याने का सहन करते ? आपल्या आईवडिलांच्या नावाला कमीपणा येऊ नये म्हणून –

सासरचे बोल । कडु विषाचे ग प्याले ।
माय बाप । तुमच्यासाठी गोड केले ।।
सासूचा सासरवास । रडवितो पदोपदी ।
लेक थोराची बोलेना । कोणाशी परी कधी ।।
सासरचे बोल । जसे निवडुंगाचे घोस ।
म्हणते आई । शीलवंताच्या मुली सोस ।।

सासुरवास हा असतोच हे मुलीच्या मनात लहानपणापासून रुजविले जाते. त्यांनी तो सहन करावयाचा. पावसाने झोडपले व नवऱ्याने बडवले तर तक्रार कुणाकडे करावयाची ? ती करायची नसतेच. दिल्या घरी ती मेली तरी चालेल; पण माहेरी परतून येता कामा नये हा दंडक. आपल्या देशात ग्रामीण भागात मुलीच्या विवाहाचे सरासरी वय १५.३ वर्षे आहे. म्हणजे एवढ्या लहान वयात सासरी कष्ट उपसायचे. बोलणे, मारझोड सहन करायची. भूक लागते, पण कुणाजवळ बोलणार ? फक्त म्हणते –

भूक लागते माझ्या पोटा । वरवंटा देत्ये गाठी ।
बाप्पाजी हो । तुमच्या नावासाठी ।।

सासरी सारी बोलणार. सासू, सासरे, दीर–नणंद सर्वांचाच बोलण्याचा अधिकार. मारहाण चुकत नाही. ग्रामीण भागात शेती हा प्रमुख व्यवसाय. ऊन–पाऊस–थंडी-वारा कशाचीही फिकीर न करता फक्त ढोरासारखे राबणाऱ्या ग्रामीण स्त्रिया पहिल्या की म्हणावेसे वाटते –

सासुरवाशीचा जन्म । देवू नको असा ।
माडोत्री बैल । घाण्याला जुंपला जसा ।।

घरादारात, शेतात मोलमजुरीसाठी राबराब राबायचे. उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकायचे. घरच्यांकडून गोड शब्दाची अपेक्षा धरायची नाही. शिवाय सतत बोलणी आणि मारझोड सहन करायची. अगदीच न सोसवेल तर विहीर जवळ करायची, अशी तऱ्हा. महिला दक्षता समितीची अध्यक्षा म्हणून काम करताना अशा कितीतरी स्त्रियांचे हाल पाहिले आहेत. पोलिसांचा धाक दाखवून वा समजुतीने बरीच प्रकरणे हाताळली. काहींचे हाल अजूनही सुरू आहेत. ग्रामीण स्त्रिया छळ व सासुरवासाबद्दल तक्रार करण्यास पुढे येत नाहीत ही दुर्दैवी बाब होय.

पतीचा दृष्टिकोन : भोगवस्तू

सासुरवास सोसूनही पतीला आनंदी दिसावे म्हणून ग्रामीण स्त्रियांना हसत-मुख राहावे लागते. कपाळीचे कुंकू हे पत्नीचे भाग्य. चूल आणि मूल हाच जीवन-मंत्र. याच परिघात फिरत राहणाऱ्या ग्रामीण स्त्रिया. स्वातंत्र्याचा श्वास, स्वतःच्या निर्णयाचा ध्यास, स्वत्व जोपासण्याची प्यास, स्वाभिमान व निर्धाराची कास जोपासू शकत नाहीत.

ग्रामीण स्त्रियांना नवऱ्याचे सुख मिळते ते शारीरिक पातळीवरचे. अपत्य-प्राप्ती व वंशवेलवृद्धीसाठी वैवाहिक संबंध आवश्यक मानले जातात. मुलगा व्हावा याकडे ओढ. जरी अपत्यसंभव हा पतिपत्नीच्या मिलनाचा परिपाक असला तरी मुली झाल्या की रोष पत्नीवर हा अलिखित नियम, ग्रामीण स्त्रियांच्याबाबत काळचा दगडावरच्या रेषेइतका ठाम. मुलगा होईपर्यंत गर्भारपण लादले जाते. मुलगा झाला नाही तर दुसरा विवाह करून सवत आणणे ही प्रथा सर्रास. द्विभार्या-प्रतिबंधक कायदा जुमानला जात नाही. मग वंशवाढीसाठी मुलास जन्म न घालू शकणाऱ्यांना अत्यंत छळाला सामोरे जावे लागते. गोठ्यातल्या ढोरापेक्षाही तिची किंमत कमी.

मुलगा व्हावा हाच ध्यास घेतल्याने पती विषयासक्त व असंयमी होत जातो. पत्नीच्या शरीराची नासाडी होत राहते. पण लैंगिक अमानुषपणाची तक्रार करणार कुणाकडे ? फक्त मनात म्हणत राहायचे –

रूप ना लावण्य । सोडीना कधी माडी ।
जीवनाची । करितो नासाडी ।।
रात्र ना दिवस । चंदन वेलीला
विळखा मारून राहिला । साप मेला ।।

ग्रामीण स्त्रियांना पुरुषी अहंकार, नवरेशाही व आपल्याला विचारणारे कुणी नाही यापोटी नवऱ्यांना आलेल्या हुकुमशाही प्रवृत्तीला सतत तोंड द्यावे लागते. स्त्रियांच्या लैंगिक संबंधाबाबतच्या अडचणींचा विचार करणारे पुरुष विरळे, त्यामुळे अनेक व्याधींना तोंड द्यावे लागते. स्त्रीमुक्तीचा विचार मांडताना पत्नीची समागमाची स्वखुषी वा इच्छा लक्षात घ्यावी लागेल, अन्यथा तोसुद्धा बलात्कार समजावा लागेल, असे म्हटले जाते. ग्रामीण स्त्रियांना अजूनही अशा नाखुषीच्या संबंधाला सामोरे जाण्याचे दिव्य पार पाडावे लागते.

ज्या ग्रामीण स्त्रियांना अशा प्रकारचा छळ असह्य होतो त्यांना झटके येऊ लागतात. त्यांच्या अंगात येते, असे म्हटले जाते. खरे कारण सांगणार कसे ? पटणार कुणाला ? मग देवदेवसकी, अंगारे-उतारे, भूत काढणे अशांसारखे प्रकार

सुरू होतात. अशा प्रकारच्या यातनामय जीवनाला सामोरे जावे लागते. पत्नी-सुख देण्यास अशा स्त्रिया असमर्थ आहेत असा सासरची मंडळी गाजावाजा करतात पण त्याला कारणीभूत ठरणारे पती पुरुष मात्र समाजाच्या सहानुभूतीला पात्र. त्यांना दुसरे लग्न करण्याची सामाजिक मुभा.

लैंगिक वर्तन विशेषत: ग्रामीण समाज कधीच व्यक्तिगत बाब मानत नाही. विजोड विवाह, अयशस्वी लग्न यांचे खापर पत्नीवर फोडण्याची प्रवृत्ती आढळते. स्त्रीविषयक नीतिमत्ता केवळ दुहेरी नाही. ती दुटप्पी देखील आहे. पुरुषांनी **नीतिमत्तेचे व ज्या लैंगिक नीतिमत्तेचे ढोल पिटले ती नीतिमत्ता स्त्रियांसाठी राबविली जाते. स्त्रियांच्या लैंगिक पारतंत्र्यातून लग्न हे स्त्रियांच्या बाबतीत अनिवार्य होऊन बसले.** स्त्री केवळ कातडयाची पिशवी. स्त्रीची नीतिमत्ता चार शब्दांत सांगता येईल : ' विवाहपूर्व कौमार्यबंधन व विवाहोत्तर पतिनिष्ठा. '

ग्रामीण भागात पुरुषांनी रखेली ठेवली तर ते पुरुषीपणाचे, मर्दपणाचे लक्षण होय. त्यांनी विवाहापूर्वी लैंगिक सुखाचा आस्वाद घेतला तरी क्षम्य. मात्र विवाहाला उभा राहतो तेव्हा 'कोरी कुमारिका' हवी असते. पुरुषाचा विवाहबाह्य संबंध दुर्लक्षिला जातो. खरे तर स्त्री–पुरुष दोघांनाही समान नीतिमत्तेचा तराजू हवा. त्या नीतिमत्तेचा पाया मानवी हवा. याचा अर्थ मानवी स्खलनशीलतेचा त्यात पूर्ण विचार हवा. चुकीच्या दुरुस्तीला वाव हवा; परंतु ग्रामीण भागात फार बुरसटलेल्या कालबाह्य विचारांचा पगडा आढळतो. केवळ पत्नीच्या चारित्र्य-विषयक संशयावरून अनेक स्त्रियांना टाकलेले आहे.

परित्यक्तांची दु:खेही मी (लोकप्रभेत प्रसिद्ध झालेली) प्रत्यक्ष त्यांच्याशी मुलाखत घेऊन जाणून घेतली. मुलगा होत नाही, हुंडा कमी दिला, मानपान नाही, दिराच्या मुलाशी संबंध आहेत अशा संशयावरून, माहेरची इस्टेट स्वत:च्या नावावर करावी, दिवाळसणाला अंगठी दिली नाही, बाहेरख्यालीपणाला विरोध केला म्हणून, पत्नीच्या पोटातील गर्भ स्वत:च्याकडून राहिलेला नाही हा समज, सासूला उलट बोलते, काम जमत नाही अशांसारख्या विविध कारणांनी स्त्रियांना टाकलेले आहे. त्यांना माहेरचा आधार नाही. घटस्फोट व पोटगीचे कायदे माहीत नाहीत. शिवाय ते करण्यासाठी आर्थिक पाठबळ व मानसिक आधार देणारे कुणी नाही.

अशा परित्यक्ता दुसरा विवाहही करू शकत नाहीत. समाज त्यांच्याकडे वाईट नजरेने पाहतो. दारिद्र्य, मुलाची विवंचना, शरीरधर्मातून निर्माण होणारी कामवासना काबूत ठेवण्यासाठी द्यावा लागणारा झगडा, समाजाकडून उपेक्षा, गुंड व इतरही लोकांकडून होणारा उपद्रव, सतत दडपण व कायम भीतिदायक वातावरण यांमुळे त्यांना हलाखीचे जीवन जगावे लागते.

व्यसनी पुरुषाकडून छळ

ग्रामीण भागात नवऱ्यांच्या व्यसनाधीनतेमुळे अनेक स्त्रियांना नरकवास सहन करावा लागत आहे. त्याला विरोध करण्याची स्त्रियांची ताकद नाही. तो विरोध म्हणजे मारहाण आणि बाहेरख्यालीपणाला आमंत्रण. रोजच्या रात्री लाथा-बुक्क्यांच्या प्रसादाशिवाय उजाडत नाहीत. अशा अत्यंत नीरस व बेचव आयुष्य वाटचाला आलेल्या स्त्रिया खरोखरच मेल्याहून मेल्यावरचे जिणे जगत आहेत. त्या दुःखाने म्हणतात,

समुद्राच्या काठी । माती पोवळ्याच्या वेली ।
दैवाची उणीव । कडू वेल हाती आली ।।

नवऱ्याला दोष देण्यापेक्षा आपल्या नशिबाला बोल लावत बसण्याची पाळी येते. दैववाद अंगी भिनलेला. नवऱ्याशी गोड बोलून ताळ्यावर आणण्याचा सहनशीलतेचा प्रयत्न. प्रेम देण्याची पद्धत स्वीकारली जाते. त्या माया देतात; पण बहुसंख्य जणींचा अनुभव असा –

जीवाला जीव देत्ये । जीव देवून पाहिला ।
पाण्यात पाषाण । अंती कोरडा राहिला ।।
फोडिले चंदन । त्याच्या केल्या बारा फोडी ।
स्त्रियांची जात वेडी । पुरुषांना माया थोडी ।।

ग्रामीण स्त्रियांना असा अनुभव येऊनही त्या सोसत राहतात. माहेरी सत्ता नाही, लहानपणी वडिलांच्या धाकात, तरुणपणी नवऱ्याच्या ताब्यात व म्हातारपणी मुलांच्या तालावर तारेवरची कसरत करीत जीणे जगावे लागते. ही ग्रामीण स्त्रियांची कौटुंबिक स्थिती.

अंधश्रद्धेच्या अंधारात

भवानीमाता महिला नागरी पतसंस्थेची चेअरमन म्हणून गेली दहा वर्षे काम करीत असल्याने ग्रामीण भागातील पाच हजार सभासद स्त्रियांना घराघरात पोहोचविण्याची संधी मिळाली. त्यांच्या धार्मिक समजुती, रूढी–परंपरांचा मागोवा घेऊन त्या घालविण्याच्या दृष्टीने प्रबोधनात्मक अनेक शिबिरे घेतली. धार्मिक तत्त्वज्ञानाचा यत्किंचितही अर्थ माहीत नसलेल्या आपल्या देशातील हजारो ग्रामीण स्त्रिया अंधश्रद्धा, कर्मकांड, उपासतापास, देवऋषी, बुवा, भट यांच्यात गुरफटलेल्या आहेत. ग्रामीण भागात स्त्री साक्षरतेचे प्रमाण सरासरी १३ टक्के आढळते. काही भागात तर ते ३ ते ४ टक्के आहे. शिक्षणापासून वंचितता हा त्यांना मिळालेला शाप. घरचे दारिद्र्य, आर्थिक अडचणी, सामाजिक दृष्टिकोनातील पारंपरिकपणा, खेड्यातील संकुचित वातावरण, शाळेच्या सोयीचा अभाव, पालकांची उदासीनता,

आईचे गर्भारपण, लहान भावंडांचे संगोपन, घरकाम, घराबाहेरचे काम, शिक्षणाने वय वाढते, नवऱ्याबद्दल अपेक्षा वाढतात, उद्धटपणा येतो, चूल व मूल हेच कार्यक्षेत्र, शिकून काय करायचे ? ह्यांसारखी अनेक कारणे ग्रामीण मुलींना शिक्षणापासून वंचित करतात.

ह्याच अडाणी अल्पशिक्षित मुली अंधश्रद्धेच्या अंधकारात वावरतात. लग्नानंतर तर कुलाचार, पूजाअर्जा, उपास, नवस ह्यांच्या मागे लागतात. डॉक्टरापेक्षा लागीर बघण्याकडे अधिक कल. उतारा, ताईत, गंडेदोरे, नवस ह्यांवर अधिक विश्वास व विसंबलेपणा. रात्री विरजण न देणे, पाल चुकचुकली की अशुभ मानणे, विधवा स्त्री, मानसिक दृष्टचा त्या कमकुवत होत जाऊन खेडचातील बुवा, भट, देव, पंचांगवाले यांच्या नादी लागताना दिसतात. वैज्ञानिक वृत्ती आणि तर्कसंगत विचारसरणीपासून त्या कोटचवधी मैल दूर आहेत, हेच सत्य.

तुलनात्मक परिस्थिती

ग्रामीण व शहरी स्त्रियांची तुलना करता जमीनअस्मानाचा फरक जाणवतो. ग्रामीण भागात दारिद्रचरेषेखालील जीवन जगणाऱ्यांची संख्या २२ कोटी २२ लाख आहे असे शासनाचे मत आहे. पण प्रत्यक्षात त्याहीपेक्षा अधिक संख्या असल्याचे अर्थतज्ज्ञांचे मत आहे. उदा. प्रा. सी. एच. हनुमंतराव यांच्या मते, देशातील पूर्व व मध्य भागात ग्रामीण दारिद्र्याची तीव्रता फार असून ६२.४ टक्के जनता दारिद्रचरेषेखालील निर्धन व कंगाल जिणे जगत आहे. शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात दारिद्रचाची तीव्रता अधिक आहे. ह्या सर्व कुटुंबांच्या दारिद्र्याची सर्वाधिक झळ पोहोचते ती ग्रामीण स्त्रियांना. स्त्रियांचा दर्जा, विवाहाचे वय, अत्यल्प संख्या, मुलीच्या जन्माकडे पाहण्याचा दृष्टिकोन, आरोग्यविषयक सोयी, पाणी, संडास, सामाजिक, सांस्कृतिक पद्धतीबरोबर आर्थिक परिस्थिती महत्त्वाची ठरते. शिक्षण मनोरंजन प्रचारमाध्यमे, सरकारचे विविध कल्याणकारी कार्यक्रम, स्त्रीविषयक कायदे, दवाखान्याच्या सोयी वगैरे बाबतींत ग्रामीण स्त्रियांना शहरी स्त्रियांच्या तुलनेने फार मागासलेले, उपेक्षित व दुर्लक्षित राहावे लागत आहे. त्या दृष्टीने पुढील मुद्दे लक्षात घेता येतील –

१) भारतात १९८१ च्या जनगणनेनुसार शहरी स्त्रियांची संख्या ५६.८ दशलक्ष होती. ग्रामीण स्त्रियांची संख्या जास्त होती. संख्यात्मक दृष्टचा अधिक असलेला हा गट उपेक्षित आहे. देशातील स्त्रीसाक्षरता प्रमाण सरासरी २४.९ टक्के आहे. मात्र देशपातळीवर शहरी स्त्रियांचे साक्षरता प्रमाण ४७.८२ टक्के आहे. ग्रामीण स्त्रियांचे साक्षरता प्रमाण सरासरी १३ टक्के आहे.

२) आपल्या देशात भारतीय स्त्रीचे विवाहाचे सरासरी वय १८.३२ वर्षे

आहे. शहरी भागात ते १७.६ वर्षे आणि ग्रामीण भागात १६.५ वर्षे आहे. शहरी मुलीची विवाहाची वयोमर्यादा ग्रामीण मुलीच्या मानाने वाढलेली आहे.

३) स्त्रियांच्या आयुर्मानाच्या दृष्टिकोनातून अभ्यास करता असे दिसते की, ग्रामीण स्त्रियांपेक्षा शहरी स्त्रियांचे आयुर्मान अधिक आहे. १९७८ ते ८० च्या काळातील सॅम्पल रजिस्ट्रेशन सिस्टीमच्या आकडेवारीनुसार असे लक्षात येते की, शहरी स्त्रियांचे आयुर्मान ६०.८ वर्षे आहे तर ग्रामीण स्त्रियांचे सरासरी आयुर्मान ५०.३ वर्षे आहे. ग्रामीण स्त्रीचे आरोग्य अत्यंत दुर्लक्षिले जाते.

४) दर हजारी लोकसंख्येमागे दरवर्षी किती लोक जन्माला येतात त्या प्रमाणाला जन्मदर म्हणतात. ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात जन्मदर कमी आहे. १९८५ साली ग्रामीण जन्मदर १८.१ असल्याचे आढळते. यावरून ग्रामीण स्त्रिया कुटुंबनियोजनामध्ये मागे आहेत आणि गर्भारपणा, अपत्यजन्म व संगोपनात अडकलेल्या आहेत.

५) मृत्युदराबाबतीतही अशीच तफावत आढळते. देशातील शहरी स्त्रियांचा मृत्युदर ७.१ (दर हजारी) आहे तर ग्रामीण स्त्रियांचा दर १३.२ (दर हजारी) आहे. निकृष्ट आहार, वैद्यकीय सोयीची कमतरता, गरीब स्त्रियांचा कनिष्ठ दर्जा, आर्थिक व सामाजिक परंपरागत दृष्टिकोन, गर्भारपण, अज्ञान, उपवास, अनारोग्य व आजाराकडे दुर्लक्ष वगैरे कारणे या परिस्थितीस जबाबदार आहेत.

६) माता व अपत्याच्या आरोग्याचा निर्देशक म्हणजे अर्भक मृत्यूदर (दर हजारी) हा होय. दर हजारी एका वर्षाखालील अर्भकांचा मृत्यूदर ग्रामीण भागात ११४ तर शहरी भागात फक्त ६५ आहे. शिवाय स्त्री अर्भकाचा मृत्यूदर शहरी भागात ६० तर ग्रामीण भागात ११४ आढळतो.

७) १९८१ च्या जनगणनेनुसार शहरी स्त्रियांचे नोकरी व अर्थार्जनाच्या क्षेत्रातील सहभागाचे प्रमाण ८.२ टक्के होते, तर ग्रामीण स्त्रियांचे प्रमाण २३.१८ टक्के होते, मात्र त्या प्रामुख्याने शेती, शेतमजुरी, दुग्ध व्यवसाय अशांसारख्या रोजंदारीच्या कामात गुंतलेल्या, असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या आहेत. अपुरे वेतन कामाची हमी नसते आणि शारीरिक कष्टाची कामे व राबवणूक अधिक अशी ग्रामीण स्त्रियांच्या रोजगारीची स्थिती होय. वेतनश्रेणी, बोनस, सुट्ट्या, आजारपणाची रजा, मॅटर्निटी लीव्ह, पेन्शन वगैरेंपासून हे क्षेत्र पूर्णपणे वगळलेले. ग्रामीण स्त्रियांना आर्थिक लाभ फारसा मिळत नाही.

कायदे कागदावरच राहिले

ग्रामीण स्त्रियांना हिंदू वारसा हक्काचा कायदा, दत्तक घटस्फोट, पोटगी, द्विभार्या प्रतिबंधक कायदा, हुंडाबंदी कायदा, बालविवाह प्रतिबंधक कायदा वगैरे-

विषयीच्या माहितीचा अभाव आढळतो. स्त्रीहक्क व सुरक्षितता, संरक्षणविषयक आणि वडिलांच्या मालमत्तेतील वाटणीविषयी केलेले कायदे केवळ कागदावरच राहिले. मी कोल्हापूर जिल्हा कायदेविषयक सहाय्य व सल्ला समितीवर (लिगल एड) सदस्य आणि कन्सिलिटर (समुपदेशक) म्हणून गेली ७ वर्षे काम करीत आहे. सर्वसाधारणपणे १० ते १५ टक्के स्त्रियांना घटस्फोट व पोटगी कायद्याबाबत साधारण माहिती आहे. रूढी–परंपरेचा जबरदस्त पगडा, शिक्षणाची कमतरता, कायदेविषयक माहिती करून घेण्याच्या जागरुकतेचा व औत्सुकतेचा अभाव, आत्मविश्वासाची उणीव, बुजरेपणा, आर्थिक बळ आणि मानसिक कमतरतेमुळे कायदे कागदावर राहिलेले आहेत. विशेषत: परित्यक्ता, विधवा, अपंग आणि नवऱ्याने रखेली ठेवलेल्या किंवा दुसरे लग्न केलेल्या ग्रामीण स्त्रियांची स्थिती शोचनीय आहे.

आज महाराष्ट्रात महिला दक्षता समिती आणि कायदेविषयक सहाय्य व सल्ला समिती स्थापन करण्यात आल्या आहेत. जिल्हा व तालुका स्तरावर त्या कार्यरत आहेत. स्त्रियांच्यावरील होणारे अन्याय व छळाला वाचा फोडण्याचे काम आणि घटस्फोट, पोटगी आणि तडजोडीने समेट घडवून आणण्यासाठी मोफत कायदेशीर सल्लाही दिला जातो. वकिलाची सेवा मोफत मिळण्याची तरतूद आहे, परंतु लाभ घेणाऱ्या स्त्रियांची संख्या फार अत्यल्प आहे. पोटगी मिळण्यास ३ ते ४ वर्षे लागतात. दिरंगाई व खर्चिक पद्धतीमुळे अशा अडचणीत सापडलेल्या स्त्रिया कंटाळतात. शिवाय असे कार्य करणाऱ्या समित्या तालुका पातळीवर आहेत, हे ९० टक्के स्त्रियांना माहीत नाही. आत्मबल, निर्धार आणि आत्मविश्वास तसेच आर्थिक कुवत, मानसिक आधार नसलेल्या बहुसंख्य स्त्रिया ह्या तशाच स्थितीत निराधारांचे आश्रित जिणे जगताना दिसतात.

आश्चर्यकारक उदाहरणे

आज ग्रामीण स्त्रियांची कार्यक्षेत्रे विस्तारलेली नाहीत. अंटार्क्टिका मोहिमेतील डॉ. आदिती पंत व डॉ. सुदीप्ता घोष या दोन शास्त्रज्ञ महिला, चंद्रप्रभा ऐतबाल, रीटा गोबू, बचेंद्री पाल ह्या एव्हरेस्ट शिखर सर करण्यासाठी गेलेल्या महिला, हिमालयाच्या चिपको आंदोलनातील स्त्रिया, मुस्लिम स्त्रियांच्या सिनेमाबंदीविरुद्ध रस्त्यावर झुंज देणाऱ्या नजमा बांगी, रझिया पटेल आणि बुरखाधारी सहकारी व नागरी स्वातंत्र्याच्या विविध पैलूंसाठी जिद्दीने झटणाऱ्या स्त्री वकील, सुप्रीम कोर्टात न्यायासाठी आवाज उठविणाऱ्या स्त्रिया ह्या भारतीय स्त्री समाजाचे प्रतिनिधित्व करताहेत म्हटले जाते; पण त्यात ग्रामीण स्त्रिया कुठेच बसत नाहीत. अद्यापही ग्रामीण स्त्रियांचे जीवन सरंजामशाही

मूल्यांनी जखडलेले आहे. अवहेलना, मानहानी, अतोनात कष्ट यांनी ते किती ओतप्रोत भरलेले आहे, याचे आश्चर्य वाटावे अशी शेकडो उदाहरणे सापडतात.

सौंदत्ती येथे यल्लमाच्या नावाने देवाला सोडणाऱ्या देवदासी मुलींची संख्या कित्येक हजारोंच्या घरात आहे. हुंड्याच्या जोरावर असंख्य तरुणींची हुशारी व कर्तबगारी मातीमोलाची ठरत आहे. हुंडाबळी, सासुरवास, बलात्कार, अत्याचार, आत्महत्या करण्यास भाग पाडणाऱ्या परिस्थितीचा बळी जाणाऱ्या अनेक स्त्रिया सापडतात. १९५२ मध्ये पार्लमेंटमधील स्त्री-प्रतिनिधींची संख्या ५० होती ती १९८४ च्या निवडणुकीत ४३ झाली. ग्रामीण भागात स्त्रियांची राजकीय जागरूकता व पक्षीय निष्ठा जवळजवळ नसल्यासारखी स्थिती आहे. सभांना स्त्रियांची उपस्थिती असते. मतदानासाठी सहभाग असतो; पण हे केवळ आंधळेपणाने. बोलविता धनी वेगळा. स्वतंत्र विचार नाही, मत नाही, पक्षीय बांधिलकी नाही. ग्रामीण भागात ग्रामपंचायतीमधील स्त्री–सदस्यही कायद्याच्या तरतुदीमुळे नामधारी म्हणून निवडली जाऊन त्यांच्या सहभागाचा विचार होतच नाही. नवऱ्याच्या व्यसनाधीनतेपायी कष्टाने मिळविलेले चार पैसे त्याच्या व्यसनापायी गमावून पुन्हा त्याच्याच मारहाणीला बळी पडण्याचे प्रसंग हजारो स्त्रियांपुढे नित्य वाढून ठेवलेले आहेत.

स्त्री–संघटनांकडून ग्रामीण स्त्री उपेक्षित

प्रतिगामी स्त्री–संघटना, स्थितिवादी स्त्री संघटना, प्रागतिक स्त्री संघटना, व्यावसायिक आणि पुरोगामी संघटना, स्त्रीवादी गट, स्त्री–मुक्ती आंदोलन ह्या प्रकारच्या विविध स्त्री–संघटना आज कार्य करताना आढळतात; परंतु ग्रामीण भागात आणि तेथील स्त्रियांसाठी त्यांचे कार्य पोहोचलेले नाही, ही दुर्दैवाची बाब होय. ग्रामीण स्त्रियांची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, मानसिक आणि राजकीय क्षेत्रातील प्रगती अगदी मंद गतीने चालू आहे. स्त्री–संघटना याबाबत गंभीरपणे विचार करताना आढळत नाहीत.

मुळातच ग्रामीण स्त्री संघटित नाही. शिवाय जागरूक तर नाहीच, अंधश्रद्धा व अज्ञानाच्या अंधःकारात चाचपडत आहे. कायदेविषयक प्रचंड अडाणीपणा आढळतो. स्त्रीकडे बघण्याचा परंपरागत दृष्टिकोन बदलण्यात फारसे यश आलेले नाही. भोगवस्तू हीच स्त्रीची प्रतिमा अजूनही स्वीकारली जाते. ग्रामीण भागात स्त्रीचे दुय्यम स्थान ही त्यांची मुख्य समस्या तर आहेच, पण जुन्या धार्मिक व सांस्कृतिक मूल्यांचा, व्रतवैकल्यांचा आग्रह, मातृत्वाचा अवास्तव बडेजाव व गौरव, गृहिणी ह्या भूमिकेचे नको तितके स्तोम माजवून शिक्षणापासून वंचित ठेवून, लवकर लहान वयात लग्न, नीतिमत्तेच्या बुरसटलेल्या कल्पना, सासुरवास

व छळ वगैरेंमुळे त्यांना नव्या विचारांचा स्पर्श होऊ नये, अशीच समाजव्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न आजही थांबलेला नाही. स्त्री-संघटना, मंडळे, मंच यांचे कार्य शहरापुरते मर्यादित, ग्रामीण भागाकडे अक्षम्य दुर्लक्ष झाल्याने ग्रामीण स्त्रिया अनेक प्रकारच्या दुर्दैवाला सामोऱ्या जात आहेत, याकडे लक्ष पुरवायला हवे.

ग्रामीण स्त्रीमुक्तीसाठी

ग्रामीण स्त्रियांच्या प्रबोधनाचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. स्त्रीशिक्षणाचा प्रसार आणि गुलामगिरीची मानसिकता या दृष्टीने युद्धपातळीवर, राजकीय वचनबद्धता, पक्षभेद विसरून सर्व स्तरांवर प्रयत्नाला प्राधान्य मिळणे जरुरीचे आहे. ग्रामीण स्त्रियांचे अंधश्रद्धा निर्मूलन, रूढी-परंपरांतून सुटकेची शिकवण व आत्मविश्वास या दृष्टीने प्रबोधन होणे अत्यंत जरूरीचे आहे.

ग्रामीण स्त्रिया बालविवाह, हुंडापद्धतीमुळे येणारा सासरचा रोष, सासुरवास, पतीचा बाहेरख्यालीपणा, सवत व रखेली यांमुळे येणारा छळवाद, व्यसनाधीनता या प्रमुख बाबींमुळे पीडित-शोषित आहे. कायदे असूनही त्याबाबतचे अज्ञान आहे, म्हणून पत्नीने तक्रार केलीच पाहिजे असे नाही; तर इतरांनी तक्रार केल्यास प्रथम अटक व्हावी अशी तरतूद व्हावी. सरकारने अशा प्रकारच्या केसेस चालवाव्यात. तालुका पातळीवर कायदेशीर सहाय्य, सल्ला व मार्गदर्शन सेल कायम प्रकारची तरतूद म्हणून केली जावी. स्त्रीविषयक कायद्यांची प्रसार-मोहीम हाती घ्यावी. अनावश्यक व लादलेले गर्भारपण ही ग्रामीण स्त्रीची आत्यंतिक डोकेदुखीची बाब होय. या बाबतीत कायदेशीर व सक्तीचा समान नागरी कायदा केला जावा.

महिला मंडळे, स्त्री-संघटना, स्त्रीमुक्ती आंदोलन किंवा अन्य कोणत्याही स्त्री-संघटनांच्याबरोबर इतरही स्वयंसेवी संस्था व आंदोलनाच्या नेते मंडळी व कार्यकर्त्यांनी ग्रामीण स्त्रियांचे प्रश्न सोडविण्याची वचनबद्धता मानावी. आरोग्याचे पुनर्वसन, आदिवासींचे प्रश्न, चिपको आंदोलन, भारत जोडो अभियान, वृक्षसंवर्धन मोहीम, पर्यावरणाचे रक्षण, लोकशाही हक्करक्षण, जागतिक शांतता यांसारख्या सर्व चळवळींमध्ये ग्रामीण स्त्री प्रबोधन व संरक्षण हा भाग अविभाज्य मानला जावा; कारण ग्रामीण स्त्री अनेक वैचारिक रोगांपासून पीडित आहे.

ग्रामीण स्त्रियांची चळवळ ही एक स्वतंत्र, स्वयंगतीने चालणारे आंदोलन न बनता सर्व श्रमिक, शोषित, पददलित जनतेच्या आंदोलनाचा भाग बनायला हवी; कारण समाजातील इतर घटकांप्रमाणेच मानवी समाजाच्या इतिहासाच्या विशिष्ट टप्प्यावर स्त्रीची गुलामगिरी निर्माण झाली आहे; म्हणून स्त्रीच्या गुलामगिरीचा स्वतंत्र विचार करून मार्ग सापडणार नाही, तर सर्व शोषितांची मुक्तता होईल त्या वेळेसच स्त्रीच्या स्वतंत्र विकासाची वाट तिला मोकळी होईल.

स्त्रीपुरुषांतील कुटुंबांतर्गत विषमता हा बाहेरच्या सर्वांगीण विषमतेचा भाग होय. ग्रामीण स्त्रियांना दारिद्र्य, सतत काम, उत्पादन क्रियेत दुय्यम दर्जा आणि अपत्यसंगोपन, गर्भारपण यांमुळे फार हलाखीची परिस्थिती सहन करावी लागते. यावर अन्याय निवारणाचा सार्वत्रिक शाश्वत व हुकुमी मार्ग सापडणार नाही. तरीही अन्यायाची तात्त्विक, परंपरागत वैचारिक बैठक दूर करण्याचे प्रयत्न व्हायला हवेत.

तात्त्विक दृष्ट्या चूक म्हणून स्त्री–पुरुष संघर्ष हा स्त्री चळवळीचे मुख्य अधिष्ठान असता कामा नये. मात्र पाणी भरण्याचे काम करताना स्त्रियांची शक्ती व वेळ यांचा अपव्यय होतो, हेही लक्षात घेतले पाहिजे. आरोग्यविषयक सेवा वेळेवर मिळत नाहीत व शिक्षणाच्या संधी उपलब्ध होत नाहीत, स्त्रियांच्या नावावर मालकी हक्क म्हणून मालसुद्धा असत नाही. ह्यासारख्या बाबतीत स्त्री–पुरुष समानता प्रस्थापित व्हायला हवी.

ग्रामीण भागातील स्त्रियांचे प्रश्न हे वैयक्तिक गाऱ्हाणे म्हणून लक्षात घेतले जाऊ नये. स्त्रियांच्या सामूहिक गाऱ्हाण्यांबद्दल कृती करणें आवश्यक आहे. वैयक्तिक अन्यायाच्या केसेसवर लक्ष केंद्रीत न करता सामूहिक पातळीवर ते प्रश्न नेणें अधिक आवश्यक आहे. स्त्री–संघटनांनी या दृष्टीने विचार करायला हवा.

आर्थिक स्वातंत्र्य, स्त्री–पुरुष समान वेतन, स्त्रियांना कामाच्या संधी वाढविणें या दृष्टीने धोरणात्मक प्रयत्न केले जात नाहीत. खरे तर त्याशिवाय ग्रामीण स्त्रियांच्या विकासाला दिशा मिळणार नाही. स्त्रीमुक्ती विचाराचे पहिले पाऊल ग्रामीण स्त्रियांबाबत या दिशेने पडायला हवे. शहरापासून दूर असलेली खेडी आणि वस्त्या व तिथे असणाऱ्या स्त्रिया कित्येक शतके जगाच्या मागे आहेत. अशा भागात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची गरज आहे. त्यासाठी संघर्ष आवश्यक आहे. हजारो वर्षे दास्यात अडकून पडलेल्या स्त्रियांचे पाश आता कुजू लागले आहेत. ते तोडण्याचे काम सोपे नसले तरी प्रयत्नसाध्य आहे. स्त्रियांना गुलाम ठेवता येणार नाही. त्यांना दिशा द्यायला हवी. भारतीय स्त्री चळवळीने आता ग्रामीण भागाचा ध्यास घ्यायला हवा. स्त्री चळवळ ही सर्व शोषणविरोधी लढ्याचा एक अविभाज्य भाग असल्याने सभोवताली चाललेल्या लढ्याबद्दल अधिक संवेदनाशील राहून इतर शोषितांच्या चळवळीशी तिने दृढ अनुबंध निर्माण केले तरच सर्वंकष परिवर्तन घडवून स्वतंत्र होण्याचे ध्येय गाठणे स्त्री चळवळीला शक्य आहे.

□

२ आजचे स्त्री-जीवन

आजच्या स्त्री-जीवन समस्या

' पती चारित्र्यहीन, विषयासक्त आणि चांगल्या गुणांचा अभाव असला तरी पत्नीने त्याला देवासारखे मानावे. ' (मनू ५ – १५४)

' स्त्रियांनी आपल्या पतीची आज्ञा पाळावी, हाच त्यांचा परम धर्म होय. ' (याज्ञवल्क्य १ – १८)

' स्त्रीला स्वतंत्र यज्ञसंस्कार किंवा उपवास नाहीत. पतीची सेवा करूनच तिला स्वर्गामध्ये उत्तम स्थान मिळते. ' (मनू ५ – १४५)

' पती जिवंत असताना जी स्त्री उपवास करते आणि व्रते करते, ती आपल्या पतीचे आयुष्य कमी करते. ती नरकाला जाते. ज्या स्त्रीला तीर्थ हवे असेल तिने आपल्या पतीला स्नान घालावे किंवा त्याचे पाय धुवावेत आणि ते तीर्थ घ्यावे. तिला उत्तम लोकाची प्राप्ती होते. ' (अत्री १३६ – ३७)

' स्त्रीला पतीखेरीज दुसरा लोक नाही. जी स्त्री आपल्या पतीच्या मनाविरुद्ध वागते, ती मरणानंतर पतिलोकाला जाऊ शकत नाही; म्हणून तिने पतीच्या विरुद्ध कधीही वागू नये. ' (वासिष्ट २१ – १४)

' जी स्त्री आपल्या पित्याच्या कुळाचा अभिमान बाळगते आणि नवऱ्याची अवज्ञा करते, तिच्या हातचे अन्न कुणीही खाऊ नये. अशा स्त्रीला कुलटा समजावी. ' (अंगिरस ६९)

'जेंव्हा पती वाईट मार्गाला लागतो, दारुडा होतो किंवा रोगाने पिडला जातो तेंव्हा स्त्रीने त्याची अवज्ञा केली तर तीन महिन्यांपर्यंत तिचे दागदागिने व चांगली लुगडी काढून घेऊन, तिला दूर ठेवावी. ' (मनू १० – ७८)

ज्यांना स्त्रियांचे स्वातंत्र्य स्वतःच्या स्वातंत्र्याइतके प्रिय वाटते आणि जे स्त्रीला वंशमाता मानतात, त्यांना मुळीसुद्धा मान्य होणार नाही अशी वचने

स्मृतिग्रंथात आहेत. पण विसाव्या शतकात स्त्रीची स्थिती स्मृतिग्रंथातील वचनाप्रमाणे नसली तरी आधुनिक नवग्रहांच्या फेऱ्यात सापडलेली आहे. स्मृतिग्रंथातील वर उल्लेखलेली वचने आधुनिक संदर्भात पुढीलप्रमाणे मांडता येतील.

' पती चरित्र्यहीन चालेल; पण पत्नीने नैतिकता पाळली पाहिजे. पतीच्या चारित्र्यहीनतेकडे डोळेझाक करून संसाराचा गाडा ओढला पाहिजे. '

' स्त्रियांनी पुरुषाच्या आधाराशिवाय जगणे हा अधर्म आणि सामाजिक-दृष्टया अमान्यतेचा मार्ग होय. '

' कुमारी माता बनविणाऱ्या पुरुषाचे ' कर्तृत्व ' क्षम्य. कुमारी मातेची शारीरिक व मानसिक अवस्था म्हणजे भयंकर नरकवास आहे. '

' जी स्त्री विधवा होते, ती सर्व भौतिक सुखांपासून वंचित, धार्मिक, सांस्कृतिक व सण-समारंभात तिची उपेक्षा, विधवा पुनर्विवाहाचा कायदा होऊनही तिला लाजिरवाणे जिणे जगावे लागते.)'

' जी स्त्री पित्याच्या कुळाचा अभिमान बाळगते, तिला सासरच्या छळामुळे आजही ' मंजुश्री सारडा ' बनावे लागते. अशा अनेक ' मंजुश्री ' आजही टाहो फोडत स्वर्गवासी होत आहेत. '

' स्त्रियांची दुःखे व परवशता अजून संपलेली नाही. आजच्या पुरोगामी काळाचे बहुतेक फायदे लुटत असूनही आजच्या विवाहित (व अविवाहित) तरुणीला एक प्रकारची अगतिकता सहन करावी लागत आहे. '

' स्त्रियांचे सुखदुःख आजही विवाहात गुंतलेले आहे. '

' राजवाडे स्वच्छ ठेवण्यासाठी जशी गटारे, तशी समाजासाठी वेश्या. परमेश्वराने अत्यंत उदात्त हेतूने जी स्त्री निर्मित केली, तिला कामवासनेचे साधन करून पुरुषांनी नीच कोटीपेक्षा नीच कृत्य केले आहे. पण त्याचा पुरुषजातीला ना खंत, ना खेद. '

' स्त्री ही या जगात स्वतःकरिता अस्तित्वात नाही, ती पुरुषाकरिता आहे; तिचे व्यक्तित्व पुरुषसमर्पित आहे. ' या शब्दांत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यानी हिंदुस्थानी स्त्रीविषयक तत्त्वज्ञानाचे सार सांगितले आहे.

' गेल्या शे-दोनशे वर्षांत हुंड्याला ' जिझीया ' कराचे स्वरूप आले आहे. हुंड्याची पद्धत ही स्त्री दास्यत्वाचा दारुण आविष्कार आहे. समाज सुधारला पाहिजे, म्हणजे पुरुषी जुलमी मन सुधारले पाहिजे. ' असा विचार डॉ. चित्रा नाईक यानी व्यक्त केला.

' हुंडा घेणाऱ्या रानटी लोकांची एक स्वतंत्र जमात आहे. उपवर, सुशिक्षित रूपवान मुलींची लग्ने तहकूब होण्याचे मुख्य कारण म्हणजे हुंड्याची लिलावी

मनोवृत्ती होय,' असे मत प्रा. श्री. के. क्षीरसागरांसारख्या विचारवंतांनी व्यक्त केले.

'स्त्रियांचा प्रवास गर्भाशयातील अंधारातून थडग्यातील मृत्यूच्या अंधाराकडे एक अनंत अधांतरी यात्रा आहे. पंख छाटलेल्या जटायूच्या अवस्थेतून भारतीय स्त्री केव्हा बाहेर पडणार? मध्यमवर्गीय स्त्रीचे जीवन म्हणजे केवढी कंटाळवाणी गोष्ट.' ह्या शब्दांत आजच्या भारतीय स्त्रीचे वर्णन अमृता प्रीतम यानी केले आहे.

'बहुतेक सुशिक्षित स्त्रियांची अवस्था 'हर मास्टर्स व्हाईस' किंवा 'एको' अशी आहे. म्हणजे स्त्री-पुरुषातील समानता कागदोपत्री आहे.'

कमला भसीन लिहितात, 'लैंगिक जीवनात स्त्रीच्या इच्छेला किंमत नाही. तिच्या मालकाला वाटेल तेव्हा तिने समागमासाठी सज्ज असणे हा तिचा धर्म आहे; त्यामुळे लैंगिक संबंधाच्या बाबतीत विवाहित स्त्री-पुरुषांचे संबंध बाजारू स्वरूपाचे आहेत. विवाहित स्त्री अन्न, वस्त्र, निवारा यांच्या मोबदल्यात शरीर देते.'

सीमॉन दबॉयनेही असे मत मांडले की, 'अनिच्छेने केलेला समागम हा बऱ्याच वेळी बलात्कार ठरतो व त्याला अंत नाही. कित्येक नाराज नवऱ्यांनी आपल्या बायकांना शरीरसुख देत नाहीत म्हणून ठार मारल्याची उदाहरणे देता येतील.'

मानवेंद्रनाथ रॉय यानी स्पष्ट मत दिले आहे की, 'अनिच्छेने केलेल्या समागमाचे वैवाहिक जीवन म्हणजे कायदेशीर व्यभिचार आहे.'

'विवाहित स्त्री एक घर सोडून दुसऱ्या घरात जाते तेव्हा पित्याच्या तावडीतून पतीच्या तावडीत जाते. म्हणजे आज्ञापालन करायचे ती व्यक्ती बदलली. पतिनिष्ठा हा धर्म तिच्या माथी मारला जातो. पातिव्रत्याच्या कल्पनेची कीड भारतीय स्त्रीच्या डोक्यातून ब्रेनवॉश करून काढली पाहिजे,' असा विचार डॉ. प्रमिला कपूर आजही मांडताना दिसतात.

आज स्वातंत्र्याच्या देशात स्त्रीला घटनेने पुरुषांच्या बरोबरीने स्थान दिले आहे. सामाजिक, शैक्षणिक, वैवाहिक व धार्मिक बाबतीत तिच्यावर लादलेली अन्यायी विषमता आज घटनेने व कायद्याने दूर झालेली आहे. मात्र स्वातंत्र्य-लढ्यात हिरीरीने लढणारी ही स्वातंत्र्यसैनिक आता शांततेच्या काळात तितक्याच हिरीरीने व आत्मविश्वासाने कार्याला लागेल, स्त्री-जीवन कानाकोपऱ्यातूनही तरारून येईल अशी अपेक्षा होती; पण ती काही प्रमाणात खरी ठरली. साहित्य, संगीत, कला या क्षेत्रांत वैयक्तिक पातळीवर स्त्रियांनी मोठीच कामगिरी बजावली. त्यांच्या वैयक्तिक गुणवत्तेच्या कक्षा चांगल्याच विस्तारल्या. बुद्धिमत्तेच्या उच्च पातळीमुळे प्राप्त होणाऱ्या उच्च अधिकाराच्या जागा त्यांनी मिळविल्या. काहींनी

तर त्यांच्या त्यांच्या विवक्षित क्षेत्रात इतके उत्तम यश संपादन केले की, स्त्रीचे म्हणून नव्हे तर त्या क्षेत्राचे यश म्हणून ते भूषणास्पद गणले गेले.

परंतु या वैयक्तिक पातळीवरील प्रगतीने अखिल भारतीय स्त्रीच्या जीवनाची पातळी उंचावत नाही. शिवाय अशी प्रगती साधणाऱ्या स्त्रियांची संख्या अगदी नगण्य आहे. अखिल भारतीय सर्वसामान्य स्त्रीच्या जीवनाची पातळी उंचावण्यास सामाजिक उणिवा, अन्याय नाहीसे करण्याची तळमळ व विशेषकरून संघटित प्रयत्नांची आवश्यकता आहे; म्हणून वर उल्लेखिलेल्या क्षेत्रातील सर्वसामान्य स्त्रीजीवनाचा विचार सामान्य स्त्रीजीवन कुठे आहे, हे पाहण्यासाठी करायला हवा.

'स्त्री घडविताना त्वष्टाने चंद्रम्याचा गोलावा घेतला आणि वेलीचा कळसेदारपणा घेतला. तंतुकोंभांची लगट व तृणपात्यांची थरथर घेतली. वेळूंकडून शिडशिडपणा व फुलाकडून बहर घेतला. गवताचा हलकेपणा व हत्तीच्या सोंडेचा निमुळतेपणा घेतला. हरिणांकडून कटाक्ष घेतले. भुंग्यांचे थवे करून राहणें घेतले. सूर्यबिंबाचा आनंद घेतला. मोराकडून डामडौल घेतला. शुकाच्या वक्षस्थळाचा मुलायमपणा घेतला. वज्राचा कठोरपणा घेतला व मधाचा मधुरपणा घेतला. व्याघ्राचे क्रौर्य व अग्निज्योतीचा उदारपणा घेतला. बर्फाचा थंडावा घेतला व चिमण्यांचा चिवचिवाट घेतला. कोकिळेचे कुहूकुहू कुंजन घेतले, बगळ्याचे ढोंग घेतले व चक्रवाकाची प्रेमनिष्ठा घेतली आणि या सर्व गुणांचा सुरेख संगम करून त्याने स्त्री घडविली व पुरुषाकडे सोपविली.' असे वर्णन 'स्त्री : एक समाज-शास्त्रीय दर्शन' या पुस्तकाचे लेखक प्रा. गो. द. कुलकर्णी यानी केले आहे.

आजचे स्त्रीचे सामाजिक स्थान लक्षात घेताना किंवा विसाव्या शतकातील स्त्रीच्या दर्जाविषयक विवेचन करताना महत्त्वाची बाब अशी की, स्त्री ही पुरुषापेक्षा कनिष्ठ नाही हे मान्य झाले आहे. पुरुष स्त्रीपेक्षा शारीरिकदृष्ट्या अधिक बलवान असतो, हे तितकेसे बरोबर नाही. 'स्त्री–पुरुष यांच्यातील लिंगभेद निसर्गनिर्मित आहेत, परंतु स्त्री ही प्रथम मानवप्राणी व नंतर स्त्री आहे. त्या दृष्टीने ती श्रेष्ठच आहे.' डॉ. जॉन्सनने असे मत व्यक्त केले. एका फ्रेंच लेखिकेने एके ठिकाणी लिहिले आहे, 'स्त्री ही स्त्री म्हणून जन्माला येत नाही. ती संस्कारामुळे स्त्री बनते. थोडक्यात, स्त्री ही पुरुषाच्या बरोबरीने विविध क्षेत्रांत काम करू शकते हे मान्य झालेले आहे. परंतु सामाजिक दृष्ट्या स्त्रियांच्या बाबतीत स्त्री–पुरुष समानतेच्या न्यायाने वागणूक दिली जात नाही. आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक दृष्टीनेही स्त्रीला दुय्यम स्थान दिले जात असल्याने सर्वसामान्य स्त्री खऱ्या मानवी जीवनापासून वंचित राहिलेली आहे. अर्थात विसाव्या शतकातील भारतीय स्त्री पडदा पद्धतीचा अवलंब करणारी, चूल व मूल हेच कार्यक्षेत्र मानणारी, शिक्षणापासून वंचित राहिलेली नाही.'

सुमारे १८७५ पर्यंत समाज मात्र शतकाशतकांच्या गुलामी वागणुकीने इतका थंड, निश्चेष्ट झाल्यासारखा पडला होता की, त्याच्यात हात हलविण्याचे सामर्थ्य नव्हते; पण त्यानंतर विशेषत: भारतीय स्वतंत्र्यलढ्यात स्त्री सुधारणांच्या कार्यावरचे लक्ष उडाले तरी अन्यायाविरुद्ध असहकार, सत्याग्रह, हक्काची जाणीव वगैरेंची जागरूकता निर्माण झाली व स्वातंत्र्याच्या चळवळीत स्त्रियांनी पुरुषांच्या खांद्याला खांदा देऊन सत्याग्रहात उडी घेतली, लाठीचे वार सहन केले, अस्पृश्यांची सेवा केली, तुरुंगवास पत्करले आणि मुलेबाळे खांद्यावर घेऊन 'चले जाव'च्या चळवळीत भाग घेतला. १९२६ पासून स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने वावरू लागल्याने स्वातंत्र्यानंतर स्त्रीला घटनेने आपोआप समान दर्जा मिळाला. स्त्रिया शिक्षण घेऊ लागल्या. स्वातंत्र्यानंतरच्या काळात राजकारणात भाग घेऊ लागल्या, नोकरी करू लागल्या. स्वातंत्र्यानंतरच्या काळातही स्त्रियांच्या परिस्थितीत सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीयदृष्ट्या सुधारणा झाली, हे मान्य करावे लागते. हिंदू विवाह कायदा (१९५५), हिंदू वारसा हक्क कायदा (१९५६), हिंदू अज्ञान व पालकत्वाचा कायदा (१९५६), हिंदू दत्तक व पोटगी कायदा (१९५६) आणि गर्भपातविषयक कायदा (१९७१), हुंडाविरोधी कायदा व त्यात झालेल्या तरतुदीतील बदल (१९६१) वगैरे कायदे हे स्त्रीच्या जीवनात नवे पर्व उजाडल्यासारखे ठरावेत म्हणून करण्यात आले. स्त्रीच्या गुलामीचा, अंधारमय जिण्याचा काळ संपण्यासाठी ते करण्यात आले; पण कायद्यातील पळवाटा आणि हे सर्व कायदे सुशिक्षित व उच्चवर्णियांसाठी उपयुक्त ठरत आहेत; कारण कायद्याने हक्क मिळावयाचे झाले तर सर्वसामान्य स्त्रीने पैसे कुठून आणायचे ? तिला मदत कोण करणार ? माहेरी जायची बंदी; मग तिची हाक ऐकणार कोण? ती कोर्टामध्ये जायचे धैर्य कुठून गोळा करील ? शिक्षण नसल्याने सगळ्या बाबी ध्यानात घ्यायची कुवत कशी येणार ? वगैरे अनेक प्रश्न सर्वसामान्य, अशिक्षित, अर्धशिक्षित स्त्रियांच्या बाबतीत निर्माण होतात.

मात्र या कायद्यांमुळे ज्यांना शक्य आहे अशा स्त्रियांनी त्याचा फायदा करून घेतला व त्यामुळे त्या दिशेने वाटचाल करण्याचे प्रयत्न करणे उपयुक्त आहे, अशी स्त्रियांच्यामध्ये हळूहळू जागरूकता निर्माण होत आहे. मात्र ती मंद गतीनेच व मिळवत्या सुशिक्षित स्त्रियांच्यात अधिक आहे. भारतीय स्त्रीला राजकीय व आर्थिक हक्क विनासायास मिळाले. शिक्षणाची दारे खुली झाली आहेत; त्यामुळे स्त्रियांच्या संघटनांचे काम कधीच पाय रोवू शकले नाही. आजही स्त्रियांच्या संघटना सर्वत्र दिसून येत नाहीत. ज्याचशा संघटना शहरातच आहेत. शिवाय खेड्यातील स्त्री अद्यापही बहुतांशी असंघटित, अडाणी व बुजरी आहे. घरच्या कामाच्या कंटाळवाण्या वातावरणातून विरंगुळा वाटावा म्हणून स्त्रिया महिला

मंडळे काढत आहेत; पण सन्माननीय अपवाद वगळता, त्या ठराविक खाण्या-पिण्याचे, मनोरंजनाचे, सहलीचे, नवरात्र व हळदी-कुंकवाचे कार्यक्रम साजरे करताना दिसतात.

बहुसंख्य स्त्रिया गृहिणी म्हणून संकुचित जीवन जगत आहेत. अधिक उत्पादक व राष्ट्रीय उत्पन्नाच्या कार्यास हातभार लावणारे, व्यावसायिक स्त्री-पुरुषांच्या गरजा पुरविणारे उत्पादक कार्य करून भरीव व टिकाऊ स्वरूपाचे काम करावयास महिला पुढे येत नाहीत व त्यांना तशा संधीही उपलब्ध करून दिल्या जाण्यावर मर्यादा पडत आहेत. अगदी अलीकडच्या काळात अखिल भारतीय महिला परिषद देशव्यापी असली तरी तीही फारसे परिवर्तनाचे कार्य हाती घेताना दिसत नाही. आजच्या भारतीय स्त्रीच्या स्थानाचा विचार करताना सामाजिक स्थानातून उद्‌भवणाऱ्या विविध बाजू लक्षात घेणे आवश्यक आहे. त्या घेताना सर्वसामान्य स्त्री-जीवन व मध्यमवर्गीय स्त्रियांचा विचार प्रामुख्याने केला आहे. अखिल भारतीय स्त्रीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या स्त्रीच्या समस्यांचा ऊहापोह करण्याचा प्रयत्न आहे.

विवाहित स्त्रियांनी 'जगावे' कसे ?

मुंबईच्या धारावी येतील मिलिंदनगर येथे सरोजा नावाच्या तरुणीच्या खुनाची बातमी वाचली. तिच्या पतीने हातपाय बांधून, ड्रिलिंग मशीन घेऊन सरोजाच्या डोक्याला व हातापायांना भोके पाडून अमानुष रीतीने खून केला. अत्यंत क्रूरपणे पत्नीचा खून करणाऱ्या पतीचे हे कृत्य समाजाला लांच्छनास्पद बाब आहे. आजही स्त्रियांच्यावर असा अमानुष छळ करून मरण पत्करण्याची पाळी यावी हे पुरुषांच्या क्रूर मनाचे व शारीरिक सामर्थ्याचे हिडीस दर्शन होय, याची दखल समाजाने घ्यायला हवी. परपुरुषांच्याकडून स्त्रियांच्यावर होणाऱ्या अत्याचार व बलात्काराविरुद्ध संघटित होऊन, ठिकठिकाणी परिषदा व मेळावे घेण्यात आले. निषेध व्यक्त करण्यात येऊन अशा पुरुषांना कडक शासन व्हावे म्हणून आणि स्त्रियांना संरक्षण मिळावे या दृष्टीने विविध मागण्या करण्यात आल्या. समाजाने या समस्येला स्त्रियांच्या बाजूने पाठिंबा दिला व शासनानेही अशा पुरुषांना कडक शिक्षा करण्याच्या दृष्टीने कायदेशीर तरतुदींत पुढाकार घेतला आहे.

परपुरुषांच्या वासनांना बळी पडून आयुष्यातून उठणाऱ्या तरुणींना व अल्पवयीन मुलींना संरक्षणाची गरज आहेच; पण त्याचबरोबर पवित्र विवाहप्रसंगी मंगल सप्तपदी चालून संसारात पदार्पण केलेल्या आणि पतीला परमेश्वर मानून

आत्मसमर्पण केलेल्या तरुणींनाही संसारात होणाऱ्या मारहाणीची व शारीरिक आघातांची दखल खंबीरपणे घेण्याची गरज आहे. विवाह झाल्यानंतर काही वर्षांतच टिकट्वेंटी घेऊन, पेटवून घेऊन, विहिरीत पडून आत्महत्या केलेल्या विवाहित स्त्रियांच्या बातम्या आपण वाचतो. ती आत्महत्या खुशीची की सासरच्या मंडळींकडून होणाऱ्या आत्यंतिक जाचाची असहायता प्रकट करणारे ते अगतिक देहविसर्जन असते, असा प्रश्न पडतो. लग्नसमारंभातील मानापानाचे प्रश्न, हुंड्यावरून निर्माण झालेले वादंग, लग्नानंतर माहेरकडून पैसे व दागिने मिळविण्याची हाव, आई-वडिलांच्या इच्छेखातर नाइलाजाने त्या तरुणीशी केलेला विवाह; पत्नीच्या चारित्र्याचा संशय व त्यातून तिला कोंडून ठेवण्याचे व मारहाणीचे प्रकार इत्यादी कारणांनी विवाहित तरुणींना जीवन जगणे कठीण केले जाते.

नुकत्याच आलेल्या बातम्या पाहता, मुळशी तालुक्यातील पीड येथील शेतकऱ्याच्या मुलीला सासरी विहिरीत ढकलून दिले व तिने आत्महत्या केल्याचा बहाणा करण्यात आला. तसेच सातारा रोड येथील प्रेमनगर वसाहतीतील सौ. पूजा सेठीया ही बावीस वर्षांची विवाहित तरुणी जळून मेली. पूजाचे पती पैशाची वारंवार मागणी करीत असत व ती मेली त्या अगोदरच्या दिवशीही माहेरहून पैसे आणण्याचा तगादा नवऱ्याने लावला होता. मग ती अपघाती जळाली की जाळून मारली याविषयीची चर्चा करण्याची गरज नाही. पुण्याच्या शुभांगी बागला दोन मुले, पण सासूचा छळ व दोघींचे सतत भांडण होत असे. शुभांगी अचानक गंभीर आजारी झाली व बेशुद्ध असताना वडिलांशी न बोलता मेली. ही व अशी अनेक उदाहरणे समाजात पाहावयास मिळतात. मनाचा थरकाप होतो. विवाहित स्त्रियांच्यावर होणारे अन्याय व पारंपरिक जाचाच्या प्रवृत्तीला बळी पडणाऱ्या स्त्रियांची संख्या कमी का जास्त ? पूर्वीपेक्षा वाढलेली आहे की कमी झालेली आहे ? त्यांचाही दोष आहे की नाही ? हे प्रश्न गौण व फोल आहेत.

वर्तमानपत्रात येणाऱ्या बातम्यांवरून सासरच्या छळाला कंटाळून आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या स्त्रियांची संख्या अथवा प्रकार नेमके किती हे जरी आकडचांत सांगता आले नाही तरी ते प्रकार थांबविण्याच्या दृष्टीने सर्व स्तरांवर व घटकांच्याकडून प्रयत्न व्हायला हवेत याबद्दल दुमत नाही. सासरच्या मंडळींकडून व पतीकडून मारहाण होऊन मरणप्राय अवस्थेत त्या दवाखान्यात आणल्या जातात. काही जणी जाचाला कंटाळून आत्महत्या करतात, तर काही मारल्या जातात. उजेडात येणारी व वर्तमानपत्रांनी दखल घेतलेली अशी कृत्ये आसपास व समाजात चर्चिली जातात. संवेदनशील व मानवतेला मानणाऱ्या मनाला ती चटका लावणारी व माणुसकीला काळिमा फासणारी वाटतात. मात्र प्रतिष्ठित व बडचा कुटुंबात आणि आत्यंतिक गरीब घरात व खेडचात अशा घटना घडल्या

तरी त्यांची जाहीर वाच्यता होत नाही. कुटुंबाची लाज राखण्याच्या नावाखाली व प्रतिष्ठा सांभाळण्याच्या दृष्टीने दोन्हीकडची मंडळी अशा घटना दाबून टाकतात.

स्त्री शिक्षणाची प्रगती, स्त्रियांच्यातील हक्कांची जाणीव, स्त्रियांना लाभत असलेले आर्थिक सामर्थ्य, त्यांच्यात निर्माण झालेला स्वाभिमान, राहणीमानाच्या दर्जाविषयी वाढत चाललेल्या अपेक्षा, पुरुष वर्गाच्या पगाराचा अपुरेपणा, त्यातून पत्नीच्या आर्थिक सहाय्याची निर्माण झालेली गरज, त्यामुळे पुरुषांचा अहंकार कमी करण्याची त्यांची प्रवृत्ती इत्यादींची जोड मिळत चालल्याने स्त्रियांना व्यक्ति-स्वातंत्र्य मिळत आहे व व्यक्तिविकासाच्या संधी उपलब्ध होत आहेत असे मत व्यक्त केले जाते व सकृतदर्शनी ते खरे वाटत आहे. पण ते मत पूर्णपणे ग्राह्य व निर्विवाद सत्य नाही याचा अनुभव येत आहे; कारण स्त्रियांचे वाढलेले महत्त्व, उंचावलेले स्थान व दिले जाणारे स्वातंत्र्य हे फसवे आणि पुरुषप्रधान समाजाने स्वार्थाने देऊ केलेली व मान्यता पावत चाललेली लाच मानावी लागेल.

हल्ली स्त्रीचा शैक्षणिक दर्जा वाढला, तिचे व्यावहारिक शहाणपण वाढले आहे, आर्थिक बाजूनेही काहीजणी कुटुंबाच्या मिळकतीत भर टाकत आहेत. मुलांच्या संगोपनाची जबाबदारी घेण्यात त्या तत्पर ठरत आहेत. पोस्ट-बँका-विमा-रेशन-बाजार इत्यादींसाठी त्या बाहेर पडत आहेत. नोकरी करूनही संसार त्या समर्थपणे करू शकतात हे चाणाक्ष पुरुषांनी ओळखले आहे. पत्नी खऱ्या अर्थाने व बदलत्या परिस्थितीला सामोरे जाऊन समर्थपणे संसारात कृतिशील भागीदारी करू शकते हे लक्षात आल्यावर पतीने तिच्यावरच्या जबाबदाऱ्या वाढविल्या. स्वतःवरील जबाबदाऱ्या तिच्यावर ढकलून प्रसंगी महत्त्वाचे निर्णय घेण्याचीही व त्याच्या परिणामाला सामोरे जाण्याची कामगिरीही तिच्याकडे सोपविण्याचे मोठे मन दाखविण्यामागे स्वतःची जास्तीत जास्त सुटका करून घेण्याचा हेतू असतो. बायकोचा सल्ला घेऊन निर्णय घेतो असा आव आणून सल्ल्याच्या मोबदल्यात तिची सांसारिक फरफट आणखी वाढविली. अर्थात हाताच्या बोटावर मोजण्याइतके अपवाद शोधून सापडतील, पण बहुसंख्य कुटुंबात हीच स्थिती दिसते. पुरुष स्वतःचा अहंकार गिळून पत्नीला बरोबरीचा व कधी कधी श्रेष्ठ दर्जा दिल्याचा आव आणतो. तो बहाणा करतो; कारण खऱ्या अर्थी स्वतःच्या बरोबरीचे स्थान, स्वातंत्र्य व कामाच्या विभागणीत समानता देण्याची त्याची अजूनही तयारी नाही. पत्नीची बरोबरी वा श्रेष्ठत्व निरिच्छपणे, वैचारिक पातळीने व कृतीची जोड देऊन मानणारे पती समाजात फारच तुरळक कुटुंबांत दिसून येतात. किंबहुना बहुसंख्य पुरुषांना ते अजूनही न मानवणारे आहे, असे जाणवते.

कौटुंबिक जबाबदाऱ्यांविषयी तिचा जिव्हाळा कमी होत नाही ना ? शुद्ध

चारित्र्याची जपवणूक होते ना ? मित्र–मैत्रिणींचे वर्तुळ चांगल्या घरातले आहे का ? नातेवाईकांची तिला आस्था आहे ना ? वेळेची बंधने ती पाळते का ? पत्नी म्हणून सर्व प्रकारचे सुख देण्यात ती कमी पडत नाही ना ? याची तत्परतेने दखल घेणारे बहुसंख्य पुरुष पाहिले की समानतेचा व स्त्रियांचा दर्जा उंचावल्याचा दावा करणाऱ्यांनी वस्तुस्थितीची दखल घेतलेली नाही, असे वाटते. काही अंशी स्त्रियांचा दर्जा सुधारला असे सकृतदर्शनी वाटत असले तरी त्यांच्याकडे बघण्याच्या दृष्टिकोनात मूलभूत बदल झालेला आहे असे नाही. ' स्त्री ' हे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व न मानले जाता, तिच्याकडे पत्नी, बहीण, मुलगी, सासू वगैरे नात्यांच्या संदर्भातच पाहिले जाते. तिचे स्वतंत्र अस्तित्व मानले न जाता तिच्याकडे दुय्यम दर्जाने पाहिले जाते. जर ' स्त्री 'ला खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य दिले जात असते तर जन्माला येणाऱ्या मुलगा व मुलगीमुळे कुटुंबियांना सारखाच आनंद झाला असता. मुला–मुलींचे विवाह उशिराच केले असते, हुंडा पद्धती नष्ट झाली असती, सासू–सुनांच्या मताला व पती आणि पत्नीच्या विचाराला सारखेच महत्त्व मिळाले असते, परित्यक्ता अथवा घटस्फोटित स्त्री व विधुर पुरुष यांना समाजाने सारख्याच पातळीने जोखले असते. पुरुषांचा बाहेरख्यालीपणा न चर्चिला जाण्याची व स्त्रियांच्या बाबतीत त्याचा डोंगर करण्याची प्रवृत्ती बळावली नसती, नोकरी करून घरी येणाऱ्या स्त्रियांना व पुरुषांना सारखेच काम करण्याची अपेक्षा धरली गेली असती; पण असे चित्र दिसत नाही. त्यामुळे स्त्रियांचे स्वातंत्र्य, स्त्रीमुक्ती व स्त्री–पुरुष समानता ह्या मूल्यांची जपवणूक करण्याची तयारी समाज दर्शवीत नाही. अर्थात त्या दृष्टीने विचारआचार, कृती व्हावी म्हणून प्रयत्न होत आहे; पण त्याची गती मंद, मर्यादित व विशिष्ट समाजाशी निगडित आहे.

संस्कृतीची जपणूक करण्याची मक्तेदारी कुटुंबातील विवाहित स्त्रीकडे. पतीशी एकनिष्ठ राहण्याची नैतिकता तिने पाळायची, सासरच्या नातेवाईक मंडळींची मनं सांभाळण्याचं काम तिचं, मुलांना वळण लावण्याची जबाबदारी तिच्याकडे, रीतिरिवाज व देवधर्माच्या निष्ठा तिनेच सांभाळायच्या, अशा अपेक्षापूर्ततेच्या कसोटीत जेव्हा ती पतीच्या दृष्टीने उतरते तेव्हा तिची वाहवा होते. पण जराशी जरी कुचराई झाली व अपेक्षाभंग झाला तरी तिचे मानसिक खच्चीकरण सुरू होते. त्यास तिने विरोध दर्शविला की मारहाण करण्यास ती मंडळी मागे–पुढे पाहत नाहीत. परंपरागत विचारात, चाकोरीबद्ध वागणुकीत, पूर्वापार चालत आलेल्या कुटुंबरचनेत, सामाजिक पथ्ये व नैतिकेच्या कल्पना यांत केवळ कामापुरता सोयिस्कर बदल करून व एरवी ती त्यात फिट्ट बसावी अशी अपेक्षा असल्याने, नव्याशी जुळते घेत असताना जुन्या वळणाला टाकाऊ ठरविण्याचा मुभा नसल्याने व ते कठीण असल्याने विवाहित स्त्रियांना आत्यंतिक धावपळीला,

मानसिक द्वंद्वाला, शारीरिक ससेहोलपटीला व कौटुंबिक तणावाला तोंड द्यावे लागते; सहनशक्तीच्या पलीकडे संघर्ष गेले की, आत्मनाशाची पाळी येते, किंबहुना आणली जाते असे म्हणावे लागेल.

जागरूकता हवी

स्त्रीच्या आयुष्याचा मागोवा घेतल्यास तिच्या जन्मापासून ते मरणापर्यंत तिला दुय्यम स्थान व कनिष्ठ दर्जा दिला जातो. तिच्यावर पती म्हणून हक्क गाजविणाऱ्याची विचारसरणी त्याच धर्तीची असल्यामुळे कुटुंबातील अन्य मंडळीही त्या रीतीनेच तिला वागवितात. पत्नी म्हणून तिचे नवलाईचे दिवस संपले की तिच्यावर राग काढण्याचे वारंवार प्रसंग येऊ लागतात. लग्नातील मानपान, हुंडा, माहेरकडून प्रत्येक सणासाठी काहीतही प्रेझेंट आणण्याची तिला ताकीद, तिच्या वागणुकीविषयी नकळत तिरस्कार दर्शविण्याची पद्धती, घरकाम, नातेवाईकांची मने सांभाळताना विविध कारणांमुळे वारंवार खटके उडत राहतात व मारहाण सुरू होते. अशा वेळी माहेरच्या मंडळींनी सावध व्हायला हवे. लग्न करून दिलं की, मुलगी आपल्याला मेली अशी प्रवृत्ती असते; कारण विवाहित मुलीची चौकशी आई-वडील सतत करू लागले की सासरच्या मंडळींना ते खपत नाही. म्हणून त्यांची नाराजी ओढवून घेण्यापेक्षा मुलगी दिली तिथे आता जबाबदारी संपली अशा विचाराने तिची अधिक चौकशी केली जात नाही. दुसरे म्हणजे आपण फार खोलात शिरलो व तिची दुःखे जाणून घेतली आणि म्हणून तिला कायमचे माहेरी पाठवून दिल्यास काय करा ? अशा भीतीपोटी तिची अधिक दखल घेतली जात नाही. माहेरची श्रीमंती असूनही आई-वडिलांकडे जाणे म्हणजे आपण भार ठरू व नावडते होऊ म्हणून ती सासरी छळ सोसत राहते. त्यातून ती मोठी मुलगी असल्यास सासरी न नांदता ती माहेरी येऊन राहिलीय ही बाब इतर वहिणी व भावांच्या लग्नातील आडकाठी ठरते. त्यामुळे तर तिला सासरी छळ सोसूनही माहेरची दारे दूर ठेवावी लागतात. स्वतंत्र राहावे तर आर्थिकदृष्टचा स्वतःच्या पायावर उभे राहण्याची ताकद नसल्याने तिला प्रचंड कोंडमारा सहन करावा लागतो. सहनशक्तीच्या पलीकडे गेल्यास तिला मानसिकदृष्टचा जळत राहून नाइलाजाने मृत्यूला जवळ करावे लागते.

अशा परिस्थितीत आई-वडिलांनी मुलीची सासरच्या छळातून सोडवणूक करण्याच्या दृष्टीने खंबीर पावले उचलायला हवीत. मानसिक आधार देऊन आम्ही तुझ्या पाठीशी आहोत, अशी तिला धीर देण्याची भूमिका स्वीकारायला हवी. अशा विवाहित स्त्रियांना समाजाची सहानुभूती मिळणे आवश्यक आहे. परित्यक्ता, घटस्फोटिता म्हणून तिला आयुष्य काढावे लागणार असले तरी मारहाण, छळ,

खून यांतून तिची सुटका करणे व तिची बाजू नातेवाईक, शेजारीपाजारी यांनी उचलून धरण्याची गरज आहे. कष्ट करून जगण्याचा तिचा अधिकार नाकारला जाऊ नये.

सासरकडचा छळ निमूटपणे सोसून आपण संस्कृतीची जपणूक करतोय, आई–वडिलांच्या कुळाला बट्टा लावत नाही, खानदानाला गालबोट लावत नाही, स्त्री म्हणून जन्माला आलो तर नशिबात असेल ते भोगण्याची सहनशक्ती आपण दाखविली पाहिजे, अशा भूमिका घेऊन छळ सोशीत राहिल्याने सासरच्या मंडळींना फावते. या उलट अशा छळाला जागरूकतेने वेळीच विरोध केल्यास व त्यातून सुटका करून घेतल्यास स्वत:च्या पायावर उभे राहण्याचे मार्ग सापडू शकतात. जीव गमावून बसण्यापेक्षा कष्ट करून जगता येईल, असा उभारीचा व आत्मविश्वासाचा विचार केल्यास आत्मनाशाच्या आत्यंतिक टोकाला जावे लागणार नाही. छळ सोशीत राहण्यापेक्षा मानसिकदृष्ट्या खंबीर बनून आपण अप्रस्तुत व समाजाला अमान्य अशा चाकोरीतून जात नसून जगण्याचा न्याय्य मार्ग अवलंबीत आहोत असा विधायक विचार करावा. त्यांनी आपल्या विचाराशी ठाम राहून स्वत:ची सामाजिक, नैतिक प्रतिमा उजळ ठेवण्याचा पायंडा पाडावा म्हणजे सासरच्या मंडळींना धडा मिळू शकेल.

सासरी छळ सुरू असताना शेजारपाजारच्या मंडळींना आपल्या घरचा जाच कसा सांगावा, त्यामुळे घराण्याची अब्रू जाईल या पारंपरिक कल्पनांमुळे मारहाण सहन करीत, सुखाचा खोटा मुखवटा घेऊन आयुष्य घालवू नये. त्यांच्या या प्रवृत्तीमुळे मारहाणीची दखल शेजारीपाजारी घेत नाहीत. शेजाऱ्यांना विश्वासात घेऊन त्रासाची कल्पना द्यावी. शेजाऱ्यांनीही तो खाजगी मामला व घरगुती बाब म्हणून दुर्लक्ष करून तटस्थ राहणे उपयोगी नाही. अशा प्रश्नाविषयी एक सामाजिक कर्तव्य व शेजारधर्म म्हणून तिच्या छळाची कल्पना माहेरच्या लोकांना द्यावी. वेळ पडल्यास प्रसंगावधान साधून पोलिसांना खबर देण्याची काळजी घ्यावी. अशा कामासाठी द्यावा लागणारा वेळ, खर्च करावा लागणारा पैसा व शक्ती ही अपव्यय ठरणारी नसून, त्या निरपराध स्त्रीची मानसिक कोंडमाऱ्यातून आणि मारहाणीतून सुटका करण्यासाठी केलेले आत्मिक समाधानाचे काम समजावे.

तिसरे असे की, अशा समस्यांना वाचा फोडण्याचे काम सामाजिक संस्था, महिला मंडळे, तरुण मंडळे व सामाजिक कार्यकर्ते यांनी हाती घ्यावे. विवाहित स्त्रियांवर अन्याय करणाऱ्या व मारहाण करणाऱ्या कुटुंबांवर मित्रमंडळींनी व समाजाने बहिष्कार टाकला पाहिजे. त्यांच्या कृत्यांना सामाजिक निषेध म्हणून संघटित विरोध नोंदविला जावा, ती खाजगी बाब नसून स्त्रीला मारहाण व तिचा खून हा रानटी प्रकार सर्वांना लांच्छनास्पद बाब म्हणून उघडपणे व सामुदायिक-

रीतीने त्या प्रकाराला विरोध दर्शविण्याची गरज लक्षात घ्यावी. अशा कुटुंबांना सामाजिक बहिष्काराची झळ पोहोचली पाहिजे. भाववाढ, अत्याचार व बलात्कार; पाण्याची टंचाई, हरिजनांना मारहाण इत्यादी प्रश्नांसाठी मोर्चे काढले जातात; परिषदा घेतल्या जातात. त्याहीपेक्षा गंभीर असा विवाहित स्त्रियांचा प्रश्न हाती घेऊन आंदोलन उभारण्याची गरज आहे. म्हणजे त्याकडे शासनाचे व समाजाचे लक्ष वेधले जाईल. सामाजिक दबावाचे परिणामकारक हत्यार वापरायला हवे.

कठोर शिक्षेची तरतूद

एखाद्या विवाहित स्त्रीला विवाहानंतर चार–दोन वर्षांत मृत्यू आला तर तो नैसर्गिक की अनैसर्गिक याची छाननी व्हावी. ती होताना डॉक्टर मंडळींनी अत्यंत दक्ष राहिले पाहिजे. सरकारी दवाखाने व खाजगी हॉस्पिटलमधून याबाबतची काटेकोर छाननी व्हावी या दृष्टीने पद्धती ठरविली जावी. मारहाण करून बेशुद्ध अवस्थेत स्त्रियांना दवाखान्यात नेण्याचा क्रूर खेळ करणाऱ्यांना ताबडतोब पोलिसांच्या तावडीत दिले जावे. शिवाय कसल्याही प्रकारच्या मोहाला व दबावाला बळी न पडता मेडिकलचा वास्तव रिपोर्ट देण्याची खबरदारी घेतली जावी.

मारहाण करणाऱ्या सासूला तितकीच कठोर शिक्षा देण्याची कायदेशीर तरतूद असावी. या बाबतीत आत्महत्या करण्यास भाग पाडणाऱ्या व कारणीभूत ठरणाऱ्या व्यक्तींचा मागोवा घेऊन त्यांनाही कडक शिक्षा दिली जावी. बलात्कार व अत्याचार या बाबतीत कायदेशीर तरतुदीचा सखोल विचार पुणे, मुंबई व इतर ठिकाणी सामाजिक कार्यकर्त्या मंडळींनी, महिला मंडळे व वकील तज्ज्ञांनी केल्याचे दिसते. त्यामध्ये सुलभता यावी व पळवाटा राहू नयेत म्हणून विचारमंथन होऊन सूचना करण्यात आल्या. त्याचप्रमाणे कायद्याच्या क्षेत्रात तज्ज्ञ असलेल्या व गुन्ह्या-संबंधीच्या कामकाजात प्रत्यक्ष अनुभव घेतलेल्या वकीलमंडळींनी यात विशेष रस घेतला पाहिजे. विवाहित स्त्रियांना मारहाण करणाऱ्यांना व करण्यास कारणीभूत ठरणाऱ्यांना कठोर शिक्षा कशी होईल व परिस्थितिजन्य पुरावे देऊन ते कसे सुटणार नाहीत याचा गंभीरपणे विचार केला जावा. पोलिस अधिकाऱ्यांनी या बाबतीत अधिक दक्ष रहावे म्हणून विशेष सूचना व खास नियम करावेत. कायदेशीर व तांत्रिक बाबींचा विचार तज्ज्ञ मंडळींनी करावा की जेणेकरून स्त्रियांच्यावर होणाऱ्या शारीरिक अत्याचारांचा गुन्हा हा कठोर कारवाईस पात्र ठरेल. त्यामुळे मारहाण, खून वगैरे प्रकार करणाऱ्यांना कायदेशीर धाक वाटेल. शारीरिक छळ करणाऱ्या व कारणीभूत ठरणाऱ्यांना जबरदस्त शिक्षा देऊन दहशत बसेल या दृष्टीने कायद्यात प्राधान्य देण्यात यावे.

आधार देणाऱ्या संस्था

विवाहित स्त्रियांना होणाऱ्या मारहाणीची दखल घेण्याच्या दृष्टीने स्त्रीपुरुष कार्यकर्त्यांनी पुढाकार घेऊन समाजाला जागृत करावे.विचारमंथन होणाच्या दृष्टीने परिषदा, मेळावे, चर्चासत्रे आयोजित केली जावीत. तसेच वर्तमानपत्रे, मासिके व विशेषत: महिलांच्या मासिकांनी या प्रकारच्या घटनांना प्रकाशझोतात आणून, जाहीर दखल घेऊन विचाराला चालना देण्याचे कार्य करावे संघटित रीतीने केलेल्या प्रयत्नांमुळे विवाहित स्त्रिया सावध होतीलच; पण विवाहेच्छुक तरुणांनाही विचाराची दिशा मिळेल.

कायद्याने हा प्रश्न सुटू शकेल असे नाही; कारण न्यायालयीन बाबीत अनेक गुंतागुंतीचे व परस्परविरोधी मुद्दे उद्‌भवण्याची शक्यता नाकारता येत नाही. मारहाणीला कंटाळून सासरचा त्याग करणाऱ्या व घटस्फोट घेऊनही स्वतंत्र राहू इच्छिणाऱ्या स्त्रियांना केवळ माहेरचा आधार मिळून उपयोगी नाही. केवळ भावनेपोटी व दयादृष्टीने हा प्रश्न सुटणारा नसून त्यांना आर्थिक स्वातंत्र्य मिळायला हवे. नाहीतर आगीतून फुफाटचात अशी पाळी येईल. आर्थिक दृष्टच्या त्या स्वावलंबी व्हाव्यात म्हणून विविध सामाजिक संस्था व शासनाच्या समाज-कल्याण खात्याने पुढाकार घ्यायला हवा. त्यांना उत्पन्नाचा मार्ग सापडला की त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होईल. स्वतंत्र व्यवसाय करण्याची उमेद व कुवत असणाऱ्यांना या दृष्टीने सहाय्य मिळण्याची तरतूद व्हावी. अशा स्त्रियांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार सरकारी व निमसरकारी खात्यात नोकरीमध्येही प्राधान्य देण्यात यावे. शिवाय सामाजिक संस्थांनी अशा स्त्रियांच्यासाठी आधारगृहे व वसतिगृहे उभारण्याचे प्रयत्न करावेत. त्यांना कुणी फुकट पोसावे अशी अपेक्षा नाही; पण माहेरच्या घरी त्यांच्याकडे कुटुंबातील बोजा अथवा कुटुंबातील अनावश्यक घटक या दृष्टीने पाहिले जाणार नाही याकडे लक्ष द्यावे.

पूर्वीच्या काळी लहान वयात मुलींच्या पतीचे निधन झाल्यास त्या माहेरी येऊन राहत. माहेरी भावाच्या कुटुंबाच्या सर्व जबाबदाऱ्या उचलून त्या जिद्दीने आपला अधिकार प्रस्थापित करीत. त्यांच्याबद्दल घरात आदराची भावना असे. आजही बालविधवा स्त्रियांना माहेरी पूर्णपणे संरक्षण देऊन मानाने वागविल्याची उदाहरणे आढळतात. तशाच प्रकारे विवाहित स्त्रियांना संरक्षण व स्थान दिले जावे. त्या सासरचा त्याग करून आल्या तरी मारहाण, छळ, कष्ट यांतून सुटका करून घेण्यासाठी तो त्याग असल्याने त्यांना सर्वांची सहानुभूती मिळाली पाहिजे.

बालविवाह, हुंडा पद्धती, लग्न–समारंभातील मानपान, माहेरकडून सतत दागदागिने नेण्याची स्त्रियांची प्रवृत्ती, भौतिक सुखाची हाव, वृद्धांची अडगळ,

वाढती महागाई व नैतिकतेचा घसरलेला दर्जा, सामाजिक मूल्यांची घसरण व आदर्श व्यक्तींचा अभाव इत्यादींमुळे कुटुंबातील मंडळींमध्ये कृतज्ञता बुद्धी, सारासार विचार, सौहार्दाची भावना व त्याग प्रवृत्ती कमी होत आहे. दुसऱ्यांना समजून घेण्याची प्रवृत्ती कमी होऊन व्यक्तिस्वातंत्र्याच्या नावाखाली आडमुठेपणा वाढत आहे. सामंजस्याऐवजी संघर्ष, तडजोडीऐवजी तणाव, सहकार्याऐवजी विरोध, कौटुंबिक चौकटीतील स्वातंत्र्यापेक्षा मनमानी वागणूक करण्याची वृत्ती यांमुळे विवाहित स्त्रियांची संसारात चोहोबाजूंनी कुचंबणा होत आहे. त्यातूनच संसार असमाधानाचे, दुःखाचे व कष्टाचे ठरत आहेत. तशातच अतिरेक झाला तर स्त्रियांना आत्महत्येची वाट जवळ करावी लागते. कारण सर्व मनस्ताप तिच्यावर काढला जातो. पती, दीर, सासू, नणंद यांच्याकडून कसलाही दिलासा, भावनिक ओलावा व मानसिक आधार मिळेनासा झाला व तशातच मारहाण सुरू झाली की अशा स्त्रियांना जिवंत राहून रोज मरणयातना भोगण्यापेक्षा आत्मनाशाचा मार्ग सुकर वाटल्यास नवल नाही. ह्यातून त्यांची सुटका व्हावी म्हणून माहेरची मंडळी, नातेवाईक, शेजारी, महिला मंडळे, सामाजिक संस्था, स्त्री–मुक्ती चळवळीच्या कार्यकर्त्या, इतर समाजघटकांशी निगडित संघटना व प्रामुख्याने शासन यांनी कृतिशील राहावे. सामाजिक परिवर्तनाचे कार्य करणाऱ्यांनी या बाबतीत दक्ष राहण्याची गरज आहे.

चुरगळलेले वैधव्य : मरगळलेला समाज

गारगोटी येथील सुशीला भाट नावाची विधवा बाई. बाई म्हणण्यापेक्षा तरुणी म्हणणे जास्त उचित ठरेल. तीन लहान मुले दहा वर्षाच्या आतील, नवरा दारुड्या. दारूच्या व्यसनात जगला व मेला. मात्र सुशीलावर आकाश कोसळले. कसलाच आधार नाही. मुले जगावयाची कशी ? हा प्रश्न नवऱ्याच्या मरणाच्या दुःखापेक्षाही अधिक दुःख देणारा ! नातेवाईकांच्याकडून कोरडा उपदेश व शाब्दिक सहानुभूती-शिवाय कसलाच आधार मिळू न शकल्याने सतत चिंतेत. आमच्याकडे नियमित यायची. सुरुवातीला शासकीय मेसमध्ये स्वयंपाकाचे काम मिळवून दिले; पण चार महिन्यांत तेही सुटले. मग पोट भागेना. शेतात मजुरीला जायची. मूल लहान, तेव्हा एक मुलगा कोल्हापूरच्या अनाथ आश्रमात व दुसरा पाटगाव येथील आश्रमशाळेत ठेवण्यासाठी खटपट केली व त्यात यश आले. सध्या एक लहान मुलगा व दोन शेळ्यांसह एका खोलीत कशीबशी आयुष्य घालवीत आहे. मुलं मोठी होतील व सुख देतील या आशेवर जगत आहे.

अशा अनेक सुशीला आपल्या समाजात अत्यंत दिशाहीन व केविलवाणें जीवन

जगत आहेत.समाजात वैधव्यामुळे दुर्लक्षित व कनिष्ठ स्थान, आर्थिक परावलंबित्व, घरात नकोशी वाटणारी व्यक्ती या वेढचात सापडलेल्या अनेक विधवा मानसिक-दृष्ट्या आतून जळत असतात. सुशिक्षित व श्रीमंत कुटुंबांत विधवांना आर्थिक संकटांना व सामाजिक हेटाळणीला सामोरे जावे लागतेच असे नाही; पण मध्यम-वर्गीय व सर्वसामान्य बहुसंख्य कुटुंबांत विधवा स्त्रियांची स्थिती दयनीय असते. विधवांच्या प्रश्नाचा विचार करताना काही विशिष्ट, पवित्र मानलेल्या ठिकाणी विधवा मोठ्या संख्येने वास्तव्य करून राहत असल्याचे लक्षात येते.

केविलवाणी परिस्थिती

वृंदावन हे हिंदूंचे अत्यंत पवित्र तीर्थक्षेत्र. तिथे पांढऱ्या वेषात, केसांचे मुंडण केलेल्या, कृश व अशक्तपणामुळे आलेला पांढूरपणा अशा विधवा मोठ्या संख्येने राहत आहेत. पहाटे घाटावर स्नानास येऊन, देवाचे नाव घेऊन, आपल्या अस्ति-त्वाची जाणीव करून देणाचा प्रयत्न त्या करतात. या शहराच्या दुसऱ्या भागात भजन आश्रमात अनेकजणींचे वास्तव्य असून सकाळी चार तास व दुपारनंतर चार तास देवाचे नामस्मरण करण्याच्या सामुदायिक कार्यक्रमात त्या गुंतलेल्या असतात. प्रार्थना कामाचा मोबदला आठ-बारा आणे एवढाच. वर्षानुवर्षे हीच जगण्याची तऱ्हा. शाब्दिक अर्थाने केवळ जगणे. बाकी कसलाच अर्थ त्यांच्या आयुष्याला उरलेला नाही. वृंदावन ह्याच ठिकाणी विधवा स्त्रियांचे वास्तव्य आहे असे नाही तर दक्षिण भारतात, बंगाल, असाम, महाराष्ट्र या राज्यांतही धार्मिक पवित्र क्षेत्रे विधवांचा आधार ठरलेली आहेत.

भविष्यकाल अंधारमय असलेल्या वर्तमानकाळात समाजाच्या दृष्टीने भार ठरलेल्या अडाणी व अकुशल, शारिरीकदृष्ट्या दुबळ्या अशा विधवांची संख्या मोठी आहे. वृंदावन येथील देवळात व त्या परिसरात राहणाऱ्यांची संख्या ७,००० ते १०,००० आहे. वाराणसी येथे ती वीस हजार असून हरिद्वार, गोकुळ, गोवर्धन, अयोध्या व इतर पवित्र स्थळी त्या हजारोंच्या संख्येने वास्तव्य करून असल्याची माहिती उपलब्ध आहे.

समाजकल्याण खात्याने विधवांच्या संख्येविषयी जो अंदाज व्यक्त केलेला आहे, तो म्हणजे आपल्या देशात प्रतिवर्षी जवळ जवळ एक लाख स्त्रिया निराधार होऊन विधवांच्या वर्गीकरणात मोडल्या जातात. अर्थात खात्याच्या या अंदाजाबद्दल मतभेद आहेत; पण विधवांची संख्या फार मोठी आहे एवढे मात्र निश्चित. परस्वाधीन जिणे जगण्याची पाळी आणल्यामुळे परमेश्वराबद्दल त्यांना किती प्रेम वाटत असेल ? त्या भजनात त्या अंतःकरणापासून किती रमत असतील ? भक्ती, श्रद्धा या भावना किती प्रखर असतील ? हे व असे प्रश्न

अनुत्तरीत राहतात. केवळ कशीबशी गुजराण करण्यासाठी व समदुःखी म्हणून धर्मक्षेत्रे ही वास्तव्याचे ठिकाण एवढ्याच शुद्ध व व्यवहार्य हेतूने त्या राहत असतात.

कायदे व विधवा

सामाजिक सुधारणेतील महत्त्वाचे पाऊल म्हणून हिंदू विधवा पुनर्विवाह कायदा १८५६ साली करण्यात आला. आपला समाज व शासन कायदे करण्यात पुरोगामी आहे. मात्र १७७१ च्या शिरगणतीनुसार २३ दशलक्ष विधवा होत्या. म्हणजे एकूण स्त्री संख्येच्या १० टक्के स्त्रिया विधवा होत्या. यावरून विधवांची संख्या दुर्लक्ष करण्याइतकी लहान नाही, हे मान्य करून त्यांच्या प्रश्नाचा विचार गंभीरपणे करायला हवा. १९७१ च्या जनगणनेनुसार विधुरांची संख्या मात्र फक्त आठ दशलक्ष होती. यावरून शतकाहून अधिक जुना असलेला पुनर्विवाहाचा कायदा कागदावर राहिलेला आहे, असे दिसून येते.

विधवा स्त्रियांच्याबाबतीतील आणखी एक कायदा उपयुक्त ठरू शकतो. तो म्हणजे हिंदू वारसा कायदा. हा १९५६ साली करण्यात आला. हिंदू स्त्रीला या कायद्याने प्रथमच वारसा हक्क मिळाला. हा कायदा पास झाल्यानंतर एखादा हिंदू मृत्युपत्र न करता मृत्यू पावल्यास त्याची स्वकष्टार्जित मिळकत अगर वडिलोपार्जित इस्टेटीतील त्याचा हिस्सा हा त्याची पत्नी, मुलगे, मुली व आई यांच्यामध्ये वाटला जातो. तसेच त्याच्या मृत्यूपूर्वी त्याचा मुलगा अथवा मुलगी मृत्यू पावली असल्यास त्याच्या मुलांना अथवा वारसांना त्या मृत मुलाचा अथवा मुलीचा हिस्सा दिला जातो. बायकोला व मुलीला मिळालेला हिस्सा त्यांच्या पूर्ण मालकीचा असतो.

कायद्याने विधवांना आर्थिक संरक्षण मिळाले असले तरी कायद्याविषयीचे अज्ञान, दीर-सासू-सासरे यांच्या दबावामुळे कायद्याविषयी बोलण्याची चोरी, स्वतःच्या मुलाकरवी कायदेशीर वाटणी मागावी म्हटले तरी त्यासाठी भांडण करण्याची पाळी वगैरेंमुळे विधवांना त्वरित आर्थिक बाजूने आपला प्रश्न सोडविणे अत्यंत कठीण होते. त्या कायद्याने दिलेले संरक्षण सुशिक्षित व श्रीमंत विधवांना लाभदायी ठरले आहे; पण मध्यमवर्गीय अशिक्षित व ग्रामीण भागातील विधवांना हे बोलणे म्हणजे महाभयंकर बाब. 'काय बाईची धन्य हं. सोन्यासारखा नवरा मेला. संसाराची धूळधाण झाली. कुंकू पुसलं. जीवनाचं पोतेरं झालं. कायद्यानं वाटणी मिळवून ही पैसे उधळणार वाटतं. कशाला हवी पैशाची ऊब ? चार घास पोटाला व दोन लुगडी अंगाला, त्यासाठी एवढा खटाटोप कशाला ?' असे उद्‌गार ऐकून घ्यावे लागतात.

कमीत कमी गरजा व निरिच्छ जीवन हे विधवांचे नैसर्गिक जगणे असा आपल्या समाजाचा दृढ समज आहे. विधवा स्त्रियांनी विशिष्ट पद्धतीने जगले पाहिजे. समाजमान्य पथ्ये पाळून, तशी वर्तणूक ठेवून आयुष्य घालविले पाहिजे. त्यामुळे कायद्याला हात घालून स्वावलंबनाने व स्वाभिमानाने आनंद लुटण्याचे धैर्य त्यांच्यात येणार तरी कसे ? ते रुचणार तरी कुणाला ? तेवढे स्वतंत्र वृत्तीने व स्वयंपूर्ण पद्धतीने जीवन जगण्यासाठी रुळलेल्या वाटा व रीतिरिवाज मोडण्याचे धाडस त्यांच्यात येणार तरी कसे ? म्हणून प्रथम त्यांना आर्थिक स्वातंत्र्य मिळण्याची गरज आहे.

प्रतिष्ठित मोलकरीण

विधवा स्त्रिया ह्या घरातील मोलकरीण ठरतात. म्हणजे एकत्र कुटुंबात तरी त्यांचे तसे स्थान असते. जवळचे नाते असूनही त्यांना मोलकरणीचे जिणे जगावे लागते. लेकुरवाळ्या जाऊबाई, नणंदा व इतरही येणारे-जाणारे यांच्यासाठी कष्ट करीत राहावे लागते. लग्न-कार्य, बारसे-मुंज, धार्मिक व सांस्कृतिक विधी इत्यादींसाठी घराबाहेर पडून विसावा देणारी व मन रुजविणारी ठिकाणे त्यांच्याकरिता वर्ज्य असल्याने त्यांच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर मर्यादा पडतात. फक्त मंदिरात जाणे व भजनाच्या निमित्ताने त्यांना बाहेर पडण्याची संधी मिळते. पण रोज नाही तरी एकादशी, पौर्णिमा, चतुर्थी अशा ठराविक दिवशी त्यांना बाहेर पडण्याची मुभा असते. शिवाय बाहेरच्या माणसांदेखत खोटी स्तुती व इतर वेळी टाकून बोलणी सहन करावी लागतात. अशा कोंडीत सापडून त्या घराबाहेर पडल्यास आर्थिक दृष्टचा हाल सहन करावे लागतात. समाजाकडून नको ते आरोप सहन करण्याची तयारी ठेवावी लागते. इतरही सज्जनपणाचा बुरखा घेतलेल्या लोकांच्याकडून त्यांच्या असहाय्यतेचा फायदा घेतला जाण्याचा संभवही असतो; त्यामुळे बहुसंख्य विधवांना इकडे आड, तिकडे विहीर अशी कोंडी सहन करावी लागते.

समाजाकडून उपेक्षा

अत्यंत सुशिक्षित व स्त्री-स्वातंत्र्याला मान्यता दिलेल्या कुटुंबातही हळदी-कुंकू समारंभ होतात; पण त्याला विधवा स्त्रियांना आमंत्रित करण्याचे धाडस केले जात नाही. म्हणजेच सामाजिक दृष्टचा पतीचे मरण हा पत्नीचा गुन्हा किंवा पाप असेच समजले जाते. धार्मिक, सांस्कृतिक कामात विधवांचा सहभाग समाजाने मान्य केलेला नाही. लग्न-मुंज-बारसे, हळदी-कुंकू, सत्यनारायण, गृहप्रवेश व वास्तुशांती, ओटीभरण वगैरे कार्यक्रमात त्यांची उपस्थिती अनावश्यक मानली जाते व असलीच तर इतरांच्याकडून नाक मुरडून व कपाळाला आठ्या घालून,

नापसंतीदर्शक उद्‌गार ऐकण्यासाठीच, तेव्हा येणाऱ्या कटू अनुभवामुळे त्या अशा कार्यक्रमाचा धसका घेतात. त्यामुळे त्यांचे जग मर्यादित राहते. समाजाचा एक घटक म्हणून जगण्यावर अनेक बंधने आल्याने त्यांची मानसिक कुचंबणा होते. आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र नसलेल्या विधवांना तर आयुष्यात सामाजिक स्थान मिळतच नाही; पण कुटुंबातसुद्धा त्यांची सर्व प्रकारची कुचंबणा केली जाते. नीतिमत्तेच्या बाबतीत त्यांच्यासाठी अलवचिक निकष लावले जातात. चारित्र्याबद्दल कोणतेही, कसलेही बिनबुडाचे आरोप प्रौढांच्या बाबतीतही केले जातात. पतिनिधनानंतर परपुरुषाशी बोलणे, त्याची मदत घेणे म्हणजे महाभयंकर गुन्हा होय. परिणामी त्यांना पदोपदी फार विचारपूर्वक वागणे भाग पडते.

ज्या भारतीय संस्कृतीचा आपण उदोउदो करतो, ज्या संपन्न वेदवाङ्मयाचा व रामायण–महाभारतासारख्या अमूल्य ग्रंथांचा आम्हास अभिमान वाटतो व ज्या विधवाविवाह करणाऱ्या महर्षी कर्व्यांचे आज आपण गुणगान करतो, त्याच भूमीत विधवांना गुराढोराप्रमाणे जीवन जगणे भाग पडते. तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी अर्धपोटी व नीरस जीवन जगावे लागत आहे. विधवांशी पुनर्विवाह करून त्यांना सामाजिक स्थान व संरक्षण देण्याची पुरुषांची तयारी नसतेच. अशा विवाहास जे पुरुष तयार होतात त्यांच्याही बाबतीत त्यांच्याविषयी वाटणारी कणव व त्याच्यावर उपकार म्हणून आयुष्यभर त्या ओझ्याखाली दासी म्हणून जगविता याव्यात या दृष्टीनेच. अर्थात काही अपवाद असतात. श्रीमंत, त्यातल्या त्यात तरुण व देखणी, शिवाय नोकरी करणारी विधवा असल्यास तिचा विवाह सहजी जमू शकतो. गरीब, मध्यमवर्गीय व अर्धशिक्षित विधवांना स्वीकारण्याची तयारी दर्शविणारे विरळे.

काही उपाय

विधवांच्या प्रश्नांचा सरसकट विचार करणे शक्य नाही; कारण अपत्य असलेल्या व अपत्यहीन, गरीब व श्रीमंत, नोकरी करणाऱ्या व न करणाऱ्या; सुशिक्षित व अशिक्षित अशा परिस्थितीनुसार त्यांच्या प्रश्नाचे स्वरूप बदलत जाते. शिवाय तरुण, प्रौढ व उतार वयात आलेल्या वैधव्यानुसारही त्यांची परिस्थिती बदलते. मात्र एका बाबतीत एकवाक्यता आढळते; ती म्हणजे कोणत्याही विधवा स्त्रीला लग्नकार्यात प्रत्यक्ष सहभाग नाकारला जातो. हळदी–कुंकू समारंभांना तिची उपस्थिती वर्ज्य मानली जाते. गृहप्रवेश व एखाद्या अशाच स्वरूपाच्या मंगल प्रसंगी त्यांची हजेरी अनावश्यक ठरते.

उच्चशिक्षित व परदेशी जाऊन आलेल्या स्त्रियासुद्धा आपल्या घरी आलेल्या विधवांना इतर विवाहित मैत्रिणींच्याबरोबर कुंकू लावण्याच्या बाबतीत टाळतात; म्हणजे त्या विधवा मैत्रिणीच्या उपस्थितीमुळे कुणालाच तो प्रसंग

'एन्जॉय' करता येत नाही. अर्थात कुंकू हे सौभाग्याचे प्रतीक आहे की नाही ? विवाहित स्त्रियांनी कुंकू लावावे की नाही ? विधवांनी कुंकू न लावण्यासारखे काय आहे ? असे वादाचे मुद्दे बाजूला ठेवले तरी चारचौघींत असताना विधवेव्यतिरिक्त उरलेल्या स्त्रियांना कुंकू लावून त्यांचा निरोप घेणे क्रूरपणाचे ठरेल. हळदी-कुंकू समारंभ झोकात केले जातात. श्रीमंतीचे प्रदर्शन करण्याची संधी घेतली जाते; पण जीवश्च-कंठश्च विधवा मैत्रिणीला बोलविण्याचे विचार त्या समारंभप्रिय गृहिणीच्या मनाला शिवत नाहीत. मनाची श्रीमंती व विचारांचे वैभव त्यांच्याजवळ नसते; अर्थात सामाजिक रूढी व परंपरांविरुद्ध जाण्याचे धाडस नसल्याने पिढ्यान्-पिढ्या त्या प्रथा पाळल्या जातात. तेव्हा अशा समारंभातून विधवा स्त्रियांची मने दुखवली जातात. तेव्हा एक तर ते करण्याची गरज आहे काय ? याचा शास्त्रीय, वैज्ञानिक व तर्कसंगत दृष्टीने विचार व्हावा म्हणजे असा भेदभाव करण्याचा प्रसंगच येणार नाही.

विधवांच्या प्रश्नाचे स्वरूप कळण्याच्या दृष्टीने व त्यावर उपाय योजण्यासाठी नेमका आधार म्हणून त्यांच्याविषयीची आर्थिक परिस्थिती, निश्चित माहिती उपलब्ध होणे जरुरीचे आहे. हे काम किचकट खरे व संख्याही मोठी असल्याने खर्चिक आहेच; पण सरकारने ते करण्याचे ठरविल्यास अडचण नाही. शिरगणती-मध्येच गोळा केलेली आकडेवारी उपयुक्त ठरणार नाही तर अपत्य, विनाअपत्य, नोकरी करणाऱ्या व न करणाऱ्या, आर्थिकदृष्टचा स्वावलंबी व परावलंबी या व अशा प्रकारची माहिती गोळा करणे जरुरीचे आहे. संशोधनाच्या पद्धतीत व प्रशिक्षित कर्मचाऱ्यांच्यामार्फत ती गोळा केली जावी. गरज वाटल्यास अर्थ-शास्त्रीय व सामाजिक समस्यांच्या संशोधन कार्यात रस असणाऱ्या संस्थांवर ही जबाबदारी सोपवून त्यांना आर्थिक सहाय्य द्यावे. विशेषत: धार्मिक, पवित्र क्षेत्रांच्या ठिकाणी निराधार जीवन कंठणाऱ्या विधवांच्यासंबंधी विश्वसनीय व सर्वसमावेशक माहिती गोळा केली जावी.

कायद्याचे ज्ञान खेडोपाडी पोहोचवा

हिंदू पुनर्विवाह कायद्याचे आणि विशेषत: वारसा हक्क कायद्याचे ज्ञान अशिक्षित व ग्रामीण भागात राहणाऱ्या विधवांपर्यंत पोहोचेल या दृष्टीने प्रयत्न केले जावेत. नुसती माहिती देऊन व तोंडी प्रसार करून उपयोग नाही तर या दृष्टीने नियमित मार्गदर्शन व्हावे व कायदेशीर सल्ला मिळावा या दृष्टीने सरकारने विशिष्ट खात्यावर जबाबदारी सोपवावी. किमान तालुका पातळीवर ही केंद्रे प्रस्थापित व्हावीत. शिवाय महिला संघटना, महिला ॲडव्होकेट, शिक्षिका व ग्रामसविका, समाज कार्यकर्त्या, ऑनरी मॅजिस्ट्रेट म्हणून काम करणाऱ्या व करणारे,

भजनी मंडळे व महिला मंडळे यांचे पदाधिकारी, आश्रमांचे चालक, पब्लिक ट्रस्ट संस्थांचे अध्यक्ष वगैरे मंडळींनी या कायद्यांची परिपूर्ण माहिती स्वत: घेऊन विधवांपर्यंत ती पोहोचविण्याची सामाजिक जबाबदारी स्वीकारावी.

शिवाय दीड–दोन वर्षांपूर्वी तालुका पातळीवर कायदेशीर मोफत सल्ला व सहाय्य मंडळ स्थापन करण्यात आलेले आहे. गारगोटी येथे हे मंडळ इस्टेटीच्या वाटणीवरून व दिवाणी स्वरूपाच्या सर्व अडचणींविषयक सल्ला देण्याचे व मध्यस्थी करून तंटे मिटविण्याचे व कोर्ट–कचेऱ्याचा खर्च न होईल या दृष्टीने मध्यस्थीचे कार्य उत्तम रीतीने करीत आहे. त्या मंडळामध्ये स्त्री प्रतिनिधी म्हणून एक महिला सदस्यही आहे. ह्या मंडळाने वारसा हक्क व इतर स्वरूपाच्या विधवा स्त्रियांच्या अडचणींचा सहानुभूतिपूर्वक विचार करावा.

ज्यांना अपत्य नाही व उत्पन्नाचा मार्ग उपलब्ध नाही, पण शारीरिक कष्ट करण्याची तयारी आहे, त्यांना काम देण्याचे प्राधान्यपूर्वक प्रयत्न करावेत. शासनाच्या विविध खात्यांमध्ये काम देण्याचे धोरण स्वीकारावे. प्रश्न असा आहे की, आपल्या देशात बेकारीची समस्या गंभीर बनत असताना विधवांना नोकरी द्या म्हणणे म्हणजे धाडसाचे व अप्रस्तुत वाटेल; पण सरकारी, निम्न सरकारी व संबंधित संस्थांच्यामध्ये अकुशल व अर्धवेळ स्वरूपाची कामे देऊन त्यांना आर्थिक स्वावलंबन व स्वातंत्र्य देण्याचे प्रयत्न व्हायला हरकत नाही. किमान सहानुभूतिपूर्वक विचार करायला कुणाचीही हरकत नसावी. निराधार विधवांची संख्या फार मोठी नसल्याने तेवढी जबाबदारी शासनाने उचलण्यास हरकत नाही.

महिला मंडळे, क्लब्ज, पब्लिक ट्रस्ट संस्था (उदा. कोल्हापुरातील कोरगावकर आणि वालावलकर ट्रस्ट या दोन समर्थ संस्था), सामाजिक सुधारणा व परिवर्तनाचे कार्य करणाऱ्या ऐच्छिक संस्थांनी या बाबतीत विचार करण्याची गरज आहे. हा विचार करताना आर्थिक सहाय्यच विचारात घेतले जावे असे नाही तर त्यांच्याबाबतीत सामाजिक बांधिलकीच्या दृष्टिकोनातून वातावरण निर्मिती करण्याची गरज महत्त्वाची मानावी. विधवांकडे दुर्लक्ष करून, त्यांच्याविषयीच्या नीतिमत्तेच्या कल्पना अधिक ताठर करून विनाकारण संशयाच्या आधारे त्यांना दबावाखाली जगण्यास भाग पाडण्याची प्रवृत्ती समाजामध्ये बळावणार नाही, या दृष्टीने विचार मांडण्यात पुढाकार घ्यावा. त्यांना सुसह्य व आनंदी जीवन जगण्याचा हक्क नाकारण्याचा अधिकार समाजाला नाही हे पटवून देण्याची व रूढी-परंपरेच्या निकषांचा फोलपणा दाखवून देण्याची जबाबदारी त्यांनी स्वीकारावी. एखाद्या महिला मंडळाने आपल्या मंडळात असलेल्या विधवांच्या अनुभवकथनाचे कार्यक्रम ठेवून त्यांनी आपली वैचारिक गुलामगिरी सोडून

दिल्याने त्यांचे जीवन कसे आनंददायी बनले, याविषयीची माहिती सर्वांना करून द्यावी.

पुनर्विवाह झालेल्या विधवांचे संसार किती सुखकारक झाले आहेत हे दाखवून देण्यासाठी त्या दांपत्यांच्या मुलाखती, ओळख व माहिती टी. व्ही., वर्तमानपत्रे, मासिके व रेडिओवर प्रसारित केली जावी. त्याचा काही अंशी इष्ट परिणाम नक्कीच होईल. निदान त्या दिशेने विचार करण्याची प्रवृत्ती संबंधितांमध्ये निर्माण होईल. विधवा स्त्रियाही त्या दृष्टीने विचार करण्यास उद्युक्त होतील. वृंदावन, गोकर्ण, हरिद्वार वगैरे ठिकाणी ज्या विधवा वास्तव्य करून आहेत, त्यांच्याविषयी आज परिपूर्ण माहिती उपलब्ध नाही; त्यामुळे त्यांचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने नेमका विचार मांडणे कठीण आहे. शिवाय त्या वातावरणात मानसिक दृष्ट्या त्या समाधानी आहेत की नाहीत याचाही विचार करायला हवा. एक मात्र निश्चित की, वार्धक्य व काम करण्याची शारीरिक असमर्थता असलेल्यांची व अपत्यहीन विधवा स्त्रियांची आर्थिक जबाबदारी सरकारने उचलली पाहिजे.

उत्तर प्रदेशात सरकारने काम करू न शकणाऱ्या विधवांना महिन्याला तीस रुपये आर्थिक सहाय्य देण्याची योजना कार्यान्वित केली आहे. समाजातील ह्या दुर्बल घटकासाठी इतर राज्यांनी अशीच आर्थिक सहाय्य योजना सुरू करण्यास हरकत नाही. शक्यतो कामाशिवाय मोबदला किंवा फुकट आर्थिक सहाय्य देण्याचे धोरण आपल्या देशाला परवडण्यासारखे नाही; तरीही निराधार व शारीरिक कष्ट करण्यास अपात्र असलेल्यांची किमान आर्थिक तरतूद करण्याची जबाबदारी स्वीकारणे हे सामाजिक बांधिलकीचे द्योतक मानले जावे. अशा विधवा स्त्रियांवर होणारा खर्च अनार्थिक व अनाठायी ठरणार नाही व तसे वाटण्याची गरज नाही.

गारगोटीमध्ये असलेल्या सुशीलासारख्या अनेक विधवा स्त्रिया खेड्यात आहेत. त्यांना आर्थिक आधार देण्याचे प्रयत्न व्हावेत. महाराष्ट्रात रोजगार हमी योजना राबविली जाते, त्यामध्ये त्यांना प्राधान्य देण्यात यावे. तसेच हल्ली बँकांमार्फत विविध प्रकारच्या सहाय्य योजना कार्यान्वित केल्या जात आहेत. म्हैस, कोंबड्या व इतर लघुव्यवसायासाठी कर्जे दिली जात आहेत. तेव्हा अशा संस्थांनी विधवा स्त्रियांना प्राधान्य देऊन विनाविलंब मंजुरी द्यावी. तसेच आर्थिक सहाय्य, अनुदान अशा योजना ज्या ज्या संस्था व खात्यामार्फत राबविल्या जातात, त्यांनीही गरजू विधवा स्त्रियांचा सहानुभूतिपूर्वक विचार करावा. संजय गांधी निराधार योजना राबविली जात आहे. बेघरांना घरे दिली जात आहेत.

त्यांचा लाभ गरजू व निराधार व्यक्तींना मिळावा व त्यामध्ये अशा स्त्रियांचा विचार अग्रक्रमाने व्हावा.

सुशिक्षित स्त्रिया या ना त्या कारणाने संघटित होत आहेत. बलात्कारासारख्या अमानुष प्रकाराविरुद्ध उठाव केला जात आहे. स्त्रीस्वातंत्र्याचा प्रश्न प्रधान मानून, समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेतील एक अविभाज्य टप्पा समजून चर्चा केली जात आहे. अशा परिस्थितीत विधवा स्त्रियांचा प्रश्न महत्त्वाचा मानून, तो सोडविण्याच्या दृष्टीने शासनाने पुढाकार घ्यावा म्हणून सामाजिक उठाव व दबाव आणणे जरुरीचे आहे. अशा स्त्रियांना आर्थिक स्वावलंबन प्राप्त झाले पाहिजे, रूढीपरंपरेनुसार त्यांच्याकडे बघण्याचा पारंपरिक दृष्टिकोन बदलला पाहिजे, स्वतंत्र समाजघटक म्हणून त्यांना मान्यता मिळाली पाहिजे या दृष्टीने विचार, कृती, कार्यक्रम हाती घ्यायला हवेत. त्यासाठी आंतरराष्ट्रीय महिला वर्ष हवे असे मुळीच नाही.

घटस्फोटाचा प्रश्न

अलीकडच्या काळात सुशिक्षित व समंजस स्त्री-पुरुषांना विवाहविच्छेद किंवा घटस्फोटाची आवश्यकता पटत चालली आहे. नवऱ्याचे संरक्षण असून–नसून सारखेच झालेल्या अनन्यगतिक परित्यक्तांना घटस्फोटाचा मार्ग खुला करून देऊन, नवा संसार इच्छेनुरूप मांडण्याची त्यांना परवानगी देणे हे न्याय्य असून असे न करणे निव्वळ माणुसकीला सोडून वागणे आहे; असे अनेकांना वाटू लागले आहे; परंतु अजूनही घटस्फोट म्हणजे स्त्रीमुक्तीचे फॅड डोक्यात घेतलेल्या अट्टाहासी व एककल्ली स्त्रियांनी घेतलेला निर्णय अशी काहीशी प्रतिक्रिया ऐकू येत राहते. 'जुळवून घ्यायला हवं होतं,' 'उगाच ताणायला नको होतं' या व अशा तऱ्हेचे उद्‌गार आणि घटस्फोटित स्त्रियांविषयीची कुत्सित काळजी घेणारी मंडळीही समाजात दिसतात. समाजसुधारक मंडळींना, जुन्या विचाराने भारलेल्यांना, स्त्रीकडे अनाथ, अबला, आधारानेच जगू शकणारी या दृष्टीने पाहणाऱ्या मंडळींना घटस्फोट घेणाऱ्यांबद्दल (स्त्रियांच्याबद्दल नव्हे) शंका वाटतात. पहिले म्हणजे घटस्फोटाचा कायदा झाल्याने कुटुंबसंस्था मोडकळीस येईल, स्त्रिया मुक्त होऊन वरचेवर घटस्फोट मागणाऱ्यांच्या संख्येत वाढ होईल. पाश्चात्त्य देशात आज घटस्फोटाचे प्रमाण किती वाढत आहे हे आकडे पाहिले असता आपल्याही देशात घटस्फोट घेणाऱ्यांचे प्रमाण वाढेल व अनाचार, स्वैराचाराला कायदेशीर स्वरूप मिळाल्याने समाजस्वातंत्र्यातून विघटनाची परिस्थिती निर्माण होईल.

दुसरी काळजी अशी की, घटस्फोट घेतलेल्या जोडप्यांच्या अपत्यांचे संगोपन

व वाढ योग्य रीतीने होण्यात अडचणी येतात हे लक्षात घ्यावे. किंबहुना त्याचा गंभीरपणे विचार करून विवाहित स्त्रीने घटस्फोटाची शक्यता व निर्णय टाळावा. अशा कुटुंबातील मुलांच्या जोपासना चिंतेतून घटस्फोटाबद्दल आणि विशेषत: अशा स्त्रियांबद्दल कडवट उद्‌गार ऐकू येतात.

तिसरी चिंता अशी की, स्त्री ही परावलंबी आहे. आजच्या समाजात एकटी 'बाईमाणूस' कशी राहील ? समाजकंटक तिला तसे जगू देणार नाहीत याचे भान तिने ठेवायला नको का ? घटस्फोट घेऊन मोकळी झाल्यावर तिच्या पोटा-पाण्याची व्यवस्था करून घेण्यास ती खंबीर बनेल काय ? या व अशा प्रश्न-चिन्हांतून स्त्री ही स्वतंत्र, स्वावलंबी व स्वयंपूर्ण असू शकत नाही, हा विचार करून, घटस्फोटानंतर तिची दैन्यावस्था वाढेल, शोचनीय परिस्थिती होईल म्हणून घटस्फोट शक्यतो समाधानी व सुखाचा मार्ग ठरणार नाही, अशीच मते व्यक्त केली जातात. विशेषत: स्त्रियांनी घटस्फोटाच्या बाबतीत पुढाकार घेऊ नये, सोसत राहावे, झिजत राहावे, सहन करावे अशा वृत्तीतून हे चिंतेचे उसासे.

हिंदू विवाह कायदा १९५५-५६ मध्ये करण्यात आला आणि हिंदू विवाहित स्त्रीला नको असलेल्या नवऱ्याच्या मगरमिठीतून सुटण्याचा कायदेशीर मार्ग उपलब्ध झाला. घटस्फोटासंबंधीच्या नियम व तरतुदीबद्दलचा विचार करण्यापूर्वी वरील तीन पद्धतींनी घटस्फोटाबद्दल चिंता करणाऱ्यांच्या चिंतेला चिंतनाने उत्तरे देता येतील.

पाश्चात्त्य देशातील घटस्फोटाचे आकडे वाचले की भीतिदायक व निराश-जनक असे विचार मनात येणे स्वाभाविक आहे. अत्यंत क्षुल्लक कारणावरून घटस्फोट घेऊन लग्न हा भातुकलीचा खेळ ठरत चालला आहे. घटस्फोटांचे वाढते प्रमाण पाहिल्यानंतर, पाश्चात्त्य देशातील चित्र डोळ्यांसमोर येऊन घटस्फोटाच्या कायद्यामुळे कुटुंबसंस्था मोडकळीस येईल असे वाटते. बेजबाबदारपणे लग्न ठरविणे अथवा मोडणे अथवा घटस्फोट घेणे हे समाजस्वास्थ्य, कुटुंबाचे धैर्य आणि अपत्य संगोपनाच्या दृष्टीने अत्यंत विघातक आहे, यात शंका नाही; परंतु खरोखरच परस्परविरुद्ध स्वभावाच्या, आवडीनिवडी टोकाच्या असणाऱ्या, एकमेकांबद्दल तिटकारा व जिव्हाळ्याच्या लवलेशाचा असलेला मागमूस नसणाऱ्या पतिपत्नींनी एकत्र राहून कुटुंब वर्धन करणे हा एक प्रकारचा कायदेशीर व्यभिचार नव्हे काय? विवाह केल्याने विवाहित स्त्रीने स्वत:च्या पोटासाठी, मुलांच्या संगोपनासाठी आई-वडिलांच्या नावासाठी समाजाच्या टीकेस तोंड द्यायला नको म्हणून लाचारी नको असलेल्या माणसाबरोबर वर्षानुवर्षे पत्निव्रत आचरण्याची सक्ती माणुसकीला सोडून ठरत नाही काय ? रोगी, विकृत, दुराचारी व पत्नीचा छळ करण्यात आसुरी आनंद मिळण्यातच धन्य मानणाऱ्या नवऱ्याशी एकरूप होण्यात नीतीचे तत्त्व

कसले व कोणत्या आधारावर समर्थनीय ठरले जाते ? अशा अनिच्छेने झालेल्या समागमातून पोटी येणाऱ्या अपत्यांची शारीरिक व मानसिक निकोप वाढ होईल काय ? याचा विचार करून मग त्या विचारी बैठकीच्या दिशेने घटस्फोटित स्त्रिया या समाजात अनीती माजविण्यास, कुटुंबाचे विघटन करण्यास जबाबदार ठरतील काय ? याची उत्तरे शोधण्याचा प्रामाणिक प्रयत्न व्हावा.

विवाह हा पवित्र संस्कार जर मनाजोगता जोडीदार न देता क्रूरपणे शरीराशी खेळणारा वासनापुरुष, व्यसनी व निर्दयी कृतीचा नर देत असेल तर समाज समृद्धी, कुटुंब संस्था व मानसिक सौख्य संवर्धन साधणार नाहीच; मग ओढूनताणून रोजच बलात्कारितेचे जिणे जगण्यापेक्षा त्यातून कायदेशीर सुटका करून घेण्याचे धैर्य असणारी स्त्री उपेक्षेस पात्र ठरविली जाऊ नये. क्षुल्लक कारण, स्वभावातील भिन्नता, कधीमधी होणारे मतभेद हे घटस्फोट घेण्यास स्त्रियांना प्रवृत्त करीत नाहीत, ही आजच्या समाजातील वस्तुस्थिती असल्याने घटस्फोटाने अनीती माजेल, स्वैराचार वाढेल, कुटुंबसंस्था धोक्यात येतील, समाजाची घडी बिघडेल, विवाहाचे पावित्र्य डागाळेल, अशी शंका घेण्याचे कारण नाही.

दुसरा मुद्दा असा की, घटस्फोट घेतल्याने विवाहित जोडप्यांच्या अपत्यांच्या संगोपनाच्या व व्यक्तिमत्त्वाच्या विकासामध्ये अडथळे निर्माण होतील. घटस्फोट हा संततीच्या दृष्टीने अयोग्य आहे हे सर्वसामान्यपणे खरे. मुलांच्या जन्मानंतर, त्यांचा दोष नसताना त्यांच्यावरील पिता किंवा माता यांपैकी एखादे छत्र विवाहविच्छेदनाने नाहीसे होते. ते करण्याचा अधिकार माता-पित्यांना प्राप्त होणार नाही हे जरी नाकारता आले नाही तरी उभयतांचे सान्निध्य हितकारक ठरेल, याची खात्री नसेल, त्यामुळे सुखशांतीची हमी मिळत नाही तर अशा कुटुंबातील मुलांसाठी पतिपत्नीचे एकत्र राहणे उपकारक ठरणार नसेल हे लक्षात घ्यायला हवे. व्यसनी पित्याची आईला मारहाण, बाहेरख्याली वडिलांच्यामुळे मातेची कुचंबणा, दोघांचे सतत भांडण यांसारख्या प्रसंगाचे मूक किंवा बोलके साक्षीदार व न्यायाधीश होण्याची वेळ वारंवार मुलांच्यावर येत असेल, तर त्यांच्या दृष्टीने आईवडिलांचे एकत्र सान्निध्य त्रासदायक तर ठरेल, पण त्यांच्यातही न्यूनगंड, विकृती निर्माण होण्याची शक्यता नाकारून चालेल काय ? दुष्ट, व्यसनी, पशुतुल्य, अहंकारी अशा वडिलांपासून मुलगा दूर करणे हे आईने केलेले कर्तव्य विचारी मातृत्वाचे उत्कृष्ट उदाहरण मानण्याची तयारी समाजाने दाखवायला हवी. कलहाच्या वातावरणात समाजाने मुलांच्या निकोप वाढीची अपेक्षा धरण्यात अर्थच नाही. त्यामुळे अपत्यांचे कारण पुढे करून घटस्फोटापासून संतती जोपासण्याची समस्या उद्‌भवेल व मुले बेवारशी, निराधार बनतील अशी भीती वाटली तरी ती घटस्फोटाचा विचारही मनात आणू नये असे ठामपणे सांगण्याइतपत समर्थनीय नाही.

कायद्यानुसार सर्वसाधारण तरतूद अशी की, जो पक्ष दोषी असेल अथवा न्यायालयाने ठरविला जाईल, त्याच्याकडून मुलांचे पालकत्व काढून घ्यावे. निर्दोषी व्यक्तीकडे ते देऊन त्याचा खर्च दोषी व्यक्तीने करावा, ही पद्धत योग्य मानली जाते; परंतु दोघांनाही खर्चाचा भार योग्य प्रमाणात उचलण्याची न्याय्य तरतूद करण्यास हरकत नाही. समाजाचा घटक म्हणून निर्दोष पत्नी स्त्री जरी असली तरी पालक ठरू शकते. पालकत्वाचा कायदेशीर हक्क स्त्रियांना मिळण्याच्या बाबतीत घटस्फोटाच्या कायद्याने झुकते माप टाकले तर त्यांच्या दृष्टीने ती बाब फायदेशीर ठरेल. अडाणी, व्यवहारातील अनुभव नसणारी स्त्री ही दक्ष व समर्थ पालकत्व आपल्या मुलांना देऊ शकत नाही, हा चुकीचा समज आहे.

तिसरे शंकास्थान म्हणजे घटस्फोट घेतलेली स्त्री ही परावलंबी व अगतिक बनेल. तिला ना सासर, ना माहेर अशा आधारहीन स्थितीत जीवन जगावे लागेल; म्हणून पतीपासून विभक्त होण्याचा निर्णय स्त्रियांनी घेणे फारसे सौख्यकारक ठरणार नाही, अशी भीती व्यक्त केली जाते तीसुद्धा निराधार आहे; कारण बहुसंख्य मुलींचे माता-पिता हे मुलीचे लग्न करून टाकल्यानंतर 'दिल्या घरी ती मेली तरी चालेल, पण माहेरी आलेली चालणार नाही. माहेर चार दिवसांचेच, सासरच खरा आधार' या परंपरागत तत्त्वाने तिच्याकडे पाहतात. नवऱ्याने टाकलेली विवाहित मुलगी आई-वडील, भाऊ-बहीण, वहिनी, बहीण-मेहुणा, मामा-मामी वा अन्य कोणत्याही नातेवाईकांना जवळची वाटत नाही. त्यामुळे परंपरागत विचारानुसार विभक्त झाल्यानंतर तिची दयनीय स्थिती होईल, या विचाराने ग्रस्त होऊन घटस्फोटाची गरज पतीला असली तरी पत्नीने सोशिकपणे, लाचारीने त्याच्याजवळ राहावे. स्त्री मुळातच दुर्बल व अनाथ नाही हे लक्षात न घेता तिच्याविषयी चिंता व्यक्त केली जाते. केवळ पोटासाठी अप्रिय लग्नाच्या बेडीत जखडून पडण्यापेक्षा स्वतंत्र होऊन आत्मविश्वासाने जगणे सुखकारक ठरते. शिवाय मालमत्ता व संपत्तीत वाटा मिळण्याची तरतूद असल्याने त्या दिशेने तिने प्रयत्न करणे उचित ठरते. योग्य शिक्षण, पुरेसी संधी व अर्थोत्पादनाच्या क्षेत्रात सहभागी होण्यास वर दिलेल्या स्त्रिया पुरुषांच्या पती या नात्याची जोड (जी कुचकामी ठरल्याने ती विभक्त होऊ इच्छिते.) नसतानाही माणूस म्हणून जीवनाचा आनंद उपभोगू शकतात. शिवाय विधवा झालेल्या स्त्रिया पुरुषाच्या मदतीशिवाय जगतातच की नाही ? एवढेच नव्हे, पोरा-बाळांचे संगोपन करून कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडताना दिसतात. त्यामुळे घटस्फोट घेतल्याने स्त्रिया अनाथ होतील, त्यांची मुले-बाळे उघड्यावर पडतील व परावलंबनातून त्यांची स्थिती दयनीय होईल, असा कांगावा करण्यात अर्थ नाही. थोडक्यात, स्त्री-जीवन सुखी होण्याला अत्यंत जरूर असा घटस्फोटाचा कायदा असून कुटुंबस्वास्थ्य व समाजस्थैर्य यांना तो

परिणामी पोषकच ठरेल.

घटस्फोट घेणे शक्य व्हावे म्हणून कायदेशीर तरतूद करण्यात आल्याने तो घेणाऱ्यांची संख्या हळूहळू वाढत आहे; परंतु आता कायद्याने घटस्फोट घेता येत असला तरी घटस्फोटित स्त्री सामाजिक दूषणास पात्र होते. घटस्फोट घेणाऱ्या स्त्रीमध्ये काहीतरी खोट असल्याचे सर्वसाधारणपणे मानले जाते. घटस्फोट घेणाऱ्या स्त्रीकडे भीतियुक्त अनादराने किंवा अत्यंत कणवेने पाहिले जाते. घटस्फोटाविषयी उघड चर्चा फारशी होत नाही किंवा ती करणे हे घटस्फोटित स्त्रीसमोर इष्ट मानले जात नाही. हिंदू विवाहित स्त्री ही आजही वटसावित्रीचे व्रत करताना दिसते व 'जन्मोजन्मी हाच पती लाभो' अशी मनोमन प्रार्थना करते. अशा बहुसंख्य स्त्रियांच्या दृष्टीने घटस्फोट घेणारी स्त्री ही दोषी व बंडखोर ठरते. अशा स्त्रीबद्दल फारसा सामाजिक मान्यतेचा दृष्टिकोन स्वीकारला जात नाही. इतर स्त्रियांप्रमाणे हळदी–कुंकू, गौरीपूजन, ओटीभरण अशा प्रसंगी त्यांच्या उपस्थितीबद्दल नाराजी व्यक्त केली जाते. किंबहुना त्यांच्या चारित्र्याबद्दलही शंका घेण्यास समाज मागेपुढे पाहत नाही. घटस्फोटाचे तोटे असले तरी ते लक्षात घेण्याची जबाबदारी विवाहित स्त्रियांच्यावर म्हणजे पत्नीवर ढकलली जाते. त्यांनीच घटस्फोटाची पाळी येईपर्यंत सहन करीत राहावे. शक्यतो ती येऊच नये या दृष्टीने मारहाण, छळ व कुचंबणा सोसत राहाव्यात अशी समाजाची अपेक्षा आहे. म्हणजे घटस्फोटाची भीती स्त्रियांना वाटते. ही भीती पुरुषांनाही हवी अशी समाजधारणा आजही नाही. यातच स्त्रियांची मानहानी व दुर्दैव आहे. सुशिक्षित व सुसंस्कृत म्हणून ओळखली जाणारी मंडळीसुद्धा याच दिशेने विचार करताना दिसतात. याच्या मुळात ही तीन प्रकारची कारणे आहेत.

पहिले कारण असे की, विवाह ही स्त्रीला आवश्यक बाब मानली जाते. त्याचे समर्थनही असे की, भारतीय अविवाहित स्त्री मुक्तपणे भारतीय अविवाहित पुरुषाप्रमाणे लैंगिक सुख घेऊ शकत नाही. वेश्यांच्याकडे जाणाऱ्या पुरुषांमध्ये अविवाहित पुरुषांचे प्रमाण जास्त आहे. विवाहानंतरच खऱ्या अर्थाने स्त्रियांना लैंगिक सुखाचा अनुभव घेता येतो. विवाहानंतर असे सुख मिळते; पण घटस्फोटामुळे त्याकडे पाठ फिरवावी लागते. तसे करणे स्त्रीला शक्य होणार नाही. तिला पुनर्विवाहाची संधी मिळेलच असे नाही. परिणामी लैंगिक सुखाशिवाय ती जगू शकेल, असे समाजाला वाटत नाही. म्हणजे बहुसंख्य सर्वसामान्य लोकांची तशी धारणा आहे.

दुसरे असे की, आजही विवाह हा पवित्र संस्कार समाजाकडून मानला जातो. त्यामुळे घटस्फोट कायद्यात तो करार ठरविला गेला तरी विशेषतः स्त्रियांनी विवाहाचे पावित्र्य राखावे अशी समाजाची तीव्र इच्छा; त्यामुळे पती हाच परमेश्वर

मानून विवाहाच्या पवित्र बंधनात राहण्यातच तिचे हित असते, अशीच भूमिका स्वीकारली जाते. शिवाय १९५५ चा विवाह कायदा विवाह हा संस्काराची भूमिका सोडून कराराच्या भूमिकेकडे झुकलेला आहे, हे स्पष्ट करीत असला तरी अजून-पर्यंत हा कायदा विवाहाला संपूर्णपणे करार मानण्यास तयार नाही. अगदी नोंदणी विवाह पद्धतीत सुद्धा हे जन्माचे नाते समजण्यात येते. नपुंसकत्व, चार वर्षांपर्यंत टाकून देणे, सात वर्षांपर्यंत नाहीसे होणे, महारोग, नवऱ्याने दोन किंवा अधिक लग्ने केली असल्यास, रखेली ठेवणे, बायको जर दुसऱ्या कुणाची रखेली असेल, वेश्या व्यवसाय करीत असेल, अशाच कारणाने तो घेता येतो. ती कारणे सिद्ध करून दाखवावी लागतात. विवाहात संस्काराचा जो अंश राहिला आहे, त्यामुळेच घट-स्फोटासारखी महत्त्वाची बाब असली तरी कायदा लवचिक ठेवावा. विवाहविच्छेद सुलभ करावयाचा नाही. शिवाय घटस्फोटाच्या कायदेशीर कारणाचे पंचगव्य कडू व किचकट आहे. घटस्फोटासंबंधीचे नियम अजूनही सैल व मानवी पायावर आधारण्याची गरज आहे.

तिसरा मुद्दा असा की, सर्वच लागलेले विवाह खऱ्या अर्थाने टिकाऊ असावेत, अशी सामाजिक अपेक्षा आहे व तीच पद्धत घट्ट आहे. खरे तर पति-पत्नीची तशीच अपेक्षा असते; परंतु अनेकविध कारणांनी जेव्हा त्यांचे मानसिक मिलन होतच नाही व परस्परांचा तिरस्कार एवढीच भावना उरते, तेव्हा घटस्फोट ही त्या ताणातून सुटण्याचा उपकारक मार्ग मानला जाऊ नये काय? विवाह टिकविलेच पाहिजेत असा आग्रह धरणाऱ्या समाजाने अयशस्वी विवाह संपुष्टात आणण्याची आवश्यकता लक्षात घ्यायला नको का? जेव्हा पत्नी आणि पती दोघांनी घटस्फोटाच्या तरतुदीनुसार विभक्त होण्याचे ठरविले तर पत्नीकडेच दोष असला पाहिजे असाच बहुसंख्य समाजघटकांचा दृष्टिकोन असल्याचा अनुभव येतो.

१९५५ च्या हिंदू विवाह कायद्यात असलेल्या तरतुदी बऱ्याचशा योग्य असल्या तरी नपुंसकत्वाचा दोष सिद्ध करणे फार कटकटीचे ठरते. कायदेशीर फारकतीची डिक्री मिळविली तरी दोन वर्षे रखडावे लागते. तद्नंतर घटस्फोटाचा अर्ज कोर्टात दाखल करता येतो. पुरेसा पुरावा उपलब्ध करणे हे व्यभिचाराच्या कारणाच्या बाबतीत फार अडचणीचे ठरते. खर्चिक, कटकटीची प्रणाली व विलंबाने निर्णय ह्या कायद्याच्या बाबतीत अधिक प्रमाणात आढळून येतात. घटस्फोट मिळे-पर्यंत जवळजवळ ६-७ वर्षे लागतात. परागंदा पतीसाठी सात वर्षे थांबण्याची अट योग्य वाटत नाही. लग्न झाल्यापासून घटस्फोटाचा अर्ज दाखल करीपर्यंत जेवढी इस्टेट पतीने मिळविली, त्याच्या अर्धा हिस्सा घटस्फोटित स्त्रीस मिळण्याची काय-देशीर तरतूद असावी. नाही तर व्यसनी, उधळे पती सर्व मालमत्ता उडवून टाकण्याची भीती असते व घटस्फोटित स्त्रीस मिळतो तो पोटगीचा तुकडा. त्यावर

तिला मुलाबाळांची गुजराण करावी लागते. त्यामुळ घटस्फोटातून आर्थिक हलाखीची पाळी निर्माण होऊन त्यातून मुलांचे हाल होतात.

घटस्फोट मागणाऱ्या स्त्रियांत सुशिक्षित स्त्रियांचे प्रमाण अधिक आहे. यामध्ये शिक्षणाचा दोष नाही. स्त्रिया जागृत होऊ लागल्या आहेत. पुरुषी मोहजालाच्या जाचातून स्त्री बंधनमुक्त होऊ पाहत आहे. घटस्फोट मागण्यात शिक्षणाने शेफारण्याचा अथवा शिक्षणपद्धतीचा दोष नाही. निष्प्रेम वैवाहिक जीवन व शोषणयुक्त नात्याने जगण्यापेक्षा त्यातून मुक्ती मिळविण्यासाठी घटस्फोटाचा मार्ग स्वीकारणे योग्य मानले जावे. आपल्या देशात अजूनही ज्या स्त्रियांनी घटस्फोटाची मागणी करायला हवी, त्या सामाजिक दडपणामुळे, परंपरेचा पगडा झटकून टाकता न आल्यामुळे मुलांचे भावजीवन उद्ध्वस्त होण्याची मनातून वाटणारी भीती व नातेवाईक मंडळींच्याकडून अशा निर्णयापासून मागे खेचण्याचा सल्ला व सतत त्याच दिशेने मार्गदर्शन वगैरेंमुळे करीत नाहीत. स्त्रीचे व्यक्तिस्वातंत्र्य मान्य केल्यानंतर तिचा हा अधिकार अबाधित राहायला हवा.

परित्यक्ता स्त्रियांचा प्रश्न

परित्यक्ता म्हणजे नवऱ्याने टाकून दिलेली स्त्री. हा त्याग एका दृष्टीने दोन व्यक्तींपुरता. कायद्याने संमती नसलेला, पण स्वयंनिर्णित असा लग्नविच्छेद होय. अशा वेळी टाकणारी व्यक्ती जोडीच्या व्यक्तीला तो विच्छेद मान्य अथवा विचार करण्यासाठी या निर्णयापासून थांबत नाही. काहीही झाले तरी अतःपर दोघांनी एकत्र राहणे शक्य नाही, अशा मनाने घेतलेल्या निर्णयामुळे ही स्थिती निर्माण होते. मने फाटली व सहवास असह्य झाला की विवाहबंधन तोडले जाते.

लग्नबंधनानंतर एकमेकांपासून तुटू पाहणाऱ्या व्यक्तींचा प्रश्न हा दोघांपुरता मर्यादित राहत नाही. त्यात मुले, कुटुंबसंस्था यांच्यावरचा परिणाम दुर्लक्षिता येत नाही. शिवाय हा सामाजिक प्रश्न म्हणून त्याकडे पाहावे लागेल. परित्यक्ता स्त्रियांचा प्रश्न म्हणजे केवळ नवऱ्याने टाकलेल्या एवढाच त्याचा शब्दार्थ घेऊन भागणार नाही, तर कित्येक वेळा पत्नीचा असा मानसिक व शारीरिक छळ केला जातो की त्या स्त्रीला पतीचे घर सोडल्याशिवाय पर्याय राहत नाही.अशा स्त्रीचाही आपल्याला परित्यक्ता स्त्रिया म्हणून विचार करावा लागेल; कारक ती शरीराने नसली तरी मनाने परित्यक्त असते, नकोशी झालेली असते आणि तिला छळण्यात नवरा आणि इतर छळणारी माणसे एक प्रकारचा राक्षसी आनंद घेत असतात.

लग्नविच्छेदाच्या बाबतीत, विशेषतः परित्यक्ता स्त्रियांचा विचार करताना

महत्त्वाची बाब अशी की, नवऱ्याने मनाने किंवा प्रत्यक्ष शरीराने टाकल्यानंतर लग्नविच्छेद घेण्याची बाईला आता कायद्याने जरी मोकळीक असली तरी ती मिळविण्याकरिता लागणारा कोर्टकचेऱ्या खर्च, पैशाची तरतूद करण्याचे सामर्थ्य नसल्याने कायदेशीररीत्या घटस्फोट मिळविणे शक्य होत नाही. शिवाय नातेवाईक या दृष्टीने मदत करण्यास उत्सुक असत नाहीत. त्याचबरोबर घटस्फोटानंतर तिच्याशी विवाह करण्यास 'उष्टावलेली स्त्री' म्हणून पुरुष जसे उत्सुक असत नाहीत, तसे विवाहानंतरच्या छळामुळे घटस्फोटित स्त्रियासुद्धा पुन्हा विवाहाच्या सौख्याकडे वळण्यास तयार असतातच असे नाही. काही काही वेळा परित्यक्ता स्त्रिया पंचापुढे सोडचिठ्ठी घेऊन आपला मार्ग मोकळा करतात. मात्र तो तितका कायदेशीर नसतो. नवऱ्याने त्याग केल्यावर स्त्रीची सर्व बाजूंनी 'बाई' म्हणून अशी कुचंबणा होते. त्यातच अर्थार्जनाच्या अक्षमतेमुळे तिच्या आयुष्याची परवड होऊन ती अनैतिक मार्गाकडे ओढली जाण्याची संभवही असतो. अत्यंत नाइलाज म्हणून काही वेळा पुरुषाचा आधार घ्यावा, त्याशिवाय जगता येणे कठीण जाते, अशा अनुभवातून एखाद्या पुरुषाला जवळ केले जाते. अशा स्त्रीकडे समाज अत्यंत टाकाऊ स्त्री म्हणून पाहतो; पण त्यास कारणीभूत ठरणाऱ्या परिस्थितीचा सहानुभूतिपूर्वक विचार केला जातोच असे नाही.

टाकण्याची क्रिया, स्वयंनिर्णित लग्नविच्छेद ह्या गोष्टी जरी मानसिक वितुष्टाने घडत असल्या तरी वितुष्ट उद्‌भवण्याची कारणे शारीरिक व बाह्य परिस्थितिजन्य असतात, हे नाकारता येणार नाही; कारण तशी उदाहरणे घडत असल्याचा अनुभव आपणास सभोवती दिसतो. महिलाश्रम हे सरकार व स्वयसेवी संस्थांकडून चालविले जात आहेत. शिवाय घटस्फोट अथवा लग्नविच्छेदाची न्यायालये व त्यांच्याकडील अशा केसेसचा अभ्यास केल्यास लग्नविच्छेदाची कारणे लक्षात येतात. महिलाश्रम ह्या संस्था तर सामाजिक रोगाचे एकप्रकारचे दवाखाने आहेत. त्यांत निरनिराळे सामाजिक रोग व त्यांची नाना उदाहरणे एकत्र पाहायला मिळतात. त्या कारणांचा अभ्यास करता, पतिपत्नीतील विसंवाद, खटके, संघर्ष वाढत जाऊन अखेर विकोपाला जातो. कारणांचा विचार करता नवऱ्याकडून होणारी मारहाण व छळ हे महत्त्वाचे कारण. जवळ जवळ निम्म्या स्त्रिया ज्या कोर्टाकडे धाव घेतात अथवा महिलाश्रमांचा आश्रय घेतात त्या नवऱ्याच्या मारहाणीचा अतिरेक झाल्यानेच. केवळ अशिक्षित वर्गातच अशा घटना घडतात असे नाही, तर सुशिक्षित व श्रीमंत कुटुंबातसुद्धा स्त्रियांना नवऱ्याकडून मारहाण झाल्याचे दिसते.

काही स्त्रिया शारीरिक मारहाण व मानसिक छळाला कंटाळून आत्महत्या करताना आढळतात. कुळाची सामाजिक प्रतिष्ठा, खानदान, आई-वडिलांचे नाव

राखण्यासाठी काही स्त्रिया भयंकर मुस्कटदाबी सहन करतात; पण अगदीच असह्य झाल्यानंतर मात्र परित्यक्ता म्हणून जगण्याची मानसिक तयारी करतात. एकाच लग्नाचा कटू अनुभव आल्याने पुनर्विवाहाच्या भानगडीत न पडण्यात शहाणपण आहे, अशीच भूमिका त्यांना स्वीकारण्यास भाग पाडतात. काही वेळा हुंडा, मानपान, देणी–घेणी, करणी वगैरे कारणांनी सासरची मंडळी अतोनात छळ करतात. त्यातूनही असा निर्णय घेतला जातो. प्रत्यक्ष व्यभिचार किंवा व्यभिचाराचा संशय हे कारण महत्त्वाचे ठरते. वेड, व्यसनाधीनता, अनारोग्य, फसवणूक ही कारणे वैवाहिक खटले निर्माण करण्यास कारणीभूत ठरतात. काही वेळा विरोधी स्वभावसुद्धा विसंवाद निर्माण करण्यास कारणीभूत ठरतो. स्त्रीत असणारा पोरकटपणा, हट्टी स्वभाव, आक्रस्ताळेपणा, सारखी कुरकुरण्याची सवय, नटण्या-मुरडण्याची अतिरेकी आवड, तसेच पुरुषांची सतत पत्नीचा पाणउतारा करण्याची सवय, कमी लेखून अपमान करण्याची पद्धती, पान–तंबाखू चघळण्याची सवय, अत्यंत राबवून घेण्यात आसुरी आनंद मिळविण्याची पद्धती, दुसऱ्या पक्षाला समजून घेण्याची पात्रता इत्यादी गोष्टींच्या अतिरेकानेही एकमेकांपासून विभक्त होण्याची पाळी येते.

आपल्या समाजात अजूनही कुंडलीतील गुण व गोत्र यांच्या निकषाने वडीलधाऱ्या माणसांच्या संमतीने बहुसंख्य लग्ने जुळविली जातात. वैद्यकीय तपासणीला तर स्थानच नाही. शिवाय लग्न जुळत आहे म्हटल्यावर दोन्ही पक्षांकडून दोष झाकून ठेवले जातात. कित्येक वेळा मुलगा हा शारीरिकदृष्ट्या विवाहाला अपात्र असतानाही प्रतिष्ठेसाठी त्याचे लग्न केले जाते. अक्षम असलेल्या जोडीदाराच्या निवडीमुळे वैवाहिक जीवनातील सौख्याचा महत्त्वाचा भाग म्हणून रतिसुखातील अडचणी निर्माण होतात. कित्येक वेळा बाह्यत्कारी पुरुष अथवा स्त्री आरोग्यदायी व देखणी दिसत असली तरी समागमाच्या बाबतीत त्यांच्यात शारीरिक व मानसिक पातळीवर कामपूर्ती आनंद मिळविणे शक्य होत नाही. रतिसुखाची इतकी मानसिक अढी किंवा घृणा काही वेळा निर्माण होते की पती–पत्नी शरीरसंबंध ठेवण्यासाठी जवळ येऊ शकत नाहीत. तोंडसुद्धा पाहण्याची इच्छा राहत नाही. अशा वेळी एकमेकांना समजून घेऊन खुल्या दिलाने डॉक्टरांकडे जाण्याची तयारी ठेवल्यास मार्गदर्शन मिळणे जमण्यासारखे असते; परंतु तेवढा समंजसपणा क्वचितच पाहावयास मिळतो. प्रजनन अक्षमता स्त्री म्हणून पत्नीवर बहुसंख्य वेळा लादली जाते. वांझ म्हणून तिला टाकण्याची भाषा सुरू होते. अर्थात वांझ या नात्याने तिचा छळ केला जातो. दुसरे लग्न करून पती मोकळा होतो. द्विभार्या प्रतिबंधक कायद्यातील पळवाटांचा आधार घेऊन अथवा नवऱ्याच्या जाचाला कंटाळून पत्नी स्वखुषीने त्यास विवाहाची परवानगी देते व स्वतः

परित्यक्तेचे जिणे जगण्याला तयार होते. वयोमानातील फरक, शिक्षणातील तफावत, व्यवसायाचे स्वरूप, विवाहपूर्व प्रेमभंग, कुटुंबातील संस्कार व पार्श्व-भूमीतील फरक इत्यादी गोष्टी वैवाहिक जीवनात संघर्ष आणू शकतात. वैवाहिक जीवन अस्थिर बनण्यातून लग्नविच्छेदाकडे वाटचाल होते.

परित्यक्तांची महत्त्वाची समस्या म्हणजे बहुतेक अशा स्त्रियांसमोर आर्थिक ओढाताण व पोषणासाठी तरतूद नसण्याची शक्यता अशी परिस्थिती असते. त्यातच मुलांच्या पालनपोषणाची जबाबदारी पडल्यास तिच्यासमोर अनेक प्रश्न उभे राहतात. घटस्फोटाची कायदेशीररीत्या पूर्तता होऊन पोटगी मिळाली तर बरे, नाहीतर त्यांची स्थिती केविलवाणी होते. हल्लीच्या काळी माहेरची माणसेही मदतीला धावून येऊ शकत नाहीत. विभक्त कुटुंब पद्धती, व्यक्तिस्वातंत्र्याचा हवा तो सोयीचा अर्थ, जिव्हाळ्याऐवजी नात्याने आलेला यांत्रिकपणा, आपल्यापुरतेच पाहण्याची वृत्ती, वाढती महागाई, राहणीमानाविषयीच्या आधुनिक कल्पना यांमुळे परित्यक्ता व तिच्या मुलाबाळांची जबाबदारी घेण्यास नात्यातील मंडळी पुढे येईनाशी झाली आहेत. आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी असलेल्या परित्यक्तांना सामाजिक परंपरा व रूढींतून निर्माण होणाऱ्या मनस्तापास व पुरुषांच्यापासून असलेल्या धोक्यातून उद्भवणाऱ्या असुरक्षिततेस सामोरे जावे लागते.अनेक प्रकारचे आरोप केले जातात. समाजाच्या दृष्टीने तिच्या वर्तणुकीचे अर्थ लावून सर्व प्रकारच्या नीतिमत्तेचे निकष लावले जातात.मात्र आर्थिक दृष्ट्या सक्षम असणाऱ्या परित्यक्ता अशा परिस्थितीला तोंड देण्याची तयारी करू शकतात; परंतु आर्थिक प्रश्न हा ज्यांच्या बाबतीत महत्त्वाचा ठरतो, त्यांची ससेहोलपट होताना दिसते.

परित्यक्ता स्त्रियांसाठी महत्त्वाची बाब अशी की, त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वतःच्या पायावर उभा राहता आले पाहिजे या दृष्टीने सरकार, स्वयंसेवी संस्थांनी, खासगी कारखानदारांनी,बँका व इतर प्रकारच्या आर्थिक सहाय्य देणाऱ्या संस्थांनी, वसतिगृहांनी, समाजकल्याण खात्यांनी सामाजिक जबाबदारी म्हणून प्रयत्न करायला हवेत. शिवाय लग्नविच्छेदानंतरही त्या स्त्रियांच्या पुनर्विवाहाच्या दृष्टीने आश्रमचालक व स्वयंसेवी संस्थांनी विचार करायला हवा. अर्थात ज्यांची पुन्हा लग्न करण्याची इच्छा नाही, त्यांना स्वतंत्र पण स्वावलंबी जिणे कसे जगता येईल, ह्यासाठी समाजातील विविध घटकांच्या सहानुभूतीची व सहकार्याची गरज आहे. मानसिक दृष्ट्या त्यांना जपण्याची आवश्यकता व त्या दृष्टीने आधार देण्याचा सामाजिक कार्याचा भाग म्हणून महिला मंडळे, संघटना, क्लब्स यांनीही प्रयत्न करणे जरुरीचे आहे.

आपल्या देशात अखिल भारतीय स्त्री संस्थांकडून मॅरेज कौन्सिलिंगची

काही ठिकाणी सोय उपलब्ध करण्यात आली आहे; पण त्याची माहिती बहुसंख्य स्त्रियांना असतेच असे नाही. शिवाय अशा सोयी अत्यंत तटपुंज्या आहेत. नवविवाहित जोडप्यांसाठी अशा सेंटर्सचा नक्कीच फायदा होऊ शकतो. तणाव व गैरसमज दूर करून पति–पत्नीना एकत्र आणण्याच्या दृष्टीने हे काम सामाजिक स्वास्थ्याच्या संदर्भात गरजेचे आहे. भौतिक सुखाच्या सोयी, बदलती आर्थिक परिस्थिती व सामाजिक मूल्यांतील परिवर्तन, पाश्चात्त्यांचा संपर्क, विभक्त कुटुंब पद्धती वगैरे कारणांमुळे समाज एक प्रकारच्या संक्रमणावस्थेतून जात आहे. लग्न हे मानवी बंधन आहे. त्यात दैवी पावित्र्य नाही. तो एक करार आहे, अशी भूमिका मान्यता पावत आहे. शिवाय निष्प्रेम, बळजबरीचे वैवाहिक जीवन जगण्यातील फोलपणा प्रकर्षाने जाणवू लागला आहे. स्त्री केवळ पुरुषाधीन व पुरुषावलंबी राहावी असे न मानले जाता, स्वतंत्र व स्वावलंबी जीवन जगण्याचा तिचा हक्क दिवसेंदिवस मान्य केला जात आहे. त्यामुळे कायदेशीर लग्नविच्छेद अथवा स्वयंनिर्णयाने लग्नविच्छेदातून निर्माण झालेल्या परित्यक्तांचा प्रश्न हा अपरिहार्य मानून तो सोडविण्याची जबाबदारी समाजाने मान्य करायला हवी. नवऱ्याने टाकलेली स्त्री अथवा परित्यक्ता असा शब्दसुद्धा न वापरता त्यांच्यासाठी विभक्तता अथवा आणखी एखादा योग्य शब्द वापरून त्यांची मानहानी होणार नाही, याची दक्षता घ्यायला हवी.

स्त्री-शरीर विक्रेत्या वेश्या

वेश्या व्यवसायाला जगातील प्राचीनतम धंदा म्हणून गौरविले जाते, याचा अर्थ असा होतो की, पुरुषांनी स्त्रियांची पिळवणूक हजारो वर्षे चालविली आहे. 'पत्नी ही मुले देण्यासाठी, वेश्या ही शारीरिक सुखासाठी व कलावंत स्त्री आत्म्याच्या सुखासाठी पुरुषांना हवी असते.' असे उद्‌गार डेमॉस्थिनीस यांनी स्त्रीचे पुरुषजीवनातील स्थान दर्शविण्याच्या दृष्टीने काढले आहेत. इंद्रियलालसेच्या तृप्तीसाठी स्त्रीला क्रयविक्रयाची वस्तू बनविणे ही कल्पना ऐदी, चैनी, सुखासुखी समाजाच्या सुपीक मेंदूतून बाहेर पडली आहे. सुखासीन, स्वैर जीवन होऊ लागले की, त्यावर वैवाहिक नीतीसारखी बंधने घालणे व नंतर ती कृत्रिम बंधने चैनीला चटावलेल्या जीवनाला जाचक वाटू लागली व त्यातून पळवाट काढण्याचा प्रयत्न करून एकंदर जीवन नकली, दिखाऊ, बाहेरून पवित्र पण आतून अपवित्र करणे ही सर्व सुधारणा म्हणविणाऱ्या समाजाची लक्षणे आहेत. या खोट्या सुधारणेच्या कल्पनेमुळेच वेश्या व्यवसायाचे समर्थन केले जाते.

वैवाहिक जीवनाची पवित्रता कायम राहावी म्हणून राजरोस वैवाहिक

पावित्र्यभंगाची सोय ठेवणे, आपल्या आई-बहिणींची अब्रू डागाळली जाऊ नये म्हणून दुसऱ्यांची आई-बहीण बाजारात बसविणे. एकंदर स्त्री जातीला प्रतिष्ठित पातिव्रत्याचा, पावित्र्याचा, नीतीचा डांगोरा पिटता यावा म्हणून काही स्त्रियांच्या पावित्र्याची होळी करणे अशा परस्परविरोधी, कृत्रिम, हास्यास्पद व भयंकर गोष्टींचे कडबोळे म्हणजे वेश्या व्यवसाय. या सुधारलेल्या समाजाच्या संस्कृतीचा कळस म्हणजे ज्यांना ते स्वतःच्या समाजाच्या पावित्र्याचे रक्षक म्हणून म्हणतात, त्या या स्त्रियांनी हीन, पतित म्हणून पशूपेक्षाही कमी लेखणे, त्यांना क्रयविक्रयाची वस्तू बनविणे व त्यांचा दैनंदिन जीवनक्रम लाजिरवाणा, कष्टमय, अपमानकारक बनवून सोडणे, सुधारलेल्या आजच्या समाजाचा गुप्त रानटीपणा, क्रूरपणा, अपवित्रता व ढोंगीपणा यांची मूर्तिमंत साक्ष म्हणजे वेश्या व्यवसाय ही संस्था.

आता असा प्रश्न विचारला जाईल की, जर हा व्यवसाय असा लाजिरवाणा व उद्वेगजनक आहे तर त्याकडे स्त्रिया वळतात तरी कशाला ? समाजसेवकांनी आकडे गोळा करून असे सिद्ध केले आहे की, वेश्या व्यवसायाकडे वळणाऱ्या स्त्रिया हीन मनोवृत्तीच्या असून आपखुषीने त्या हा धंदा पत्करतात असे नाही, तर आज या व्यवसायाकडे स्त्रियांना ओढून नेणारी कारणे पुढीलप्रमाणे आहेत असे दिसते.

आपल्या देशात दारिद्र्य हा सर्व बाजूंनी ग्रासून टाकणारा महाभयंकर रोग अनाथ व अशरण स्त्रियांना या बाजूला ओढून नेतो. पुरुषी वर्चस्व व स्त्रीचे दौर्बल्य ही एक प्राचीन जोडी आजही अस्तित्वात आहे. पुरुषी वर्चस्वाची जोपासना पुरुषाचे शारीरिक बळ, सामाजिक व सांस्कृतिक परंपरांनी केली आहे. सामाजिक व सांस्कृतिक परंपरेच्या पगडघास दारिद्र्याची जोड मिळाल्याने स्त्रिया याकडे वळताना दिसतात. आर्थिक दुर्बलता सावरण्यासाठी शरीरविक्रय व नंतर नुसत्या नैतिक अधःपतनाच्या जाणिवेची खंत या कार्यात वेश्या पिचत राहतात. तारुण्याचा बहर ओसरल्यावर वेश्येला गिऱ्हाईकच काय,पण वस्तीतले लूत भरलेले कुत्रेदेखील विचारीत नाही. जिचे तारुण्य पुरुषाच्या मनोरंजनार्थ गेले, तिच्या मरणसमयी बेवारशी प्रेताची वाहतूक करणारी ॲम्ब्युलन्स तेवढी उरते. नवऱ्यावर आर्थिक संकट आले असता त्याच्या उदरनिर्वाहासाठी त्या हा धंदा पत्करतात, किंवा एखादा लोभी, आळशी, निर्घृण, उलटचा काळजाचा पुरुष आपल्या फायद्यासाठी व सुखासाठी आपल्या पत्नीला किंवा प्रेयसीला या व्यवसायात लोटतो. लीग ऑफ नेशन्स्ने निरनिराळ्या देशांतून या विषयाबद्दल एकत्रित केलेल्या आकडेवारीवरून हेच दिसून येते.

दारिद्र्य हे प्रमुख कारण तर आहेच, पण दारिद्र्यातून उद्भवणारे व्यसनांचे माहेरघर व विकृतीचे वास्तव्य ह्या बाबीसुद्धा वेश्या व्यवसायाकडे

वळण्यास कारणीभूत ठरतात, असा अनुभव आहे. वयात येणाऱ्या मुलीला दरिद्री झोपडीतले दरिद्री आई-बाप जर समागमावस्थेत दिसले तर ती एका रात्रीत शहाणी होते. दरिद्री आईबापांच्या मुलींना पोटासाठी धंदा पाहावा लागतो. अपुऱ्या किंवा शिक्षणाच्या अभावामुळे हलकी रोजगारीची कामे पत्करावी लागतात. औद्योगीकरण व शहरीकरणामुळे शहरांकडे जाणाऱ्या व गरिबी, उपासमारीच्या तावडीतून सुटण्यासाठी शहराकडे धाव घेणाऱ्या लोकांची झोपडपट्टीतील वस्ती ही अनेक असांस्कृतिक, असामाजिक व अनारोग्याचे जीवन आहे. अशा झोपडीत राहणारी मंडळी पशुवत जीवन जगणारी व त्यातच पौगंडावस्थेतील मुली अज्ञानापोटी पुरुषी वासनेच्या बळी पडतात.

बऱ्याच वेळा अज्ञानातून, असहाय्यपणातून पाय घसरला की सामाजिक मूल्ये आणखी खाली ढकलतात. आयुष्यभर त्याच निरुंद, निसरड्या मार्गावर चालावे लागते. पतित स्त्री एकदा पतित झाली की ती सदा पतित ठरते. तिची समाजाकडून व कुटुंबाकडून नितांत उपेक्षा व छळामुळे वैफल्यग्रस्तता निर्माण होते. शरीरविक्रयाचा धंदा पत्करण्याशिवाय मार्ग उरत नाही. लैंगिक व्यवहाराविषयीच्या अज्ञानामुळे अनेक जणींवर हा व्यवसाय करण्याची पाळी येते.

काही अल्पवयीन विवाहित मुली विधवाविवाह, नापसंत पती, खाष्ट सासू, एकत्र कुटुंबातील जाच व मारहाण यांना कंटाळून एखाद्या सभ्य दिसणाऱ्या, पण कुंटणखाना चालविणाऱ्या बायांच्या नादी लागून फशी पडतात व एकदा पाय घसरला की, पुन्हा कोरड्या जमिनीला लागण्याची आपल्या समाजात सहज संधी मिळत नाही. त्यामुळे त्याच धंद्यात त्या रुतून बसतात. स्त्रियांमधील अज्ञान, शिक्षणाचा अभाव, एकदा वाकड्या वाटेने गेल्यावर पुन्हा परत येण्याची वाट अजिबात बंद होणे, कुंटणगिरीच्या धंद्यास लावणाऱ्यांच्यावर सरकारचे नियंत्रण नसणे वगैरे कारणांमुळे वेश्या व्यवसायात पडलेल्या स्त्रियांची संख्या वाढत आहे.

लहान वयात पतिसुखाला व संसारसुखापासून वंचित विधवा एकत्र कुटुंबात पोटावरी कष्ट करीत राहते. एकत्र कुटुंबात अथवा शेजारीपाजारी, नातेवाईकांच्या घरी अनेक प्रकारचे सण-समारंभ, स्त्री-पुरुष जमून हास्यविनोदाचे प्रसंग, डोहाळजेवणे, बारसे वगैरे सोहाळे होत असतात. अशा प्रसंगी काही वेळा विधवांचे मन मोहात सापडण्याची शक्यता नाकारता येत नाही. अनाथ जीवांचा अवाजवी फायदा घेऊन परिणामी आपण नामानिराळे राहणारे समाजकंटकही आहेत. अशा एखाद्याकडून बिचारी अल्पवयी विधवा फसली जाते. पुढे निसर्गानेही तिला फशी पाडल्यावर पापाला तोंड फुटण्याच्या भीतीने ती घराचा आसरा सोडून बाहेर पडते. एखाद्याच्या मध्यस्थीने ती विश्वासाने सुटका करून घेण्याच्या प्रयत्नात असतानाच वेश्या व्यवसायात ढकलली जाते. गर्भपातविषयक कायदा असूनही ती

सामाजिक दृष्ट्या अनैतिक ठरल्याने उघडपणे सुटका करून घेऊ शकत नाही. एखादी वाट चुकलेली विधवा पुढील आयुष्य सन्मार्गात घालविण्याच्या इच्छेने एखाद्या विधवाश्रमात जाऊ इच्छित असल्यास त्या विधवेला तसे संरक्षण मिळतेच असे नाही. विधवेला स्वतःच्या मालमत्तेवर अधिकार प्राप्त होत असेल, पोटापाण्याची सोय बिनकटकटीची होत असेल, अथवा अर्थोत्पादनक्षम बनविण्याच्या दृष्टीने व्यावसायिक शिक्षण किंवा रोजगाराची तरतूद होऊ शकत असेल तर तिला प्रतिष्ठितपणे जगण्याची संधी उपलब्ध होऊ शकेल. पुनर्विवाहावरील सामाजिक बहिष्कार उठल्याशिवाय अनेक मोहविवश विधवांचा प्रश्न सुलभतेने व राजरोसपणे सुटणार नाही. तसेच विधवांचे वाकडे पाऊल व नीतिमत्तेची कल्पना ह्यांबाबत योग्य तो विचार होऊन त्यांच्या संरक्षणाच्या दृष्टीने देशभर सोयी उपलब्ध व्हायला हव्यात.

काही विचारवंतांच्या मते वेश्या व्यवसायाची समाजाला जरुरी आहे. लैंगिक प्रेरणा व आर्थिक परावलंबन ही अनुक्रमे पुरुषांच्या वेश्यागमनाची व स्त्रीच्या देहविक्रयाची प्रमुख कारणे आहेत. विवाहित, अविवाहित व विधुर पुरुष वासना-दमनासाठी त्यांच्याकडे धाव घेतात. पुरुष वेश्यागमनी म्हणून जेवढा धिक्कारला जातो, त्यापेक्षा शतपटीने शरीरविक्रेती वेश्या धिक्कारली जाते. वेश्यांचा धिक्कार करण्यात स्त्रिया पुरुषांच्या पुढे आहेत. वेश्यांना जिथे स्त्रियांची सहानुभूती मिळत नाही, तिथे पुरुषांकडून अपेक्षा करण्यात अर्थ तरी काय ? याचा अर्थ स्त्रियांनी उघड उघडपणे अथवा चोरून शरीरविक्रयाचा धंदा केला तर अनंत तऱ्हेची उपेक्षा, शारीरिक ऱ्हास, मानसिक कुचंबणा सहन करावी लागते, पुरुषांच्याकडे मात्र जाणूनबुजून दुर्लक्ष केले जाते. दुटप्पी नैतिकता याहून दुसरी शोधून सापडणार नाही. स्त्रियांना नरकात ढकलणाऱ्यांची गय केली जाते. मात्र ढकलून घेणारी सर्वार्थाने उपेक्षित जीणे जगते आहे.

वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया हीन मनोवृत्तीच्या असतात. नटणे, मुरडणे, चैनी वृत्ती यांच्या आवडीतून त्या ह्या व्यवसायाकडे वळतात. काही स्त्रियांच्या बाबतीत लैंगिक सुखाची दुर्धर चटक, वैचित्र्याची अनावर वासना हे कारणदेखील संभवते. लैंगिक समागमात नावीन्याचा सोस हे तत्त्व स्त्री–पुरुष दोघांनाही लागू पडते. पैकी स्त्रीला वेश्या म्हणून जगावे लागते. पुरुष मात्र समाजात उजळ माथ्याने वावरू शकतो. चैनीची लालसा, नटण्या–मुरडण्याची हौस, दुबळी मने, छचोर व उथळ चित्रपट बहकविण्यास कारणीभूत होतात. थोडचा कष्टात जास्त पैसा मिळविण्याचा मार्ग म्हणून एकदा देहविक्रय अंगवळणी पडला की त्यात गैर वाटेनासे होते. अर्थात आपखुषीने हा धंदा पत्करणाऱ्या या स्त्रियांची त्यांना नंतर भोगाव्या लागणाऱ्या त्यांच्या पापांच्या फळांबद्दल कीव करण्याचे मुळीच कारण नाही; परंतु अशा कारणाने वेश्या व्यवसायाकडे वळणाऱ्या स्त्रियांची संख्या एक

टक्क्यापर्यंत सुद्धा असेल असे वाटत नाही. स्त्रीला पोट भरण्यासाठी प्रतिष्ठित काम न मिळणे व तिच्या पाठीवर तिचा वाली, रक्षणकर्ता असे कुणी मायेचे माणूस नसणे ही दोन्ही वेश्या व्यवसाय वर्षानुवर्षे चालू राहण्याची कारणे आहेत.

आज वेश्या व्यवसाय फोफावण्यास देवदासीची पद्धतही कारणीभूत आहे. देवदासी या पवित्र नावाने वेश्या व्यवसाय देवतांच्या आशीर्वादाने शेकडो वर्षे बिनधास्त चालू आहे. जर आल्याने, अन्य कारणाने म्हणजे नवस फेडण्यासाठी मुलीचे लग्न देवीशी लावून दिले जाते व त्यानंतर ती मुलगी वयात आल्यावर समाजातील कोणत्याही पुरुषाच्या उपभोगासाठी वापरण्याची मुभा आहे. देवदासी, मुरळचा ह्या देवभोळेपणा, धर्मश्रद्धा ह्यांतून उद्भवणारी लांच्छनास्पद प्रथा असली तरी ती सर्रास चालू आहे. आज देवदासींना कायद्याने बंदी आहे; पण देवदासींच्या संख्येत आई-बापांकडून राजरोस भर टाकली जाते; त्यामुळे या धार्मिक भावनेच्या विकृतीखाली फोफावलेल्या स्त्री जातीच्या बाजाराला कायदा थोपवू शकत नाही, अशी वस्तुस्थिती जाहे.

वेश्या म्हणजे पुरुषजातीने स्त्री जातीची केलेली पिळवणूक व शरीरविक्रयाचा धंदा करण्यास वळविण्यास भाग पाडणारी आर्थिक, सामाजिक, नैतिक व सांस्कृतिक कोंडी यांची अपरिहार्य बाब मानावी लागेल. वेश्या म्हणजे मूर्तिमंत दुर्दैव. वेश्या जीवन म्हणजे नरकवास. वेश्या म्हणजे अंधाऱ्या नरकाच्या भोकात वळवळत पडलेले जीव. अशा वेश्या व्यवसायात गुंतलेल्या वेश्यांचा प्रश्न हा सामाजिक पातळीवर वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून सोडविणे आवश्यक आहे.

काही सामाजिक समस्यांचे तज्ज्ञ असे मत व्यक्त करताना आढळतात की, सामाजिक संस्था म्हणून वेश्या आवश्यक आहेत. वेश्या ही समाजमनात भग-भगणाऱ्या बेफाम वासनेची 'सेफ्टी व्हॉल्व्ह' आहे. पण वेश्येचे जीवन म्हणजे पिकदाणी. कुणीही यावे व थुंकावे. वेश्या ही साधनरूप मानण्याचा समाजाचा दृष्टिकोन स्त्रीवर वर्षानुवर्षे अन्याय करीत आहे. वेश्या हा तूर्त तरी त्वरित निर्मूलन करण्याइतका सोपा व सोपा व्यवसाय राहिलेला नाही. शिवाय वेश्या वस्ती शहराबाहेर हलवा, वेश्या बंद करा, वेश्या व्यवसायाने समाज निकृष्ट व अनैतिक होत आहे, त्यावर बंदी घाला अशा घोषणा देऊन अथवा तशी मागणी करून तो दबणार नाही. त्यामुळे वेश्यांना समस्या मानण्यापेक्षा त्यांना सामाजिक घटक म्हणून मान्यता व प्रतिष्ठा निर्माण करून देण्याच्या दृष्टीने प्रयत्न व्हायला हवेत.

वेश्या व्यवसाय हा पुरुषी पशुवृत्तीमुळे कायदेशीर धंदा बनला आहे. त्यावर कायद्याने बंदी आणली तरी पुरुषांच्या पशुवृत्तीवर नियंत्रण आणण्याइतपत जबर-दस्त कायदा अस्तित्वात आहे कुठे? वेश्या व्यवसायाचे निर्मूलन म्हणून केवळ

वेश्यावस्तीचे स्थलांतर किंवा उच्चाटन करणे नव्हे हे लक्षात घ्यायला हवे. काही वेश्यांना पकडून सुधारणा तुरुंगात ठेवण्यानेही ही समस्या सुटण्यासारखी नाही. शिवाय शरीरविक्रेत्या स्त्रीचे अस्तित्व पुरुष देहधारी जनतेसाठी आवश्यक असे मानले जात असल्याने त्यांचे हाल कमी करण्यासाठी काय करता येईल, याचा विचार होणे आवश्यक आहे. तो करताना स्त्री–पुरुषांनी पुढाकार घ्यायला हवा. म्हणजे स्त्री–पुरुषांच्या सामाजिक, स्वयंसेवी, सांस्कृतिक संस्था व संघटनांनी हा प्रश्न उपेक्षित व अनैतिक स्त्रियांचा न मानता तो समाजाच्या जिव्हाळ्याचा व नैतिक जबाबदारीने सोडविण्याचा मानायला हवा.

वेश्यांच्या जीवनावर 'मंडी' सारखे चित्रपट महाराष्ट्रात दाखविले जातात; पण ते सर्वसामान्य जनमानसाचे मनपरिवर्तन करण्याच्या दृष्टीने प्रभावी ठरले असे वाटले तरी तशी वस्तुस्थिती असत नाही. वेश्याजीवन कसे काय असते ? हे जाणून घेण्याच्या उत्सुकतेने व त्यांच्या शरीरविक्रय कलेची मजा पाहण्यासाठी बहुसंख्य चित्रपटशौकीन अशा चित्रपटांना गर्दी करताना दिसतात. कथा-कादंबऱ्यांतून वेश्या स्त्रीच्या जीवनाचा नरकवास रंगविला जातो. समाजसेवक, कार्यकर्ते आपल्या व्याख्यानातून व लिखाणातून ह्या प्रश्नावर प्रकाश पाडण्याच्या प्रयत्नात आहेत. समाजशास्त्राची तज्ज्ञ व अभ्यासू मंडळी वेश्या व्यवसायाचा उद्‌भव, स्थिती व स्वरूप समजावून सांगण्याचा प्रयत्न करीत आहेत. वेश्या व्यवसायाकडे वळणाऱ्या तरुणींची कुंटणखान्यातून सुटका करण्याची जबाबदारीही पोलिस यंत्रणेच्यामार्फत घेतली जाते. वेश्यागृहाचे चालक, चालिका यांच्यावर खटले भरले गेल्याच्याही बातम्या वर्तमानपत्रांतून वाचावयास मिळतात. मात्र हे सर्व प्रयत्न फसवे, वरवरचे व दिखाऊ असल्याचे जाणवते; कारण नियंत्रणामुळे हितकारक सुधारणा होण्याऐवजी जास्तच लाचलुचपत, क्रौर्य व आधुनिकतेच्या प्रवाहरूपाने गोंडस नावाने हा व्यवसाय चालविला जात आहे.

वेश्यांची नेमकी संख्या किती ? हा शोध घेणे कठीण आहे; पण त्या संख्येत वाढ झाल्याचे नाकारता येत नाही. १९२१ साली आपल्या देशात सुमारे १५-२० लाख वेश्या असाव्यात असा अंदाज होता. १९७७ साली किमान ४० लाख तरी त्यांची संख्या असावी असे मत व्यक्त केले जाते. एकटया मुंबईत २० ते २५ हजार वेश्या असाव्यात असा अंदाज आहे. वेश्यावस्ती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भागात राहून धंदेवाईक वेश्या म्हणून जीवन जगणाऱ्यांची संख्या एवढी मोठी. त्या व्यतिरिक्त छुप्या रीतीने हल्ली उत्पन्न मिळविण्याचा मार्ग म्हणून हौशी वेश्यांचे प्रमाण वाढत आहे, असा निष्कर्ष डॉ. पुणेकर यानी आपल्या 'प्रॉस्टिटचुटस इन बॉम्बे' या प्रबंधात मांडला आहे. त्यांचा व्यवसाय कॅबरे नर्तिका, कॉल गर्ल्स, एक्स्ट्रा नटी, नृत्यांगणा, डान्सिग पार्टनर या आवरणाखाली चालू असल्याचे दिसते.

प्रौढ कुमारिका, विधवा, परित्यक्ता, विवाहित व अविवाहित स्त्रिया, लैंगिक विकृतीला बळी पडलेल्या तरुणींचा यामध्ये समावेश आहे.

आजच्या समाजात वेश्या म्हणून स्त्रीजातीला जो कलंक आहे आणि जो अन्याय होत आहे, त्याचा गंभीरपणे विचार व्हायला हवा.

वेश्या व्यवसायाला नियंत्रण घालण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर स्त्रीच्या आरोग्य, संपत्ती व संरक्षणाची हमी घेण्याचे धोरण स्वीकारायला हवे. वेश्या व्यवसायाकडे नाइलाजास्तव स्त्रियांनी वळू नयें या दृष्टीने त्यांच्यासाठी आर्थिक आधाराचा व्यापक विचार केला जावा. विधवा, परित्यक्ता, प्रौढ कुमारिका व घटस्फोटित स्त्रिया यांना पती व पिता यांच्या संपत्ती व मालमत्तेमध्ये कायदेशीर वाटणी मिळाली पाहिजे. अर्थात हिंदू विवाह कायद्यात तशी तरतूद करण्यात आली असली तरी सहजी व त्वरित इस्टेटीत वाटा मिळत नाही. वारसा हक्काबद्दलचा कायदासुद्धा उपयुक्त असला तरी कोर्ट–कचेऱ्या कराव्या लागतात. तेवढे धैर्य स्त्रियांमध्ये असतेच असे नाही. कायद्याबद्दल अज्ञान, कोर्ट–कचेऱ्यांमध्ये हक्क शाबीत करण्यात येणाऱ्या अडचणी व त्यासाठी लागणारा पैसा नसण्याची शक्यता, कुटुंबीय मंडळींकडून असा हिस्सा मिळू नये या दृष्टीने त्यांची एकजूट, मुलगी, बायको व आई म्हणून येणाऱ्या भावनात्मक अडचणी वगैरे बाबींमुळे पुरुषाच्या मालमत्ता व संपत्तीवर बायकांचे हक्क कायद्याने शाबीत झाले असले तरी प्रत्यक्ष व्यवहारात त्याच्या लाभांविषयीची वस्तुस्थिती समाधानकारक नाही. शिवाय आपल्या देशात दारिद्र्यात राहणाऱ्या कुटुंबांची संख्या एवढी मोठी आहे की, संपत्तीच नाही तर त्याचा हिस्सा वगैरे भानगड आहे कुठे ? परिणामी दारिद्र्यातील उपासमार निराधार स्त्रियांना वेश्या व्यवसायास उद्युक्त करीत आहे. त्यांची आर्थिक जबाबदारी समाजाने घ्यायला हवी.

वेश्या व्यवसायात शिरणाऱ्या तरुणींची संख्या वाढू नये म्हणून मुलामुलींना लैंगिक शिक्षण देणें आवश्यक आहे. केवळ शाळांतून नव्हे तर इतरही प्रकारच्या सामाजिक, शेती, आर्थिक कार्य करणाऱ्या संस्था, युवक मंडळे व महिला संघटना, भजनी मंडळे वगैरे संस्था व संघटनांच्यामार्फत हे कार्य व्हायला हवे; त्यामुळे बऱ्याच भावी वेश्या त्या व्यवसायाबाहेर राहतील व बरेच तरुण गुप्तरोगांना बळी पडू शकणार नाहीत.

वेश्या व्यवसायाचा संशोधनात्मक अभ्यास व्यापक पातळीवर होणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांच्या समस्या वस्तुनिष्ठ रीतीने लक्षात येतील. त्या आधारे हा प्रश्न सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक उपायांच्या आधारे कसा सोडविता येईल, या दृष्टीने एकसंध धोरण आखता येईल. असा अभ्यास सरकारने सामाजिक

...४

संस्थांच्या माध्यमाने हाती घ्यावा. आज ही जबाबदारी सरकार व इतरही सामाजिक स्वयंसेवी संस्थांच्याकडून टाळली जात आहे. किंबहुना तो प्रश्न अत्यंत दुर्लक्षित व उपेक्षित राहिला आहे. शरीरविक्रेत्या स्त्रियांना सामाजिक गरज म्हणून जरी मानले तरी त्यांची काहीतरी तरतूद करायला हवी. वेश्यांच्यावर कठोर निर्बंध घालून व कायदे करून हा प्रश्न सुटणार आहे का ? सरकारी उपाय म्हणजे वेश्यागृहांवर छापे व दलालांना शिक्षा असा अत्यंत तुटपुंजा, वरवरचा व झटका आल्यासारखा अधूनमधून उपाय चालू आहे. त्याशिवाय वेश्यांसाठी किमान वयाची अट नेमून दिलेली आहे. वयाचा दाखला काय नोटा देऊन बदलून आणता येत नाही. छापा घालणारे पोलिस सामाजिक जाणिवेने प्रेरित झालेले असतात काय ? सरकारी कायदे व पोलिस यांनी ही समस्या दूर होईल काय ? वेश्या हा गुन्हा तसा कायदेशीर ठरत नाही. मग शिक्षा कुणाला व कशासाठी ? दलाल व वेश्या पकडून वेश्यागमन करणारा पुरुष मात्र गुन्हेगार ठरणार नसेल तर हा व्यवसाय बंद होईल कसा ?

हा व्यवसाय करताना गरोदरपणा व गुप्तरोग ह्यांमुळे स्त्रिया अत्यंत हलाखीत जीवन जगताना दिसतात. संतती नियमनाची साधने वापरून वेश्यांची गर्भारपणाची स्थिती टाळता येईल; परंतु एखाद्या वेश्येला मातृत्वाचा अधिकार नाकारण्यातच तिचे हित आहे, असे आपण का समजावे ? ती मुलाच्या मदतीने ह्या व्यवसायातून बाहेर पडू इच्छित असेल तर त्या कृतीला इष्ट वळण देण्यास समाजाने तयार व्हायला हवे. ती व तिचे अपत्य यांना आधार मिळायला हवा. बाबासाहेब आमटचांनी महारोग्यांसाठी आनंदवन निर्माण करून अत्यंत दुर्धर कामास सामाजिक मान्यता मिळवून दिली. समाजाने गुन्हेगार ठरविलेल्या या वेश्यांसाठी आनंदवन निर्माण करायला पुढाकार घेणारा कोण भेटेल ? निदान सरकारने तरी त्यांच्याकडे लक्ष पुरविण्याची गरज आहे.

वेश्यांना पर्यायी व्यवसाय पुरविणे, त्यांच्या आरोग्यासाठी सेवा पुरविणें, गुप्तरोग काबूत आणण्याच्या दृष्टीने उघडपणे व निश्चित मनाने त्यांनी डॉक्टरांचा सल्ला व उपायाकडे वळावे या दृष्टीने सामाजिक वातावरण तयार झाले पाहिजे. आपल्या समाजात लैंगिक भूक भागविण्याच्या परंपरा ह्या व्यवहार्य नाहीत. त्या छुप्या व अनैतिक मार्गाचा शिक्का मानून आडमार्गाने भागविल्या जात आहेत; त्यामुळें वेश्या व्यवसाय नष्ट होण्याची आशा करणे सर्वथैव अव्यवहार्य आहे. म्हणून वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांना सामाजिक वर्तुळाबाहेर ठेवून त्यांची सुधारणा होणार नाही. त्यांचा प्रश्न आपला समजून त्याकडे पाहण्याचे भान आजही आम्हाला नाही, ही दुर्दैवाची बाब आहे.

वेश्या व्यवसायात गुंतलेल्यांची परवड थांबण्यासाठी हा व्यवसाय किंवा धंदा करणाऱ्या स्त्रियांना अनैतिक व गुन्हेगार मानण्याची भूमिका सोडून द्यायला हवी. वेश्यागृहे ही मध्यस्थांना पैसे मिळविण्याचे साधन बनलेली केंद्रे आहेत व वेश्यांची मात्र अत्यंत केविलवाणी अवस्था आहे, हे नाकारता येणार नाही. त्यामुळे वेश्या व्यवसायाच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाय आणि सुधारणा हेतूने आखण्याचे मार्ग अवलंबिले पाहिजेत. म्हणजे 'प्रिव्हेंटिव्ह मेजर्स आणि क्युरेटिव्ह मेजर्स' या मार्गांनी ह्याकडे पाहिले जावे त्या दृष्टीने लोकशिक्षणाचे शैक्षणिक मार्ग व वैद्यकीय मार्गांचा अवलंब करावा लागेल. संमतिवयाची मर्यादा वाढविणे, अविवाहित मातांना संरक्षण देणे, अनाथ मुलामुलींना योग्य आश्रय व संरक्षण देणे, शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार, अशा स्त्रियांच्या सुधारणेसाठी सरकारी व सार्वजनिक फंडाची तरतूद, पावनाश्रयाची सोय, अनैतिक व्यापारावर गब्बर होणाऱ्या मध्यस्थांना जबर शिक्षा ठोठावणे, वेश्या व्यवसायाने सार्वत्रिक आरोग्याला कसा व किती धोका पोहोचतो व त्या स्त्रियांचा शारीरिक ऱ्हास कसा भयावह प्रमाणात होतो याची जाणीव समाजाला करून द्यायला हवी.

संसर्गजन्य रोगांना इलाज करण्यासाठी स्वतंत्र खास क्लिनिक्स उघडणे, वेश्यांच्या प्रश्नाची वस्तुनिष्ठ माहिती गोळा करून त्यांच्या सल्ल्यानुसार पर्यायी व्यवसाय प्रशिक्षणाची उपलब्धता, सुरक्षिततेची निवासव्यवस्था व बेकार स्त्रियांना भत्ता आणि त्यांच्या उपजीविकेच्या साधनांसाठीच नव्हे, पण मानसिक गुंतवणूक व व्यवधान म्हणून कामाची उपलब्धता यांस प्राधान्य द्यायला हवे. जिथे तिथे अनीतीचा फैलाव म्हणून नव्हे, पण पुरुषी वासनेस बळी पडून वेश्या व्यवसायाकडे वळण्याच्या मोक्याच्या व धोक्याच्या जागा हेरून त्यांवर कडक इलाज योजणे आवश्यक आहे. तो इलाज करताना दुटप्पी नीतिमत्तेचा निकष लावला जाऊ नये. म्हणजे स्त्रिया निर्दोष, निष्कलंक व निरपराधी राहण्याच्या प्रयत्नात असता-नाही पुरुषाच्या स्वैराचारास बळी पडल्या तरीही स्त्री गुन्हेगार, समाजाकडून बहिष्कृत इतर स्त्रियांच्याकडून विटंबना सहन करण्यामुळे उपेक्षित समजली जाऊन पुरुष मात्र उजळ माथ्याने फिरतो. स्त्रीचे पाऊल वाकडे पडल्याची भाषा ऐकू येते; पण स्त्री व पुरुष या दोघांनी मिळून केलेल्या कृत्यावद्दल पुरुषाचे पाऊल वाकडे पडत नाही काय ? तिचा गुन्हा चव्हाट्यावर व पुरुषाची सहीसलामत सुटका. पुरुषाला समाज, रूढी किंवा कायदा काय शिक्षा करतात ? म्हणून कडक इलाज हा आजच्या काळात स्त्रीला वेगळी कसोटी व पुरुषाला वेगळा निकष लावून होता कामा नये.

झोपडपट्टी, कामगार वस्ती, चाळी, खेड्यातून शहराकडे जाऊन वास्तव्य करण्याची ठिकाणे, वेश्या वस्तीच्या जवळपासच्या जागा यांच्यातून ह्या व्यवसाया-

3360
22284

कडे स्त्रिया नाइलाजाने वळण्याची शक्यता असते. विडी कामगार, गवंडी काम अथवा ज्या ज्या व्यवसाय, उद्योगात प्रामुख्याने तरुण मुली व स्त्रिया गुंतलेल्या आहेत, अशा ठिकाणी समाज प्रबोधनाने स्त्रीविषयक कायदे, स्त्री-हक्काची जाणीव, स्त्रीवरील अन्याय व पिळवणूक या दृष्टीने जागरूकता निर्माण करण्याची गरज आहे. वेश्या व्यवसाय ठिकाणे व वस्त्या हेरून नामोहरम होणारी बाब नसली तरी उगमस्थानांचा शोध घेऊन त्या मनोवृत्तीच्या विकृतीपासून तरुण स्त्रियांचा बचाव करण्याच्या प्रयत्नास प्राधान्य देता येईल. तात्पुरता व दीर्घकालाचा विचार करून वेश्या व्यवसायावर उपाय करण्यात यावेत. वेश्या व्यवसायाकडे वळू न देण्याच्या दृष्टीने स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करणे व स्त्रीचा दर्जा सुधारणे, आर्थिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रात पुरुषाच्या बरोबरीने कायदेशीर व व्यवहार्य समानता प्राप्त करून देऊन सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेस वेग यायला हवा. विधवांचा व घटस्फोटित स्त्रियांचा पुनर्विवाह या उपायांना महत्त्वाचे स्थान असले तरी पुनर्विवाहास त्यांची तयारी आहे, असे गृहित धरून चालणार नाही; कारण कित्येक स्त्रिया अशा वैवाहिक सुखाऐवजी दुःखे, विकृती व मानहानीने इतक्या पोळलेल्या असतात की, त्यांनी पुनर्विवाहाची वाट कायमपणे बंद केल्याचे आढळते. म्हणून विशिष्ट वयानंतर लैंगिक शिक्षणाची सोय करून देऊन त्यांना आर्थिक दृष्टया स्वावलंबी व स्वतंत्र बनविणे हाच न्याय्य मार्ग होय. हे करण्याचे नाकारून आजच्या विसाव्या शतकात वेश्या व्यवसायाची भरभराट पाहत राहण्याइतके दुसरे दुर्भाग्य कोणते ?

१९५६ साली वेश्या व्यवसाय प्रतिबंधक कायदा करण्यात आला आहे; परंतु आपली सामाजिक परिस्थितीच अजून त्याची यशस्वीपणे अंमलबजावणी करता येईल अशा प्रकारची नाही. कायद्याच्या तरतुदी काय आहेत ? त्या आधारे वेश्या व्यवसायाचे उच्चाटन होऊ शकेल काय ? कायद्याने ह्या व्यवसायावर संपूर्ण बंदी घालण्यात यश आले काय, वेश्या व्यवसायावर नियंत्रण ठेवण्यात व उच्चाटन करण्याच्या दृष्टीने कायदा कितपत उपयुक्त ठरत आहे ? कायद्यात कोणत्या प्रकारची सुधारणा केल्याने ह्या व्यवसायाचे निर्मूलन होईल ? कायदा म्हटले की तो पोलिस यंत्रणेशी निगडित झाला. अशा यंत्रणेच्या आधारे वेश्या व्यवसायासाठी करण्यात आलेल्या प्रतिबंधक तरतुदीची अंमलबजावणी करता येईल ? वगैरे प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न केल्यास वेश्या व्यवसाय प्रतिबंधक कायदा आहे एवढेच एक होकारात्मक उत्तर व बाकीच्या बाबतीत नकारात्मक उत्तराची शक्यता अधिक अशी आजची परिस्थिती आहे. त्यामुळे वेश्या व्यवसायाचे संपूर्ण उच्चाटन करण्याच्या ह्या ध्येयाकडे वळण्यासाठी आपल्या सामाजिक परिस्थितीत बदल घडवून जाणणे जरुरीचे आहे. त्यासाठी फक्त कायदा उपयुक्त ठरणार नाही.

वेश्या व्यवसाय पूर्णपणें बंद झालाच पाहिजे असे मानून त्या दृष्टीने कायदा करावयाचा झाल्यास वेश्या व्यवसाय हा गुन्हा समजला गेला पाहिजे. त्यासाठी अत्यंत कडक कायदे करावे लागतील. शिवाय त्याच्या अंमलबजावणीसाठी मोठे व दक्ष पोलिस दल सुसज्ज ठेवावे लागेल. कामवासनेची पूर्ती करून घेण्यासाठी वेश्यागमन करणाऱ्या अनेकांना मोकाट वागण्यास मुभा मिळणार नाही. शिवाय असा गुन्हेगार ठरणारा पुरुष हा कडक कायदाही मोडणारा ठरल्यास त्यातून उद्‌भवणाऱ्या परिस्थितीविषयक निर्णय देण्यासाठी न्यायालयांचे काम वाढेल. त्यामुळे वेश्या व्यवसाय पूर्णपणें बंद झालाच पाहिजे, ह्या हेतूने प्रेरित होऊ इच्छिणारे सरकार वरीलप्रमाणे तरतुदी करण्यास समर्थ आहे असे आजच्या एकंदर परिस्थितीवरून वाटत नाही. संपूर्ण बंदीचे धोरण आजच्या शासनाला झेपण्यासारखे नाही. शिवाय तशी सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक परिस्थितीही नाही.

दुसरा विचार असा की, वेश्या व्यवसायासंबंधी प्रतिबंधात्मक धोरण अवलंबिता येते. ह्या धोरणानुसार वेश्या व्यवसायाचे अस्तित्व सरकारला मान्य करावे लागते व असा व्यवसाय करणे हा गुन्हा नव्हे असेही मानावे लागते. अर्थात हा गुन्हा नव्हे हे मान्य केले तरी स्त्रीला भोगाव्या लागणाऱ्या दुष्परिणामांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. म्हणून कोणत्या ना कोणत्या स्वरूपात त्याच्यावर नियंत्रण घालणे भाग आहे. संपूर्ण बंदीच्या धोरणात वेश्या व्यवसाय गुन्हा ठरत असल्याने तो जरी संपूर्णपणे समाजात नष्ट झाला नाही व तो चोरून करण्याची प्रवृत्ती झाली व त्याचे परिणामही गुप्तरोगाच्या स्वरूपात दिसू लागले तरीही उघडपणे औषधोपचार करणे किंवा डॉक्टरचा सल्ला घेणे कायद्याच्या कचाट्यात सापडण्याच्या भीतीने अशक्य झाले असा इतर देशांचा अनुभव आहे. त्यामुळे सध्या तरी वेश्या व्यवसायाबद्दल नियंत्रणाचे धोरण स्वीकारण्यात येते. त्यामुळे वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांची नोंद सरकारी नोंदणी बुकात असणे, याचना करणे, मोह पाडणे, सार्वजनिक जागी फिरणे वगैरे बंधनांचे कायदे करणे, वेश्यागृहांची व तेथील स्त्रियांची वैद्यकीय तपासणी करणे, त्यांना सक्तीने हॉस्पिटलात पाठविणे व त्यांच्यावर औषधोपचार करणे शक्य झाले आहे; परंतु वेश्यांप्रमाणे वेश्यागमनी पुरुषांवरही निर्बंध असले पाहिजेत. त्यांना शिक्षा करण्याची तरतूद असली पाहिजे.

वेश्या व्यवसायाचे उच्चाटन करण्याच्या धोरणाचा विचार वेश्या व्यवसाय-संबंधी कडक कायदे करून त्या व्यवसायाचे निर्मूलन करावे या अर्थाने मांडला जातो. उच्चाटनासाठी कडक कायदे हे जाचक व अन्यायी वाटण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यांविरुद्ध संघटितपणे आवाजही उठविला जाईल. स्वैर वर्तनाच्या व्यक्तींना तर ह्या व्यवसायाचे उच्चाटन व्हावे असे वाटेल कसे ?

याचा अर्थ उच्चाटनाची भूमिका सोडून द्यायला हवी असे मुळीच नाही. समाजाचे शाश्वत कल्याण व स्त्रीजातीचे शोषण टाळण्यासाठी उच्चाटनाच्या धोरणाच्या अंमलबजावणीची गरज आहे, हा तात्त्विक विचार पटण्यासारखा आहे. शिवाय त्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्यावर बंधने व खाजगी जीवनावर नियंत्रण येते, असेही मानण्याची गरज नाही.

प्रश्न महत्त्वाचा असा की, ज्याकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष केले जाते तो म्हणजे वेश्या व्यवसायावर संपूर्ण बंदी, नियंत्रण व उच्चाटन ह्यांपैकी कोणत्याही धोरणाचा अवलंब करून कायदे करण्यात आले तरी वेश्या ह्या व्यवसायातून बाहेर पडल्या तरी त्यांची कुटुंबे त्यांना स्वीकारण्यास तयार आहेत काय ? समाज त्यांच्याकडे चांगल्या दृष्टीने पाहून आपल्यात सामावून घेण्यास उत्सुक आहे काय ? सरकार त्यांच्यासाठी निवास व्यवस्था व आर्थिकदृष्टचा कायमची जबाबदारी घेण्यास समर्थ आहे काय ? त्यांच्या कुवतीनुसार कामधंदा मिळेल अशी हमी देणे शक्य होईल काय ? शरीर व मन दुबळे झालेल्या, कसब व शिक्षण नसलेल्या, शरीर-कष्टाची सवय नसलेल्या या स्त्रियांना खाजगी नोकरी झेपेल काय ? व त्याहीपेक्षा ती देण्यास कुणी तयार होईल काय ? छोटे उद्योग व कामधंदा यांत त्या यशस्वी होतील काय ? वगैरे प्रश्न गंभीरपणे लक्षात घेतले जात नाहीत; कारण आजही स्त्रीविषयक कायदे करण्यात पुरोगामी असलेल्या सरकारला कायद्यांची यादी वाढविण्यात राजकीयदृष्टचा रस आहे; पण प्रत्यक्षात ह्या व्यवसायात गुंतलेल्यांची समस्या वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून सोडविण्याची जबाबदारी घेण्याचे सामर्थ्यही नाही. म्हणून वेश्या व्यवसाय प्रतिबंधक कायदा १९५६ साली झाला, पण सातत्याने वेश्यांची संख्या वाढत आहे; यातच कायद्याच्या परिणामकारकते-विषयी यंत्रणेची उदासीनता लक्षात येते. कायद्याने स्त्रीला सुरक्षितता, निर्भयता व आत्मविश्वास आणि विकासाच्या संधी मिळाल्या पाहिजेत. केवळ स्त्री म्हणून नव्हे तर व्यक्ती म्हणून स्वातंत्र्याची व हिताची जपणूक झाली पाहिजे. जर त्या विचाराने वेश्या व्यवसायाकडे पाहायचे झाल्यास वेश्यांच्या पुनर्वसनाचे मार्ग कायद्यातच नमूद करावे लागतील, किंबहुना त्या प्रकारच्या तरतुदीस अधिक प्राधान्य द्यावे लागेल.

पुनर्विवाह

स्त्रीचा पुनर्विवाह ही गोष्ट आजच्या समाजात नवीन नाही व खटकणारी नाही. पहिल्या पतीच्या मृत्यूनंतर परावलंबी जीवन जगण्यापेक्षा विधवा स्त्रीने पुनर्विवाह करावा आणि आपली शारीरिक कुचंबणा, आर्थिक परावलंबन व

एकटेपणाचे जिणे संपवावे, असे गेली अनेक वर्षे समाजसुधारक सांगत आहेत. अर्थात आज पुनर्विवाहास प्रथम विवाहाइतकी मान्यता दिली जात नसली तरी मृत पतीनंतर त्या स्मृतीवर तिने सर्व आयुष्य घालविलेच पाहिजे असे नाही, हे मान्य झाले आहे. स्त्रीचा पुनर्विवाह ही गोष्ट निषिद्ध मानली जात नाही. तो पुरुषाच्या पुनर्लग्नासारखाच शास्त्रसिद्ध, न्यायाचा व पवित्र आहे, असे मानले जात असले तरी ते व्हावेत या दृष्टीने सामाजिक परिस्थिती सुधारण्याची गरज आहे. पूर्वी आर्थिक परावलंबन, शारीरिक काबाडकष्ट, मानसिक कुचंबणा, बंधनाची पराकाष्ठा, अशुभ दर्शन आणि जन्मभर राबून तिचीच अडगळ अशी विधवेची जीवनचर्या होती. त्यामुळे तिचे मानहानीचे जीवन संपुष्टात आले पाहिजे म्हणून पुनर्विवाहाची गरज प्रतिपादन केली पाहिजे; म्हणजे आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी नसल्याने होणाऱ्या हलाखीच्या परिस्थितीवर तोडगा म्हणून त्याचा पुरस्कार केला जाईल.

आज पुनर्विवाहाची आवश्यकता योग्य आहे, हे मान्य करताना सांसारिक सुखोपभोग घेण्याचा तिचा न्याय्य हक्क आहे, हे लक्षात घ्यायला हवे. आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होऊन विधवा स्त्री स्वतंत्रपणे जीवन जगू शकते किंवा पतिनिधनानंतर कायदेशीररीत्या तिला मालमत्ता व असेल त्या इस्टेटीवर हक्क सांगता येतो. तिच्या व मुलाबाळांच्या संगोपनाची जबाबदारी घेण्यात ती कमी पडते असे नाही. त्यामुळे पूर्वी 'घरातील एक अडगळ' हे तिच्या जीवनाचे स्वरूप नाहीसे झाले पाहिजे हा हेतू प्रामुख्याने ठेवून पुनर्विवाहाची गरज प्रतिपादन केली गेली; परंतु नंतरच्या काळात विधवांच्या लग्नाचा विचार हा मानसशास्त्रीय दृष्ट्या होणे अगत्याचे आहे हे ध्यानात येऊ लागले. पुरुषाने प्रथम पत्नी गेल्यानंतर दुसरी पत्नी करण्याचे जे नैसर्गिक कारण आहे, त्याच कारणासाठी विधवेने पुनर्विवाह करणे आवश्यक आहे. पुरुषाला स्त्री-सहवासाची जशी जरुरी आहे, तशीच स्त्रीलाही पुरुषाच्या सहवासाची गरज आहे हे मान्य होऊन त्याकडे पाहिले जावे. पुरुष जसा पत्नीच्या मृत्यूनंतर संन्यासी, बैरागी होत नाही हे समाजाने बिनधोकपणे मान्य केले आहे, ह्याच भूमिकेतून विधवेच्या पुनर्विवाहाकडे बघण्याची तयारी ठेवायला हवी. खोट्या, अस्वाभाविक, अनैसर्गिक कल्पना न बाळगता वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून विधवांच्या परिस्थितीचा विचार व्हावा.

स्त्रीचा संसार प्रेमाचा, सुखाचा, समाधानाचा, तृप्तीचा झाल्यानंतर पतिनिधनाने वैधव्याची कुऱ्हाड कोसळली म्हणजे तिला मानसिक आधाराची गरज असते. पुरुषाच्या सहवासाची ओढ, निसर्गसहज शृंगाराच्या भावना व कुंकू लावून कुणाच्या तरी स्वामित्वाखाली सुरक्षित जगण्याची हौस हा भाव काही विधवांच्या बाबतीत गौण असतो. पण पुनर्विवाहाची त्यांची गरज प्रामुख्याने

मानसिक आधार ही असते. म्हातारपणातही स्त्रीला पतिसहवासाचे आकर्षण असते, ते एकटेपणाची पोकळी टाळण्यासाठी. त्यामुळे पन्नास वर्षे वयाला झालेल्या विवाहित स्त्रिया आपल्या पतीशी प्रेमाच्या गोष्टी, सुखदुःखाची बोलणी, वाद व तंटेसुद्धा घालताना दिसतात. तेव्हा त्या आपल्या म्हातारपणाची जाणीव विसरू शकतात. शिवाय मुले-मुली आपापल्या व्यापात असल्याने लग्न झालेल्या मुलाच्या संसारात प्रौढ विधवा स्त्रियांची गरज भासलीच तरी ती फक्त त्यांची मुले लहान असताना. त्यामुळे त्यांच्यावद्दलची आस्था ही आवश्यकतेतून निर्माण झालेली असते. अर्थात विधवा स्त्रियांची मातृत्व भावना नाहीशी झालेली नसल्याने नातवंडांची देखभाल त्यांना आनंद देणारी असली तरी केवळ त्यातून त्यांच्याकड पाहण्याच्या दृष्टिकोनामुळे येणाऱ्या निराशाजनक मनःस्थितीत पुरुष म्हणून पती सहवासाची गरज असते. म्हणून म्हातारपणात वयोवृद्ध माणसे जेव्हा विधवा स्त्रीने लग्नाच्या मोहात पडू नये, असे विरक्तीचा आव आणून सांगतात, तेव्हा सर्व उपभोग घेत असूनही आपण विरक्त आहोत, असा खोटा आव आणण्याचा त्यांचा प्रयत्न असतो आणि आमच्यासारखेच तिनेही त्यागाने, विरक्तीने राहावे, असा अर्थ अभिप्रेत असतो. उपभोग घेत असूनही त्यांच्यासारखा खोटा विरक्तीचा दिमाख दाखविण्याची आजच्या जगात तरी गरज नाही. ते स्वतः सर्व प्रकारची सुखे भोगत राहतात व विधवा स्त्रियांनी मात्र शारीरिक व मानसिकदृष्ट्या एकटेपणाच्या जीवनात सुख मानावे अशी अपेक्षा करीत राहतात. त्यांच्या दुर्दैवी जीवनाबद्दल फक्त कोरडी सहानुभूती दाखविणेच त्यांना आवडते. अशा लोकांची मनोवृत्ती फार संकुचित आहे असे म्हणावे लागेल; म्हणून वयोवृद्ध पुरुषांची अथवा स्त्रियांची मानसिकदृष्ट्या एकटेपणाची पोकळी ही जाणीवपूर्वक लक्षात येते. म्हणून पुनर्विवाह हा त्यावरील तोडगा या दृष्टीने त्याचे समर्थन व्हायला हवे.

आणखी एक विचार असा की, वयाच्या चाळिसाव्या वर्षीही कित्येक स्त्रियांची अशी तक्रार ऐकू येते की, पती मेल्यानंतर त्या कितीही नैतिकदृष्ट्या चांगल्या वागत असल्या तरी समाजातील अनेकांची त्यांच्या वर्तणुकीवर दृष्टी असते. त्यांची वागणूक कितीही शुचिर्भूत असली तरी लोकांच्या दृष्टीने त्या मंगळसूत्र नसलेल्या स्त्रियाच ठरतात. त्यांच्या आचरणाविषयी लोक खात्री बाळगतीलच असा विश्वास वाटत नाही; घरातील पुरुषाशी किंवा शेजारच्या माणसाशी विवाहित स्त्रीने बोललेले फारसे आक्षेपार्ह वाटत नाही; परंतु विधवा स्त्रियांनी बोललेले मात्र संशयाला कारण होते. अर्थात पूर्वीइतकी दबावाची आणि अत्यंत संशयातून त्यांच्याकडे पाहण्याची प्रखर परंपरेची परिस्थिती राहिली नसली तरी विवाहित स्त्री व विधवा स्त्री यांच्या वर्तणुकीचा अर्थ सारखाच, वागण्याच्या

भूमिकेचे समर्थन एकाच रीतीने आजही केले जात नाही. विधवा स्त्रीकडे नेहमीच संशयाच्या दृष्टीने पाहिले जाते. शिवाय अशा स्त्रीलासुद्धा स्वतःबद्दल स्वाभिमान, संरक्षणाची आवश्यकता भासल्यास पुरुषांचे सहकार्य घेण्याचा हक्क आहे. विवाहित स्त्रियांप्रमाणे मानाचे निर्धास्त जिणे स्वेच्छेने तिला हवे असेल तर त्यासाठी पुनर्विवाहाचा विचार करणे नैसर्गिक नव्हे काय ? अंतर्मनाची खरी इच्छा दडपून त्यांनी त्यागाचे जीवन जगण्याच्या नावाखाली स्वतःची मानसिक व शारीरिक कुचंबणा कशासाठी करून घ्यावी ?

विशिष्ट वयानंतर स्त्रीने पुनर्विवाहाचा विचार करू नये अशी एखादी वयाची लक्ष्मणरेषा आखून घेता येत नाही व देताही येत नाही. चाळीस वर्षांनंतर स्त्रीचे मन संसारातून विरक्त होते हे जरी खरे असले तरी सांसारिक गोष्टींचे व स्त्रीला पुरुष सहवासाचे आकर्षण नसतेच, असे म्हणता येणार नाही. पुरुष विधुर झाला की, चाळिसाव्या वर्षीही विवाहाचा विचार करू शकतो; कारण लहान मुलांची देखभाल अथवा मुले मोठी असली तरी त्यांच्या व्यापात गुंतलेली; त्यामुळे स्वयंपाकपाण्याची सोय, वैवाहिक सुखांची इच्छा, स्त्रीसहवासाची सवय व गरज, म्हातारपणात उद्‌भवणाऱ्या आजारपणात काळजी घ्यायला हक्काचे माणूस असा विविधांगी विचार करून पुरुषांचा पुनर्विवाहाचा आग्रह नातेवाईक मंडळींकडून होतो. बऱ्याच वेळा प्रौढ कुमारिका असलेल्या आणि आर्थिक अडचणीत असलेल्या तरुणी, विधवा स्त्रिया अशी स्थळे सुचविली जातात व लग्नेही उरकली जातात असे दिसते. पुरुषाप्रमाणे स्त्रियांना शृंगारिक वासनांसाठी नव्हे; पण खात्रीच्या आधारासाठी पुनर्विवाहाची जास्त गरज आहे, हे जवळपासच्या मंडळींनी जाणून घ्यायला हवे. पुरुषांच्या जीवनास परिपूर्णता येण्यासाठी व सहवासाचा आनंद म्हणून जसे चाळिसाव्या वर्षीही लग्नाची आवश्यकता भासते, त्याचप्रमाणे स्त्रियांनाही एकमेकांच्या साहचर्याने जिणे सुसह्य करता येते. शिवाय काही वर्षे संसार केल्यानंतर स्त्रीने संसारातून, शृंगारातून मन काढून घ्यायलाच हवे असेही म्हणणे गैर आहे. प्रौढ वयातही पुरुष सहवासाचे आकर्षण वाटणे हे अनैसर्गिक मानणे चुकीचे आहे. म्हणून शारीरिक वासना, मानसिक प्रेम, पुरुष सहवासाची सवय, मुलांची जबाबदारी घेण्याच्या दृष्टीने त्यांना पितृत्वाची उणीव भासू नये म्हणूनसुद्धा पुनर्विवाहाचा विचार केवळ बालविधवेच्या दृष्टिकोनातून करून चालणार नाही; तर आजच्या काळात प्रौढ विधवांच्या संदर्भातही त्याची गरज मान्य करावी लागेल.

मुले असलेल्या विधवा स्त्रियांच्याबाबतीत पुष्कळदा पुनर्विवाहाची शक्यता धोकादायक व कुटुंब स्वास्थ्य बिघडण्यास जबाबदार असल्याचे मानले जाते. अशा स्त्रियांनी लग्नाच्या भानगडीत पडू नये असेही अनेकजण बोलताना आढळतात,

परंतु पुनर्विवाह करताना स्त्री आपल्या जबाबदाऱ्यांचे भान ठेवते. शिवाय असे विवाह हे तारुण्यातील प्रेमविवाह या स्वरूपाचे असत नाहीत. सहवासाने, एकमेकांविषयी जिव्हाळा वाटल्याने अथवा नातेवाईक, मध्यस्थ मंडळी पूर्वकल्पना देऊन पुनर्विवाहाच्या शक्यता निर्माण होतात व मगच अंतिम निर्णय घेतला जातो. त्यामुळे मुलांची जबाबदारी नाकारून विधवा आपल्या वैवाहिक सुखाचा विचार करतात असे नाही, शिवाय मुले स्वत:ची जबाबदारी घेण्याइतकी मोठी असल्यास त्यांच्यासाठी पुनर्विवाहामुळे निर्माण होऊ शकतील अशा संभाव्य अडचणींचा बाऊ करण्याचीही गरज नाही. अर्थात मुले असलेल्या विधवेशी लग्न करण्यास पुरुष सहसा उत्सुक नसतात. कारण सावत्र मुले आहेत हे सांगताना स्त्रीला नैतिकदृष्टचा मोठेपणा व त्यागाचे वाटू शकते; परंतु पुरुषांना मात्र तसे न वाटता कमीपणाचे वाटते. त्यामुळे पुनर्विवाह करताना आपली मुले पहिल्या सासरच्या घरी अथवा माहेरी (शक्यता खूप कमी) सोडून दिली पाहिजेत किंवा पुनर्विवाहित पतीच्या संमतीने पतीच्या घरी न्यायला हवीत.

अशी जबाबदारी घेणारी पुरुष मंडळी भेटण्याची शक्यताही नाकारता येत नाही. विशेषत: ज्या विधवा या आर्थिकदृष्टचा स्वावलंबी असतात, त्यांच्या बाबतीत पुनर्विवाह केल्यावर पूर्वाश्रमीच्या मुलांच्या पालकत्वाची जबाबदारी घेण्यास ते मागेपुढे पाहत नाहीत. एवढ्यासाठी मुले असलेल्या अशा स्त्रियांनी आर्थिक दृष्टचा स्वावलंबी असणे प्रथम आवश्यक आहे. मात्र केवळ आर्थिक स्वावलंबन विधवेच्या पुनर्विवाहास अनुकूल घटक ठरेल असे नाही. पतीच्या मृत्यूनंतर मुलांच्या जिव्हाळचाची आणि प्रामाणिक पालकांची जबाबदारी आई घेऊ शकते हे मान्य; परंतु विधवा झाल्यावर तिने दुसरा विवाह केला म्हणून मुलांच्यावरील तिचे प्रेम कमी झाले आणि पहिल्या पतीच्या पवित्र स्मृतीस ती विसरली असे म्हणून पुनर्विवाहानंतरच्या प्रत्येक कृतीचा अर्थ त्या दृष्टीने लावला गेल्यास वैवाहिक जीवनातील समाधान लोप पावेल. ज्या मुलांवर विसंबून राहून विधवेने त्यांच्यासाठी एकटेपणाने आयुष्य काढले, ती मात्र अखेरपर्यंत एकटीच राहते. मुलांची साथ ही बरोबरीची, सुखदु:ख सारख्या तऱ्हेने सहभागी होण्याची, जिव्हाळचाची असतेच असे नाही; म्हणून मुलांकडे पाहून आपले आयुष्य विधवांनी कंठावे असे म्हणणे इष्ट नाही.

आर्थिक जबाबदारी उचलण्याचे सामर्थ्य अथवा तशी तरतूद असणाऱ्या विधवांनी मुलांची आर्थिक व्यवस्था चोखपणे लावावी हे अपेक्षित आहे. शिवाय आई म्हणून मुलांची देखभाल त्या चोखपणे करतील असा विश्वास बाळगण्यासही हरकत नाही. त्यामुळे पतीच्या निधनानंतर मुलांच्या खात्रीलायक संगोपनाच्या संयुक्तिक मार्गांचा अवलंब करणाऱ्या विधवांची स्वेच्छेने पुनर्विवाहाची तयारी समाजाला

मान्य होत असली तरी ते व्हावेत या दृष्टीने मात्र प्रयत्नास पुढाकार घेण्यातील मागासलेपणा व संकुचित प्रवृत्ती अजूनही विशेष करून बदललेली दिसत नाही. वैयक्तिक पातळीवर अथवा संस्था, मंडळे, संघटना स्तरावर पुनर्विवाह व्हावेत या दृष्टीने फारसे प्रयत्नही केले जात नाहीत. अगदी तरुण वयात वैधव्य प्राप्त झालेल्या विधवेनेसुद्धा आपल्या अत्यंत लहान वयाच्या मुलांची काळजी म्हणून पुनर्विवाहाचा विचार करणेही अयोग्य ठरेल असेच तिच्या मनावर बिंबविले जाते. पहिले मूल पाच अथवा तीन वर्षांचे व दुसऱ्यांदा गरोदर असताना पती वारल्यानंतरसुद्धा त्या तरुण विधवेचा पुनर्विवाह व्हावा, असे जुन्या पिढीतील मंडळींना मनापासून वाटत नाही; कारण आपल्या समाजात मातृत्व अत्यंत महत्त्वाचे आणि त्या मानाने इतर सुखांना गौण स्थान अशी समाजाची मनोभूमिका आम्ही फार बदललेली नाही. शिवाय पुनर्विवाहाची विधवेची तयारी मानसिकदृष्ट्या तर असायला हवीच, पण त्याचबरोबर दुसऱ्या लग्नानंतरच्या परिस्थितीशी जुळवून घेण्याची खंबीर मनाने प्रयत्न करण्याची उभारी हवी.

वैधव्याने खचून जाऊन काही वर्षे तसेच जीवन व्यतीत केल्यानंतर अगदीच नाइलाजाने पुनर्विवाहाची इच्छा व्यक्त केल्यास, द्विधा मनस्थितीत निर्णय घेतल्यास पुनर्विवाह शास्त्रशुद्ध व न्यायाचा असला तरी तो सुख व संतुष्टतेचा ठरेलच असे नाही. म्हणून पुनर्विवाह हा स्वेच्छेचा भाग तर आहेच, पण केवळ विधवेच्या इच्छेचा तो मार्ग असून तिच्याशी विवाह करण्यास उत्सुक व इच्छुक असणाऱ्या पुरुषांच्या सहकार्याने तो स्वीकारता येणार आहे. पुनर्विवाहास सामाजिक मान्यता हवी. कायद्याने अशा विवाहास मान्यता असून भागणार नाही. आज पुनर्विवाह करणाऱ्या पुरुषाची सामाजिक प्रतिष्ठा कमी मानली जात नाही; पण तितक्याच दर्जाने पुनर्विवाहित स्त्रीला वागविण्याची गरज आहे. व्यक्ती, मुले व समाज या सर्व दृष्टिकोनांतून पुनर्विवाहाचा विचार व्हायला हवा. अन्यथा मन नसलेला जीव, आत्मा नसलेला प्राणी, चुरगळलेले जीवन, मरगळलेले आयुष्य अशी विधवांची स्थिती होईल.

प्रौढ कुमारिकांचे प्रश्न

समाजामध्ये स्त्रियांच्यासंबंधी जे विविध प्रश्न निर्माण होतात, त्यांपैकी प्रौढ कुमारिकांची समस्या हीसुद्धा चिंतेची बाब व चिंतनाचा विषय बनत असल्याचे जाणवत आहे. विशेषतः शहरात, मध्यम व उच्च मध्यमवर्गीय समाजात अशा उपवर मुलींची संख्या वाढत असल्याचे आढळते. ग्रामीण भागात व मुलींची लग्ने लहान वयातच करण्याची प्रथा असलेल्या जातीजमातींत हा प्रश्न प्रकर्षाने जाणवत

नाही. तरीही हल्ली तालुक्याच्या ठिकाणी महाविद्यालयीन शिक्षणाची सोय झाल्याने शिकणाऱ्या मुलींच्या बाबतीत हा प्रश्न निर्माण होत असल्याचे आढळून येत आहे. सुशिक्षित, नोकरी करणाऱ्या मुलींना या ना त्या कारणाने जोडीदार मिळणे कठीण होते. वय वाढले की लग्न जमणे कठीण होते. आपल्या समाजात ४०–४५ वर्षे वयात असलेला पुरुष २० वर्षे वयाच्या मुलीला मागणी घालू शकतो आणि आश्चर्य म्हणजे ती पूर्णही होते; पण या उलट प्रकार घडणे अशक्य आहे. योग्य वयात विवाहाची संधी हुकली की नंतर लग्न जमणे मुश्किल ठरते.

सर्वसाधारणपणे प्रौढ कुमारिका म्हणून लग्नाविना राहणाऱ्यांचा विचार केला असता असे दिसते की, त्यामागे प्रामुख्याने १) नैसर्गिक, २) सामाजिक, ३) परिस्थितिजन्य कारणे दिसून येतात. अर्थात गुंतागुंतीच्या घटकांमुळे व वातावरणामुळे त्यांच्यावर ही पाळी येते. कोणतेही एकच कारण यामागे आहे असेही म्हणता येत नाही. काही वेळा अनेकविध कारणांमुळे लग्नाविना राहावे लागते.

सुयोग्य निवडीसाठी वरपक्षाकडील मंडळांकडून जाहिरात देण्याची पद्धती दिवसेंदिवस प्रिय होत चालली आहे. जाहिरातींचा अभ्यास केल्यास सुस्वरूप, अमुक इतक्या उंचीची, चष्मा नसलेली, विशिष्ट जात व खानदान घराण्यातील वधू पाहिजे अशी बहुसंख्य मंडळींची वधूसंबंधीची अपेक्षा असते. त्याशिवाय विशिष्ट क्षेत्रातच नोकरी करीत असल्यास प्राधान्य दिले जाईल, असाही स्पष्ट उल्लेख असतो. स्मार्ट, सडपातळ, चष्मा नसलेली या प्रकारात न बसणाऱ्या विवाहेच्छू मुलींना नापसंतीचा शिक्का मारला जातो. जाहिरात न देतासुद्धा बघायला आलेली मंडळी काटेकोर पद्धतीने मुलीची निवड करताना देखणेपणाचा निकष थोड्याफार फरकाने लावतात. मुलगा 'वर' या वर्गीकरणातला असला तरी त्याचे कर्तृत्व व पैसा बघायचा असतो व मुलीचे 'वधू' म्हणून देखणेपण बघायचे असते असा आपला ठाम समज असल्याने त्या निकषात न बसणाऱ्या मुलींना लग्न हे तारुण्यातील स्वप्न मानून नंतर तो विचारच सोडून द्यावा लागतो.

शारीरिक व्यंग

देखणेपणा, उंची, रंग ह्या गोष्टी कुणाच्याच हातात नसतात. काळा रंग, कुरूपपणा, दात पुढे, नाकाची ठेवण, तिरळे डोळे वगैरे स्वरूपाच्या नैसर्गिक कारणांमुळें शिवाय अपंगत्व, अधूपणा, अंधत्व, मुकेपणा, बहिरेपणा याही कारणांमुळे लग्नाच्या बाजारात त्यांचे मूल्य शून्य व काही वेळा वजा असते; त्यामुळे जोडीदार मिळण्याची अपेक्षा ठेवणेच अनैसर्गिक ठरते. काही वेळा मंद बुद्धी, मेंदूची अपुरी वाढ, मानसिक कमकुवतपणा वगैरे कारणांमुळें लग्ने होत नाहीत. अर्थात शारीरिक व्यंग व मानसिक विकृतीमुळे लग्नाविना राहणाऱ्यांना सामाजिक

व कौटुंबिक मान्यता असते. त्यामुळे त्यांना लग्न न झाल्याची फार मानसिक कुचंबणा सहन करावी लागतेच असे नाही. मनाची तयारी करून प्राप्त परिस्थितीला सामोरे जाण्याची त्यांच्याकडून अपेक्षा नाइलाजाने ठेवली जाते.

हुंडा, मानपान, दागदागिने यांसाठी आवश्यक तेवढा पैसा उपलब्ध नसलेल्या कुटुंबांतही मुलींची लग्ने जमविणे अशक्य होते. गरिबी व कुटुंबात मुलींची संख्या जास्त असणे यामुळे लग्नासाठी आवश्यक तेवढी आर्थिक तरतूद करता येत नाही. कर्त्या माणसाचा अचानक मृत्यू किंवा आकस्मिक आर्थिक संकट यांमुळे कुटुंबातील मुलीवर जबाबदारी पडते. नोकरी हा मुलीची लग्ने लांबणीवर टाकण्यास कारणीभूत ठरणारा घटक आहे. मुलगी मिळवती झाली की, कुटुंबातील मंडळींना तिच्या मिळकतीची चटक लागते. विशेषत: मोठे कुटुंब व वडील पेन्शनच्या मार्गावर असल्यास मिळवत्या मुलीच्या लग्नाचा विषय फक्त आईच्या मनात असतो. बाकी सर्वजण ' तिचे लग्न झाल्यास आपले कसे होणार ? ' या विचाराने त्रस्त झालेले आढळतात. धाकट्या भावंडाचे शिक्षण, घरचा खर्च भागविण्याच्या व त्यागाच्या भूमिकेत मुलींना लग्नाची इच्छा प्रकट करणे अशक्य बनते. आर्थिक ओढाताण वाढू नये, मानसिक स्वास्थ्य बिघडू नये आणि कुटुंबात तणावाचे वातावरण निर्माण होऊ नये आणि लहान भावंडांच्या मनावर ह्या वातावरणाचा परिणाम होऊ नये, म्हणून त्या मुली लग्नाचा विचार करण्यासही धजत नाहीत. ते जमविण्यासाठी पुढाकार घेतल्यास कुटुंबाची आर्थिक ओढग्रस्त परिस्थिती होणार हे जाणून वडील मंडळीसुद्धा फारशी उत्सुक नसल्याने हा विषय हळूहळू मागे पडतो.

रूढींचा प्रभाव

जात, गोत्र, धर्म, कुंडली इत्यादी बाबींचा अजूनही लग्नासंबंधात प्रभाव आढळून येतो. जेव्हा मुगील पसंत नसते तेव्हा कुंडली जमत नाही हे हमखास प्रभावी हत्यार उपयोगी पडते. खानदान, घराणे, पदर लागणे, नात्यात बसणे याकडेही कटाक्षाने लक्ष पुरविणारी मंडळी आहेत. मुलीच्या बाबतीत वय ही अट फार महत्त्वाची ठरते. वरापेक्षा वधूचे वय विशिष्ट वर्षांनी कमी असण्याचा आग्रह धरणारी मंडळी असतात.

मुलीचे वय वाढले व परिस्थितिजन्य कारणामुळ तिचे लग्न होऊ शकले नाही अशा मुलीच्या बाबतीत लग्न न होण्याच्या कारणांचा कीस काढला जातो. तिच्या चारित्र्याविषयी खऱ्या-खोट्या बातम्या पसरविल्या जातात. मुळातच मुलीचे लग्न इतकी वर्षे जमले नाही म्हणजे तिच्यात काही तरी दोष असलाच पाहिजे, असा ठाम ग्रह करून घेतला जातो. त्यामुळे तिला बघण्याचा कार्यक्रम होतो, पण नाकारून क्रूर चेष्टाही करण्याचा प्रयत्न वरपक्षीय मंडळींच्याकडून केला

जातो. एवढेंच नव्हे तर मध्यस्थांच्यामार्फत नाकारण्याची कारणे त्या कुटुंबापर्यंत कशी पोहोचविली जातील, याचीही काळजी घेतली जाते. दाखविणे आणि बघणे ह्या प्रकारातून अनेक वेळा जाऊन निराशा पदरी पडल्यावर पुनःपुन्हा त्या प्रसंगाच्या सामोरे जाण्याची किळस निर्माण होते. काही वेळा आई–वडिलांचा आंतरजातीय विवाह झालेला असतो. आई, आजा, आजी, काकी यांपैकी कुणा–विषयी तरी बरे बोलले जात नसल्याने मुलगीही तशीच निघेल, अशा बेसवर नाकारली जाते.

' वरा 'बद्दलच्या अपेक्षा

सुशिक्षित, आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी आणि विचारस्वातंत्र्य असलेल्या मुलींच्या पतीविषयक अपेक्षा उंचावलेल्या आहेत. ज्याप्रमाणें वधूच्या निवडीसाठी जाहिरात दिली जाते, त्याप्रमाणे वराबद्दल स्पष्ट अपेक्षा व्यक्त करणाऱ्या जाहि-रातींचे प्रमाण वाढत असल्याचे दिसते. अर्थात पतीविषयक अपेक्षा करण्याचा व निवडीचा अधिकार कोणत्याही कारणाने मुलींना नाकारणें व तो दृष्टिकोन गैर मानणे अप्रस्तुत व अनैसर्गिक ठरेल; पण त्याच्या उंचावलेल्या अपेक्षांचा अतिरेक झाला व त्यांनीही मुलगा ' वर ' म्हणून नाकारण्याचा प्रयत्न केला तर त्यांची ही प्रवृत्ती लगोलग या ना त्या मार्गे सगळीकडे चर्चिली जाते. हे त्यांचे वर्तन आपल्या रूढीप्रिय समाजाला आणि लग्नाला बाजारी स्वरूप आल्याने दुसऱ्या पार्टीला उद्दामपणाचे वाटते. अशा मुलीशी लग्न करून आपण सुखी होणार नाही अशी खात्री विवाहेच्छू वराला वाटते. अशा स्वतंत्र वृत्तीच्या मुलीशी विवाह केल्यास आपला मुलगा ती आपल्यापासून दूर नेईल व म्हातारपणी सुख मिळणार नाही, अशी धास्ती वाटून वर माता–पिता त्या वाटेला जाणेच नको, असा व्यवहारी मार्ग स्वीकारतात.

काही मुलींना डॉक्टर किंवा इंजिनियर नवरा हवा असतो. शहरात राहणारा कार व बंगला असणारा, बदलीवाला नसलेला वगैरे अटी घालणाऱ्या मुली आहेत. चष्मा आहे, उंची कमी, सासू कडक स्वभावाची, वराच्या बहिणी बिनलग्नाच्या म्हणजे जबाबदारी आली म्हणूनही स्थळाबद्दल नाराजी व्यक्त करणाऱ्या तरुणी ह्या आर्थिकदृष्ट्या स्वतःच्या पायावर उभ्या असतात. पुढे पुढे त्यांची लग्नाच्या बाजारात किंमत कमी होते. नंतर त्या आपल्या अटी आणि आग्रही मते बाजूला ठेवून लग्नासाठी खाली उतरतात; पण तोपर्यंत वय वाढलेले असल्याने त्यांची ही तडजोडीची वृत्ती लग्न जमविण्यास उपयुक्त ठरतेच असे नाही. त्यातूनही एखादा गरीब, गरजू व मिळवती म्हणून उपकाराच्या भावनेने तिच्याशी लग्न करण्याची तयारी दर्शवितो; पण अशी उदाहरणे फारशी सापडत नाहीत.

मिळवत्या नसलेल्यांची कुचंबणा

प्रौढ कुमारिका ज्या नोकरी करून किंवा अन्य मार्गांनी पैसा मिळवीत नसतील, त्या कुटुंबाचा भार बनतात. अनावश्यक व्यक्ती या दृष्टीने त्यांच्याकडे पाहिले जाते. आई-वडिलानाही त्यांच्या अस्तित्वाचा कंटाळा आल्याची उदाहरणे दिसतात. त्या भावाच्या सुखाला लागलेले ग्रहण आहेत, अशीही त्यांची प्रतिमा उभी केली जाते. कुटुंबातील लग्नकार्यात, धार्मिक व सांस्कृतिक समारंभात फार भाग घेऊ नये अशीही सर्वांची अपेक्षा असते. उघडपणे तशा सूचनाही देण्यात येतात. त्यांच्या मनाचा व भावनांचा विचार केला जातोच असे नाही. अर्थात सर्वच कुटुंबांत अशी वागणूक मिळते असे नाही. तरीही थोड्याफार फरकाने उघडपणे नसली तरी त्यांच्या अपरोक्ष बोलण्यातून त्यांच्याविषयीची सहानुभूती व्यक्त न होता, जिव्हाळा दाखविला न जाता फक्त कुचेष्टा व वर्तणुकीविषयी नापसंती व्यक्त केली जाते. शिवाय त्यांच्यावर अनेक बंधने घालून नको हे जिणे असे म्हणण्याची पाळी आणली जाते. अर्थात सर्वजणी अत्यंत बंधनात राहून उबग येणारे जीवन जगतात असे नाही; परंतु त्यांनी तसे जगावे अशी कुटुंबातील सर्वांची अपेक्षा असते. सर्वांची अपेक्षा असते की, मिळवत्या नसलेल्या कुमारिकांनी कुटुंबात पडेल ते काम निमूटपणे करावे. दुरुत्तरे करू नयेत. सर्वांच्या पुढे पुढे करून त्यांची मने सांभाळावीत. जिथे जिथे शारीरिक बळाची आवश्यकता असेल तिथे तिथे त्यांची पाठवणी करणे, त्यानी मानावे अशी अपेक्षा असते. आजारी रुग्णाची सेवा हे तर त्यांच्यासाठीच ठेवलेले राखीव काम होय.

अशा शारीरिक व मानसिक कष्टाला व कुचंबणेला कंटाळून त्यांचा तोल जाण्याची, नैतिकदृष्ट्या अधःपतन होण्याची किंवा मानसिक विकृती जडण्याचा धोका असतो. कौटुंबिक प्रेम न मिळाल्यास, सामाजिक प्रतिष्ठा न लाभल्याने नाते-वाईकांची उपेक्षा सहन करावी लागत असल्याने, समवयस्क मैत्रिणी संसारात गुरफटलेल्या असल्याने, सण-समारंभ, कार्यक्रम-सोहळे यांच्यात सहभागी होऊन मनसोक्त आनंद लुटण्याच्या संधी मिळत नसल्याने त्यांची एकटेपणाची भावना वाढीस लागते. आधाराविना जीवन जगण्याच्या कल्पनेने मानसिक पोकळी निर्माण होऊन त्यांचे वागणे लहरी, असंभवनीय व चमत्कारिक बनण्याचा धोका निर्माण होतो. सुरुवातीला कुटुंब व समाजाकडून त्यांना मिळणारी सहानुभूती व जवळीक हळूहळू कमी होऊ लागते. जसजसे वय वाढत जाते व त्यांची शारीरिक कष्ट करण्याची कुवत कमी होऊ लागते, तसतशी त्यांची स्थिती आणखी दयनीय होते.

एकाकी व असुरक्षित प्रौढ कुमारिका

ज्या प्रौढ कुमारिका नोकरी करून आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र असतात, त्यांची

परिस्थिती थोडीफार वेगळी असते. त्यांच्या मिळकतीवर कुटुंब पूर्णपणे अवलंबून असते. त्यांची घराला गरज असते; त्यामुळे त्यांची घरात दखल घेतली जाते. त्यांचा घरात एक प्रकारचा वचक असतो. त्यांच्या मताला किंमत दिली जाते. आई वडीलसुद्धा त्यांच्या दबावाखाली राहतात. मात्र सुरुवातीला त्यांचा त्याग गौरविला जातो. त्यांचे कष्ट, संसारासाठी झटण्याची प्रवृत्ती, भावाबहिणीवरची माया, आई-वडिलांची काळजी यांसंबंधी स्तुती केली जाते.त्यांच्याविषयी कृतज्ञतेची व आदराची भावना असते; पण काही वर्षांनंतर विशेषत: त्या मुली स्वत:वर थोडा अधिक खर्च करू लागल्या, मैत्रिणींच्याबरोबर काही बेत, सहली व कार्यक्रम आखू लागल्या व म्हातारपणाची तरतूद म्हणून नियमित शिल्लक टाकू लागल्या व घरखर्चाला थोडासा हात आखडता येऊ लागल्या की त्यांना नापसंतीदर्शक उद्‌गार ऐकून घ्यावे लागतात, नाराजी व्यक्त केली जाते. भावांच्या मते, 'आम्ही काय तिला टाकून देणार आहोत काय ? आता आयुष्यभर पत्करं घेतलाय तेव्हा हात राखून वागायची गरज काय ?' अशा परिस्थितीत आई-वडिलाना परिस्थितीमुळे सहमत व्हावेच लागते. त्यातून भावाचे लग्न झाले असल्यास तर प्रौढ कुमारिका कुटुंबात वादाचा, भाऊ–बहिणी यांच्या पति–पत्नी नात्यातील तणावास व आई-वडिलांची केविल-वाणी परिस्थिती निर्माण करण्यास कारणीभूत ठरणारी बाब बनते. नणंद-भावजयीचे नाते संशयाचे, अनिष्ट स्पर्धेचे, हेव्यादाव्याचे, संसाराच्या सौख्याच्या ऱ्हासाचे बनते. परिणामी कौटुंबिक कलह व तणाव वाढून शेवटी त्या आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र असल्याने स्वतंत्र राहण्याचा निर्णय घेतात.

प्रौढ कुमारिकांना समाजात अत्यंत जपून वागणे भाग पडते. मंगळसूत्र घालून विवाहित स्त्रियांनी सौभाग्यालंकाराच्या आधारे कसेही वागले तरी समाज त्याकडे दुर्लक्ष करतो किंबहुना विवाहित स्त्रियांची तशी वर्तणूक असंभवनीय आहे असे समजून त्याचा गाजावाजा होत नाही. पण प्रौढ कुमारिकांच्याकडे सर्वांचे डोळे रोखलेले असतात. काहीजण त्यांच्या परिस्थितीचा गैरफायदा घेण्याच्या संधीची वाटच पाहत असतात, तर काहींना त्यांचा विषय चघळण्याचे व्यसन लागलेले असते. लग्न न होणे हे जणू काही त्यांचे पूर्वजन्माचे पाप असे समजून त्यांनी पदोपदी जपून वागले पाहिजे, अशी अपेक्षा. खऱ्याखोट्या अफवा पसरवून त्यांची टिंगल केली जाते.नैतिक बंधने व रूढी, प्रथा ह्यांचे पाश प्रौढ कुमारिकांसाठी अधिक ताठर केले जातात. अर्थात ज्या श्रीमंत कुटुंबात व भावाच्या आधारे सुरक्षित जीवन जगू शकतात, त्यांना हा त्रास उघडपणे सहन करावा लागतोच असे नाही. पण एकूण त्यांच्याकडे बघण्याची प्रवृत्ती हीच असते. प्रौढ कुमारिकांना सांसारिक जबाबदाऱ्या नसतात. मुला-बाळांचा व्याप नसतो व स्वतंत्र जीवन जगता येते अशी लोकांची समजूत असते; पण स्वातंत्र्य हे आपल्या समाजात त्यांच्याबाबतीत

शाप ठरते. नाइलाजाने कुमारिका राहण्याची पाळी आल्याने होणारी कुचंबणा लक्षात तर घेतली जात नाहीच, उलट त्यांच्या स्वातंत्र्याचा हेवा केला जातो. एकीकडे स्वातंत्र्याचा उपभोग घेण्याचा मोह व दुसरीकडे सामाजिक परंपरा व रूढींनी निर्माण केलेली पथ्ये पाळण्याची ओढ यांतून कुचंबणा सहन करावी लागते. त्यातून निराशा पदरी पडते.

काही उपाय

प्रौढ कुमारिका ह्या सामाजिक प्रथांचे बळी आहेत. नैसर्गिक शापामुळे व परिस्थितीच्या कोंडीत सापडल्याने त्यांना एकाकीपणाने आयुष्य घालवावे लागते; म्हणून समाजाने त्यांचा सहानुभूतिपूर्वक विचार केला पाहिजे. कुटुंबातील मंडळींनी त्यांची मानसिक स्थिती लक्षात घेऊन सावरण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यांचे प्रश्न समजावून घेण्याच्या दृष्टीने महिला कार्यकर्त्यांनी प्रयत्न करायला हवा. सामाजिक बांधिलकी म्हणून समाजातील संस्थांनी व सरकारने या दृष्टीने प्रयत्न करावेत. ज्यांना समाजकार्यात रस आहे, अशा सोशल वर्कर्स व समाजशास्त्राच्या तज्ज्ञ मंडळींना प्रशिक्षण देऊन त्यांचा प्रश्न सहानुभूतीने व तटस्थतेने अभ्यासला जावा, म्हणजे रूढी व परंपरागत निकष व पूर्वग्रहदूषित दृष्टिकोनातून त्यांकडे पाहिले जाऊ नये. त्यांच्या व्यक्तिगत व्यथा, कौटुंबिक, सामाजिक दृष्टिकोनातून विचारात घेतल्या जाव्यात. सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेचा हा भाग समजला जावा. ज्यांना नोकरी वा व्यवसाय नाही, अशा प्रौढ कुमारिकांना त्यांची आवड व कुवत लक्षात घेऊन कुशल अथवा अर्धकुशल स्वरूपाची कामे देण्यात यावीत म्हणून खास प्रयत्न करावेत. आर्थिक परावलंबित्वामुळे त्यांचे जिणे सर्वार्थाने कुचंबणेचे ठरते. ते त्यांच्या मानसिक कुचंबणेत अधिक भर टाकणारे ठरते. शिवाय वेळ उत्पादक कार्यात गुंतविण्याची संधी न मिळाल्याने त्यांची एक प्रकारची असमाधानी भावना वाढीस लागण्यास मदत होते. रिकामपण हे एकटेपणाची जाणीव तीव्र करण्यास कारणीभूत ठरते, म्हणून अशा प्रौढ कुमारिकांना अर्थार्जनाचे साधन उपलब्ध करून देणे म्हणजे सामाजिक जबाबदारी मानून त्याचा व्यापक दृष्टीने विचार व्हायला हवा. या दृष्टीने सोशल वर्कर्स बोर्ड, वसतिगृहे व महिला संघटना, शासनाची विविध खाती यांनी प्रयत्न करणे जरुरीचे आहे.

प्रौढ कुमारिकांनी अन्य प्रकारे एकाकी जीवन कंठणाऱ्या स्त्रियांशी संपर्क साधून मैत्री वाढविण्याचे प्रयत्न करावेत. त्यांचे अनुभव, कल्पना, व्यथांशी समरस होऊन एकमेकांच्या सुखदुःखात सहभागी व्हावे. समाजातील इतर स्त्रियांपेक्षा आपण वेगळे आहोत असे समजून हेतुपुरस्सर समाजापासून दूर जाण्याची प्रवृत्ती टाळावी. त्या प्रवृत्तीच्या आहारी गेल्याने व एकटेपणाची तीव्र जाणीव ठेवून

वागण्याने त्यांना वाईट सवयी, व्यसने व विकृती जडण्याचा धोका असतो. नैतिक अधःपतन होते. हे धोके टाळण्यासाठी त्यांनी आत्मचिंतन केले पाहिजे. आशावादी प्रवृत्ती अंगी बाणली पाहिजे. भावनेच्या आहारी न जाता वास्तव परिस्थितीला आत्मविश्वासाने सामोरे जाण्याचा व्यवहारी विचार मनोमन स्वीकारला पाहिजे. आपल्यात काहीतरी कमी आहे, अशा न्यूनगंडाने वागू नये. त्यांना समाजातील मानवी घटक म्हणून जगण्याचा पूर्ण अधिकार आहे. त्यांनी तो प्रस्थापित करावा आणि समाजाने त्याला मान्यता द्यावी. दुसऱ्याच्या सहानुभूतीची व दयेची वाट न पाहता स्वतःहून समाजात मिसळण्याची व पुढाकार घेऊन सामाजिक कार्यात गुंतवून घेण्याची वृत्ती त्यांना उपयुक्त ठरेल. तसेच धर्माच्या नावाखाली जे अवडंबर व व्रतवैकल्यांचे स्तोम माजविले जाते, ते जणू आपल्यासाठी आहे असे समजून त्या आधारे जीवन जगण्याचा मार्ग आदर्श समजू नये. ते सर्व टाळून सुशिक्षित प्रौढांनी आध्यात्मिक विचार व वाचनाचा छंद लावून घ्यावा. प्रामुख्याने स्वतःला मानसिक व आत्मिक समाधान ज्यात लाभेल, अशा स्वरूपाचे अभ्यास व कार्यक्रम हाती घ्यावेत. प्रौढ कुमारिकांनी आपल्या आयुष्याला गती दिल्यास स्वतःविषयी विचार करण्यास संधी न मिळेल अशा रीतीचे व्याप लावून घेतल्यास सामाजिक, सांस्कृतिक व आध्यात्मिक कार्यात गुंतवून घेतल्यास त्यांना मनाचा तोल साधता येईल.

एकटेपणाची जाणीव तीव्रतेने जाणवणाऱ्या व भावनाशील प्रौढ कुमारिकांनी शक्य झाल्यास व झेपल्यास अनाथ आश्रमातील एखादे मूल सांभाळण्यासाठी घेण्यास हरकत नाही. विशेषतः आर्थिक सुस्थिती व स्वतंत्र असणाऱ्यांनी हा निर्णय घेणे उचित ठरेल. त्याच्या संगोपनातून आणि जबाबदाऱ्या स्वीकारून मातृत्वाची भूक भागविता येईल. त्यालाही माया, सुरक्षितता व जिव्हाळा मिळेल. शिवाय त्याला शिक्षण देऊन त्याचे व्यक्तिमत्त्व विकसित केल्यास समाधान मिळेल. कदाचित हा विचार अवास्तव व अव्यवहारी वाटेल; पण व्यापक बुद्धीने आणि प्रौढ कुमारिकांच्या भूमिकेतून विचार केल्यास अस्थायी वाटणार नाही. एकमेकांच्या आधारे जिद्दीने जीवन सुसह्य करणे शक्य होईल.

कुमारी मातांची समस्या

भारतीय स्त्रीच्या समस्यांचा विचार करताना कुमारी माता हा प्रश्न टाळता येत नाही. कुमारी माता ही संज्ञा भारतीयांना नवीन नाही. कुंती ही पहिली प्रसिद्ध कुमारी माता, पण आज कुमारी मातेची समस्या भेसूर व गुंतागुंतीची ठरत आहे.

तो प्रश्न उग्र स्वरूप धारण करीत आहे विवाहाचे वय वाढत जाईल तशी ही समस्या वाढत जात आहे. कुमारिका माता म्हणून समाज अशा स्त्रीला धिक्कारतो; पण वेश्या म्हणून तो तिला स्वीकारतो ही वस्तुस्थिती नाकारून चालणार नाही. लैंगिक भावना आणि पुरुषाबद्दल आकर्षण हे नैसर्गिक आहे; पण हल्ली विवाह उशिरा होतात. वयात आलेल्या मुलींच्या विवाहास हल्ली अनेक कारणांनी विलंब लागतो; पण त्यांचे कामविकार जागृत होतात. त्यातच अश्लिल वाङमय, उत्तान व भडक चित्रपट, वडीलधाऱ्यांची सैल वागणूक, नीतिमूल्यांची उलथापालथ, अनैतिकेच्या संकल्पनेतील बदल, स्वातंत्र्याचा स्वैराचार असा लावला गेलेला सोयीस्कर अर्थ, लैंगिक ज्ञानाविषयीचे अज्ञान यांमुळे तरुणींच्या मनावर अनेक ताण येतात. त्यातून लैंगिक विकृती, चोरटी कृती व त्याविषयी दडपण आणि गुप्तता बाळगण्याची प्रवृत्ती, पालकांविषयीचा अविश्वास व जवळीक साधण्यासाठी आलेले अपयश यांमुळे कुमारी मातांची संख्या आपल्या देशात वाढत आहे.

पाश्चात्त्य देशात कुमारी मातांना मार्गदर्शन व बेकायदेशीर मुले सांभाळण्याची तयारी समाजाने व सरकारनेही दर्शविली आहे. तिकडे नीतिमूल्यांचा विचार महत्त्वाचा मानला जात नाही. ज्याप्रमाणे मानवाला अन्न, वस्त्र व निवारा यांची गरज आहे, त्याप्रमाणे लैंगिक भूक भागविणे हा निसर्गधर्म आहे, अशी पाश्चात्त्यांची विचारसरणी असल्यामुळे समागमाचे सुख घेण्यात अनैतिकता आहे, असे मानले जात नाही. त्यामुळे १५ ते १९ या वयोगटातील सुमारे ६० टक्के मुलींनी लैंगिक समागम घेतल्याचे आकडेवारीवरून लक्षात येते. भारतात एवढी टक्केवारी नसली तरी ती वाढत आहे हे नक्की. कारण कुमारी मातांची संख्या किती आहे, या दृष्टीने नेमकी आकडेवारी उपलब्ध होऊ शकत नाही; कारण समाजात कुमारी माता उघडपणे दिसू शकत नाहीत. विवाहपूर्व संबंधातून झालेली गर्भधारणा लक्षात येताच माता-पिता डॉक्टरी उपायांच्या सहाय्याने गर्भपात करून घेऊन मुलीची मोकळीक करवून घेतात. हल्ली गर्भपात कायदेशीर झालेला आहे; परंतु विवाहपूर्व गर्भपात हा अत्यंत गुप्ततेने उरकावा लागतो. मुलीच्या भवितव्याचा प्रश्न व घराण्याची अब्रू यांच्याशी तो निगडित असतो; त्यामुळे केवळ शहरात नव्हे तर तालुक्याच्या ठिकाणी डॉक्टर मंडळी अडलेल्या कुमारी मातांची सुटका करून घेण्यासाठी नडलेल्या पालकांच्याकडून जबरदस्त फी घेत असताना आढळून येतात. अर्थात अर्धशिक्षित मुली, खेड्यातील तरुणी, झोपडपट्टी व जुन्या चाळीत राहणाऱ्या वयात आलेल्या मुली व काही चांगल्या पण खानदानी म्हणवून घेणाऱ्या कुटुंबातील तरुण मुलींना मासिक पाळीनंतर समागमातून गर्भधारणा होते याचीही माहिती नसते.

नुकत्याच वयात आलेल्या मुलींना एकीकडे लैंगिक सुखाविषयीचे आकर्षण

तर वाटत असते व दुसरीकडे संस्कारामुळे एक प्रकारचे दडपण व मनातून भीती अनामिक तऱ्हेने वाटत राहते; परंतु एखादा क्षण त्यांना मोहात पाडतो. विशेषत: त्यांच्या मनामध्ये चाललेल्या या मानसिक संघर्षाबद्दल त्यांना आईजवळ बोलणे शक्य होत नाही. मोठ्या बहिणीशीही तेवढी जवळीक नसते. समवयस्क मैत्रिणीही योग्य सल्ला देतील अशी खात्री वाटत नाही. तेव्हा त्यांच्याकडून लैंगिक सुखाचा उपभोग घेण्याची चूक होते. काही वेळा घराशेजारी राहणारा तरुण, जवळचा नातेवाईक, शेतकाम, गवंडीकाम व इतरही कामाच्या निमित्ताने तरुण मुलींशी लगट करणारी मंडळी यांच्याकडून हेतुपूर्वक व अडचणीत टाकून गैरफायदा घेतला जातो. कुमारी माता म्हणून त्या तरुणी उघड माथ्याने जीवन जगू शकत नाहीत; पण गर्भ पाडण्यासाठी अघोरी व गावठी उपाय करून त्या मुलींचे शारीरिक हाल केले जातात. मारहाण व छळ होतो. त्यांच्या मन:स्थितीचा तर विचार कुणाच्याच दृष्टीने दखल घेण्यासारखा मुळीच नसतो. अशा तरुणींचा शारीरिक ऱ्हास, मानसिक खच्चीकरण, समागमाविषयी तिरस्कार, विवाहाबद्दल नफरत, पुरुष जातीविषयी आत्यंतिक चीड अशी स्थिती तर होते किंवा त्या अत्यंत चंचल, नवऱ्याशी एकनिष्ठ न राहणाऱ्या, वासनातृप्तीसाठी तामसी प्रवृत्तीने कसल्याही मार्गाचा अवलंब करून बहकलेले जीवन जगण्याकडे वळताना दिसतात.

समाजमूल्ये बदलत आहेत; पण त्या निकषांचा आधार घेतल्यास शाश्वत मानवी कल्याणाचा त्याच्याशी मेळ घालणे अवघड जात आहे. कुमारी मातांच्या अभंकाचा दोष नाही, हे समाजधुरिणांनी मान्य केले आहे; पण हा प्रश्न केवळ मान्यता देऊन सुटण्यासारखा सोपा नाही. गर्भपात हा कुमारी माता समस्येवर कायमचा उपाय ठरू शकत नाही; कारण कुमारिकेचे मातृत्व हे समाजाला आजही अमान्य. ते सामाजिकदृष्टचा महापाप व अक्षम्य गुन्हा असे समजले जाते. परंतु तसे न मानता कुमारी मातांच्या बाबतीत घडलेला कळत-नकळत दुर्दैवी अपघात या दृष्टिकोनातून त्याकडे पाहिल्यास, त्यांच्या समस्यांचा विचारही सहानुभूतिपूर्वक करता येतो. कुमारी माता उजळ माथ्याने जगू शकत नाहीत, हे आज खरे असले तरी अशा कुमारिकांना पापी किंवा गुन्हेगार असे समजले जाऊ नये. त्यांचा सामाजिकदृष्टचा तिरस्कार केला जाऊ नये. कुमारी मातृत्व ही गौरवाची गोष्ट नाही; पण ती महापातकाएवढी विषारीही बाब नव्हे. कुमारी माता ही प्रतिष्ठेची व सन्माननीय स्थिती नाही; पण त्यातून अप्रतिष्ठेपोटी आत्महत्या करण्यास भाग पाडण्याइतपत अपमानास्पद बाब नव्हे. गर्भपात हा तात्पुरता तोडगा वाट चुकलेल्या एखाद्या तरुणीला वैवाहिक व सन्मानाने जगण्याची सधी देण्यास उपयुक्त मार्ग होय; परंतु अशा स्थितीत सापडलेल्या सर्वच जणींना त्या मार्गाचा अवलंब करणे यशस्वीरीत्या शक्य होतेच असे नाही. श्रद्धानंद आश्रमासारख्या समाजसेवी संस्थेने

गेल्या ५० वर्षांत सुमारे ५,००० बालकांना वाढविले व तितक्याच मातांना जीवनात स्थिर होण्यास मदत केली. कलकत्त्याच्या मदर टेरेसांनी हीच गोष्ट हजारो अनाथ अर्भकांसाठी केली आहे.

त्यामुळे कुमारी मातांचा प्रश्न हा समाजाने समजून घेतला पाहिजे. अशी दुर्दैवी परिस्थिती मुलींच्यावर येऊ नये या दृष्टीने खबरदारी घ्यायला हवी. पाश्चात्त्य देशांत कुमारी माता ही स्वीकृत समस्या आहे; पण आपल्या समाजात तो नाकारलेला प्रश्न ठरत आहे. बेवारशी मुलांची वाढती संख्या लक्षात घेता कुमारी माता बनलेल्यांच्या संख्येत नक्कोच वाढ होत आहे. त्यामुळे वयात आलेल्या मुलींना लैंगिक ज्ञान देणे आवश्यक आहे. शिवाय पालकांनी पौगंडावस्थेत असणाऱ्या आपल्या मुलींशी अत्यंत विश्वासू व जिव्हाळ्याच्या नात्याने वागून ह्या संदर्भातील माहिती योग्य रीतीने द्यायला हवी. त्यामध्ये कसल्याही प्रकारचा संकोच ठेवू नये अथवा त्यामुळे मुलीस अनैतिकतेकडे वळविण्याचा मार्ग दाखविला जाईल असाही विचार करू नये. कुमारी माता हा केवळ तिचाच दोष नसून तिच्याबरोबर किंबहुना काही वेळा तिच्याहूनही अधिक जबाबदार ठरणारा घटक म्हणजे पुरुष. तो मात्र सहीसलामत सुटतो. पितृत्वाची जबाबदारी झटकून मोकळा होऊ शकतो. त्याला गुन्हेगार ठरविण्यासाठी दृश्य असा पुरावा मिळू शकत नाही. स्त्री मात्र त्याचा अंकूर उदरात वाढविते व समाजाच्या दृष्टीने अधःपतन झालेली, वाईट चालीची, बदफैली ठरविली जाते. म्हणून कुमारी मातांकडे पाहण्याची दृष्टी स्वच्छ ठेवायला हवी. त्यातूनच कारणांचा वस्तुनिष्ठ शोध घेणे सोपे जाईल.

कुमारी मातांची जबाबदारी समाजाच्यावतीने सरकारने उचलावी, असे म्हणणे योग्य ठरेल; पण सध्या तरी या दृष्टीने शासन फार मोठे काम करीत नाही. शिवाय शासनाच्या आर्थिक सहाय्याची अपेक्षा करण्यात अयोग्य असे काहीच नाही. मात्र व्यवस्थापन व इतर प्रकारच्या आश्रमसेवा ह्या स्वयंसेवी सामाजिक संस्थांनी घ्यायला हव्या.अशा अनाथाश्रमांना व महिला संस्थांना सामाजिक मान्यता मिळायला हवी. त्यांच्या मदतीसाठी दानशूर व श्रीमंत व्यक्तीने पुढाकार घ्यायला हवा. कुमारी माता म्हणून जीवन अस्थिर झालेल्यांना स्थैर्य आणि पितृत्वाचा उघडपणे स्वीकार न करणाऱ्या नामर्द पुरुषांच्या विकृत मनोवृत्तीतून जन्मास आलेल्या निष्पाप बालकांचे संगोपन ही अत्यंत खर्चिक, भावनिक आणि सामाजिक-दृष्ट्या गुंतागुंतीची समस्या आहे; पण कुमारी मातेला समाज स्त्री म्हणून धिक्कारतो व वेश्या म्हणून स्वीकारतो. ही समाजाची नव्हे पुरुषप्रधान संस्कृतीची दुटप्पी नीती तिरस्करणीय आहे. आपल्या देशात कुमारी मातांच्या वाढत्या संख्येमुळे आत्महत्येचे प्रमाणही स्त्रियांमध्ये वाढत आहे. बावरून जाऊन, भविष्यकाळाबद्दल अत्यंत निराश होऊन, हतबलपणा व उदासीनतेतून वेश्या होऊन जगण्यापेक्षा

जीव देऊन सर्व प्रकारच्या उपेक्षांतून मुक्त होण्याचा मार्ग जवळ करणाऱ्या कुमारी माता ह्या खरोखरच दुर्दैवी जीव !

बलात्कार

आज बलात्काराची बातमी ही वर्तमानपत्राची साप्ताहिक नव्हे, पण दैनिक नियमित घटना होऊन राहिलेली आहे. प्रगत संस्कृतीचा तो जणू काही आवश्यक भाग बनत चालला आहे. पाशवी बलात्कार हा एक चुकीचा बुद्धिमंत माणूस प्राण्याने माणसाच्या भाषेत सर्वसंमत करून टाकला आहे. खरे तर पशुप्राण्यांच्या जीवनात बलात्काराला स्थान नाही.

पशू हा बुद्धिहीन नसून अल्पबुद्धीचा आहे आणि स्वबलाचा संधी मिळेल तिथे तो वापर करताना आढळतो. माणूस पशूपेक्षा श्रेष्ठ बुद्धी असलेली प्रगल्भ व्यक्ती; परंतु पशूला आपली अल्पबुद्धी वाकडचा दिशेने वळविण्याची सोय नाही. शिवाय माणसाप्रमाणे बलप्रयोगासाठी हत्यार वगैरे साधनांचा उपयोग करण्याचे सामर्थ्य व कौशल्यही त्याच्या ठायी नाही. म्हणून बलात्कारातील बीभत्सपणा व रौद्रता फक्त मानवीच असते. पशुजीवनात स्वच्छ व उघड व्यवहार असतो. पशूपेक्षाही हीन वर्तणूक करणारा मनुष्य हाच बलात्काराचे नीच कृत्य करू शकतो.

शेतात कामाला गेलेली स्त्री, ज्वारीचे उभे पीक, जमीन विस्कटलेली, बाईच्या अंगावरचे कपडे विस्कटून गेलेले, गुडघ्यापासून आत वळलेले पाय फाकलेले व जननेंद्रियातून रक्त वाहिलेले, दोन्ही हात बाजूला पडलेले, डोळे व तोंड उघडे, जीभ बाहेर आलेली व दातांत रुतलेली, गळचाभोवती तिच्याच साडीचा पदर घट्ट बांधलेला व अंगावर ओरखडे. जवळच दोन चपला डोक्याजवळ पडलेल्या. बांगडयांचे तुकडे पडलेले. असे प्रेत पाहिले की अंगावर शहारे तर येतातच; पण बलात्कार करून त्या महिलेचा खून करणाऱ्या नराधमाला चौकात उभा करून मरेपर्यंत फटके देण्याची शिक्षाच योग्य असेही मनात आल्याशिवाय राहत नाही. अशा पुरुषाचे स्थान पशूच्याही खालचे व हीनतम आहे. केवळ तरुण, प्रौढ, म्हातारपणाकडे झुकत चाललेल्या स्त्रियांवरच बलात्कार होतो असे नाही, तर लहान मुली, वयात आलेल्या व न आलेल्या कोवळ्या तरुणी, केवळ बायकी शरीराचा देहही पुरुष वासनेचा बळी ठरतो. बलात्कार ही विकृती असून तो घोर अनाचार आहे.

सार्वजनिक जीवनात स्त्रीविषयक विचार निकोप नाही. तिच्याकडे पाहण्याची दृष्टीच मुळी शारीरिक पातळीवरची. तिच्याबद्दल सतत अनाचार, दुराचारांच्या ऊर्मी मनात उसळतात. साहजिक त्या लाटांमुळे भीती व दहशत

उद्‌भवते. ढोंगीपणाच्या व कृत्रिमतेच्या, बळजबरीच्या आणि भीतीच्या संबंधातून स्त्री-पुरुषाचा होणारा समागम म्हणजें बलात्कार होय.

आज बलात्काराचा खरा बळी ठरते ती स्त्री. ही स्थिती आजची असली तरी इतिहासातसुद्धा हाच दाखला सापडतो. भगवान इंद्राने ऋषिपत्नीशी समागम केला पण तो तिला फसवून; म्हणजे त्या ऋषीचे रूप धारण करून. जेव्हा त्याने केलेली फसवणूक उघडकीस आली, तेव्हा ऋषीने दिलेल्या शापामुळें इंद्राच्या अंगाला सहस्र भोके पडली. इंद्राला त्याच्या कृत्याबद्दल शिक्षा झाली. पण अहिल्यासुद्धा शापित शिळा होऊन पडली. तिचा दोष नसतानाही शिक्षेपासून तिला वाचविता आले नाही. श्रीप्रभुरामचंद्रांच्या पदस्पर्शाने तिची मुक्ती झाली. असेही घडले तरी ही मुक्ती म्हणजे न्याय नव्हे. दुर्दैव असे की आज हजारो वर्षांनंतरही बलात्काराची शिकार बनलेल्या स्त्रीला तो न्याय समाजाकडून दिला जात आहे.

बलात्कार हा शब्दसुद्धा संकोचाने वापरला जात आहे. बलात्कार ही बातमी होऊ नये, अशीच सर्वांची अंतोनात धडपड चालू असते. ती वार्ता कुणालाही कळू नये या दृष्टीने प्रयत्नांची शिकस्त केली जाते. सुधारलेल्या सभ्य समाजात बलात्कार हा चर्चेचा विषय होऊ नये अशीच आमची अपेक्षा आहे. पेपर-मधील अशी बातमी आपल्या मुलबाळांच्या नजरेस पडू नये, त्यावर कुटुंबात फारशी चर्चा होऊ नये अशी बहुसंख्य लोकांची इच्छा असते. म्हणजे बलात्काराच्या घटनेमागील परिस्थिती जाणून घेऊन त्याविरुद्ध आवाज उठविण्याची, संघटितरीत्या त्याची दखल घेण्यासाठी आवश्यक अशा चर्चेची गरज न वाटणाऱ्यांची संख्या अधिक. खासगीत बलात्कारित स्त्रीविषयी हळहळ व्यक्त केली जाईल; पण सार्वजनिक व संघटितरीत्या त्या भावना व्यक्त करण्याची ही प्रवृत्ती अनेकांत आढळत नाही. बलात्कार झालेल्या स्त्रीकडे समाज कणवेच्या भूमिकेतून पाहतो; पण तिला न्याय देण्याची तयारी तर नसतेच. तिला स्वीकारण्याचा विचार तर दूरच.

आपल्या देशात वर्षाला ३,००० बलात्काराचे गुन्हे नोंदविले जातात. पोलिसांकडें नोंदविलेल्या गुन्ह्यांची संख्या अंदाजें वरीलप्रमाणे आहे, पण काही वेळा तो न नोंदविण्याचा निर्णयही घेतला जातो; कारण बलात्कार हा कुमारिका, विवाहित, विधवा, परित्यक्ता अशांसारख्या कोणत्याही स्त्रीवर होऊ शकतो. त्यामुळें गुन्हा नोंदवून बेअब्रू करून घेण्यापेक्षा त्याविषयीची शक्यतो वाच्यता न करता सोसणे इष्ट समजले जाते. पण काही प्रकरणांची वाच्यता इतकी होते की, तेवढचा कालावधीत ती अत्यंत गंभीरपणे चर्चिली जातात. उदा. महाराष्ट्राच्या चंद्रपूर जिल्ह्यातील देसाईगंज या पोलिस ठाण्यात गेलेल्या मथुरा नावाच्या तरुणीच्या

असहाय्य अवस्थेचा फायदा घेऊन दोन पोलिसांनी तिच्यावर बलात्कार केल्याची घटना चार-पाच वर्षांपूर्वी घडली. पोलिस संरक्षणाच्या कामासाठी नेमलेले, पण त्यांनीच हे कृत्य केल्याने बलात्काराचा विषय महाराष्ट्रभर नव्हे तर देशभर चर्चिला गेला. महिला संघटनांनी मोर्चे काढून निषेध व्यक्त केला. बलात्कारविरोधी परिषदा आयोजित केल्या गेल्या. बलात्काराच्या बातम्यांना व वर्णनांना वृत्तपत्रे, साप्ताहिके व मासिके यांनी प्राधान्य दिले. बिचाऱ्या मथुरेला आपल्यामुळे इतकी चर्चा होते याची दखलही नसावी. पोलिसांच्या विरुद्ध गुन्हा नोंदविला गेला. वेगवेगळ्या स्तरांवर न्यायालयांनी निरनिराळे निकाल दिले व शेवटी सर्वोच्च न्यायालयाने त्या दोघा कॉन्स्टेबल्सना बलात्काराच्या आरोपातून मुक्त केले; कारण मथुरेने प्रतिकार केल्याची चिन्हे व खुणा त्या न्यायालयाला कागदपत्रात दिसल्या नाहीत. आज जसा 'मंजुश्री सारडा 'चा खून केलेला शरद सारडा सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाने निर्दोष सुटला, तीच परिस्थिती थोडचाफार फरकाने मथुरेच्या अन्यायाबाबत घडली होती. बलात्काराची चर्चा होत राहते, पण बलात्काराला एकच उत्तर म्हणजे 'प्रतिकार.' हा कायद्यासाठी तर आवश्यक आहे, हे स्त्रियांना जाणवून देणे आवश्यक आहे.

इंडियन पिनल कोड कलम ३७५ हे ह्या गुन्ह्याशी संबंधित आहे व २७६ कलम हा गुन्हा करणाऱ्याला शिक्षा सांगते. जन्मठेपेची शिक्षा देण्याची तरतूद आहे; पण अजून तरी ती एखाद्या व्यक्तीला झाल्याचे वाचनात आले नाही. कितीजणांना ती दिली गेली व जाते हा प्रश्न न लक्षात घेण्यासारखा आहे. बरेच बलात्काराचे गुन्हे नोंदविले जात नाहीत व कायद्यासमोर येतच नाहीत. कारण बलात्काराला 'सामाजिक दूषण' (सोशल स्टिग्मा) मानले जाते. तसेच साक्षीदार मिळणें कठीण होते. गुन्हा घडल्याबरोबर वैद्यकीय तपासणी झाली तर गुन्हा शाबित होण्याच्या दृष्टीने पुरावा मिळू शकतो व गुन्ह्याचा मागमूस लागू शकतो. फसवून घेतलेला संभोग पुरुषाला बलात्काराच्या कायद्याखाली शिक्षा होण्यास पात्र ठरतो. बऱ्याच वेळा स्त्रियांना वाममार्गाला लावणारे पुरुष त्यांच्यावर इतरांकडून बलात्कारच करवीत असतात. अर्थात अशा वेळी कायदा हतबल होतो; कारण बलात्काराचा गुन्हा नोंदविला जात नाही व तपासणी होत नाही. अनेक वेळा जे भीषण बलात्कार करतात, ते शिक्षेशिवाय सुटतात. अशा स्त्रिया कुमारिका असल्या तरी त्यांची लग्ने होणे कठीण जाते. बेअब्रू झाल्याने त्यांच्याशी विवाह करण्याची तयारी पुरुष दर्शवीत नाहीत.

बलात्कार करणारे पुरुष बळाचा वापर करतात. परंतु तो केला गेला हे सिद्ध होणे महत्त्वाचे आहे. त्याशिवाय गुन्हेगाराला शिक्षा होत नाही; म्हणून स्त्रीने असहाय्यपणे बलात्कार सहन करण्यापेक्षा प्रतिकार करावा. ओरडून,

बोंबलून, ओरबडून, चावून, लाथा झाडून जमेल तसा प्रतिकार करावा. कारण इंडियन पिनल कोडाच्या १०० क्रमांकाच्या कलमाप्रमाणे बलात्कार करू पाहणाऱ्या किंवा करणाऱ्या व्यक्तीचा जागच्या जागी कपाळमोक्ष करण्याची, त्याला ठार मारण्याची मुभा त्या स्त्रीला असते. इतकेच नव्हे तर तिथे हजर असणाऱ्या इतर कोणत्याही नागरिकाला इंडियन पिनल कोडने ती मुभा दिली आहे. त्यामुळे ह्या पिनल कोडची स्त्रियांना माहिती व्हायला हवी व तो समाजात रूढ व्हायला हवा. कायद्याने स्त्रीला प्रतिकाराचा दिलेला हक्क तिची शारीरिक प्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी मानसिक धैर्य देऊ शकेल. दुष्टांचे व कामांधांचे मनपरिवर्तन होऊ शकणार नाही. त्यामुळे बलात्कारित स्त्रीने आत्मघाताचा मार्ग न स्वीकारता अशा प्रवृत्तीचा प्रतिकार करण्याच्या दृष्टीने पुढाकार घ्यावा. बलात्कार विकृतीला जमीनदोस्त करण्यासाठी कायद्यांची माहिती स्त्रियांना व्हायला हवी. अहिल्येप्रमाणे स्वतः शिळा म्हणून निर्जीवपणे पडून राहू नये. आजच्या समाजात पळवाटेपेक्षा प्रतिकाराची व आत्मक्लेशापेक्षा गुन्हेगारास शिक्षा देण्यासाठीची जिद्द आवश्यक आहे.

विनोबा भावे यानी अखिल भारतीय स्त्री–शक्ती संमेलनात (१९७४) असे सांगितले की,स्त्रियांवर बलात्कार होत असताना बलात्कार करणाऱ्या पुरुषास बंदुकीने ठार मारण्याचा अधिकार मी देतो. मात्र बंदूक असणाऱ्या व तत्सम हत्यार जवळ बाळगणाऱ्या स्त्रीच्या वाटचाला पुरुष जाईलच कशाला ? हा प्रश्न आहेच. नेपाळमध्ये बलात्कार झालेल्या स्त्रीला संरक्षण देण्यासाठी करण्यात आलेला कायदा अधिक चांगला आहे. नेपाळमध्ये बलात्कार झालेली स्त्री अन्यायाचा सूड किंवा प्रतिकार म्हणून बलात्कार झाल्यापासून एका तासात बलात्कार करणाऱ्या व्यक्तीचा खून करू शकते. तो खून वा हत्या तिला कायद्याने माफ करण्यात आली आहे. आपल्या देशातसुद्धा कठोर शिक्षेची तरतूद व्हायला हवी. तशी मागणी करण्यात स्त्री–संघटनांनी तर पुढाकार घ्यायलाच हवा; पण इतरही संस्था, संघटना, मंडळांनी त्या दृष्टीने हिरीरीने विचार करणे जरुरीचे आहे. वकील, गुन्हेगारीच्या क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांनी याचा तांत्रिकदृष्ट्या खोलवर विचार करायला हवा.

बलात्कार करणाऱ्यांना कायद्यातील पळवाटांच्या आधारे सुटका होण्याची कमीत कमी संधी मिळायला हवी. स्त्री–सुरक्षा ही घरात व घराबाहेर हवी. केवळ न्यायसंस्था व पोलिस यंत्रणा ह्यांवर स्त्री–सुरक्षेची संपूर्ण जबाबदारी टाकून भागणार नाही. अत्याचाऱ्यांना दैहिक शिक्षण देण्याची व्यवस्था व त्यासाठी त्या प्रकरणांचा तपास करण्याची जबाबदारी पोलिस यंत्रणेवर आहे, हे मान्य. त्यांनी ते काम चोखपणे करायला हवे. त्यांच्या जोडीला समाजाने समाजासाठीच स्त्री

सुरक्षेची जबाबदारी घ्यायला हवी. समाजातील प्रत्येक घटकाची काही सामाजिक जबाबदारी आहे. ती त्याने समर्थपणे पार पाडायला हवी. अत्याचार घडल्याबद्दल हळहळ व्यक्त करणारी मंडळी अनेक; पण आरोप सिद्ध करण्यासाठी पुरावा गोळा करताना सहकार्याचे नाव नाही. कायद्याची चौकट ढिली पाडायला पुराव्याची कमतरता कारणीभूत ठरते. म्हणून समाजच अत्याचाऱ्याला योग्य शिक्षा देऊ शकेल. स्त्री–सुरक्षा कायद्याने दिलेला अधिकार केवळ स्त्रियांनीच वापरून चालणार नाही, तर प्रत्येक नागरिकाने अत्यंत उपयुक्त अधिकाराचा वापर करायला हवा. जिथे नारीचा मान राखला जातो, तिथे देवतासुद्धा रममाण असतात, अशी आमची पूर्वजांची शिकवण. त्यामागील सूत्र ध्यानात घेऊन स्त्री–सुरक्षा धोक्यात येणार नाही, याची काळजी घ्यायला हवी. समाजातील सर्व घटकांनी स्त्री–सुरक्षा हा समाजसुरक्षेचाच भाग आहे आणि समाजसुरक्षेसाठी समाजघटकांनी आपले स्वातंत्र्य व आपल्या जबाबदाऱ्या पेलल्या पाहिजेत. स्त्री–संरक्षण ही स्त्रीविषयीचे कायदे, पोलिस यंत्रणा व न्यायसंस्थेशी निगडित असलेली बाब आहे; पण त्याहीपेक्षा त्यासाठी जागरूक, सुसंस्कृत समाज हा पूरक पण अत्यंत प्रभावी उपाय आहे.

देवदासी

पायदळी तुडविलेले स्त्रीत्व

देवदासी या शब्दातील 'दासी' हा शब्द सुसंस्कृत, सुशिक्षित, विचारी, आधुनिक समाजात कालबाह्य समजला जातो. पण ही देवदासींची प्रथा मात्र फोफावत चाललेली आहे. १५ जून, १९८० रोजी महात्मा फुले समता प्रतिष्ठानाने निपाणी येथे देवदासींची त्यांच्या समस्यांच्या ऊहापोहासाठी आणि या गंभीर प्रश्नाकडे समाज व शासनाचे लक्ष वेधण्यासाठी परिषद घेतली. पहिली परिषद २० सप्टेंबर, १९७५ ला गडहिंग्लज येथे घेतलेली होती. तब्बल पाच वर्षे इतर समाजधुरिणांना या प्रश्नाकडे बघण्यास सवडच मिळाली नाही.

देवदासी प्रथेचा उगम

देव ही खरे पाहता अमूर्त, आंतरिक, अनामिक सर्वसाक्षी अशी अद्वितीय शक्ती. या शक्तीचे विडंबन करणाऱ्या, स्वार्थ, पिळवणूक, भ्रष्टाचार, अनैतिकता यांची परंपरा आपल्या पोटासाठी व्हेस्टेड इंटरेस्ट वासनाशमनासाठी निर्माण करणाऱ्या काही विशिष्ट प्रस्थापित, प्रतिष्ठित, समाजाला ताब्यात ठेवू शकणाऱ्या

व्यक्तींनी देवदासी प्रथा निर्माण केलेली आहे. यामध्ये जमीनदार, गावचे नेते, उच्चवर्णीय–वर्गीय, देवाचे पुजारी वा गुरव यांचा समावेश होतो. आर्य संस्कृतीचे अनार्यांवर आक्रमण कोणत्या पद्धतीने झाले असेल याचे उदाहरण म्हणजे यल्लमादेवी वा रेणुकादेवीची कथा. स्त्रीच्या मनावरसुद्धा नियंत्रण करण्याची इच्छा बाळगणाऱ्या पुरुषी वृत्तीचे द्योतक म्हणजे जमदग्नी. परपुरुषाचा विचार मनात आला म्हणून पत्नीला ठार करण्याची आज्ञा तो परशुरामाला देतो. मुलगा ही आज्ञा शिरसावंद्य मानून रेणुकामातेचे शीर धडावेगळे करतो. काही क्षणांतच मुलाला वर मागण्यास सांगितले जाते. जमदग्नी महोदय 'तथास्तु' म्हणतात. जवळून मातंग समाजातील स्त्री जात असते. परशुराम जमदग्नीच्या आज्ञेवरून त्या स्त्रीचे मस्तक तोडून आईच्या धडावर ठेवतो. त्याची आई जिवंतही होते जमदग्नी तिला उःशाप देतो, 'तुला लोक मानतील. मोठ्या प्रमाणात भक्त तुझा महिमा मानतील. सेवा करतील.' रेणुका प्रवासास निघते. लोक विचारतात, 'यल्लु अम्मा ?' अर्थ, आई कुठे निघालीस ? रेणुकाला यल्लमा नाव प्राप्त होते. दुसरा अर्थ यल्लमा – यल्लरद अम्मा, सर्वांची आई. तिची सेवा करणाऱ्या, तिच्याशी लग्न करणाऱ्या मुलींना देवदासी म्हणतात. सारी कथाच मुळी बुद्धीला न पटणारी, भावनेला न पेलणारी. 'स्त्री 'चे 'खेळणे' कसे केले जाते हे सांगणारी.

एक निरपराध मातंग स्त्री, तिचा सरळ खून होतो कुणा प्रस्थापिताच्या लहरीखातर. तिला जिवंत करा असा टाहो फोडणारे कुणी नव्हते ? माझ्या आईला, पत्नीला, बहिणीला का मारलेस ? असा आक्रोश करीत विचारणारे कुणी नव्हते ? ही मातंग स्त्री हकनाक मुकाटपणे बळी जाते. रेणुका मात्र 'देवस्वरूप' मिळविते आणि भयानक विसंगत परिणाम म्हणजे ह्या देवीला भक्तिणी हव्या असतात खालच्या, दीनदुबळ्या, दरिद्री, दलित समाजस्तरातील. या देवीला विचारावे वाटते, 'का गं बाई ? जमदग्नी, परशुराम यांच्या विद्याविभूषित, उच्च महनीय संस्कृतीतील, सधन, प्रस्थापित वर्गातील मुलींची सेवा का नको तुला ? निरपराध मातंग स्त्रीचा मेंदू धारण करणारी तू. गोरगरीब मुलींचाच बळी का मागतेस ? की तू जसा निमूटपणे जीव घेऊ दिलास तशाच त्या मुक्या कोकरा-सारख्या तुझ्यासमोर येतील या खात्रीमुळं ?'

यल्लमाची जोगतीण–जोगती, खंडोबाचे वाघ्या–मुरळी, शांतादुर्गा, मंगेशीच्या भाविणी देवदासी – नाव कोणतेही असो, या प्रथेचा उगम समाजातील इतर अनेक विसंवादी, विसंगत, विकृत आणि विचित्र रूढी–परंपरांप्रमाणे कुणा जमदग्नीसारख्या प्रस्थापितांच्या स्वार्थी लालसा विचार कृतीमधूनच झालेला आहे.

भारतातील दुर्बल घटक महिलांच्या अनेक उग्र समस्यांचे मूळ असे सामाजिक

आणि जातीयवादी संघर्षामध्येच आढळते. मागासलेपणा, परंपरागत रूढी, शिक्षणाचा अभाव, दैववाद, अंधश्रद्धा यांचा खोलवर पगडा पिढ्यान्‌पिढ्या मनावर रुजल्याने देवदासीसारख्या प्रथा दिसतात. महाराष्ट्र–कर्नाटक सीमा भागातील आठ जिल्ह्यांत ह्या प्रथेने बळी गेलेल्या मुलामुलींचे प्रमाण भयावह आहे. निपाणी शहर त्याचे केंद्र आहे. बेळगाव, निपाणी, चिकोडी, अथणी या भागात देवदासी; खंडोबाची प्रसिद्ध देवालये असलेल्या भागात मुरळी आणि गोव्यात ' भाविणी ' उच्च समाजाच्या, धनवंतांच्या भोगदासी म्हणूनच वापरल्या जातात. स्वत:च्या घरांची दारे बंद करून साधनसपत्ती, कुटुंबाचे, स्वत:च्या अब्रू–जीवित रक्षणाचे हक्क समाजातील सामान्य माणसाला आहेत. सकवी या खेडचात देवदासींच्या घराला दारे न करण्याची प्रथा आहे. ' यावं... जावं घर तुम्हारा... ' या न्यायाने कुणीही, कोणत्याही वेळी त्या घरात शिरू शकते. ही प्रथा पाडणाऱ्यांच्या बुद्धीचे कौतुक करावे तेवढे थोडेच !

धर्माचे दबाव–दडपण, उगमस्थान असल्याचा प्रयत्न या प्रथेच्या संदर्भात येतो. एस. टी.तून प्रवास करताना आलेला अगदी सुरुवातीचा अनुभव. तीन सीटस्‌च्या बाकावरील मधल्या बाईला जरी पलीकडे सरकण्याची विनती केली. ती म्हणाली, ' बाई, पलीकडे जोगतीण हाय. देवाचं मानूस. कोल्हापूरला जायचं हाय. तवर चुकून-माकून पाय-बीय लागला तर वाईट असतंया, नसती बिलामत... ' ह्याच जोगतिणीकडे कितीजण येतात, जातात हा विषय टवाळखोरांच्या तोंडाला पाणी सुटणारा. सर्वसामान्य माणसं मात्र भीती, दडपणामुळे आदराने वागविल्याचा बहाणा करतात. ' जोगवा वाढा ' म्हणतात. काहीतरी त्यांच्या परडीमध्ये, जगामध्ये घातले जाते. जमीनदार, व्यापारी थोडंफार पदरात घालतात ते या भीतीपोटीच. देवदासीबद्दल मनोमन किळस, घृणा, तिरस्कार वाटत असूनही त्यांचा वापर करणारे लोकही त्यांच्याबद्दल वाईट बोलायला धजावत नाहीत. या प्रथेचा उगम अशा भीतीपोटीच झालेला आहे. आजारपण, अपमृत्यू, मूल न होणे, मूल न जगणे, मुलगा न होणे, विहिरीचे पाणी आटणे, शेती न पिकणे, विहिरीला पाणी न लागणे, पाठची भावंडे मरणे, साप वारंवार दिसणे, स्वप्नात विचित्र दृश्ये दिसणे, आर्थिक, सामाजिक आपत्ती कोसळणे इ. कारणांवरून नवस बोलले जातात. ' माझे मूल तुला वाहीन, अमूक गोष्टी घडू देत. ' संख्याशास्त्रीयदृष्टचा शे. ५० गोष्टी हव्या तशा संभाव्यपणे घडतात आणि या नवसापायी एका निर्मळ, निरागस, निष्कलंक आयुष्याची राख होते.

देवदासी कालची – आजची : एक शोध

अनेकविध कुप्रवृत्तींचा नंगानाच समाजातील सर्वच क्षेत्रांमध्ये दिसून येतो.

कालची देवदासी अंधभक्तीमुळे निर्माण होई. आज मोठ्या शहरांची, संपन्न सधन अरबांची वासना शमविण्यासाठी 'देवदासी'च्या या प्रथेचा फार पद्धतशीर वापर समाजकंटक करीत आहेत. खेडोपाडी गोरगरीब, दलित वस्तीमध्ये देखण्या मुली हेरल्या जातात. हव्या तशा अपघटना अशा गरीब घरी घडतातच. 'यल्लुआई'चा प्रकोप म्हणूनच असे घडल्याचे पालकांच्या मनावर पद्धतशीरपणे बिंबविले जाते. त्यांचा पिच्छा पुरविला जातो. सहानुभूती, आर्थिक मदत करून भावनिकदृष्ट्या ताब्यात घेतले जाते. मुलीला यल्लमाला अर्पण करण्यावाचून दुसरा मार्गच नाही अशी पालकांची खात्री पटविली जाते. एक देखणे, सुबक देह-शिल्प जगाच्या बाजारात विक्रीस येते. काही ठिकाणी देवळातील पुजारी वा गुरव यांना हाताशी धरले जाते. चिंताव्याकुळ जीव देवाला शरण जातो. आयता गुरवाच्या हाती येतो. नेहमीचा संपर्क असल्याने 'कौल' लावून मुली गटविल्या जातात. कोवळ्या कळ्या वासनांच्या धगधगत्या अग्निकुंडात पालक आपल्या हाताने लोटतात. कालपर्यंत पालकांना यात चूक आहे असे वाटत नव्हते. आज मात्र विचार केला जातो.

वाहतुकीची साधने, संपर्कमाध्यमे, वृत्तपत्र वितरणाची व्यवस्था, रेडिओ इत्यादींमुळे तालुक्यातील कार्यालयामध्ये जाणे आवश्यक ठरल्याने, सामाजिक अभिसरणाची गती वाढल्याने, इतर अंधविश्वास, श्रद्धा आणि निष्ठा यांच्यावर परिणाम घडला तसा याही प्रथेवर अगतिकपणे नाइलाजापोटी मुले वाहणारे पालक थोडेफार जागृत झाले आहेत. देवदासींची मुले थोडेफार शिक्षण घेऊ शकतात. प्राप्त परिस्थितीला तोंड देण्याकडे डोळ्यांवरील झापड दूर करून इतर सामाजिक स्तरांकडे बघण्याचे धैर्य आणि वैचारिक शक्ती या देवदासीमध्ये आलेली आहे. ही 'जाग' अत्यल्प प्रमाणात पण अस्तित्वात आहे. अतिशय खेदाची व दुर्दैवाची गोष्ट म्हणजे ही 'जाग' त्यांना अधिक उजेडाकडे नेत नाही, तर स्वतःभोवती दाटलेल्या कभिन्न काळोखाची जीवघेणी जाणीव जागृत करते. 'धरले तर चावते, सोडले तर पळते' अशी अवस्था त्यांची आहे. पोटासाठी रोज एकापुढे शरीर फेकण्याचा सराव झालेल्या देवदासींना शरीर अत्याचार नाकारत नाही. तारुण्य आहे तोपर्यंत ह्या धंद्यातून बाहेर येणे अशक्य. त्यानंतर त्या रोगजर्जर अवस्थेत मरेपर्यंत जगतात. लूत भरलेल्या कुत्र्यासारखे जीवन. इतरजणींचे पाहून तरुण देवदासींना आपणास सन्मान्य व्यवसाय हवा, असे वाटत आहे; पण मार्ग नाही, कुचंबणा अटळ आहे.

या भयावह भावनिक, मानसिक, सामाजिक आणि आर्थिक कुचंबणेची 'समज' आल्याने आजची देवदासी कालच्या देवदासीपेक्षा अधिक दुःखी, अस्वस्थ, संत्रस्त आणि संतापलेली आहे. पुढे जाण्याचा, क्रांतीचा मार्ग अशा कष्टदायक, अतिक्लेशकारक अवस्थेतून प्रत्येक लढवय्याला नेत असतोच.

'आजची' देवदासी आपला आवाज परिषदांमधून उठवू शकते. या आवाजाने समाजाच्या, शासनाच्या कानांवरचे अभेद्य पडदे कदाचित टरकावले जातील.कदाचित आवाज उठविणाऱ्या कंठावर पकड बसवून आवाज उठविणारे देहच नष्ट केले जातील. तेच अधिक सुकर, सोयीस्कर असल्याने पुण्यातील वेश्यांच्या मुलांसंबंधीचे सर्वेक्षण प्रा. विलास वाघ यानी केले असताना त्यांना शेकडा ६० हून अधिक वेश्या हरिजन समाजातील आढळल्या. देवदासीमध्ये हे प्रमाण शेकडा ९० आहे. गुजर, जैन, लिंगायत, ब्राह्मण आणि उच्च मराठा जातीच्या 'देवदासी' आढळत नाहीत. ह्यासंबंधी चर्चा करताना देवदासींची मुलगी असणाऱ्या माझी विद्यार्थिनी म्हणाली, 'मॅडम, ही टक्केवारी उपलब्ध झाली; कारण पोटासाठी आमच्या आई–बहिणी उघड उघड बाजारात बसल्या आहेत; पण उच्च वर्गातील, उंची हॉटेल-मधून उजळ माथ्याने वेश्या व्यवसाय करणाऱ्यांची टक्केवारी का झाकून ठेवतात?' दुसरी म्हणाली, 'बाई, ह्या वायका ४ रुपये घेत असतील तर त्या ४०० रु. घेतात. तिथेही वर्ग आणि वर्ण आहेतच.' त्या दोघींना, हा प्रश्न स्त्री जातीला पोटासाठी शरीर विकावे लागते, या सामाजिक अवस्थेच्या भयानकतेचा आहे, हे पटवायला मला प्रयास पडले.

आजची देवदासी आपल्या मुलीला, बहिणीला या 'वासना खड्डयात' पडण्यापासून वाचविण्याचा प्रयत्न करते. पण स्त्रीच ह्या प्रकाराला उत्तेजन देते. ह्या नरकात जन्म गेल्याने भावना पूर्ण बोथट झालेल्या देवदासींच्या पुढारीणबाई लहान वयातील देवदासींना पहिल्या रात्रीस सामोरे जाण्यास, 'झुलवा लावण्यास' तयार करण्यासाठी ओठ, तळपाय, तळहात, गुप्तांग, वक्षस्थळ इ.ना विडीचे चटके देताना आढळतात. कालच्या देवदासी पूर्ण अंधश्रद्धेने रूढीस बळी पडतात. आज त्यांना समजते, पण मार्ग नाही या अवस्थेत !

देवदासीची प्रथा नष्ट करण्याचा प्रयत्न

ब्रिटिश काळात १९३४ साली देवदासी प्रतिबंधक कायदा झाला. संबंधितांना सहा महिने सक्तमजुरीची व रु. ५०० दंडाची शिक्षा दिली जाते. देवदासी सज्ञान असली तर तिलाही शिक्षा होते; पण कर्नाटकातील वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांना-सुद्धा हा कायदा माहीत नसल्याचा अनुभव आलेला आहे. कदाचित कायद्यापेक्षा यल्लमाची भीती अधिक वाटत असेल.

ब्रिटिशांनी कायदा करण्यापूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी १९२५ मध्ये निपाणी येथे परिषद घेऊन देवदासी प्रथेच्या निर्मूलनाची मागणी केलेली होती. ५५ वर्षांपूर्वी त्या थोर, द्रष्ट्या, तेजस्वी नेत्याने केलेल्या मागणीचा उच्चार १९८० साली करावा लागतो. संप करता येत नाही, संघटित होता येत नाही

म्हणूनच ह्या समस्येकडे एवढे दुर्लक्ष. या मागणीचा पाठपुरावा श्री. भास्करराव जाधवानी केला. वीराप्पा माने आणि अण्णा सनदी यांनी वरील परिषदेमध्ये पुढील गीत म्हटल्याची आठवण ७० वर्षांचे वीरप्पा माने (निपाणी) सांगतात, असा प्रा. नरेंद्र कुकडे एका लेखात उल्लेख करतात.

' कशाला भीक मागता
कशाला याचना यांची
उडू द्या समर–रणकंदन
झडू द्या झुंज निकराची. '

आजही देवदासी भीक मागतात हे या देशाचे दुर्दैवच होय. १९३१ साली मलिकवाड येथील श्री. घटकांबळे या दलित समाजातील मामलेदारानी अथणी येथे मोठ्या प्रमाणात जलसे घेऊन ह्या राक्षसी प्रथेचे गंभीर परिणाम समाजापुढे मूर्त स्वरूपात सादर केले. अगदी हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेच हे प्रयत्न पाहता एवढेच म्हणावे वाटते की, या प्रश्नांकडे आम्ही केलेल्या दुर्लक्षाला क्षमा नाही ! ह्या परिषदांमधील स्त्रियांच्या दुःखाची निवेदने, ढसढसा रडत समाजापुढे आपल्या जीवनाच्या चिंध्यांचे दर्शन घडविणारी आत्मचरित्रपर व्याख्याने, आयुष्याच्या धिंडवडचांची वर्णने पांढरपेशा, मध्यम, सुखवस्तू वर्गाला चार दिवस वाचायला, ऐकायला मिळतात. एक चांगला रुचिपालट, नवा विषय वाचायला, चर्चा करायला, बस्स ! यापेक्षा अधिक काय साध्य होते? असं महादेव मोरेंसारखा तळागाळातील माणसांची दुःखे त्यांच्यातील एक होऊन टिपून घेणारा लेखक लिहितो तेव्हा ते कडवट का वाटावे ? स्वातंत्र्यदिनादिवशी काळे झेंडे घेऊन निषेध व्यक्त केला तर त्यांना ' राष्ट्रद्रोही ' ठरविण्याचा हक्क या सो कॉल्ड बुद्धिमंतांना, सुसंस्कृतांना असू शकतो काय ? परिषदांमध्ये एखादी देखणी, सोळा–सतरा वर्षांची देवदासी ' मला लग्न करून संसार थाटायची इच्छा आहे. आहे का कुणी तयार ?' असा सवाल करते तेव्हा हिंदी चित्रपटातील हिरोसारखा एकही तरुण समोर येत नाही. अशा कथानकाचे चित्रपट मात्र वर्षभर एका थिएटरमध्ये चालू शकतात ! योग्य काम, संरक्षण आणि समाजमान्यता मागणाऱ्या ह्या भगिनींच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी समाज, शासन, महिला संघटना आज काय करतात ? कोणत्या योजना आखतात ? उत्तरे अर्थातच नकारार्थीच. परिषदा जरूर व्हाव्यात. जनमानस त्यामुळे अगदी ढवळून निघते; पण पुढील काम कोण करणार ? एकटीदुकटी संस्था वा व्यक्ती पुरी कशी पडेल ?

मागासवर्गीयांच्या सर्व सवलती आपल्या मुलांना मिळाव्यात अशी मागणी १५ जून, १९८० च्या परिषदेत ठराव क्रमांक ५ (अ) मध्ये केलेली आहे. अस्पृश्य मुलांना जे भोगावे लागते, त्यापेक्षा वेगळे दुःख या मुलांना सहन करावे लागते.

'अनौरसपणा' ही बाब या कोवळ्या जीवांचे भावनिक, मानसिक व सामाजिक खच्चीकरण करणारी आहे. दारिद्र्यरेषेखाली जगणाऱ्यांची संख्या वाढते, लोकसंख्या वाढते, तसेच देवदासींचे व त्यांच्या मुलांचे प्रमाण वाढतेच आहे. बालगुन्हेगारीचा प्रश्न ह्या प्रश्नाशी निकट संबंध प्रस्थापित करणारा आहे. अर्धवट वयाची ही मुले समाजविघातक गोष्टी करून पोट भरतात. या किडलेल्या कळ्यांचे प्रमाण किती वाढले आहे, याची आकडेवारी भयप्रद आहे. अनाथाश्रम, बालगुन्हेगारांसाठी संस्था काढल्या तर चार-दोन मध्यमवर्गीयांच्या पोटापाण्याची सोय होते. ह्या मुलांच्या भवितव्याचा प्रश्न तसाच अनुत्तरित राहतो. दलित संघटनांसारख्या ह्या मुला-मुलींच्या संघटना बांधल्या जाऊ शकत नाहीत, याची कारणे विखुरलेला समाज, आपण 'बिनबापाचे' आहोत हे जगाला सांगण्याची लाज वाटणे इ. होत.

आजकाल देवदासींच्या मुलामुलींचे विवाह होताना, क्वचित का होईना, आढळतात. एखाद्या मोठ्या इनामदार, व्यापाऱ्याबरोबर झुलवा लावलेल्या देवदासींच्या मुली चांगल्या (?) घरात फसवून का होईना, दिल्या जातात; पण उदाहरणे कमी. पुण्या-मुंबईच्या, चांगले उत्पन्न मिळविणाऱ्या देवदासींची गावाकडील मुलं कॉलेजमध्ये दिसतात; पण क्वचितच. ह्या अपवादात्मक उदाहरणांनी या देवदासींच्या मुलांच्या भवितव्याचा प्रश्न अधिक उग्र वाटतो. घटनेने दिलेले हक्क, पात्रता शक्ती, गरज असूनही त्यांना वजावता येत नाहीत. त्यांच्या भवितव्यात काळोखच आहे.

देवदासींना या धर्मरूढीतून मुक्त केले तर ?

ही गोष्ट आजच्या एकंदरीत सर्व संदर्भात अशक्य वाटते. या प्रश्नाविरुद्ध लढा उभा करणाऱ्या कार्यकर्त्यांना आलेला अनुभव खूप बोलका आहे. डी. वाय. एस. पी.ना १९३४ चा कायदा ठाऊक नाही. हल्ली यल्लामा देवीच्या सौंदत्ती येथील मंदिरामध्ये या अज्ञानी मुलामुलींना लिंब नेसविण्याचा, देवीशी लग्न लावण्याचा समारंभ करण्याची प्रथा बंद झाली; पण उघड वाटा बंद झाल्या की चोरवाटा खूपच सापडतात. छोट्या-मोठ्या गावी देवळात, पुजाऱ्यांच्या घरी हे 'दीक्षा-विधी' पार पडतात. माघ महिन्यातील पौर्णिमेला सौंदत्ती या निपाणी-पासून ११० कि. मी. अंतरावर असलेल्या गावी देवदासी खूप मोठ्या प्रमाणात यल्लमाच्या दर्शनास जमतात. त्या वेळी योजना आखून जागृती व पुनर्वसनाचे काम करणे शक्य होईल. शासनाने युद्धपातळीवर हे काम हाती घेतले तर, सामाजिक संस्थाही रस जरूर घेतील; पण कठोर आणि कडक कारवाई कोणत्या सत्ताधारी पक्षाला जमलेली आहे ? ही प्रथा चालू राहणे अनेकांना योग्य हितकारक वाटते ते अशा आंदोलनातील हवा काढून टाकण्यात तरबेज असतात.

धर्मरूढीचा त्याग करण्याची मानसिक तयारी देवदासींची जरूर असेल, पण सन्मान्य शक्य आहे का ? आम्ही देवीची भक्ती करू, पण आम्हाला पोटासाठी अब्रू विकणे नको आहे असे तळमळून सांगणाऱ्या आजच्या तरुण देवदासींना ह्या धर्मरूढीतील फोलपणा, विसंगती समजलेली आहे. देवाशी लग्न लावणे कसे चुकीचे आहे हे त्यांना समजलेले आहे. थोडे फार पण अन्य मार्ग उपलब्ध नसल्याने अशा जागृत स्त्रियाही या चक्रातून पोटासाठी फिरतच राहतात.

□

३ मिळवती स्त्री

समस्यांचे बदलते स्वरूप

आज स्त्री-शिक्षणाचा प्रसार होत आहे. शिक्षणामुळे स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव त्यांना होत असून सर्वच क्षेत्रांत पुरुषांच्याबरोबर आपण काम करू शकतो याची प्रचीतीही त्यांना येऊ लागली आहे. साहजिकच आर्थिकदृष्ट्या स्त्रिया हा उत्पादक घटक हे मान्य करण्याशिवाय पर्याय नाही. विविध क्षेत्रातील नोकऱ्या, व्यवसाय-उद्योगांत स्त्रियांचा शिरकाव हा अपरिहार्य सामाजिक बदल पुरुषप्रधान समाजाने मान्य केला आहे. कुटुंबाची आर्थिक गरज म्हणून स्त्रियांच्या नोकरीचा विचार करण्यात आला. तो केला कुटुंबप्रमुखांनी, पुरुषांनी व इतर मंडळींनी. नोकरी करणाऱ्या स्त्रियांनी आर्थिक स्वावलंबन आणि स्वातंत्र्याकडे फारसे लक्ष न देता कधी मुलाबाळांसाठी तर कधी म्हाताऱ्या आईवडिलांसाठी कष्ट करण्याची तयारी दर्शविली. त्यागाच्या भूमिकेतून नोकरी करण्यातच आणि गृहिणी म्हणून सोशिकपणा दाखविण्यातच भारतीय विवाहित स्त्रियांची संस्कृती-संवर्धनाची व आदर्श पत्नी म्हणून प्रतिमा जपण्यात धन्यता मानली.

नोकरी करून पैसे कमाविणाऱ्या स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य कितपत आहे ? त्यांना गृहिणी म्हणून भूमिका करताना येणाऱ्या अडचणी कोणत्या ? नोकरी करणाऱ्या म्हणून त्यांच्या कुटुंबात त्यांना मानाचे स्थान आहे काय ? पती मिळविणारा म्हणून तो स्वतंत्र निर्णय घेऊ शकतो. आता पत्नी मिळवती म्हणून दोघांच्या सहमतीने सर्व गोष्टी केल्या जातात काय ? मुलांच्याकडून त्यांना सहकार्य मिळते काय ? ठराविक कामे पुरुषांनी न करता कसल्याही परिस्थितीत बायकांनीच केली पाहिजेत असा अट्टाहास पुरुषांचा असतो काय ? आर्थिक स्वातंत्र्य म्हणून स्वतःच्या हौसमौजेसाठी त्या पैसे खर्च करू शकतात काय ? वगैरे प्रश्नांचा विचार व्हायला हवा. तो केवळ सर्वसाधारण निरीक्षण व व्यक्तिगत अनुभवाच्या आधारे न होता संशोधनाच्या पद्धतीने आणि वर्गीकरणाच्या माध्यमाने व्हायला हवा.

साहित्यात, विशेषत: कथांमधून मिळवत्या स्त्रीचे जे चित्र रंगविले जाते, ते म्हणजे बहुतेक स्त्रिया ह्या अजूनही शिकून, नोकरी करूनही शेवटी परस्वाधीनच राहिल्या आहेत. संसाराचा गाढा ओढताना तिला पतीची साथ मिळत नसल्याने अक्षरश: तिचे शारीरिक, मानसिक हाल होतात, तिची कीव करावीशी वाटते असा ठसा वाचकांच्या मनावर उमटविला जातो. नवऱ्याला आवडली तर नोकरी करायची, नाही तर सोडून द्यायची असाच विचार यातून रुजविला जातो; त्यामुळे नोकरी करूनही स्त्रियांचा दर्जा उंचावलेला नाही. त्यांना आर्थिक स्वातंत्र्य नाकारले जाते. स्वत:चे निर्णय घेण्याची मुभा नाही, असा अनुभव वर्णन केला जातो. केवळ साहित्यातून नव्हे तर चर्चा, गप्पा यांतूनही नेहमी स्त्रियांचा तोच सूर दिसतो. मिळवत्या स्त्रिया नेहमी नोकरी करताना उद्‌भवणाऱ्या अडचणींची अधिक चर्चा व फायद्यांबद्दल 'ते मिळणारच' असे मानून दुर्लक्ष करतात. म्हणून त्यांच्या समस्यांचा वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून अभ्यास व्हायला हवा. मिळवत्या स्त्रिया विशेषत: विवाहित स्त्रियांच्या समस्या ह्या नोकरीमुळेच निर्माण झाल्या की त्यांच्या परंपरागत बायकी स्वभावातून उद्‌भवल्या, त्या खरोखरच समस्या आहेत की, नोकरीच्या नावाखाली त्यांना ते स्वरूप देण्यात आले आहे ? नोकरी सोडल्यास कौटुंबिक प्रश्न पूर्णपणे सुटतील अशी खात्री देता येते काय ? या सर्वांचा केवळ विचार नव्हे तर त्या दृष्टीने संशोधन व्हायला हवे.

संशोधनाची गरज दोन कारणांनी. एक म्हणजे नोकरी करणाऱ्या स्त्रियांची संख्या वाढत आहे आणि भविष्यकाळात ती वाढणे सरळ आहे. प्रकर्षाने जाणवते ते असे की, संख्यात्मक आकडा सातत्याने वाढत आहे. त्यामुळे अशा नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या प्रश्नांचा अभ्यास संशोधनाआधारे व्हायला हवा. दुसरे महत्त्वाचे कारण असे की, नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या परंपरागत अडचणींशी, ढोबळ दृष्टीने लक्षात घेतलेले प्रश्न, कुटुंबाची पूर्वापार चालत आलेली चौकट व त्यातील पुरुषाची ताठर भूमिका ह्यांमध्ये आजच्या काळात झालेल्या बदलांची नोंद पूर्णपणे घेतल्याचे जाणवत नाही. आज नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या समस्यांचे स्वरूप, अडचणीच्या दिशा आणि कुटुंबातील कुचंबणांची व्याप्ती बदललेली असण्याची शक्यता नाकारून चालणार नाही; किंबहुना ती अजमाविण्याची नितांत गरज आहे हे जाणून संशोधनाच्या आधारे त्यांचा शोध घ्यायची आवश्यकता आहे. भावनाशील बनून, स्त्रियांचा कैवारी म्हणून पूर्वीच्या चाकोरीतूनच विचार करून, मिळवत्या स्त्रिया वरचढ होणारच, असा पूर्वग्रह करून घेऊनच त्यांच्या समस्यांची जुनी रेकॉर्ड वाजवत राहणे असंयुक्तिक तर आहेच; पण ते कालबाह्य ठरेल. नोकरी करणाऱ्या स्त्रियांसमोर समस्या नाहीतच, त्यांना न्याय मिळतो व घरात—नोकरीत पुरुषाच्या बरोबरीची वागणूक आज दिली जाते असे मुळीच नाही. परंतु त्यांचे प्रश्न पूर्वीइतकेच

गंभीर राहिलेले नसून त्यांचे स्वरूप बदललेले आहे. त्यांचा वस्तुनिष्ठ अभ्यास केल्यावरच ते सोडविण्याच्या दृष्टीने विचार व कृतीला इष्ट दिशा मिळू शकेल.

आपल्या देशात शहरीकरणाचा वेग वाढत आहे. आधुनिकीकरण आणि शिक्षणाचा विस्तार यांमुळे संधी मिळेल तिथे त्या प्रकारच्या कामांसाठी समाजातील सर्व स्तरांतील स्त्रियांना घराबाहेर पडावे लागणे नैसर्गिक बनले आहे. त्यामुळे 'गृहिणी' आणि 'मिळवती' अशा दोन्ही भूमिका यशस्वीपणे पार पाडण्यात अडचणी येतात. त्यासाठी आवश्यक अशी कुशलता, शारीरिक क्षमता आणि मानसिक तयारी स्त्रियांच्यामध्ये असली तरी काही प्रमाणात तडजोड आणि त्याग करण्याची आवश्यकता असते. घर आणि नोकरीच्या ठिकाणी त्यांच्याशी संबंधित असणाऱ्या जिवंत घटकांकडून सहकार्य मिळण्याची अनुकूलता उपलब्ध व्हायला हवी.

स्त्रियांच्या कौटुंबिक जीवनात विविधता आहे. धर्म, जात, वय, कुटुंबातील लोकांची संख्या, मुलांची संख्या, पतीचा स्वभाव, नोकरीचे स्वरूप व वेळा वगैरे या घटकांत एकवाक्यता नसते. त्यामुळे नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या समस्यांमध्ये विविधता आढळून येते. शिवाय नोकरीतील कार्यक्षमता आणि गृहिणीपदाची तंत्रे सांभाळण्याची तारेवरची कसरत करताना दोन्ही क्षेत्रांपैकी एकीकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. परिणामी नोकरी करणाऱ्या स्त्रियांना अनुषंगिक जबाबदाऱ्या घेण्यात रस नाही. सरकारी कर्मचारी वगैरे क्षेत्रातील नोकरी करणाऱ्यांच्या संघटना आहेत; परंतु त्या कार्यात पदाधिकारी म्हणून अग्रेसर राहण्याची जबाबदारी घेणाऱ्या स्त्रिया अगदीच तुरळक, नव्हे, अशा संघटनांच्या कामात, प्रशिक्षण शिबिरात सहभागी होण्यास स्त्रियांची नकारात्मक भूमिका दिसली. ह्या भूमिकेमागील कारणांचा शोध घ्यायला हवा. वस्तुस्थिती जाणण्याची नितांत गरज आहे.

नोकरी करणाऱ्या स्त्रियांशी अनेक कारणांनी माझा संपर्क येत आहे. त्यांच्याशी चर्चा करताना अडचणी जाणून घेण्याचा हेतुपूर्वक प्रयत्न करताना आजचे नवे संदर्भ, बदलती परिस्थिती लक्षात घेण्याची आवश्यकता जाणवली.

आजपर्यंतची आपली धारणा अशी की नोकरीत, व्यवसायात पदार्पण करणाऱ्या स्त्रिया केवळ आर्थिक निकड म्हणून त्यात शिरतात. शिवाय समाजाचा दृष्टिकोनही असा की, स्त्रियांना काम वा नोकरी ही कुटुंबाला पैशाची गरज असल्यास दिली जावी आणि अशा परिस्थितीमुळे त्यांनीही ती करावी. अन्यथा त्यांना बिनपगारी गृहिणीपदाचे पूर्णवेळ काम सोपविण्यात आले आहे; परंतु खरोखरच आज नोकरी करणाऱ्या स्त्रिया त्या एकाच हेतूने नोकरी करतात काय ?

ह्याचा अभ्यास व्हायला हवा. कदाचित पैसे मिळविण्याच्या हेतूने स्त्रिया नोकरी करतात हा समज अंशत: चुकीचा असल्याचेही दिसेल. कुटुंबाला मदत म्हणून त्याकडे वळत असणाऱ्या स्त्रियांची संख्या मोठी असेल, पण नोकरी ही स्वतंत्र अस्तित्व, स्वत:च्या कर्तृत्वाला संधी, आर्थिक स्वावलंबन आणि गृहिणीपदापेक्षा वेगळ्या जबाबदाऱ्या पार पाडताना मिळणारे समाधान ह्यांसाठी नोकरी करणाऱ्या स्त्रिया आहेत की नाहीत, याचाही शोध घ्यायला हवा व त्यासाठी विशेषत: विवाहित स्त्रियांचा दृष्टिकोन जाणून घ्यायला हवा.

मिळवत्या विवाहित स्त्रियांच्या बाबतीत पहिला प्रश्न म्हणजे पतीचे सहकार्य नोकरीसाठी आहे काय ? पत्नीने दाढीला पाणी द्यावे, अंघोळीचे कपडे बाथरूममध्ये ठेवावेत, हातात रुमालाची घडी ठेवावी, अंथरुणे घालावीत इतक्या अपेक्षा ठेवणारी पुरुष मंडळी आहेत का ? पूर्वीचे पुरुषप्रधान कुटुंबाचे निकष आणि वर्तणुकीची पद्धत बदलली आहे का ? मिळवत्या पत्नीकडून गृहिणीच्या सर्वच परंपरागत जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडण्याची अपेक्षा पुरुषाकडून केली जाते का ? सण, समारंभ, हळदीकुंकू, धार्मिक विधी, व्रतवैकल्ये, वाढदिवस इत्यादी कारणांसाठी मिळवत्या स्त्रियांचे कष्ट व ओढाताण यामागे त्यांचा अट्टाहास की पतीशी इच्छा? याचाही मागोवा घ्यायला हवा. स्वयंपाकातील विविध गोडधोड पदार्थांची रेलचेल, मुलांच्या खाण्यापिण्याच्या सवयी आणि पतीचे जिभेचे चोचले पुरविण्यासाठी आणि पाककलेत आपण पारंगत आहोत हे दाखविण्यासाठी नोकरी करणाऱ्या स्त्रिया जी धडपड करून घेतात आणि होणाऱ्या त्रासास आम्ही जबाबदार नाहीच असे भासवत राहतात. मी नोकरी करून कुटुंबासाठी किती कष्ट करते ? हे सांगताना त्यांच्या चेहऱ्यावरील भाव, अभिमानाचे की त्रासाचे ? हे त्यांच्या मूडवर अवलंबून. अशा प्रकारात स्त्रियांचा स्वत:चा वाटा किती ? पुरुषांची इच्छा अथवा जबरदस्ती कोणती ? सक्ती कशाची व कोणत्या प्रमाणात ? याचाही अभ्यास व्हायला हवा. पापड, लोणची, वेफर्स, केक, मुरांबे, जॅम्स बाजारात मिळतात. घरी ते केल्याने बाजारभावापेक्षा स्वस्त व जास्त रुचकर ठरतात व ठरतीलही पण ते नोकरी करणाऱ्या स्त्रियांनी करावेत की नाही ? हा ज्यांच्या त्यांच्या कुवत, सवड, आवडीचा प्रश्न आहे. मात्र जीवाचे रान करून घेऊन, त्याचा राग मुलाबाळांवर काढून, कुटुंबाचे स्वास्थ्य घालवून ते करण्याने होणारा आर्थिक फायदा हा नक्कीच 'मायनस' ठरेल.

'नोकरीची ड्यूटी सहा दिवस. सुट्टीच्या दिवशी कंबर मोडेपर्यंत काम, पण ह्यांना तर त्याची जाणीव अजिबात नाहीच, पण मुलांनाही किंमत नाही. उलट म्हणतील सगळं बाजारात आयतं मिळतंय, पण तुलाच हौस. नको ती उठाठेव.'

ही आणि अशा तऱ्हेची वाक्ये नेहमीच आजूबाजूच्या मैत्रिणींकडून व नातेवाईक स्त्रियांकडून ऐकायला मिळतात. तेव्हा पती व मुलांच्याकडून सहकार्याची व त्यांच्याकडून कमावत्या गृहिणींची अपेक्षा काय ? त्यांची धावपळ व कष्ट ही पुरुषाच्या इच्छेला मान देऊन निर्माण होणाऱ्या कामातून वाढते, की त्यांनीच निर्माण केलेल्या हौसेने वा रूढीच्या आहारी गेल्याने वाढते, याचीही दखल घ्यायला हवी. हे आणि अशा तऱ्हेचे प्रश्न अभ्यासण्याची गरज आहे. स्त्रियांनी आत्मचिंतन व स्वकृतीचे परीक्षण करायला हवे. तसे झाल्यास समस्यांची तीव्रता कमी होईल.

कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडत असतानासुद्धा उत्पन्न गट, कुटुंबातील माणसांची संख्या, सामाजिक स्तर, नोकरीव्यतिरिक्त मिळकतीचे मार्ग वगैरे घटकांनुसार अडचणींचे स्वरूप बदलते. आर्थिकदृष्ट्या स्थैर्य असलेल्या कुटुंबातील स्त्रिया नोकरी करताना घरकामासाठी नोकर-मोलकरीण ठेवून आपल्या शारीरिक कष्ट व व्यवस्थापनाच्या जबाबदाऱ्या कमी करू शकतात. मध्यमवर्गीय व कमी उत्पन्न गटातील स्त्रियांना मात्र कामवाल्यांवर खर्च करणे परवडत नाही. हा तापदायक व्याप स्त्रीचे शोषण करणारा ठरतो.आर्थिक ओढाताण, शारीरिक कष्टामुळे होणारी झीज, मानसिक संघर्षातून येणारा थकवा अशांसारख्या अडचणींतून स्त्रियांना जावे लागते. त्यावरही तोडगा काढण्याचा प्रयत्न कसा व मार्ग कोणते ? ह्याचा विचार व्हायला हवा.

नोकरी करणाऱ्या स्त्रिया कोणत्या खर्चाला प्राधान्य देतात, हे जाणून घ्यायला हवे. खर्चाच्या बाबतीत त्यांचा दृष्टिकोन लक्षात घेणे फार जरुरीचे. आर्थिक ओढाताण असूनही मैत्रिणीसारखी पोशाखी वृत्ती व राहणीमानाचा मोह टाळला जातो काय ? बाहेर आधुनिकतेच्या नावाखाली, फसव्या प्रतिष्ठेच्या आहारी जाऊन अनावश्यक खर्च करणाऱ्या स्त्रिया घरात मात्र झाडलोट, धुणी-भांडी, स्वयंपाकपाणी करण्यासाठी अतोनात राबताना दिसतात. खर्चाच्या बाबींची महत्त्वमापनानुसार वर्गवारी अथवा क्रमवारी लावण्यात कमावत्या स्त्रियांनी विशेष रस घेऊन नियोजन करायला हवे. कित्येक स्त्रिया कामवाल्यांना चार-दोन रुपये पगार वाढवून देताना, घासाघीस करताना व त्याचा बाऊ करताना दिसतात. त्यांची नाराजी व परिणामी कामाबद्दलचा जिव्हाळा संपुष्टात आणून अडचणी येतात. वेळेवर कामवाली न येणे, वारंवार खाडा करणे, काम सोडणे इत्यादींमुळे त्या त्रस्त झाल्याचा अनुभव येतो. सिनेमा, धार्मिक विधी, सण यांवरच्या खर्चात काटछाट करण्याची त्यांची तयारी असते काय ? ती असल्यास मोलकरीण सांभाळता येते व टिकविता येते. मिळवत्या स्त्रियांनी ती तयारी ठेवण्याची मनोवृत्ती दृढ करायला हवी.

दोघे मिळवते म्हणून घरात फर्निचर, फ्रिज, टी. व्ही., टेपरेकॉर्डर, गोदरेज कपाट इतरही डेकोरेटिव्ह पीसेस खरेदी करण्याची व त्या हव्यातच अशा अट्टाहासापायी रावणाऱ्या स्त्रिया घरात मोलकरणीवर होणारा खर्च टाळतात. गॅस, मिक्सर, स्कूटर ह्यांवरचा खर्च हा गुंतवणूक ठरतो. तो उत्पादक आणि स्त्रियांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी आवश्यक. त्यांचा वेळ, शक्ती व श्रम वाचतात; परंतु स्वतः सजणे, घर सजविणे व मुलांना पाहिजे ते देणे याबद्दलच्या चालत असलेल्या कल्पना व चाकोरीबद्ध विचाराच्या आहारी जाऊन त्या स्वतःची फरफट करून घेताना दिसतात. मग ही फरफट कुणी निर्माण केलीय ? कशासाठी ? त्यात स्त्रियांचा अट्टाहास किती व पुरुषांची महत्त्वाकांक्षा कोणती ? हे जाणून घेण्याची गरज आहे. नोकरी वैरी न ठरता कैवारी ठरायला हवी म्हणून अशा स्त्रियांनी आपल्या विचार, इच्छा–आकांक्षा व कृतीला तटस्थेने वळण लावायला हवे. घरकाम व शारीरिक कष्टातून सुटका करून घेण्यासाठी आवश्यक तेवढी इतरांची मदत विनासंकोच, अत्यावश्यक भाग म्हणून घ्यायला हवी. त्यासाठी करावा लागणारा खर्च हा कार्यक्षमतेच्या गरजांवर होणारा खर्चाचा आवश्यक तरतूद मानायला हवी. अशा तऱ्हेने नोकरी करणाऱ्या स्त्रियांनी शारीरिक दगदग, घरकामाच्या जबाबदाऱ्यांतून होणारा त्रास, वेळा सांभाळण्यात होणारी कुतरओढ टाळायचा प्रयत्न करायला हवा. तो अशक्य तर नाहीच नाही, मग परिस्थितीनुसार तो कसा करावा लागेल, हे ज्या त्या स्त्रीने स्वतः ठरवायला हवे.

नोकरी करणाऱ्या स्त्रियांपुढचा सर्वांत गंभीर प्रश्न म्हणजे लहान मुलांना सांभाळण्याचा. जवळ जवळ ८० ते ८५ टक्के स्त्रियांना ही मूलभूत व महत्त्वाची अडचण जाणवते. कामाचे तास, नोकरीचे ठिकाण, कुटुंबातील इतर मंडळी, सामाजिक व आर्थिक स्थिती, मुलांची संख्या इत्यादी घटकांशी हा प्रश्न निगडित आहे. लहान मुलांना सांभाळण्याचे काम मोलकरणीवर सोपविणे जिकिरीचे, कारण ती विश्वासू व जीव लावून काम करणारी असेलच अशी खात्री नाही. निदान प्राथमिक शाळेत प्रवेश घेण्याचे वय होईपर्यंत बालक संगोपनाचा प्रश्न हा अवघड. नातेवाईक, मैत्रिणी, शेजारी–पाजारी यांच्यावर रोजची अशी जबाबदारी टाकणे भाग पडते. अशा वेळी स्त्रियांना तडजोड करावी लागते.

नोकरीचे ठिकाण लांब असल्यास व कामाचे तास अनियमित असल्यास अशा स्त्रियांचे फार हाल. दुसरे मूल होऊ द्यायचे की नाही हा पति–पत्नीचा खासगी प्रश्न राहत नाही तर ती बाब सामूहिक चर्चेची व ऑफिशियल बनते. घरात, शेजाऱ्यापाजाऱ्यांकडे, मित्रमंडळींत, ऑफिसात, बॉसपर्यंत ती पोहोचते. अजूनही जन्माला येऊ न घातलेल्या, आईच्या पोटात वाढणाऱ्या, नुकत्याच जन्माला आलेल्या अशा कोणत्याही अवस्थेत असलेल्या मुलांचे अस्तित्व आनंददायी असले

तरी नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या कुटुंबात ते भावनिक, मानसिक दृष्टिकोनातून चर्चिले न जाता व्यवहार व वस्तुस्थितीच्या आधारे निर्णय घेण्याची तयारी ठेवून प्रसंगी असमाधान पदरात पडते. नोकरीमुळे तिच्यावर ही वेळ आली का? ह्याला कारणीभूत कोण? परिस्थिती, घरातल्यांचा स्वभाव, जवळच्या नातेवाईकांच्या वृत्ती, तिला समजून न घेण्याची प्रवृत्ती की तिची नोकरी? ह्याची उत्तरे शोधायला हवीत. ती शोधताना शक्यतो परस्पर समजुतीने एकत्र कुटुंब टिकवून ठेवणे व नातेवाईकांशी चांगले संबंध राखून ठेवणे हा पर्याय असू शकतो; पण ज्यांच्या घरी मोठी माणसे नाहीत, त्यांना पाळणाघराचा आश्रय घ्यावा लागेल असे सुचविले जाते. मात्र पाळणाघरांची संख्या अगदीच कमी, व्यवस्थापनही भिकार हे चित्र बदलायला हवे. विवाहित स्त्रियांनी संघटितपणे पाळणाघरांची संख्या व गुणात्मक दर्जा वाढविण्याची मागणी करायला हवी. लहान मुले सांभाळण्याची जबाबदारी केवळ पत्नीची नसून तितक्याच प्रमाणावर पतीचीही आहे.

स्त्री गमावते, स्त्री कमावते : काही प्रतिक्रिया

प्राध्यापकांच्या मागण्यांसंबंधीचे १९६३ सालापासून भिजत पडलेले घोंगडे अनेक खटपटी करून, लोकशाही मार्ग हाताळून बँकेमार्फत पगार ही मागणी तरी पूर्णपणे मान्य झाली. इतर मागण्या मान्य होतीलच. पगार बँकेमार्फत होणार म्हणून स्त्री प्राध्यापकांना मात्र जरा वेगळ्या दृष्टिकोनातून हायसे वाटते. परवाच्या एका सेमिनारला बऱ्याच प्राध्यापिका भेटल्या. अनेकजणींनी असे 'हायसे' का वाटते, याची कारणे आणि अनुभव सांगितले. नोकरी करणाऱ्यांना (सर्व क्षेत्रांतील) असे अनुभव येतात. स्त्रियांच्या कमावतेपणाबद्दल बऱ्याच व्यक्तींनी बोचक, खोचक, उपहासात्मक, मत्सरयुक्त टीका केली आहे. 'नोकरी करणारी स्त्री म्हणजे चालती बोलती टांकसाळ.' अशी स्त्री पाहताना तिच्या जागी नाण्यांची चळत काही व्यक्तींना दिसते.

मागासवर्गीयांची शिष्यवृत्ती : स्त्रियांचे वेतन

अनेक शतके समाजातल्या खालच्या थरात दबलेल्या मागासवर्गीयांच्या पाल्यांसाठी मिळणाऱ्या आर्थिक, व्यावसायिक आणि शैक्षणिक सवलतींमुळे अनेक स्तरांतील व्यक्ती कुरकुरताना दिसतात. 'सरकारचे जावई' म्हणून त्यांचा कुत्सितपणे उल्लेख होतो, तेव्हा शब्दांना कडवट धार आलेली दिसते. तसाच

मिळवित्या स्त्रियांच्या वेतनाबद्दल उल्लेख होतो. ' स्त्रियांना सामाजिक, शैक्षणिक आणि कायदेशीर हक्कांपासून पिढ्यान्‌पिढ्या वंचित केले गेले. आता कुठे समता, हक्क, न्याय आणि अधिकाराची भाषा भारतामध्ये बोलली जात आहे. प्रत्यक्षात पदरी काय आणि किती पडते आहे, हा संशोधनाचा भाग ! तरीही ही पोटदुखी का ? ' असे सौ. वर्दे म्हणत होत्या. स्त्री नोकरीमुळे कमावते किती ह्याचाच विचार होतो. ती गमावते किती याचा विचार मात्र बोलणारे नेते, समाजसेवक, विद्वान, शिक्षणतज्ज्ञ वगैरे वगैरे असूनही करीत नाहीत, मग सर्वसामान्य माणसाचे काय विचारावे ?

सण – समारंभ – माहेरपण यांस फाटा

नोकरीच्या चक्रात अडकलेल्या स्त्रियांना लग्नानंतरच्या पहिल्या वर्षीचे सण-समारंभ साजरे करता येत नाहीत. लहान–सहान नव्हे तर महत्त्वाच्या प्रसंगी सासर वा माहेर वा अन्य ठिकाणी उपस्थित राहता येत नाही. त्यामुळे नातेवाईकांकडून ' शिष्ट, ताठ, गर्विष्ठ ' असा शाब्दिक आहेर मिळतो. एक दिवस आनंद–सुख–समाधानात जावा म्हणून दोन–तीन दिवस प्रवास, जाण्यापूर्वी व आल्यावरची आवराआवर, मुलांच्या शाळा, स्वतःची रजा, घर बंद राहिल्यास दूधवाली, कामवाली यांच्यासाठी धावाधाव. या रामायणापेक्षा ' घर भले, आपण भले ' ही वृत्ती इच्छा नसताना बाळगावी लागते.

नातेवाईकांकडून अपेक्षा आणि उपेक्षाही

सासर–माहेरचे नातेवाईक, इष्टमित्र, मैत्रिणी, विविध देणग्या गोळा करणारी मंडळे यांच्या मिळवित्या स्त्रीकडून अपेक्षा असतात. जितके जवळचे नाते तितकी देणगी अधिक असावी, अशी अपेक्षा ठेवतात. वाढदिवस, बारशी, लग्न-समारंभाला ' दोघा मिळवित्या नातेवाईकांकडून घसघशीत आहेर केले जावेत,' ही अपेक्षा असते. मिळवित्या मुलांना काय कमी ? ह्या भावनेने परतफेड करण्याची गरज त्यांना वाटत नाही. बरे, आहेराचे मनापासून कौतुक तरी व्हावे ? नाव नको. ' काय झालं पाच रुपडचा खर्चल्या म्हणून ? दोघं दोघं मिळवितात. ' हा प्रतिआहेर फिरत फिरत कानी येतोच. दीपावली, संक्रांत, नववर्ष इ. प्रसंगी भेटकार्ड, शुभेच्छा, अभिनंदन तार पाठविणारी, मुलांच्या वाढदिवसांना, परीक्षेतील सुयशा-निमित्त, इतर प्रावीण्यासाठी मनापासून, आठवणीने आणि आत्यंतिक सद्‌भावाने ' टोकन ' म्हणून भेट देणारी सौ. बिंदुला ! तिने संबंधितांकडून असे काही रिमार्कस् ऐकले की हा ' उद्योग ' बंद करावा लागला तिला !

मदतनीसांच्या नाकदुऱ्या काढणे

इतर स्त्रियांपेक्षा नोकरी करणाऱ्या स्त्रियांना मदतनीसाची जरा जास्त

गरज असते. पूर्णवेळ अथवा अर्धवेळ मदतनीस ठेवूनही 'चूल-मूल' प्रकरणापासून स्त्री 'सुटका' करून घेऊ शकत नाही. सण-समारंभ, जेवणाच्या भारतीय सवयी, पाहुणे, घरातील वडीलधारी मंडळी यांमुळे कामाचा पसारा फक्त नोकरांकडून आवरला जात नाही. घरच्या माणसांपेक्षा नोकरांना जास्त सांभाळावे लागते. बडदास्त ठेवावी लागते. या बायका-मुलींवर विसंबून आराम करता येतो का ? असं असूनही तीन मुलांची आई घाईमुळे पिठाचा हात तसाच घेऊन बाहेर आल्यावर 'बाई, तुम्ही स्वयंपाक करता का ?' असं साळसूदपणे विचारणाऱ्या, अवेळी घरी आलेल्या सहकाऱ्याच्या मुखात परातीतील कणकीचा गोळा कोंबावासा वाटतो असं सौ. बीना म्हणते; तेव्हा तिच्या कपाळावरची शीर ताठलेली असते. नोकर, मुली अप्रामाणिक, कुप्रवृत्तीच्या, चुकार भेटल्या तर हाल कुत्रा खात नाही. ज्या कच्च्याबच्च्यांसाठी बाहेर हमाली करायची, त्यांची ओढाताण आणि हेळसांड पाहण्याचे नशिबी होते.

नव्या वस्तू – नवी खरेदी

गरज वाटेल तशी सर्व स्त्रियांना संसारसाहित्याची खरेदी करावी लागतेच. सौ. रजनी गोरे यानी लग्नानंतर एस. एस. सी. ते एम. ए., बी. एड्. शिक्षण घेतले. सासऱ्याचे कर्ज फेडून जमीन ताब्यात घेतली. प्रपंचातील कर्तव्य पार पाडीत परवा नोकरीला लागल्या. नखा-बोटांनी संसार केलेल्या रजूताईनी विवाहाच्या रौप्यवर्षानिमित्त गोदरेज कपाटाची खरेदी केली. ट्रक दाराशी थांबला. गल्लीमधील सारी गोळा झाली. समोर राहणारे शिक्षणाधिकारी रोषाने म्हणाले, 'दोघं-दोघं नोकऱ्या करतात आणि नसती फॅड सुचतात त्यांना.' लाकडीऐवजी गोदरेज कपाट घेण्याइतकी भारतीय प्राथमिक शिक्षकांची आर्थिक स्थिती सुधारलेली आहे, या विचाराने त्यांचा मूड गेला. दाढी करताना चक्क दोन-तीन ठिकाणी ब्लेड लागले.

सौ. उषा सामंतनी लग्नानंतर पंधरा वर्षांनी सुरेख नेकलेस केला. चुलत-आते सासूबाईंकडे बारशासाठी गेल्या तेव्हा गळ्याकडं पाहून त्या फटकन म्हणाल्या, 'हूँ, तुम्हाला काय कमी ? दोघं कमवितायं.' अर्थार्जन न करणाऱ्या त्यांच्या जावेचे मात्र त्या आवर्जून कौतुक करतात, कारण घरात घाम गाळत, काटकसरीनं त्या संसार करून शिल्लक टाकतात. उषाताई काय नटून-थटून फलक-फलक साडी फलकारीत खुर्चीवर बसायला घराबाहेर पडतात, त्यांना नेकलेस थोडाच शोभणार?

दुसऱ्याची टिमकी – स्वतःचा चौघडा

पुरुषासारखे पुरुष असून नोकरी करीत शिक्षण घेतल्याचे कौतुक करणारे, भावाबहिणींचे जबाबदारी पार पाडल्याचे येता जाता सांगणारे श्री. श्रीनिवासराव

आपल्या सहकारी स्त्रीबद्दल विचार करीत नाहीत. सौ. सुजाता डोंगरे यानी सासर–माहेरची साधारण स्थिती असल्याने स्वत:चे शिक्षण नोकरी करीत पुरे केले. एका दिराला डॉक्टरकीच्या दीर्घ मुदतीच्या खर्चिक कोर्सला पाठविले. दुसऱ्याला गावात कॉलेज असूनही शेतकी–कॉलेजला पाठविले. दोन नणंदा सुस्थळी दिल्या. दमछाक झाली तरी जिद्द धरली. परवा त्यानी फ्लॅट घेतला तेव्हा श्रीनिवासराव म्हणाले, ' बँका पुरेनात म्हणून फ्लॅटमध्ये ओतायला लागलात वाटतं पैसा. ' त्यावेळी फ्लॅटसाठी घेतलेल्या कर्जाची कागदपत्रं त्यांच्यापुढे आपटावीत असं सुजाताला वाटलं होतं.

पतीकडे दुर्लक्ष

मिळवती बायको नसल्याचे दु:ख वेळोवेळी व्यक्त करणारे सौ. रेणुताई जगदाळे यांचे सहकारी मोठ्या प्रौढीने सांगतात, ' भात कालवला की मिसेस पोळी लाटायला घेतात. टम्म फुगलेला बॉल ताटात पडला की जेवणाची मज्जा काही औरच असते बुवा ! '

' ब्रश हात घेतला की सौ. उकळी फुटलेल्या पाण्यात चहा टाकून भांडं उतरवितात. त्यामुळे ऑफिसचा चहा म्हणजे शिक्षा वाटते. ' श्री. विनायकराव मागे कसे राहतील ?

' घरात दूध किती घेतात ? कल्पना नाही बुवा... गृहमंत्री बघतात ते सारं लफडं. ' श्री. जगन गजरे हात झटकत म्हणतात.

ही चर्चा ऐकणाऱ्या रेणुताईंच्या डोळ्यांसमोर गारगोटचा झालेला भात हाताने वाढून घेणारे पतिराज येतात. त्या पाणावलेल्या डोळ्यांनी आम्हाला म्हणाल्या, ' चांगल्या झुळझुळीत साडीत, फ्रेश चेहऱ्याने यांच्यापुढं पाच मिनिटं उभं राहायला सवड नसते या धावपळीत. ते कुणाला दिसत नाही. पगार घेताना मात्र सारे ' काय बेत ? नवी खरेदी कसली ?' विचारतात. '

मुलांकडे दुर्लक्ष

सौ. ललिताला पहिला तास दहाला असतो. मात्र नियमाप्रमाणे आठला कॉलेजवर हजर राहावे लागते.दोन तास इकडच्या-तिकडच्या गप्पा करताना आपल्या हातांनी अंघोळ करणारी, केस वेडेवाकडे विंचरून, कसंबसं जेवून शाळेला पळणारी मुलं दिसतात. अभ्यास, आरोग्य, जेवण, स्वच्छता साऱ्याच गोष्टींकडे लक्ष पुरविता येत नाही. त्यांना पहाटे पाचला स्वयंपाकास सुरुवात करावी लागते. संध्याकाळी कामवाली पोळ्या करून जाते. त्या गॅसशी उभ्या असल्या की त्यांचा पुष्कि

म्हणतो, 'आई, तुझ्या गरम पोळचा चार खाल्ल्या बघ. तू नसतेस, पोळचा गार होतात. मग सकाळी पोळीच खावीशी वाटत नाही.'

सौ. वंदना विश्वासची कन्या हर्षदा 'आई, तू फोडणी घातलेलं वरण आईस्क्रीमसारखं लागतं बघ' असं म्हणते तेव्हा वंदनाताईंच्या डोळचांत नेमका कचरा जातो. पाच वर्षांची हर्षदा खुर्चीवर उभी राहून फुंकर घालते डोळचांत !

पतीवर जबाबदारी

नोकरी करणाऱ्या स्त्रीच्या पतीला प्रापंचिक कामामध्ये वाटणी उचलावी लागते. जबाबदारी शेअर करावी लागते. पत्नीने अवतीभवती असावे, गरम गरम पदार्थ पानात घालावेत, स्वस्थपणे आवडीनिवडी बघाव्यात, ऑफिसला जाताना सुपारी हाती ठेवावी, आल्याबरोबर वाफाळलेला चहा हाती द्यावा असं 'मिळवती' च्या पतीला वाटत नाही ? मिळवतीच्या पतीला वारीकसारीक प्रसंगी महत्त्वाच्या गोष्टींचा त्याग करावा लागतो. पत्नीच्या पैशावर संसार चालतो अशी इतरांची भावना त्यास अस्वस्थ करून सोडते. कर्तृत्वाला न्यूनत्व आणते. असमतोल व्यक्तिमत्त्वाच्या पतीमुळे अशा वेळी मानसिक अनारोग्यास कुटुंबाला तोंड द्यावे लागते; पत्नीचा स्वभाव जर समायोजन करणारा नसेल तर संसारासाठी नोकरी करता करता नोकरीपायी संसार गमावायची पाळी येते. ही कसरतच आहे.

अर्धनारी नटेश्वराची अवस्था

भारतीय संस्कृतीत वाढलेल्या प्रत्येक स्त्रीला पत्नी, गृहिणी, माता, सून म्हणून कोणती कर्तव्ये आहेत याची स्पष्ट व स्वच्छ जाणीव असते. घरीदारी स्वच्छता, सुबक-रेखीव संसार, पै-पाहुण्यांची सरबराई, वृद्धांची सेवा, तान्हुल्यांची काळजी घेणे इ. गोष्टींत तिला विलक्षण रस वाटतो. मनापासून स्वयंपाक करून घरच्यांना तृप्त करताना, बाळाला थोपटवून झोपविताना, कामाने थकलेल्या पतीच्या मस्तकाला तेलाने मालिश करताना तिला स्वतःचे गुण फुलवावे लागतात. नोकरीत कमी पडू नये, हीन लेखले जाऊ नये म्हणून प्रयत्नशील राहावे लागते. आचारविचार, मतप्रदर्शनात ठामपणा येतो. सहिष्णू, समंजस, सुस्वभावी पती हजारांत एकीच्या वाटचाला येतो. पत्नीचा पगारही हवा आणि आदर्श पंचकन्यांसारखी सेवाही तिच्याकडून मिळावी असा दुहेरी जाच असला तर स्त्री वैतागते. सौ. शशी चंद्रकांत कळवळत म्हणाल्या, 'आपलं स्त्रीत्व, कोमलपणा, हळुवारपणा लोप पावतो की काय वाटतं हल्ली मला. अर्धनारी नटेश्वरासारखं स्त्री-पुरुषांची कामं जबाबदारीनं, तत्परतेनं केल्यानं कधी कधी विचित्र वाटतं. अहो, तीस दिवसांतून वीस दिवस बाहेरगावी जीपने जाते. नशीब, रात्री तरी घरी येते. ह्यांनी घरगुती काम केलं की माझ्यातील 'स्त्री' स्वतःवरच रागावते. अजिबात

लक्ष दिलं नाही यानी तर माझ्यातील 'प्रोफेशनल' व्यक्ती फणफणत राहते. संसार दोघांचा आहे, हे बजावते. पतीशी तुलना करण्याचे विचार मनात कोणत्याही संदर्भात आले की कसला संसार नि कसलं पत्नित्व.'

विकासाधिकारी... विचारवंत... पत्नीबद्दल दृष्टिकोन

बी. डी. ओ. प्रशिक्षणार्थी सौ. विनिता वटावकर म्हणाल्या, 'टेबलवर डिशमध्ये मोडून ठेवलेली पोळी हाताने घेण्याऐवजी मेस प्यूनला हाक देणारे बी. डी. ओ. भेटले. म्हणतात काय बाई ! आमच्या मिसेस माझ्या आधी वा बरोबर कधीच जेवत नाहीत. तुमचं ठीक आहे. तुमचे पतिराज काय रागावणार तुमच्यावर... पैसे मिळविता ना तुम्ही ? काय बोलणार बिच्चारे !'

'मग... तुम्ही...'

'मी म्हटलं साहेब... माझ्या घरी आजोबा आणि नात-सून एका पंक्तीला जेवतात. नातसून नोकरी करीत नाही बरं. हा पैशाचा... नोकरीचा भाग नाही. पत्नी आधी जेवली म्हणून रागावणारे तुम्ही, कसला डोंबलाचा विकास करणार हो तालुक्याचा ! काय चिडले म्हणता... जेव्हा तेव्हा पैसा... पैसा... बायकांनी हे करावं... नोकरी सोडावी... संसार करावा... पुन्हा प्रशिक्षण संपेपर्यंत आवाज नाही काढला त्यांनी.' विनिताबाई विषण्ण हसल्या.

स्वत:ला विचारवंत, विकसित व्यक्तिमत्त्वाचे समजणारे, स्वत:च्या पत्नीला समाजाच्या गोंधळापासून दूर ठेवणारे लोक नोकरी करणाऱ्या स्त्रीबद्दल प्रत्यक्ष काय म्हणतात ते ऐकावे. भाषणात, लेखात वा कागदोपत्री ते लंब्याचौड्या बाता मारतात; पण नोकरी करणारी स्त्री म्हटलं की एक तिचा पगार, नीट न होणारा संसार (?) हे दुसरे... अन्य काही डोक्यात शिरतच नाही.

नोकरीत अन्याय

स्त्रिया नोकरी करतात, बरोबरीने कमवितात ही वस्तुस्थिती सहन न होणारे बॉस बिमला अरुण हिच्या वाटचाला आले होते. ऑफिसमध्ये तिच्यावर जबाबदारी न टाकता काम जमत नाही म्हणून ओरडा केला जाई. पात्रता, गुणवत्ता व कामाची पद्धत यांबद्दल वारंवार अविश्वास व्यक्त होई. सौ. शीतल वाईकर जिथे नोकरी करीत होत्या, त्या संस्थेची ग्रँट काही गोंधळाने अडकली होती. पाच-सहा महिन्यांचा पगार संस्थेकडे होता. पुतणीच्या लग्नासाठी दोन हजार रुपयांची त्यानी 'ॲडव्हान्स' म्हणून मागणी केली. पाच हजार रुपये संस्थेकडे असताना बॉसनी चारशे रुपये देऊ केले. दुसऱ्या कुणी सल्ला दिला, 'चेक द्या बाई, बँकेतून आणून देतो.' आश्चर्य म्हणजे तिसऱ्या दिवशी एका

गृहस्थाला २,५०० रु. ॲडव्हान्सपोटी दिले गेले. स्कूटर घेणार होते ते. शीतल तणतणत ऑफिसमध्ये गेली तेव्हा 'फी कालच जमा झाली' हे उत्तर मिळाले. 'माझी का आठवण ठेवली नाही?' ह्या प्रश्नास 'ते समोर बसल्याने नाइलाजाने दिले,' असे सांगितले. 'मी किती दिवस समोर बसू?' विचारताच महोदय चहाला निघून गेले. शीतलचं म्हणणं, 'आम्हाला बोलता तरी येतं इतर ठिकाणी दातखीळ बसलेली असते स्टाफची.'

सौ. उर्मिला देशपांडेना हेडक्लार्कची पोस्ट अजूनही दिली जात नाही. श्रीमती सुलभाताई घाणेकर यांच्याकडे कच्ची राहिलेली 'ड' तुकडी देऊन दहावीचा रिझल्ट कमी लागल्याबद्दल 'इन्क्रिमेंट' थांबविले आहे. श्रीमती आयेशाना 'ओव्हर–टाईम' काम दिले जात नाही. सौ. लताबाई साने सीनियर असूनही मुख्याध्यापकपदी अन्यच विराजमान होतात. मग कामगार, शेतमजूर स्त्रियांची स्थिती कशी असेल? नोकरीत अन्याय वाटचाला येत नाही त्या भाग्यवानच स्त्रिया म्हणायच्या.

तान्हे घरी – दूध साकळे उरी

सौ. सकिमा शेख पहिल्या बाळंतपणानंतर दीड महिन्यात शाळेत हजर झाल्या. बाळाच्या दुधाच्या वेळा व शाळेच्या वेळा ॲडजेस्ट करणं 'टाईमटेबल इन्चार्ज'च्या खवीसपणामुळे शक्य झालं नाही. मेडिकल ट्रीटमेंटने पान्हा जिरवून टाकावा लागला. 'मधल्या सुट्टीला वा शॉर्ट सुट्टीला जोडून एक टर्मपुरता ऑफ तास मिळाला असता तर?' छोटा मुलगा वर्षाचा झाला तरी त्या अजून हळहळत असतात. अतिशय तत्पर, कार्यक्षम आणि विद्यार्थीप्रिय शिक्षिका असूनही त्यांना शक्य होती ती सवलत मिळू शकली नाही. उलट 'नोकऱ्या कशाला करता?' हे सुनावले गेले.

सहानुभूती नकोच

आम्ही नोकऱ्या करतो म्हणजे पुरुष वर्ग, समाज, राष्ट्र, विविध संस्था–संचालक आणि मालक यांच्यावर उपकार थोडेच करतोय? आम्ही नोकरी करतो ती स्वतःची पात्रता दर्शविण्यासाठी, स्वतःच्या संसार, घरदार, मुलाबाळांसाठी. पुरुषांच्या बरोबरीने अर्थार्जनाचा हक्क भारतीय स्त्रीला न झगडता मिळाला आहे; त्यामुळे पुरुषांच्या बरोबरीने पगार घेताना इतर जबाबदाऱ्यांबद्दल गळा काढायची इच्छा नसते. सारे स्पष्ट समजून घेऊन नोकरीस बाहेर पडतो. त्रास, गैरसोय, कुचंबणा, शारिरीक श्रम, मानसिक ताण इ. अपरिहार्य कौतुक करून सहानुभूती मिळविण्याचा हा खटाटोप नाही.

आर्थिक स्वास्थ्य लाभू द्या

आम्ही आधी गमावतो, मग काही कमावतो. नोकरी करणारी स्त्री 'फक्त' पैशासाठी नोकरी करते म्हणणे खरोखर 'मागासलेपणा' होय. विशिष्ट दृष्टिकोनातून पाहिले जाते; त्यामुळे पगार घेताना चोरी वा लुबाडणूक करतोय की काय, अशी भावना निर्माण होते. उगाच 'ओशाळवाणे' वाटावे असे रिमार्कस् राहून राहून ऐकविल्याने मानसिक स्वास्थ्य नष्ट होते. घराबाहेर पडून आम्ही जे गमावतो, त्याची पैशात किंमत करताच येत नाही. आर्थिक आवक याशिवाय नोकरी करण्याला दुसरे पैलू नाहीत असे मानणारे लोक वैचारिकदृष्ट्या प्रतिगामी, मानसिक, शारीरिक, कौटुंबिक आणि भावनिक स्वास्थ्य गमावून थोडेफार आर्थिक स्वास्थ्य स्त्रियांनी मिळविले तर त्याला तरी निदान दृष्ट लावू नका. स्त्री कमावते म्हणजे 'समाजाला लुटते' असा गैरसमज करून घेऊ नये. कमावणाऱ्या स्त्रीच्या पैशातून एक कुटुंब वर येते. मुले उत्तम शिक्षण घेऊ शकतात. काटकसर, नियोजनबद्ध गुंतवणूक आणि डोळस व्यवहार यांद्वारा समाजाचा पैसा समाजाकडे येतो. पुरुष नोकरी करतो तेव्हा हेच घडते. फक्त स्त्रीचे आर्थिक हक्क वा अर्थार्जनाचा हक्क डावलू पाहणारे एक मॅनेजर आपले मत आग्रहानं मांडत असताना एक तडफदार स्टेनो म्हणाली, 'सर, तुम्ही पाच हजार पगार घेता. नऊ बेकारांना पाचशे रुपयांची नोकरी द्याल काय ? तुम्ही पाचशें रुपये घ्याल काय ?' स्टेनोचे डिपार्टमेंट बदलले गेले. युनियनची सेक्रेटरी असल्याने नोकरी मात्र टिकली.

वसतिगृहात आम्हा मिळवित्या स्त्रियांची चर्चा गंभीरतेकडे झुकली तेव्हा मिस चंदा म्हणाली, 'व्हॉट नॉन्सेस... काय लांबुडके चेहरे करून चर्चा करताय ? मला अशा कॉमेंटस्चा त्रास कधीच होत नाही. मनःस्ताप टाळायचा एक मार्ग मला माहीत आहे.'

'सांग...सांग... कोणता वसा घेतलास ? उतणार नाही, मातणार नाही, घेतला वसा टाकणार नाही. सांग...' सौ. नंदू नाडकर उद्गारली.

'अंग 'पे'च्या वेळी कुणी असं म्हटलं की मी पर्स उघडते. सोडामिटची टॅब्लेट म्हणणाऱ्यांच्या हातात ठेवते. तो कशासाठी विचारतो. तस्सं सांगते, 'फार पोट दुखू नये तुमचं, माझ्या मिळकतीमुळे !'

'फाजीलच आहेस... किती गंभीर विषय !'

'ओ हो... कुणी कधीमधी काही बोललं तर एवढं लावून घ्यावं, गंभीरतेनं का घ्यावं ? आयुष्य किती लहान... कितीतरी गोष्टी आहेत लक्ष घालाव्या अशा. कमवा, पण स्वास्थ्य गमवा' नको.' चंदाने 'ईझी' घेतलं सारं, तसंच घ्यावं.

नोकरी करणाऱ्या स्त्रीचे कातडे हळूहळू निबर बनते. गेंड्यासारखे होते.

नातेवाईक, सहकारी, बॉस, पतिराज इत्यादींचे वाक्‌शर परतवून टाकले जातात या कठीण कवचावरून. तरीही आर्थिक स्वास्थ्यासंबंधी येताजाता मारलेले खवचट, तुच्छ, द्वेषमूलक शेरे सातत्याने ऐकले की चीड येते, संताप होतो. स्त्रियांना अर्थार्जनाचा अधिकार कायद्याने, समाजाने दिलेला आहे. दीड-दोन रुपयांवर शेतमजुरी, घरगुती हलकी-सलकी कामं करणाऱ्या, विविध व्यवसाय करणाऱ्या, हातावर पोट असणाऱ्या स्त्रिया जगात एकूण कामगार संख्येच्या एक तृतीयांशपट आहेत. त्यांना मात्र असं हिणवलं जात नाही. कारण त्यांची मिळकत अल्प-स्वल्प असते. स्त्रीने अर्थार्जन करावं ह्याला समाज-पुरुषाचा विरोध नाही. फक्त तिने पुरुषांच्या बरोबरीने चांगला पगार मिळवू नये. स्त्रियांची नोकरी ही समाजसंमत घटना आहे. भारतातच नव्हे तर इतर प्रगत देशांतही स्त्रियांच्या कमावतेपणाबद्दल हिणविले जाते.

' मागासवर्गीयांच्या सवलती आणि स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने मिळणारे पगार यांबद्दल ' पोटदुखी ' व्यक्त करून मनाचा कोतेपणा दर्शविण्यापेक्षा दुसरे काहीच साध्य होत नाही. ' हा मिस चंदाचा निष्कर्ष पटण्यासारखाच आहे ना ?

आर्थिक स्वावलंबनाचा प्रश्न

आज समाजात स्त्रियांचे स्थान उंचावण्याच्या दृष्टीने प्रयत्न होत आहेत. शासन, सामाजिक व स्वयंसेवी संस्था, महिला संघटना व इतरही माध्यमे स्त्रियांचा दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने कायदे व सामाजिक प्रबोधनाच्या विविध मार्गांचा अवलंब करीत आहेत. त्यांचे कार्यक्षेत्र केवळ चूल व मूल राहू नये. कौटुंबिक बंधने, सामाजिक निर्बंध, पुरुषदास्य, सांस्कृतिक रूढीला धरून आलेली नियंत्रणे व बंदिस्तता यांतून स्त्रियांची सुटका व्हावी म्हणून कार्य केले जात आहे; परंतु आजची वस्तुस्थिती अशी की, या प्रयत्नाला अत्यंत मंद गतीने यश येत आहे. स्त्री-स्वातंत्र्याचा वापर संकुचित अर्थाने केला जात आहे. इतकेच नव्हे, तर स्त्रीमुक्ती चळवळ प्राथमिक स्वरूपात अस्तित्वात आहे.

स्त्री-शिक्षणाचा विस्तार होत असला तरी उच्च शिक्षण, कौशल्य, तंत्रज्ञान, विज्ञान, संशोधन या बाबतींतील प्रगती अगदीच निराशाजनक आहे. संकुचित कार्यक्षेत्रामुळे स्त्रियांना आर्थिक व उत्पादक घटक म्हणून कामाच्या मिळणाऱ्या संधी मर्यादित आहेत. शिवाय कष्टाची व किचकट कामे स्त्रियांकडे सोपविली जातात. उत्पन्न, उत्पादन यांच्या सर्व साधनांवर, स्थावर, जंगम मालमत्तेवर पुरुषांचा हक्क आहे. घरात सतत राबणाऱ्या स्त्रियांच्या कामाला मोल नाही. ज्या

प्रक्रियेत राबणूक जास्त आहे, त्या त्यांच्यावर सोपविल्या जातात व त्यांत सुधारणा होऊन यंत्राचा वापर होऊ लागला की त्यांच्याकडून काढून घेऊन ती पुरुषांची कार्यक्षेत्रे ठरत आहेत. म्हणजे व्यवसाय व उत्पन्नाचा मार्ग म्हणून ती मान्यता पावली की पुरुष पुढे येऊन बळकावत राहतात. शेतातील पिकावर औषधे हाताने टाकून फवारणीचे काम स्त्रियांकडून व फवारणीचे यंत्र आले की ते पुरुषांनी हाती घ्यायचे. घरातील स्वयंपाक ही स्त्रियांची पूर्ण जबाबदारी; पण स्वयंपाकी, हलवाई, धोबी वगैरे व्यवसायांत पुरुषांची मक्तेदारी व उत्पन्नावर हक्क त्यांचा. स्त्रियांना आर्थिकदृष्टचा सबल व सक्षम होऊ न देण्याचा पद्धतशीर प्रयत्न केला जातो.

नोकऱ्यांत अल्प स्थान

आर्थिक दृष्टचा स्वतंत्र पायावर उभे राहिल्याशिवाय स्त्रिया कोंडीतून सुटू शकणार नाहीत. आपल्या देशात त्या दृष्टीने प्रयत्न तर होत नाहीतच, पण परिस्थिती खालावलेली दिसून येते. नोकरी मागणाऱ्या स्त्रियांची संख्या वाढत आहे. उदा. १९८० साली एम्प्लॉयमेंट एक्स्चेंजच्या पटावर नोकरी हवी म्हणून नावे रजिस्टर करणाऱ्या महिलांची संख्या २० लाख होती. ती आता १९८१ मध्ये २६ लाख झाली. मात्र १९८१ मध्ये फक्त जेमतेम ५० हजार स्त्रियांना नोकऱ्या मिळाल्या.पण बहुतेक टेंपररी व अर्धवेळ अशाच स्वरूपाच्या होत्या. शिवाय १९०१ साली काम करणाऱ्या दर हजारी पुरुषांमागे ५५० स्त्रियांना काम मिळाले होते. तर १९७० मध्ये ते प्रमाण २३५. स्त्रियांचा उत्पादनातील सहभाग झपाटचाने कमी होऊ लागला. ३४ टक्क्यांवरून स्त्रियांची भागीदारी १९७१ साली फक्त १७ टक्क्यांवर आली आहे. आज संघटित क्षेत्रात कामे करणाऱ्या स्त्रियांची संख्या फक्त ६ टक्के आहे. या ६ टक्क्यांतील २.७ टक्के उद्योगधंद्यांत त्या नोकरीला आहेत आणि ३.३ टक्के कचेऱ्यांमधील नोकरीला आहेत. म्हणजे पुरुषांची बेकारी वाढत असताना स्त्रियांना नोकऱ्या द्यायच्या कुठून ? असा प्रश्न विचारला जावा. त्यांना नोकऱ्यांत संधी दिली जात नाही. मात्र हा प्रश्न स्त्री-पुरुष विरोधाचा नसून प्रत्येक नागरिकाचा काम मिळविण्याचा व देशाच्या आर्थिक उत्पादनात भागीदारी करण्याच्या हक्काचा आहे, हे लक्षात घेतले जात नाही ही दुर्दैवाची बाब आहे. शिवाय पुरुष बेकारीचे कारण स्त्रिया होऊ शकत नाही, हे मान्य करायला हवे.

एकूण लोकसंख्येचा मानाने स्त्रियांचे प्रमाण व एकूण रोजगारापैकी स्त्री कामगारांना मिळालेल्या रोजगाराचे प्रमाण यांची तुलना केल्यास काम करणाऱ्या महिलांचे प्रमाण अत्यल्प आहे, असे दिसून येते. बेकारी, सामाजिक मर्यादा, अशिक्षितपणा व कौशल्याचा अभाव, परंपरागत दृष्टिकोन यांमुळे कार्यक्षेत्रावर मर्यादा, मालकाची वृत्ती, शासनाचे संकुचित धोरण, स्त्रियांच्या कौटुंबिक जबाब-

दाऱ्या वगैरेंमुळे स्त्रिया आज पुन्हा आर्थिक व्यवस्थेबाहेर फेकल्या जाण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्या फक्त ग्राहक व गृहिणी या भूमिकांतून वावरताना दिसतात. हे आर्थिक परावलंबित्वाचे लक्षण आहे. म्हणून स्त्रियांनी संघटित होऊन स्त्री-मुक्तीची पहिली पायरी म्हणून सामूहिकरीत्या आर्थिक व्यवस्थेत सहभागी होण्यावर भर देणे जरुरीचे आहे. अन्यथा आर्थिक परावलंबित्व स्त्रियांना सामाजिकदृष्ट्या कनिष्ठ दर्जा खालावण्यास, शोषणाची संधी देण्यास, पुरुषांच्या वर्चस्वास वाव आणि व्रतवैकल्ये व सण-समारंभाचे पाश आणखी दृढ करण्यास, त्यांना भोगदासी व जननयंत्र मानण्याची प्रवृत्ती अनुकूल वातावरण निर्माण करीत राहील, हे स्त्रियांनीच जाणून घ्यायला हवे.

सुखासीन वृत्ती झटकायला हवी. बहुसंख्य उच्च, मध्यम व श्रीमंत कुटुंबांतील स्त्रियांना आर्थिकदृष्ट्या कुटुंबातील उत्पन्नात भर टाकण्याची गरज नसते. ग्रामीण व दरिद्री कुटुंबांतील स्त्रियांना उपलब्ध रोजगारातील जास्त कष्ट व कमी वेतनाच्या शारीरिक कष्टाची कामे करणे अनिवार्य व जवळ जवळ सक्तीचे ठरते. राहता राहिल्या मध्यमवर्गीय स्त्रिया. त्या सर्वांना नोकऱ्या मिळणे अत्यंत कठीण. तशी अपेक्षाही ठेवता येत नाही. मात्र जास्तीत जास्त स्त्रियांना नोकऱ्या उपलब्ध व्हाव्यात या दृष्टीने प्रयत्न करण्यासाठी सर्व स्तरांवरील स्त्रियांनी संघटित व्हायला तर हवेच; पण नोकऱ्यांची वाट न पाहता इतरही व्यवसाय-उद्योगांत शिरण्याची धडाडी दाखवायला हवी. त्या अगोदर केवळ घरकामात गुंतून पडण्याची व थोडी सुखावलेली-सैलावलेली वृत्ती बदलायला हवी. श्रीमंत स्त्रियांनी समाजकार्याची व्याख्या व स्वरूप बदलायला हवे. उत्पादक कार्य हाती घेऊन त्यातून मिळणारे उत्पन्न स्वतःच्या कुटुंबासाठी नव्हे तर अनाथाश्रम, मूक-बधिरांच्या शाळा व इतर अनेक दुःखी-पीडित जीवांसाठी काम करणाऱ्या संस्थांना देणगी म्हणून द्यावयासही हरकत नाही. एवढेच नव्हे तर परित्यक्ता, विधवा, मध्यमवर्गीय स्त्रियांना एकत्रित करून त्यांना उत्पादक व सक्षम बनविण्याच्या दृष्टीने ते उत्पन्न वापरता येईल. फक्त जास्तीत जास्त महिलांनी आर्थिक परावलंबन टाळण्याच्या दृष्टीने व अधिकाधिक उत्पादक क्षेत्रातून शिरकाव करण्याच्या दृष्टीने प्रयत्न व्हायला हवा; कारण राष्ट्र, समाज, कुटुंब, व्यक्ती या दृष्टीने तर ते आवश्यक आहेच; पण त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होण्यास मदत होईल.

१) केवळ स्वयंपाकपाणीच व घरकामात बुडवून घेण्यापेक्षा अल्पशा अर्थार्जनाच्या दृष्टीने प्रयत्न करण्यासाठी बाहेर पडल्यास पती-पत्नीतील वैचारिक अंतर कमी होऊ शकते. त्या त्या स्तरावरील समाजकारण, अर्थकारण, राजकारण वगैरेंशी संबंध येऊ शकतो. ज्ञान, विज्ञान, कला-कौशल्ये, आधुनिक प्रवाह व प्रवृत्ती अशा विविध क्षेत्रांतील बदल जाणून घेता येतात. अनुभव वाढतात,

व्यक्तिमत्त्वाचा विकास होऊ शकतो. ज्ञानाशी तुटलेला संपर्क, अनुभवावर पडलेल्या मर्यादा, कार्यक्षेत्रावरील बंधने, व्यक्तिमत्त्वाचा खुरटेपणा, विचारातील संकुचितपणा कमी होऊन स्त्रियांचा आत्मविश्वास वाढतो. हल्लीच्या पतीला पत्नी सखी व सहजीवन देणारी हवी असते. दोघांतील मानसिक व वैचारिक अंतर कमी होण्यासाठी महिलांनी घराबाहेर पडायला हवे. आळस, गप्पाटप्पा, हलके-फुलके वाचन यांतच आपला वेळ न घालविता उत्पादक कार्यात गुंतवून घेण्यासाठी बाहेर पडायला हवे.

२) रिकामपणातून शेजारणीचे अनुकरण, साड्या-भांड्यांचा सोस, समारंभाची हौस, नातेवाईकांच्या तक्रारी यांबाबत सर्वच स्तरांवरील महिला आपल्या कुवतीनुसार हव्यास करताना दिसतात. इतरांशी तुलना करता हेवेदावे आणि चंचलतेतून अनेक प्रश्न नकळत निर्माण होतात. मग त्यात पती, मुले व इतरही जवळचे नातेवाईक यांचा समावेश होऊन त्यांच्या वर्तणुकीची आपल्या संसाराशी तुलना करून मानसिक क्लेश करून घेताना व कौटुंबिक कलहात भर टाकताना दिसतात. कुटुंबातील राग-लोभ, सुख-दुःख, ताण-तणाव, चढ-उतार हे क्रमप्राप्त व नैसर्गिक मानून त्याला सामोरे न जाता त्याचा बाऊ करून (जो रिकामपणामुळे वाढत जातो) त्यात पुरुषांना अकारण, अनावश्यक तितक्या प्रमाणात व अनिच्छेने ओढत राहण्याची त्यांची प्रवृत्ती ही सतत घरकाम व उरलेले रिकामपण यांतून वाढत जाते. त्याचा त्यांच्या व पुरुषांच्या कार्यक्षेत्रावर अनिष्ट परिणाम होतो. घरगुती कटकटी वाढण्यास सतत घरात राहणाऱ्या गृहिणीचे कंटाळवाणे रुटिन कारणीभूत ठरते.ते त्यांनी स्वतःच पुढाकार घेऊन टाळायला हवे.

३) आज बालविवाह, हुंडा पद्धती, जातीयता, अंधश्रद्धा व लोकभ्रम, व्रतवैकल्ये व बुवाबाजी वगैरेंपासून समाजाला वाचवायचे असेल तर प्रामुख्याने महिलांनी नवे विचार, पुरोगामी दृष्टिकोन, सामाजिक बदल स्वीकारायला हवेत. सामाजिक विषमता, जातीयता, नव्या रूढी व परंपरा यांविरुद्ध मित्रमंडळीस बोलणाऱ्या, भाषणे देणाऱ्या पुरुषांना तशी कृती करण्याची इच्छा असल्यास स्त्रियांची साथ मिळतेच असे नाही; कारण घराबाहेर न पडलेल्या या स्त्रियांना बाहेरच्या बदलाची, जगातील नव्हे तर देशातले प्रवाह व प्रवृत्तींची, गतिशील अशा जीवनाची जाणीव नसते. शिवाय स्वतः त्या सामाजिक बदल स्वीकारण्यास उत्सुक नसल्याने कुटुंबाच्या विकासाला, पुरुषांच्या विकासाला व पुरुषांच्या निर्णयामध्ये त्यांचे विचार अडसर ठरतात; म्हणून त्यांचाही उत्पादक कार्यात शिरकाव हा सामाजिक विकास व प्रबोधनाच्या कामास अनुकूल ठरेल.

४) स्त्रियांनी पूर्णपणे घरात डांबून न घेता व्यवसाय व अन्य कारणाने घराबाहेर व जाणीवपूर्वक डोकावून पाहायचे ठरविल्यास स्वतंत्र निर्णय घेण्याची

कुवत वाढेल. स्वत: कष्ट करून मिळालेल्या पैशाची किंमत कळेल. घराचे अंदाज-पत्रक, भविष्यकाळासाठी तरतूद, लाभदायक गुंतवणूक, अनावश्यक खर्च टाळण्याची प्रवृत्ती या दृष्टीने पतीच्या निर्णयात सहभागी होता येते. त्यांचे या दृष्टीने व्यक्तिमत्त्व विकसित झाल्याशिवाय, आर्थिक व्यवहारात गरज उद्‌भवल्याशिवाय खऱ्या अर्थाने स्त्रियांचा सामाजिक दर्जाही सुधारता येणार नाही. स्त्रियांच्या व्यक्तिमत्त्वाला आत्मविश्वासाचा पाया असल्याशिवाय पुरुषही खऱ्या अर्थाने मुक्त ठरणार नाही. म्हणून स्त्रियांनी केवळ गृहिणी, माता, सून याच भूमिका काया–वाचा मने बजावत राहण्यापेक्षा उत्पादक घटक, व्यवसायात सहभागीदार, आर्थिक सहकारी बनण्याचा प्रयत्न करायला हवा. आज त्यांचे घरकाम, शिशुसंगोपन, शुश्रूषा यांना महत्त्व व आर्थिक मूल्य आणि व्यावसायिक प्रतिष्ठा नाही व नजीकच्या काळात येईल अशी शक्यता नाही. म्हणून निदान घराबाहेर त्यांनी आपली बुद्धी, शक्ती व कुवत देण्याचा विविध उद्योगांद्वारे प्रयत्न करावा. परिणामी हळूहळू घरातील स्त्री व पुरुष दोघांनाही घरकाम, संगोपन समाधानाने व स्वेच्छेने करण्याची गरज निर्माण होईल. त्यामुळे कुटुंब व समाजात सह-जीवनाला व समानतेला मान्यता मिळेल.

५) मुलांच्यावर संस्कार व व्यक्तिमत्त्वाचा सुयोग्य विकास घडवून आणण्याची जबाबदारी प्रामुख्याने स्त्रियांची मानली जाते. त्या संपन्न संस्कारांची अपेक्षा केवळ शिक्षित नव्हे तर सुसंस्कृत मातांकडून पूर्ण होऊ शकेल. तो सुसंस्कृत-पणा, कुशलता, शास्त्रीय व विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन घराबाहेरची माहिती व अनुभव घेणाऱ्या स्वावलंबी स्त्रियांमध्ये निश्चितच अधिक प्रमाणात असतो. मुलांना बौद्धिक, शारीरिक व मानसिक विकासास योग्य आकार द्यायचा झाल्यास केवळ गृहिणी म्हणून सतत राबणारी आई कमी पडते, या अर्थाने की, मुलांना आपली आई केवळ स्वयंपाकपाण्यात रस आणणारी वाटते. त्यामुळे तिचे निर्णय चुकीचे व तिला काय कळते ? अशाच दृष्टीने मुले तिच्याकडे पाहतात. मिळवत्या वडिलांचे निर्णय बरोबर,कारण अर्थार्जनासाठी बाहेर पडून जगाचा अनुभव घेतलेला असतो. परिणामी दिवस-रात्र राबणाऱ्या स्त्रियांचा वर्ग सतत गृहिणी या नात्याने मुलांना धाक दाखविण्याचा व वळण लावण्याचा प्रयत्न करीत राहतो. पण आईला काय कळते ? अशा तऱ्हेने तिचा उपेक्षा केली जाते.

अर्थात मिळवत्या स्त्रियांचा घरात दरारा असतो, असे मुळीच नाही; पण मुलांच्या दृष्टीने, अशा आईचे शब्द मानण्याची गरज आहे, असे निदान वाटू तरी लागते. पुरुषांचीही अरेरावीची भाषा, घरकाम करणाऱ्या पत्नीची कदर न करण्याची प्रवृत्ती, तुमची अक्कल चुलीपुरती असे हिणवून 'मी राबतो, तुमची चैन चालू द्या' असे काटकसर करून दमणाऱ्या पत्नीला उपदेशाचे डोस पाजून

असहाय्य व हतबल बनविण्याची, मानसिक खच्चीकरण करण्याची वृत्ती कमी होण्यासाठी स्त्रियांनी आर्थिक स्वातंत्र्याला प्राधान्य द्यायला हवे.

देशाच्या आर्थिक उत्पादनातील स्त्रियांच्या सहभागाची अवस्था १९७१ साली जैशी होती, त्यापेक्षाही १९८१–८२ मध्ये ढासळलेली दिसून येते. एकूणच बेकारीची समस्या गंभीर आहे. स्त्रियांच्या या परिस्थितीचे समर्थन करून व समाजाची त्या बाजूने सहानुभूती मिळवून स्त्रियांना आर्थिक क्षेत्रात सहभागी करण्यापेक्षा चूल व मुलाच्या व तत्त्वाला आधुनिक मुलामा देऊन तसेच मर्यादित ठेवण्याचा पद्धतशीर प्रयत्न व व्यवस्थित धोरण आखले जात आहे. काम करण्याचा हक्क हा मूलभूत हक्क म्हणून स्त्रियांना हवा आहे, हे त्यांना सामूहिक, संघटित-रीत्या दाखवून द्यायला हवे. मात्र ते देताना केवळ नोकऱ्या नव्हे तर मिळेल ते काम करण्याची मनाची तयारीही ठेवायला हवी.

शिवाय मिळवत्या बायका आज मागासलेल्या विचारांच्या पुरुषांना नकोशा आहेत असे नाही; पण ज्या नोकरी करून पैसा पुरुषाच्या हाती देऊन खाली मान घालून घरही चालवितात, अशा सहचारिणी हव्या आहेत. म्हणजे स्त्रियांच्या उत्पन्नाची गरज आहे. खरा विरोध महिलांनी नोकरी करण्याला असा नाही, तर त्यांना समानता देण्याला त्यांचा दृष्टिकोन विस्तारित होत आहे. याला आपल्याला मानवी हक्क मिळाले पाहिजेत या त्यांच्या आग्रहाला त्यांचा दर्जा उंचावत आहे. त्याला वेळीच जाणून घेऊन महिलांनी व्यक्ती म्हणून जगण्याचा हक्क उपभोगण्या-साठी, कुटुंबाचे स्वास्थ्य टिकविण्यासाठी,पतीच्या बरोबरीने समान वागणूक मिळावी म्हणून सामाजिक जाणीव व सुधारणा सहजी सामोरे जाता यावे व मुलांवर विज्ञाननिष्ठ व संपन्न संस्कार करता यावेत म्हणून आर्थिक स्वावलंबन हे सर्वाधिक महत्त्वाचे मानायला हवे.

अर्थार्जन क्षेत्रात स्त्रियांना असमान संधी

स्त्रियांचे सर्व प्रश्न नीटपणे सुटण्यासाठी सर्वांगीण सामाजिक परिवर्तन होणे आवश्यक आहे, असे मानले जाते. आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनणे हा या परिवर्तन प्रक्रियेतील महत्त्वाच्या टप्पा ठरतो. स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने प्रत्येक क्षेत्रात काम करण्यायोग्य अनुभव घेत आहेत; परंतु स्त्रियांच्या बाबतीत उपलब्ध असलेली क्षेत्रे मात्र जाणीवपूर्वक मर्यादित केली जात आहेत. विशिष्ट क्षेत्रे वगळता पुरुषां-पेक्षा कमी वेतनावर राबविण्यासाठी हा गट वापरला जातो. ' समान काम, समान वेतन ' हे तत्त्व केवळ तत्त्व म्हणून स्वीकारले गेले आहे. प्रत्यक्षात या तत्त्वावर

जिल्हा ग्रंथालय ठाणे

आधारलेल्या कायद्याची अंमलबजावणी परिणामकारकरीत्या होत नाही.

स्त्रियांचा सामाजिक दर्जा कनिष्ठ समजला जातो व त्या तत्त्वाला अनुसरूनच आर्थिक क्षेत्रातही त्यांच्या सहभागाचे चित्र दिसते. १९७१ च्या शिरगणतीनुसार स्त्रियांच्या एकूण संख्येच्या १३.१८ टक्के स्त्रिया रोजगार किंवा अर्थार्जनाच्या हेतूने काम करणाऱ्या होत्या. १९८१ च्या शिरगणतीनुसार काम करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण फक्त १४.५ टक्के इतके झाल्याचे दिसते. म्हणजे काम करणाऱ्या स्त्रियांच्या संख्येतील वाढ ही अत्यंत दुर्लक्षणीय व अत्यल्प प्रमाणात आढळून येते. तसेच ६.५ टक्के स्त्रिया अत्यंत अल्प वेतनावर हंगामी व अर्धवेळ कामात गुंतलेल्या आहेत. मात्र उरलेल्या जवळ जवळ ८० टक्के स्त्रिया आर्थिकदृष्ट्या परावलंबी आणि रोजगाराशिवाय आहेत. म्हणजे काम करण्याची शक्ती, कुवत व इच्छा आणि कुशलता यांनुसार कमी-अधिक मोबदल्यावर काम करण्याचा हक्क नाकारला जात आहे. स्त्रियांच्या रोजगाराचा प्रश्न गौण मानला जाऊन त्याकडे दुर्लक्ष केले जाते. काही वेळा तर देशातील बेकारीच्या प्रश्नास 'स्त्रियांची रोजगारी' असा हास्यास्पद व बिनबुडाचा विचार मांडला जातो. स्त्रियांना कामाच्या संधी मर्यादित करणे हे असामाजिक, राष्ट्रीय धोरणास बाधक व रानटीपणाचे ठरेल. आज स्त्रियांना उदरनिर्वाहासाठी दुसऱ्यावर अवलंबून राहावे लागते. परिणामी त्यांचे कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक स्थान अत्यंत दुय्यम ठरले आहे. त्यांची आश्रिताची भूमिका संपलेली नाही.

रोजगार उपलब्धतता व नोकरीच्या संधीची कमतरता यांमुळे बेकारीची समस्या गंभीर बनत आहे; पण स्त्रियांच्या बाबतीत तर काम न करणाऱ्यांचे प्रमाण फार मोठे आहे. स्त्रियांची नोकरी ही पूरक नोकरी असाच समाजाचा दृष्टिकोन असल्यामुळे स्त्रियांना नोकरीत प्राधान्य मिळत नाही. शिवाय बेकारीची पहिली कुऱ्हाड त्यांच्यावर कोसळते. कामगारांना कमी करण्याचा प्रश्न आला तर स्त्री-कामगार प्रथम कमी होतात. स्त्रियांचे अर्थार्जन कुटुंबात व समाजात प्रधान मानले जात नसल्यामुळे स्त्रियांना नोकरीवरून काढताना विरोध कमी होतो. याचाच अर्थ प्रत्येक स्त्रीला अर्थव्यवहारात भाग घेण्याचा हक्क आहे, हे सत्य अजूनही मान्य झालेले नाही.

सध्या अर्थार्जनात गुंतलेल्या एकूण स्त्रियांपैकी ४६ टक्के स्त्रिया शेतमजूर म्हणून अल्प वेतनावर राबत आहेत. शेतमजूर म्हणून काम करणे म्हणजे अल्प वेतनावर शारीरिक कष्ट करणे आलेच; पण त्याचबरोबर रोजगारातही सातत्य नाही. कामाच्या तासांबाबतही मालकांच्या मर्जीवरच अवलंबून राहावे लागते. शिवाय शेती हा हंगामी व्यवसाय असल्याने शेतमजूर म्हणून काम करण्याची आर्थिक गरज असूनही विनारोजगार राहावे लागते. शिवाय स्त्रियांपैकी बहुसंख्य स्त्रिया

स्वतःच्या शेतात राबत असल्याने त्यांना स्वतंत्रपणे मोबदला देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. परिणामी 'गृहिणी' म्हणून बिनपगारी कष्ट करणारी स्त्री स्वतःच्या शेतातही तशीच मोबदल्याच्या अपेक्षेशिवाय कष्ट करीत राहते.

शेती हा हंगामी, अनेक तऱ्हेच्या अनिश्चिततेचा व्यवसाय. अशा व्यवसायात काबाडकष्ट करणाऱ्या बहुसंख्य स्त्रियांना बाळंतपणाची रजा व पगारी रजा, अपघाताची भरपाई, आजारपणामध्ये पगारी रजा, अशांसारख्या सवलती व संरक्षण (जे औद्योगिक क्षेत्रात आहे) मिळण्याची शक्यता तर नाहीच; पण रोजगाराच्या हमीची अपेक्षाही धरता येत नाही. औद्योगिक क्षेत्रातील कामगारांना स्त्री म्हणून ज्या सोयी व संरक्षण मिळत आहे, त्याचा लाभ शेतीत राबणाऱ्या स्त्रियांना मिळत नाहीच; पण त्यांची रोजगारीसुद्धा आजच्या समाजाला पुरुषांच्या बेकारीस कारणीभूत ठरणारी वाटत आहे.

देशात काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या ३१८.३ दशलक्ष इतकी असून त्यांपैकी ७.५ दशलक्ष स्त्रिया लघू व कुटीर उद्योगांत काम करीत आहेत; परंतु असे उद्योगही बहुतांशी हंगामी व उत्पन्नाच्या बाबतीत अनिश्चित असल्याने स्त्रियांना कमी वेतनावर काम करावे लागते. शिवाय सातत्याने वर्षभर काम मिळेल अशी परिस्थिती नसते; त्यामुळे अशा क्षेत्रांतील स्त्रियांची परिस्थिती समाधानकारक नाही. काम करणाऱ्या स्त्रियांपैकी फक्त २.३८ टक्के स्त्रिया संघटित उद्योग, खाणी व अन्य व्यवसायांत नोकऱ्या करीत आहेत. त्यांतही विक्रेत्या, एजंट, सेल्सगर्ल्स, घरकाम करणाऱ्या स्त्रियांचा समावेश होतो, की ज्यांना कायद्याने कसलेच संरक्षण दिलेले नाही.

अशा रीतीने कारखानदारीत व उद्योगधंद्यात स्त्रियांची संख्या फारच अल्प आढळते. शिवाय ती फारशी वाढत नसल्याचेही प्रकर्षाने जाणवते. औद्योगिक क्षेत्रात नोकरीच्या बाबतीत स्त्रियांची पीछेहाट होत असल्याचे लक्षात घेणे आवश्यक आहे. २० वर्षांपूर्वी मुंबईतील कापडगिरण्यांत काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या २५,००० होती, ती आता ७,५०० पर्यंत कमी झालेली आहे. औद्योगिक कामगार स्त्रियांना जितक्या विस्तृत प्रमाणात नोकऱ्या व काम मिळणे आवश्यक आहे, तितक्या प्रमाणात ते मिळत नाही. याला कारणीभूत ठरणाऱ्या काही घटकांचा विचार पुढीलप्रमाणे करता येईल.

१) आपल्या देशात लोकसंख्येची अतिरिक्त वाढ होत असल्याने श्रमबाजारात श्रमाचा पुरवठाही मोठ्या प्रमाणात होत आहे. स्त्री-पुरुष श्रमांचा पुरवठा वाढत असताना त्यामधील पुरुष श्रमिकांना कुटुंबकर्ता म्हणून रोजगारामध्ये प्राधान्य दिले जाते. उत्पादनघटक म्हणून स्त्री-कामगारांचा काम मिळण्याचा हक्क

महत्त्वाचा मानला जात नाही. राष्ट्रीय पातळीवर धोरणात्मक भाग म्हणूनही हाच विचार केल्याने स्त्रियांना उद्योगधंदे व संघटित क्षेत्रात नोकऱ्या मिळणे कठीण होत आहे.

२) मातृत्वलाभ कायदा (१९६१), फॅक्टरीज ॲक्ट (१९४८), खाणकाम कायदा (१९५२) या विविध कायद्यान्वये स्त्री-कामगारांना निरनिराळ्या प्रकारच्या सवलती दिल्या जातात; कारण स्त्रिया या बालकांना जन्म देत असल्याने आणि आजची मुले ही राष्ट्राला आधारस्तंभ व समाजाची संपत्ती असल्याने स्त्रियांची काळजी घेणे हे राष्ट्राच्या कल्याणकारी, व्यापक भूमिकेचा अविभाज्य भाग मानला जातो; परंतु अशी व्यापक राष्ट्रीय भूमिका उद्योगधंद्याचे व्यवस्थापन स्वीकारण्यास उत्सुक असत नाही. त्यामुळे स्त्रियांविषयीची विशेष कायदेशीर तरतूद व त्यानुसार द्यावयाच्या सुविधा यांसाठी खर्च करण्यापेक्षा स्त्रियांना उद्योग-धंद्यात काम न देण्याचे धोरण स्वीकारले जाते.

३) खासगी क्षेत्रात व मोठ्या कारखानदारांना स्त्रियांना कामावर घेणे कटकटीचे, खर्चाचे व आर्थिक दृष्टचा उत्पादनखर्च वाढविणारे वाटते. त्यामुळे ती मंडळी हल्ली त्यांना रोजगार देण्यास उत्सुक नाहीत. स्त्रियांना कायद्यान्वये द्याव्या लागणाऱ्या सवलती त्यांना उत्पादनखर्च वाढविणाऱ्या वाटतात. खाणीमध्ये काम करणारी एखादी जरी स्त्री-कामगार असली तरी पाळणागृहाची सोय करावी लागते. शिवाय स्त्री-पुरुषांना समान वेतन द्यावे लागते. पूर्वी त्यांना कमी वेतनावर पुरेपूर राबवून घेणे शक्य असल्याने, त्यांच्या श्रमांचा वापर कारखान-दारीला फायद्याचा ठरत होता. सध्याचा समान वेतनाचा अवलंब करण्याचा कायदा स्त्रियांच्या रोजगारांवर गदा आणत आहे. शिक्षणक्षेत्रातसुद्धा शिक्षिका, प्राध्यापिका यांना बाळंतपणाची रजा देताना व्यवस्थापकीय प्रमुख कुरकुरताना व अगदी नाइलाजाने जणू काही त्यांच्यावर मेहेरबानी करतो आहोत अशा रीतीने वागताना आढळतात. हीच भूमिका संघटित उद्योगांत स्वीकारली जात असल्याने स्त्रियांच्या रोजगार उपलब्धततेवर मर्यादा येत आहेत.

४) विविध क्षेत्रांत पुरुषांइतक्याच कार्यक्षमतेने स्त्रिया काम करू शकतात हे मान्य झाल्यानेच समान वेतनाचा कायदा करण्यात आलेला आहे; परंतु कायद्याची अंमलबजावणी करण्याची तयारी काम देणाऱ्यांना करणे नकोसे वाटते; कारण स्त्री-पुरुष समानतेला अजूनही समाजाने मान्यता दिलेली नाही. जुने संस्कार, परंपरागत विचारांचा पगडा आणि त्यातून उद्भवणारी कृती यांतून स्त्रियांना नोकरीची विशिष्ट क्षेत्रे नाकारली जातात. अर्थात याला स्त्रीसुद्धा तेवढीच जबाबदार आहे. रात्रीच्या वेळची, सतत फिरतीची, पुरुषांच्यासमवेत अंडरग्राऊंड कामे करण्याची (सामाजिक दबाव व वातावरण यामुळेही)

स्त्रियांची तयारी नसते. आजही हवाई सुंदरी, नर्स, ग्रामसेविका, एजंट व फिरत्या विक्रेत्या, पोलिस, ड्रायव्हर वगैरे पेशांना स्त्रियांनी म्हणावी तितकी मान्यता दिलेली नाही. शक्यतो कारकून, स्टेनो, शिक्षक, डॉक्टर वगैरे अशा क्षेत्रांकडे स्त्रियांचा ओढा दिसतो. कारकुनी काम त्यांना मानवणारे, अशीच त्यांच्याबाबत भूमिका, समाजाने ठाशीव व चाकोरीबद्ध विचाराने स्वीकारलेली. व्यवस्थापकीय, संघटक व रचनात्मक कामातसुद्धा त्यांना वाव दिला जात नाही.

५) स्त्रियांबाबतीत आणखी महत्त्वाचा घटक म्हणजे स्त्रियांची भौगोलिक गतिशीलता फार मर्यादित आहे. लांबच्या ठिकाणी उच्च वेतनाच्या नोकऱ्या स्वीकारण्याकडे त्यांचा अजिबात कल नसतो. शिवाय त्यांची व्यावसायिक गतिशीलताही कमी आहे. एका व्यवसायातून दुसऱ्या व्यवसायाकडे वळण्यास त्या सहजी तयार होत नाहीत. उदाहरणार्थ, लग्नाअगोदर शिक्षकी पेशात असणाऱ्या तरुणी लग्नानंतर कारकून म्हणून नोकरी करण्यास उत्सुक नसतात, अशीही उदाहरणे आहेत.

६) पुरुषांवर अवलंबून राहण्याची व स्वतःला कनिष्ठ समजण्याची स्त्रियांची प्रवृत्ती, शैक्षणिकदृष्ट्या मागासलेपणा, गृहिणीपदाला अवास्तव महत्त्व व जुने निकष त्या पदाला वापरण्याचा अट्टाहास, कुशल व तांत्रिक प्रशिक्षणाच्या सोयींची कमतरता वगैरे अनेक घटकांमुळे स्त्रियांना औद्योगिक श्रमबाजारात वाव मिळत नाही. शिवाय युनियनच्या कामाचे महत्त्वही त्यांना पटलेले नाही. त्यात त्या अजिबात सहभागी होत नाहीत. त्यांना त्या कामाची आवड नाही. ज्या उद्योगात स्त्रियांची संख्या मोठी आहे, तिथे संघटना प्रभावीपणे उभारल्या जात नाहीत. परिणामी स्त्रियांची बेकारी व अन्य प्रश्नांचा कामगार संघटनाही गंभीरपणे विचार करीत नाहीत.

या व अशा विविध कारणांनी स्त्रियांना औद्योगिक संघटित क्षेत्रात पुरेसा रोजगाराचा वाटा मिळत नाही; त्यामुळे ज्या उद्योगात फक्त कष्ट व राबणूक अधिक, अल्प वेतन व कसल्याच प्रकारचे कायदेशीर संरक्षण नाही, अशा शेती व शेतमजुरीच्या कामात स्त्रियांची संख्या अधिक व औद्योगिक क्षेत्रात नगण्य स्थान अशी स्थिती होत आहे. या परिस्थितीत सुधारणा होणे आवश्यक आहे.

स्त्रियांना सामाजिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रात समान संधी व स्थान मिळाले पाहिजे, या तत्त्वाचा पाठपुरावा करणे आवश्यक आहे. त्यातील पहिला टप्पा म्हणजे स्त्रीला उत्पादक घटक म्हणून स्वतंत्र स्थान दिले जाऊन अर्थार्जन करणे हा तिचा न्याय्य हक्क मानला जायला पाहिजे. कायम स्वरूपाची कामे व कुशल कामे, देखरेख व जबाबदारीची कामे मिळाली पाहिजेत. यासाठी तांत्रिक व इतर शिक्षण यांची मोफत सोय ग्रामीण व शहरी भागात व्हायला हवी. औद्योगिक

प्रशिक्षण केंद्रांतून विविध प्रकारचे वर्ग सुरू करून मुलींना प्राधान्य दिले जावे. सध्या नोकरीवर असणाऱ्यांना प्रशिक्षण देऊन बढती व अधिकाराच्या जागा देण्यात याव्यात. समाजकल्याण खाते, शासन, मजूर संघटना यांनी कारखानदारांच्या सहाय्याने स्त्रियांना रोजगारीत प्राधान्य देण्याच्या दृष्टीने विचार करायला हवा. सरकारी व निमसरकारी खाती, अनुदानावर चालणाऱ्या संस्था, सहकारी संस्था वगैरे क्षेत्रांत स्त्रियांचे विशिष्ट प्रमाण असले पाहिजे. याबद्दल कायदेशीर तरतूद व्हायला हवी. मजूर संघटना व स्त्री संघटनांनी या बाबतीत अत्यंत जागरूक व्हायला हवे. खासगी कारखानदारांना उद्योगाची परवानगी व विस्तारीकरणाचा परवाना देताना स्त्रियांना नोकरीमध्ये विशिष्ट टक्के स्थान देण्याची अट घालावी. स्त्री-शिक्षण व प्रशिक्षणावर भर दिला जावा.

स्त्री ही दुय्यम व पुरुष कर्ता मानला जाण्याची भूमिका स्त्रियांनी व समाजाने बदलायला हवी. स्त्री हा मानवी समाजाचा एक स्वतंत्र घटक म्हणून तिला आर्थिक व सामाजिक व्यवहारात सहभागी होण्याचा हक्क दिला जावा. स्त्रियांचा सामाजिक व सांस्कृतिक दर्जा उंचावण्यासाठी आर्थिक स्वातंत्र्य व त्याला पुरेसे संरक्षण ही किमान आवश्यक बाब आहे; तरच स्त्री मानसिक व सांस्कृतिक गुलामगिरीतून मुक्त होण्याचे प्रयत्न धैर्याने व चिकाटीने करू शकेल.

स्त्रियांचा रिकामपणाचा वेळ

हल्लीच्या काळी 'पती-पत्नी व दोन मुले' हा कुटुंबाचा सर्वसाधारण साचा ठरून गेलेला आहे. सुशिक्षित व मध्यमवर्गीय कुटुंबात मध्यम वर्गातील जोडप्यांचे आयुष्य चाकोरीबद्ध झाले आहे. अशा बहुसंख्य कुटुंबांतील प्रौढ महिलांसमोर कळत नकळत निर्माण होणारा प्रश्न म्हणजे त्यांना जाणवणारी रिकामपणाची मानसिक अवस्था होय. नोकरी करणाऱ्या महिलांच्या बाबतीत हा प्रश्न निर्माण होत नाही; पण नोकरी न करणाऱ्या स्त्रियांना अशा अवस्थेचा अनुभव येत राहतो.

मुले शिक्षणाच्या व्यापात गुंतलेली, त्यांना आईच्या मदतीची फारशी गरज भासत नाही. किंबहुना मायेपोटी केलेली चौकशी व घेतलेली काळजी जाचक वाटते. त्यामुळे ती तिच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करीत राहतात. स्वतःच्या व्यापात ती मग्न असतात. त्यामुळे विशिष्ट वयापर्यंत आईचा पदोपदी आधार घेणारी व तिच्यावर विसंबून असलेली मुलं जेव्हा मोठी होतात व स्वतंत्रपणे जगण्याचा मार्ग स्वीकारतात, तेव्हा आईला त्यांच्या वागण्याचा त्रास होऊ लागतो. सर्वस्वी विसंबून नसलेली मुलं व पती नोकरीच्या व्यापात; त्यामुळे अशा स्त्रियांना वेळ कसा घालवावा असे होऊन जाते.

ज्या स्त्रियांना वाचनाची व चिंतनाची आवड असते व साहित्यात रस असतो, त्या स्त्रियांनी केवळ वाचण्याच्या छंदावरच समाधान मानू नये; कारण कथा-कादंबऱ्या वाचनातील रस त्या वयात फारसा उरत नाही; म्हणून स्वतंत्रपणे विचार मांडण्याचा व लिखाणाचा प्रयत्न अशा स्त्रियांनी करायला हरकत नाही. कित्येक सुशिक्षित स्त्रियांना कौटुंबिक जबाबदाऱ्या व इतर अडचणींमुळे नोकरी करणे शक्य झालेले नसते. त्यांनी आपल्या शिक्षणाचा, ज्ञानाचा व वाचनाचा आणि विचार करण्याच्या कुवतीचा वापर लिखाण करण्यासाठी करावा. अर्थात सर्वांनाच ते जमेल असे नाही; पण जमणारच नाही अशी उदासीन प्रवृत्ती न स्वीकारण्यास हरकत नाही. शिवाय लिहिलेले सर्व लगेच प्रसिद्ध होईल या अपेक्षेने ते करू नये; कारण एक-दोनदा 'साभार परत' आल्यास नाउमेद होऊ नये. प्रयत्नांती लिखाणाचे अंग विकसित होऊ शकते. त्यामुळे महत्त्वाचा फायदा असा की, एक तर वेळ सत्कारणी लागतो, रिकामपण जाणवत नाही, साहित्यनिर्मितीचा आनंद मिळतोच; शिवाय फावल्या वेळात कुठेतरी जाऊन कुणावर तरी टीका करीत बसण्याच्या व्यसनाची सुरुवात होत नाही. फार प्रथितयश मिळेल अशी अपेक्षा न ठेवता लिखाण करणे व विशिष्ट चाकोरीचा हव्यास न धरता लिखाणाचा ध्यास घेणाऱ्यांमध्ये रिकामपणाची पोकळी तर भरून निघतेच, पण आपल्या अस्तित्वाला कौटुंबिक व हळूहळू सामाजिक मान्यताही मिळू लागते.

सर्वच स्त्रियांना लिखाण करता येईल असे नाही. ज्या स्त्रीला वाचनात रस आहे, तिला आपल्या परिसरात छोटेसे वाचनालय चालविता येईल. मासिकांपासून सुरुवात करणे फारसे कठीण जाणार नाही. हल्ली शहरात व तालुक्याच्या ठिकाणी मोठ्या खेड्यांतसुद्धा वाचक वर्ग उपलब्ध होऊ शकतो. त्यामुळे फार मोठ्या आर्थिक लाभाची अपेक्षा न ठेवता, पण योग्य तो मोबदला मिळेल या हेतूने लायब्ररी चालविणे शक्य आहे. विशिष्ट वेळेचा हा पार्टटाइम जॉब खरोखरच समाधान देणारा व कसल्याही कटकटीचा नाही; त्यामुळे फार शिक्षणाची गरज नसलेले हे क्षेत्र स्त्रियांना लाभदायक व मानसिक समाधान देणारे आहे. त्यासाठी लायब्ररी कोर्सची गरज नाही.

व्यवहारी दृष्टिकोन व मोबदल्याची अपेक्षा ठेवूनच नोकरी करणाऱ्या महिलांच्या मुलांना मॉंटेसरीत पोहोचविणे व आणणे ही जबाबदारी त्यांनी स्वीकारण्यास हरकत नाही. वेळा अर्थात सोयीस्कर असल्या पाहिजेत; पण त्यातूनही एक सामाजिक गरज, मुलांची सुरक्षितता व वेळ सत्कारणी लावण्याचे साधन म्हणून या कामाकडे बघण्यास हरकत नाही. पाश्चात्त्य राष्ट्रांत 'पाळणागृहे' ही अत्यावश्यक सेवा व व्यवसाय म्हणून चालविली जातात. आपल्या देशातसुद्धा

नोकरी करणाऱ्या स्त्रियांची वाढती संख्या, स्वतंत्र कुटुंब पद्धती, बाजारहाटासाठी करावी लागणारी धावपळ, विश्वासू नोकर मिळण्याची अशाश्वती वगैरेंमुळे लहान मुलांच्या संगोपनाचा प्रश्न बिकट होत चालला आहे. दिवसांतले काही तास असे असतात की, मूल माँटेसरीत जाण्याच्या वयाचे होईपर्यंत कुणाजवळ ठेवावे असा प्रश्न निर्माण होतो. तो सुलभरीत्या सोडविण्याच्या दृष्टीने जवळपासच्या स्त्रियांनी मदत करण्यास हरकत नाही. या कामाला सामाजिक महत्त्व व मान्यता मिळू शकत असल्याने घरगुती अर्थार्जन करण्याचे साधन म्हणून याकडे पाहिले जाते.

विशिष्ट परिसराची मर्यादा ठरवून ज्या त्या परिसरात माँटेसरी सुरू करण्याचे कामही हाती घेता येईल. १२ ते ३ ही वेळ सर्वांच्याच सोयीची असल्याने त्या काळात असे वर्ग चालविणे सहज शक्य होईल. या सेवेच्या मोबदल्यात पैसेही मिळतील. शैक्षणिक व मनोरंजनात्मक कामात वेळही चांगला जाईल. याच धर्तीवर संस्कारवर्गही सुरू करण्यास हरकत नाही. विशिष्ट वयोगटातील मुलामुलींना जीवनाला उपयुक्त अशी शिस्त, मूल्ये व मूलभूत तत्त्वाची जाणीव करून देण्याच्या दृष्टीने हे वर्ग उपयुक्त ठरतील. यासाठी काही स्त्रियांनी एकत्र येऊन विषयांची व दिवसांची वाटणी करून घेतल्यास सोयीचे ठरेल. शिवाय तो परीक्षार्थी अभ्यासक्रम नव्हे अथवा उच्च ज्ञान देण्याचे केंद्र नव्हे. त्यामुळे संस्कारवर्ग हा एक सामाजिक, सांस्कृतिक प्रशिक्षणाचा उपक्रम मानला जावा.

एकमेकींकडे गप्पा मारण्यात आपण वेळ घालवितो, तसा वेळ न दवडता पापड, लोणची, चटण्या, हळद, वाती, तिखट, मसाला, मिरपूड, शेवया, शिकेकाई वगैरे वस्तू बनवून देण्याचे काम करावे. ऑर्डर्स नोंदवून घेऊन त्या पुरविल्यास विक्रीचा प्रश्न उद्‌भवणार नाही. यामध्ये चांगले घरगुती पदार्थ देण्याचे श्रेय मिळेल, उत्पन्नही मिळेल आणि काम करून आपल्या कुटुंबाच्या मिळकतीत भर टाकता येईल.

आज शहरात व तालुक्याच्या ठिकाणी शिंपी कधीच वेळेवर कपडे शिवून देत नाही असा अनुभव आहे. शिवणकामाची आवड असणाऱ्या स्त्रियांनी हाही उद्योग महत्त्वाचा व आवश्यक मानण्याचा दृष्टिकोन स्वीकारावा. वेळ पडल्यास अगोदर शिवणाच्या क्लासमध्ये जाऊन शिकावे; म्हणजे शिवणकलेचा शास्त्रीय पाया तयार होईल. 'आता या वयात शिवणवर्गात जायची लाज वाटते बाई,' असे म्हणण्याची व संकोच बाळगण्याची जरुरी नाही. शिकण्यासाठी विशिष्ट वय लागतेच असे नाही. फक्त मनाची तयारी असली पाहिजे. त्यामुळे शिवणकाम, इस्त्री, कलाकुसरीच्या वस्तू बनविणे इत्यादी क्षेत्रे अजूनही कामाच्या संधी उपलब्ध करून देण्यास समर्थ आहेत. त्याचा फायदा अशा स्त्रियांना सहजी घेता येईल. स्वतःबरोबरच इतर तरुण मुलींना मार्गदर्शन करून त्यांनाही उद्योगाची सवय व उद्योजकाचा

दृष्टिकोन स्वीकारण्याचे कळत-नकळत प्रशिक्षण देता येईल.

महिला मंडळे, भजनी मंडळे, रसना मंडळे या ठिकाणी स्त्रिया एकत्रित जमतात; पण ते तात्पुरते व्यवधान व मनोरंजनाचा भाग म्हणूनच उपयुक्त ठरते. त्यामुळे आनंद मिळतो; पण त्याचबरोबर मनस्ताप व हेवेदावे, तुलना वाढण्यास मदत होत असल्याचा अनुभवही येतो. म्हणून ती ठिकाणे सर्वस्वी वर्ज्य आहेत असे नाही; पण त्यातून सामाजिक कार्य व आर्थिक हेतू साध्य होतोच असे नाही. म्हणून स्त्रियांनी अशा कामाचा ध्यास घ्यावा की, ज्यातून उपयुक्त सेवा उपलब्ध होऊ शकतील. अशा उपक्रमांचा विचार करताना स्त्रियांचा व्यावसायिक कल व आवड, शिक्षण, कौटुंबिक पार्श्वभूमी, परिसरातील लोकांच्या गरजा, कर्त्यांची आर्थिक परिस्थिती लक्षात घ्यावी लागेल. तसेच सामाजिक परिस्थिती पोषक व पूरक कशी होईल याकडे लक्ष दिले जावे. अशा स्त्रियांना सुरुवातीच्या काळात नातेवाईक व कुटुंबीय मंडळी, मैत्रिणी, शेजारीपाजारी यांच्याकडून टीकेचे उद्‌गार ऐकून घ्यावे लागतील. 'मी मिळवायला समर्थ आहे. तू आता सुखात रहा. घरात विश्रांती घे. नको ते फॅड कशाला ?' अशी व या तऱ्हेची पतिराजांची वक्तव्येही ऐकून घ्यावी लागतील. मुलांनाही स्त्रियांची अशी शारीरिक व मानसिक अनुपस्थिती फारशी रुचेलच असे नाही; परंतु स्त्रियांनी ही सर्व परिस्थिती गृहित धरूनच स्वत:ला अशा स्वरूपाच्या कार्यात गुंतवून घेण्याची तयारी ठेवली पाहिजे. कारण विवाहानंतर पंधरा-सोळा वर्षे संसारातील विविध जबाबदाऱ्या पार पाडल्यानंतर मिळालेली उसंत व विश्रांती स्वत:च्या इच्छेप्रमाणे व आवडीच्या व्यवसायात घालविण्याचा प्रयत्न करणे अप्रस्तुत वाटू नये.

काही स्त्रिया रिकामपणाच्या वेळी घरातल्या क्षुल्लक बाबींवर विचार करीत राहतात. शब्दांचा कीस पाडून, त्यातून अर्थ काढीत बसून स्वत:च्या घरात स्वत: परक्या होऊन बसतात. नवऱ्यास व मुलांना आपल्या कष्टाचे मोल वाटत नाही, आता मुले मोठी झाल्याने आपली किंमत ठेंवीत नाहीत, अशा विचाराने त्या हैराण होतात. त्यांचा स्वभाव चिडचिडा बनतो. अशा मन:स्थितीत नवऱ्याने सहजी काढलेले उद्‌गार स्फोटक परिस्थिती व मानसिक उद्‌ध्वस्तपणा येण्यास कारणीभूत ठरतात. आयुष्याला नियोजनबद्ध वळण लावले पाहिजे. ते लावताना कौटुंबिक शांतता व वेळापत्रक याला ग्रहण न लावता आपल्या दिनक्रमातील विशिष्ट तास स्वत:साठी राखून ठेवले पाहिजेत. तो वेळ वरील विविध उपक्रमांसाठी खर्च केला पाहिजे. ते करताना एक वेगळेच समाधान व आनंद मिळू शकेल.

यामुळ आणखीही महत्त्वाचा धोका टाळता येईल व तो म्हणजे मुलं थोडीशी मोठी व सुटी झाली की, आपण उतार वयाचे झालो या कल्पनेतून स्त्रिया वावरू लागतात. रिकामपणामुळे हा विचार रुजू लागतो. व्यवस्थितपणे

वेषभूषा व राहणीकडेही त्या नकळत दुर्लक्ष करू लागतात. परिणामी त्यांना उतारवयात अपेक्षित असे संभाव्य रोग झाल्याच्या लक्षणांचा भास होऊ लागतो. अशक्तपणा आल्यासारखे वाटते. हाच आधार घेऊन मुले शाळा–कॉलेजला गेली व पती ऑफिसला गेले की, दुपार लोळून काढण्याची सवय लागते. हे सर्व टाळण्यासाठी स्त्रियांनी व्यवसाय, उद्योग, छंद व कामाचा व्याप लावून घेतला पाहिजे. त्यामुळे आयुष्याला गती येते. मन व शरीर उल्हसित राहते. घरातील मंडळींनाही खेळीमेळीच्या वातावरणाचा लाभ होतो. तेव्हा प्रौढावस्थेतील स्त्रियांनी आपल्या शारीरिक व मानसिक स्वास्थ्यासाठी व कुटुंबाची घडी विसकटू नये म्हणून आयुष्याला वळण लावून घेतले पाहिजे.

भारतीय स्त्रीची उपेक्षा भविष्यकाळातही कायम ?

आपल्या देशात स्वातंत्र्यप्राप्तीनंतरसुद्धा स्त्रियांचा दर्जा सुधारलेला नाही. पुरुष कर्ता व स्त्री घरकामाच्या न संपणाऱ्या पसाऱ्यात या ना त्या स्वरूपात जन्मभर कोंडली गेल्याने ज्ञान, अधिकार व सामाजिक जीवन, स्वतंत्र अस्तित्व यांपासून वंचित राहते. बालविवाह, हुंडा पद्धती, विवाहानंतर शारीरिक व मानसिक कुचंबणा, कौटुंबिक कामाची वेठबिगारी, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिकदृष्टया स्त्रीला दिले जाणारे दुय्यम स्थान, प्रौढ कुमारिका व विधवांच्या समस्या, बलात्कार व मारहाण वगैरे अनेकविध चक्रांतून, पारतंत्र्याच्या बेडयांतून जावे लागत असल्याने असंख्य स्त्रियांना 'नको गं बाई तो बायकांचा जन्म' असं म्हणण्याची पाळी येते. त्यातूनच घरात मुलाऐवजी मुलीचा जन्म म्हणजे दुधात साखरेऐवजी मीठ पडल्यासारखी परिस्थिती निर्माण होते.

फसवी समानता

पुरुषप्रधान संस्कृतीमुळे, लिंगभेदावर आधारित श्रमविभागणीमुळे आणि परंपरागत संस्कारांमुळे स्त्रियांचे कार्यक्षेत्र मर्यादित झाले. त्यामुळे अनेक सामाजिक, कौटुंबिक व नीतिमत्तेचे प्रश्न केवळ स्त्रियांशी निगडित झाले. परिणामी आजही कुटुंबात मुलगी जन्मली की, आई–वडिलांच्या पायांत मणामणाच्या बेडया घातल्यासारखी परिस्थिती निर्माण होत आहे. हल्ली अनेक क्षेत्रांत पुरुषांच्या बरोबरीने स्त्रिया फक्त आर्थिक जीवनात सहभागी होत आहेत; पण स्त्रियांना नोकरी व व्यवसायात दिली जाणारी समानता फसवी आहे. कारण हे प्रमाण पुरुषांच्या मानाने अल्प आहेच, शिवाय तो आधुनिक सासुरवास आहे. नोकरी-

बरोबरच घरकामाच्या व अन्य प्रकारच्या कौटुंबिक जबाबदाऱ्यांच्या कोंडीतून त्यांची सुटका झालेली नाही. मुलींच्या जन्मापासून ते मरेपर्यंत स्त्रीचे गौणत्व पदोपदी जाणवत आहे. आपल्या देशात स्त्रियांची होणारी हेळसांड, कनिष्ठ दर्जा, दुजाभावाची वागणूक यामुळे त्या खऱ्या मानवी जीवनापासून वंचित राहिल्या आहेत. सारांश, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिकदृष्टचा दलितांपेक्षाही उपेक्षित राहिलेला बहुसंख्य स्त्री–समाज सध्याही अनेकविध कुचंबणा सहन करीत आहे. ही त्यांची उपेक्षा देशाच्या लोकसंख्येच्या चिकित्सक अभ्यासातूनही दिसून येते.

आपल्या देशातील लोकसंख्येच्या आकडेवारीचे विश्लेषण करता, स्त्रियांचे प्रमाण पुरुषांपेक्षा कमी आहे. १९८१ च्या (तात्पुरत्या) जनगणना अहवालानुसार, दर एक हजार पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण ९३५ असल्याचे निदर्शनास आले आहे. चिंतेची बाब अशी की, १९०१ पासून पुरुषांच्या मानाने स्त्रियांचे प्रमाण सातत्याने घटत आहे. स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वीचा विचार केल्यास १९०१ साली दर एक हजार पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण ९७२ इतके होते, त्यामध्ये घट होऊन ते १९४१ मध्ये ९४५ झाले होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या जनगणना अहवालाचा तौलनिक अभ्याससुद्धा स्त्रियांच्या प्रमाणात घट झाल्याचे दर्शवितो. १९५१ च्या आकडेवारीनुसार दर एक हजार पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण ९४६होते, तर १९८१ च्या अहवालानुसार ते ९३५ असल्याचे दिसते. म्हणजे पुरुषांपेक्षा स्त्रियांची संख्या सातत्याने कमी होत जाणे हे सांस्कृतिकदृष्टचा मागासलेपणाचे लक्षण मानावे लागेल. या उलट प्रगत देशांत पुरुषांची संख्या स्त्रियांच्या मानाने कमी असल्याचे आढळते. अमेरिकेत दर हजार पुरुषांमागे १०५० स्त्रिया, इंग्लंडमध्ये दर हजारास १०६० स्त्रिया तर रशियामध्ये दर एक हजार पुरुषांमागे ११७० स्त्रिया असे प्रमाण आहे.

वरील स्त्रीपुरुष संख्येतील तफावतीच्या आणखी समर्थनार्थ वा आधार म्हणून लोकसंख्येच्या आकडेवारीचे विश्लेषण करता येईल. भारत व भारताशी सांस्कृतिक दृष्टचा साम्य नसलेल्या प्रगत देशांत स्त्री–पुरुषांचे प्रमाण लक्षात घेतल्यास, आपल्यापेक्षा वेगळे चित्र दिसते.

देश	पुरुषांचे शेकडा प्रमाण	स्त्रियांचे शेकडा प्रमाण
१	२	३
भारत (१९७०)	५१.८	४८.२
अमेरिका (१९७०)	४८.७	५१.३
रशिया (१९७०)	४८.३	५१.७

१		२	३
इंग्लंड	(१९७१)	४८.५	५१.५
फ्रान्स	(१९७०)	४६.३	५३.७
जपान	(१९७०)	४९.१	५०.९
चिली	(१९७०)	४८.८	५१.२

वरील तक्त्यावरून लक्षात येईल की, भारताचा अपवाद सोडता इतर प्रगत देशांत स्त्रियांचे सरासरी आयुर्मान पुरुषांच्या सरासरी आयुर्मानापेक्षा जास्त आहे. आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे तेथे बालमृत्यूंतसुद्धा पुरुष बालकांचे प्रमाण स्त्री बालकांपेक्षा जास्त आहे.

म्हणजेच आपल्या देशात लोकसंख्येची भयावह वाढ होत असून दर दीड सेकंदाला एक मूल जन्माला येऊन दर दिवशी लोकसंख्येत ५७,००० व्यक्तींची भर पडते. प्रतिवर्षी लोकसंख्यावाढीचे सरासरी २०५ टक्के असे प्रमाण आहे. मात्र केवळ देशाची एकूण प्रचंड लोकसंख्या, लोकसंख्या वाढीचा शीघ्र वेग हाच प्रश्न नसून पुरुषांपेक्षा स्त्रियांचे प्रमाण घटत जाणें, सरासरी आयुष्यमान पुरुषापेक्षा कमी असणे, बाल मृत्यूतसुद्धा पुरुष–बालकांचे प्रमाण स्त्री–बालकांपेक्षा कमी असणे ह्या मूलभूत व महत्वाच्या समस्या आहेत. स्त्रियांच्या बाबतीत लोकसंख्येच्या रचनेत हीच स्थिती राहिल्यास स्त्रियांचे प्रमाण घटत गेले तर निसर्गाचा तोल ढासळेल, निसर्गक्रम अडचणीत येईल. कुणी सांगावे, कदाचित विवाह समस्या बिकट बनून कुटुंबसंस्थाच यामुळे अडचणीत येईल. हा विचार काहींना अवास्तव वाटला तरी वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. शिवाय पुरुषांची संख्या प्रमाणाबाहेर वाढली तर लैंगिक गुन्ह्यांची संख्या वाढेल; म्हणून स्त्रियांच्या कौटुंबिक, सामाजिक, सांस्कृतिक व आरोग्यविषयक समस्यांचे स्वरूप जाणून घेऊन ते सोडविण्यास प्राधान्य देणे अत्यंत जरुरीचे आहे.

वरील लोकसंख्येचा अभ्यास व आकडेवारीचा आधार असे दर्शवितो की, स्त्रियांचे प्रमाण पुरुषांपेक्षा कमी असणे हे गेल्या ९ जनगणना अहवालांवरून निदर्शनास येते. अशी परिस्थिती निर्माण होण्यामागे असणारी कारणें :

जन्माला येणाऱ्या बालकांत मुलींपेक्षा मुलांचे प्रमाण जास्त असणे. बालमृत्यू प्रमाणात मुलांपेक्षा मुलींच्या मृत्यूंचे प्रमाण जास्त असणे, लहान मुलींना वेळेवर औषधोपचार केले जात नाहीत, व्यवस्थित आहार मिळत नाही, चार वर्षांखालील मुली मोठ्या प्रमाणात मृत्युमुखी पडतात. भारतीय संस्कृतीमध्ये मुलींना सावत्रपणाची वागणूक दिली जाते. आरोग्याकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही.

स्त्रियांच्या मृत्यूचे प्रमाण पुरुषांच्या मृत्यूच्या प्रमाणापेक्षा जास्त असणे. आपल्या समाजात पुरुषश्रेष्ठतेच्या पारंपरिक कल्पनांमुळे कुटुंबात पुरुषाच्या आहाराची व अन्य सुविधांची उपलब्धतता, विशेष काळजी घेतली जाते. मात्र स्त्रियांकडे दुर्लक्ष होते. बालवयातील विवाहामुळे १५ ते १९ या जननक्षम वयोगटात स्त्रियांच्या मृत्यूचे प्रमाण अधिक आढळते. न झेपणारे नको तेवढे मातृत्व लादल्यानेही त्यांची शारीरिक झीज होऊन त्यांच्या जगण्याचा हक्क धोक्यात आणला जातो.

बाळंतपणात मृत्युमुखी पडणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण पूर्वीपेक्षा कमी झाले असले, तरी इतर प्रगत राष्ट्रांच्या मानाने ते अजूनही जास्त आहे. एक हजार बाळंतीण स्त्रियांपैकी मृत्युमुखी पडणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण ३ आहे. पण इंग्लड व कॅनडामध्ये हे प्रमाण दर हजारी ० ५ तर अमेरिकेत ०.१८ आणि डेन्मार्कमध्ये हे प्रमाण फारच कमी म्हणजे ०.०४ आहे.

मुलीपेक्षा मुलास जास्त प्राधान्य देण्याची वृत्ती. जाणूनबुजून मुलीकडे दुर्लक्ष केल्यामुळे मुलींच्या मृत्यूचे प्रमाण वाढते ही गोष्ट विश्वासार्ह वाटण्यायोग्य आकडेवारीचे आधार उपलब्ध नाहीत. त्या संदर्भात संशोधन होण्याची गरज आहे; पण मुलीच्या जन्माचे थंडे स्वागत, मुलीपेक्षा मुलाकडे अधिक लक्ष पुरविण्याची पुरुषप्रधान संस्कृती, मुलगी म्हणजे स्त्री ही फक्त देहाने ओळखली जाणारी व भोगदासी असा स्त्री व पुरुष यांच्यामधील शारीरिक फरक प्राधान्याने जपण्याचा अट्टाहास, मुलगा वंशाचा दिवा व मुलगी परक्याचे धन, मुलगा होणे म्हणजे जीवनातील मोठ्यात मोठी सार्थकता व स्त्रीजन्म म्हणजे पूर्वपापाचे फळ अशी भावना वगैरे भेदभाव समाजात पदोपदी दिसतो.

अजूनही वंचित, शोषित

लोकसंख्येचा वयोगटानुरूप अभ्यासही स्त्रियांची उपेक्षितता लक्षात आणून देतो. १९७१ च्या जनगणनेनुसार असे आढळते की, ० ते १४ वयोगटातील पुरुषांचे प्रमाण ४१.८८ व स्त्रियांचे प्रमाण ४२.२० होते. पण जर ५५ व अधिक वर्षे वयोगटाचा विचार केल्यास ते प्रमाण पुरुष ५.९४ टक्के व स्त्रिया ०.९९ टक्के इतके होते. याचा अर्थ पुरुषांचे सरासरी आयुर्मान स्त्रियांपेक्षा जास्त आहे. स्त्रिया पुरुषापेक्षा कमी वर्षे जगतात. कारण प्रजोत्पादनाचे यंत्र, कष्टाचे साधन, ओझ्याचा गुलाम, पायाची दासी व भोगण्याची सजीव वस्तू म्हणून वावरणारी स्त्री अजूनही गुदमरलेली, स्वतंत्र श्वास घेऊ न शकणारी, खचलेली, समान संधीपासून वंचित व शोषित आहे. तिची जगण्याची ताकद, शारीरिक साथ, मानसिक तीव्र इच्छाशक्ती पुरुषापेक्षा कमी होत जाते.

लोकसंख्येची गुणवत्तेनुसार रचना ही देशाच्या प्रगतीच्या दृष्टीने महत्त्वाची ठरते. गुणवत्ता याचा अर्थ देशातील लोकांचे शिक्षण, तंत्रज्ञान, कौशल्यप्राप्ती व संस्कृती असा होऊ शकतो. वैयक्तिक व सामाजिक प्रगतीसाठी, त्याचप्रमाणे सुखी जीवनाची वाटचाल करण्यासाठी शिक्षणाची गरज आहे. पण दुर्दैवाने शिक्षणाच्या क्षेत्रातील एकूण प्रगती बरीच मंद आहे व विशेषत: स्त्रियांच्या बाबतीत तर अत्यंत निराशाजनक आहे. १९८१ च्या जनगणना अहवालानुसार साक्षर स्त्रियांच्या बाबतीत तर अत्यंत निराशाजनक स्थिती आहे. १९८१ च्या जनगणना अहवालानुसार साक्षर स्त्रियांचे प्रमाण हजारी २४९ व पुरुषांचे ४६७ आहे. मुलींच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष, बालविवाह, लहान भावंडांना सांभाळण्याची जबाबदारी, दारिद्र्य, मुलीकडे पाहण्याचा पारंपरिक दृष्टिकोन, अज्ञानामुळे मुलींच्या शिक्षणाबद्दल पालकांची उदासीनता, चालीरीती वगैरे कारणांमुळे स्त्रियांची शिक्षणक्षेत्रातही पुरुषांच्या मानाने पीछेहाट दिसून येते.

अशा रीतीने भारतातील लोकसंख्येच्या रचनेचा लिंगानुसार, वयोगटानुसार व गुणवत्तेनुरूप अभ्यास केल्यास पुरुषांच्या मानाने स्त्रियांच्या संख्येत घट; सरासरी आयुर्मान कमी व साक्षरता प्रमाणातही त्या मागें असल्याचे आजही तीव्रतेने जाणवते.

वरदान भस्मासुर ठरेल

पुढील धोका असा की, आज अस्तित्वात असलेली समाजरचना लक्षात घेता केवळ मुलगा हवा असा अट्टाहास व त्या दृष्टीने असलेले संशोधन व गर्भाशयात गर्भाचे लिंग ओळखून मुलगा किंवा मुलगी यांपैकी काय जन्माला येणार हे स्पष्ट होईल म्हणून होणारा प्रयत्न हे लोकसंख्येच्या रचनेत असमतोल निर्माण करण्यास व त्या रीतीने मानवजातीच्या दृष्टीने बाधक ठरणारे आहेत, केवळ मुलगा हवा ही आग्रही भूमिका व त्या दृष्टीने होणारे प्रयत्न, मग ते संशोधनाच्या सहाय्याने असो वा मुलीच्या जन्मापासून तिची हेळसांड व मुलापेक्षा वेगळी वागणूक देऊन असो, आपल्याला हवी ती संतती म्हणून मुलगा हवा म्हटला तर निसर्गाचा समतोल ढळेल, अशी भीती कायदेतज्ज्ञ व समाजशास्त्रज्ञांनी व्यक्त केली आहे. याचाही गंभीरपणे विचार व्हायला हवा; यामुळे सामाजिक, आर्थिक, मानसशास्त्रीय, नैतिक, शैक्षणिक क्षेत्रावर निश्चित असे अनिष्ट परिणाम होतील आणि हा अट्टाहास पुढील काळात वरदान ठरण्याऐवजी भस्मासुर ठरेल अशी साधार भीती समाजधुरिणांनी व्यक्त केली आहे. मातापित्यांनी, सुशिक्षित दांपत्यांनी, समाज कार्यकर्त्यांनी हा विचार विशेषत्वाने करायला हवा. मुलगा की मुलगी असा संततीच्या निवडीचा अट्टाहास व त्या दृष्टीने कुटुंब व्यवस्थेची रचना

व समाजाच्या चौकटीतील मान्य मूल्ये जोपासली न जाता, मुलीच्या जन्माचे स्वागत, मुलामुलींना समान वागणूक व संधी, प्रजोत्पादन क्षमतेचा मर्यादित वापर व आरोग्यदायी मातृत्व या विचारांना चालना व मान्यता मिळायला हवी.

□

४ स्त्री-शिक्षण

मुलींच्या प्राथमिक शिक्षणाकडे पाहण्याचा ग्रामीण स्त्रियांचा दृष्टिकोन

आपल्या देशात ज्यांनी शाळेचे तोंड पाहिलेले नाही, पायरीही चढलेली नाही, अशा मुलांची संख्या ४ कोटी ७० लाख इतकी आहे. शाळेत जाऊ न शकणाऱ्या या ४ कोटी ७० लाख मुलांच्या सध्याच्या संख्येपैकी ३ कोटींपेक्षा जास्त म्हणजेच एकूण संख्येच्या दोन तृतीयांश मुली आहेत. अशा प्रकारे शाळेत प्रवेश न करू शकलेल्या १०० मुलांपैकी ६५ मुली आहेत. प्राथमिक शिक्षण व्यापक बनविण्याच्या उद्देशाने काम करणाऱ्या समितीने १९८२-८३ पर्यंत ३ कोटी २० लाख अधिक शिक्षण देण्याचे लक्ष्य गाठण्याची शिफारस केली होती. त्याच-प्रमाणे १९७८ ते ८३ च्या काळात शिक्षणयोग्य अशा जादा मुलांपैकी ५० टक्के मुलांचा समावेश शाळाबाह्य अंशकालीन शिक्षण कार्यक्रमात करावा, असेही सुचविले होते. एकूण २२ राज्यांनी सहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये १ कोटी ४० हजार मुलांसाठी अशी शाळाबाह्य शिक्षणाची व्यवस्था केली. ती संख्या हिशेबात धरूनसुद्धा वर उल्लेखलेल्या समितीच्या शिफारसीप्रमाणे मुलांच्या शिक्षणाचे उद्दिष्ट गाठता आले नाही. आजवरच्या अनुभवावरून शिक्षणाच्या बाबतीत, विशेषत: मुलींच्या शिक्षणाच्या बाबतीत निर्धारित केलेले लक्ष्य गाठण्यात यश आलेले नाही.

भारतात १९८१ च्या जनगणनेनुसार अजूनही ७६ टक्के लोक निरक्षर आहेत. याचाच अर्थ असा की, अजूनसुद्धा देशातील दोन तृतीयांश लोक अज्ञानाच्या अंधारात चाचपडत आहेत. स्त्रियांच्या शिक्षणात प्रगती होऊनसुद्धा १९८१ च्या जनगणना अहवालानुसार साक्षर स्त्रियांचे प्रमाण दर हजारी फक्त २४९ इतकेच आहे. ग्रामीण भागात तर हे प्रमाण निश्चितपणे कमी आढळते. निरक्षरता हा भारतासारख्या विकसनशील राष्ट्रास शाप आहे. शासनाने प्राथमिक

शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचा चंग बांधला आहे. महाराष्ट्रात दहावीपर्यंतचे मुलींच्या मोफत शिक्षणाचे धोरण स्वीकारण्यात आले आहे. प्राथमिक शिक्षण सक्तीचे व फुकट असूनही अजून त्या वयोगटातील मुले–मुली व त्यांचा मोठा वर्ग या शिक्षणव्यवस्थेबाहेर आहे. विशेषत: ग्रामीण भागात मुलींच्या बाबतीत आजही मुलींच्या प्राथमिक शिक्षणाची परिस्थिती निराशाजनक असल्याचे दिसते. शाळेत न जाणे, गळती व स्थगिती ह्यांस पालकांचे अज्ञान, दारिद्र्य, अल्प वेतनावर मुले राबविण्याची गरज, घरगुती अडचणी, लहान भावंडांना सांभाळण्याची जबाबदारी, शेतीकाम व गुरे सांभाळणे अशी कारणे सांगितली जातात. कोठारी आयोगाच्या मते, मुलांच्या बाबतीत प्राथमिक शिक्षणाचा प्रश्न जवळजवळ संपुष्टात आला आहे. कारण ९० टक्के मुले प्राथमिक शाळेत नाव घालताना दिसतात; परंतु शाळेची पायरी न चढणाऱ्या मुलींची संख्या मोठी आहे. त्या दृष्टीने ग्रामीण स्त्रियांचा मुलींच्या शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन महत्त्वाचा ठरतो. तो अभ्यासण्याचा प्रयत्न केला आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील भुदरगड तालुक्यातील 'गारगोटी' आणि 'मडूर' ही दोन गावे सदरच्या संशोधनासाठी निवडण्यात आली. या दोन गावांतील स्त्रियांची निवड करताना स्तरित नमुना पद्धती वापरण्यात आली. गावातून प्रत्येकी २५ याप्रमाणे ५० स्त्रिया निवडल्या. प्रश्नावलीच्या आधारे त्यांचा मुलींच्या प्राथमिक शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अभ्यासण्याचा प्रयत्न केला. त्याचे प्रमुख उद्देश खालीलप्रमाणे आहेत. : अ) ग्रामीण भागातील स्त्रियांचा त्यांच्या मुलींच्या प्राथमिक शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अभ्यासणे, ब) (१) गावातील उपलब्ध शिक्षणाची सोय (२) स्त्रियांचा शैक्षणिक दर्जा, क) कुटुंबातील मुलांची संख्या व आर्थिक स्तर ह्या तीन प्रमुख घटकांनुसार स्त्रियांची वर्गवारी करून त्यांचा मुलींच्या प्राथमिक शिक्षणाविषयीचा दृष्टिकोन जाणून घेणे.

प्रश्नावलीच्या आधारे वरील मर्यादित हेतूने शोधनिबंध तयार करण्यात आला. ज्या अर्थाने शिक्षणविषयक संकल्पना वापरण्यात आल्या, त्यांचे विवेचन खालीलप्रमाणे –

१) **उपलब्ध शिक्षणविषयक सोयी** : ह्या संदर्भात शाळेची इमारत व परिसर, घरापासून शाळेचे अंतर, शिक्षकांची संख्या व वर्तणूक, इतर उपक्रम व कार्यक्रम वगैरे बाबींचा विचार व्यक्त करण्यात आला.

२) **स्त्रियांचा शैक्षणिक दर्जा** : या बाबतीत शिक्षणाच्या कक्षा लक्षात न घेता फक्त साक्षर व निरक्षर असे वर्गीकरण करण्यात आले. उच्च शिक्षण घेतलेल्या ग्रामीण स्त्रियांचा समावेश निवडीमध्ये करण्यात आलेला नाही.

३) **आर्थिक स्तर** : स्त्रियांच्या कुटुंबाचे मासिक उत्पन्न लक्षात घेतले आहे. उच्च स्तर म्हणजे १,५०० ते २,००० रु., मध्यम स्तर ५०० ते १,००० रु. आणि कनिष्ठ स्तर म्हणजे ५०० रु. च्या आतील उत्पन्न.

वरील निकषांच्या आधारे पुढीलप्रमाणे ग्रामीण स्त्रियांचे वर्गीकरण खालील कोष्टकरूपाने दर्शविता येईल.

ग्रामीण स्त्रियांचे निकषांनुसार वर्गीकरण

अ. नं.	घटक	वर्गीकरण	स्त्रियांची संख्या
१.	उपलब्ध शिक्षणविषयक सोयी	(अ) चांगले	२५
		(ब) कनिष्ठ	२५
२.	स्त्रियांचा शैक्षणिक दर्जा	(अ) साक्षर	१८
		(ब) निरक्षर	१८
३.	मुलांची संख्या	१–३	१८
		४–५	२०
		६–८	१२
४.	आर्थिक स्तर	उच्च	९
		मध्यम	१५
		कनिष्ठ	३६

निवड केलेल्या स्त्रियांची प्रत्यक्ष भेट घेऊन प्रश्नावलीच्या आधारे माहिती जमा केली. त्यातून निघालेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत –

१) निवड केलेल्या ५० ग्रामीण स्त्रियांपैकी ३२ स्त्रियांचे मत, मुलींना प्राथमिक शिक्षण देण्याविषयी अनुकूल असल्याचे दिसते. त्यांना प्राथमिक शिक्षणाचे महत्त्व पटल्याचे बोलण्यातून जाणवले. शिक्षणासाठी फी नसल्याने, खर्चाचा भार पडत नसल्याने ते परवडते. शिवाय गावात प्राथमिक शाळा असल्याने व घरापासून ती लांब अंतरावर नसल्याने मुलींना शाळेत पाठविणे सहज शक्य होते व धोक्याचे नसते. म्हणजे ' जाणीव, ' ' खर्च आणि सोय ' या तिन्ही बाजूंनी विचार केल्यास मुलींना प्राथमिक शिक्षण देण्याची अनुकूलता त्यांच्यात दिसून आली. मात्र ' शिक्षक ' ह्या घटकाबाबतीत ५० टक्के स्त्रियांनी नापसंती व्यक्त केली, तर उरलेल्या तितक्याच जणींनी अनुकूल दृष्टिकोन मांडला. नापसंत शिक्षकांच्या बाबतीत शैक्षणिक दर्जा, दोन कुटुंबातील कलह, मुलांबद्दलची अनास्था, शाळेतील मुलांची भांडणे, वारंवार त्यांची रजा, मुलांना धाक बसविण्याच्या बाबतीत अपयश, शिकविण्याबद्दलची तक्रार वगैरे कारणे असल्याचे नोंदविण्यात आले.

२) गारगोटी ह्या गावात मौनी विद्यापीठ हे शिक्षणकेंद्र असून तिथे निरनिराळ्या स्तरांवरील चौदा संस्था ज्ञानदानाचे काम करीत आहेत. बालवाडी ते पीएच. डी. पदवीपर्यंतचे शिक्षण देणारे ते केंद्र असल्याने त्या शैक्षणिक वातावरणाचा परिणाम ग्रामीण स्त्रियांवर झालेला प्रकर्षाने जाणवला. या गावातील निवडलेल्या, एक अपवाद वगळता, सर्वच स्त्रियांनी मुलींना प्राथमिक शिक्षण देण्याविषयीचे फायदे जाणून अनुकूल मत व्यक्त केले. शिवाय या विद्यापीठातील शैक्षणिक दर्जा चांगला आहे. तेथील ग्रामीण स्त्रियांचा मुलींच्या शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोनही अनुकूल असल्याचे दिसते. खालील कोष्टक समर्थनार्थ उपयुक्त ठरेल.

शिक्षण-सोयींच्या उपलब्धततेचा परिणाम व स्त्रियांचा दृष्टिकोन

गाव	शिक्षणविषयक सोयी	गावातील एकूण महिला	शिक्षणविषयक अनुकूल दृष्टिकोन व्यक्त करणाऱ्या महिलांची टक्केवारी
गारगोटी	बालवाडी ते पीएच. डी. पर्यंत शिक्षणसंस्थांची उपलब्धता	२५	९६ टक्के (२४)
मडूर	प्राथमिक शाळा	२५	३२ टक्के (८)

कंसातील आकडे स्त्रियांची संख्या दर्शवितात.

अशा रीतीने शिक्षणांची सोय आवश्यक आहे, हे लक्षात घेऊन मुलींच्या शिक्षणाविषयीचे धोरण व प्रगती यांचा विचार करणे इष्ट ठरेल.

३) ग्रामीण भागात स्त्रियांची साक्षरता हा घटकही मुलींच्या प्राथमिक शिक्षणाचे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने जबाबदार ठरतो, असे दिसते.

साक्षर स्त्रियांनी मुलींच्या प्राथमिक शिक्षणाचा ठामपणे पुरस्कार करून त्याची आवश्यकता प्रतिपादन केली. मात्र निरक्षर स्त्रियांना त्यांचे महत्त्व पटलेले असूनही ते अत्यंत निकडीचे आहे व अडचणींना मागे सारून ते द्यायलाच हवे, असे वाटले नाही. पुढील कोष्टकावरून या घटकांची परिणामकारकता लक्षात येईल.

मुलींच्या शिक्षणाबद्दलच्या दृष्टिकोनातून महिलांची साक्षरतेनुसार वर्गवारी

शैक्षणिक दर्जा	ग्रामीण महिलांची एकूण संख्या	अनुकूल दृष्टिकोन व्यक्त केलेल्या महिलांची टक्केवारी
साक्षर	१८	१०० टक्के
निरक्षर	३२	४३.७ टक्के

यावरून माता साक्षर करण्याची गरज लक्षात घेऊन त्या दृष्टीने प्राथमिक शिक्षणाच्या विस्ताराबरोबरच प्रौढ निरक्षर महिलांना साक्षरतेचे धडे द्यायला हवेत.

४) महिलांच्या आर्थिक स्तराबाबतीत असे दिसून आले की, उत्पन्नावर मुलीच्या प्राथमिक शिक्षणाची अनुकूलता वा प्रतिकूलता फारशी अवलंबून नाही. आर्थिकदृष्ट्या प्राथमिक शिक्षणाचा बोजा कुटुंबावर पडत नाही. शिवाय महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाने अल्प किमतीत पाठ्यपुस्तके उपलब्ध करून दिल्याने प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भात तरी खर्चाची सबब, मुलींच्या शिक्षणाबद्दल प्रतिकूल दृष्टिकोन व्यक्त करताना एकाही महिलेने सांगितली नाही. याचा अर्थ मोफत शिक्षणाची सुविधा ही ग्रामीण महिलांच्या दृष्टीने शिक्षणाच्या संदर्भात उत्तेजन देणारी ठरली. जर ती सवलत बंद केली तर मात्र त्याचे शिक्षणविस्तारावर अनिष्ट परिणाम होतील.

५) अत्यंत महत्त्वाचा सहसंबंध असा की, कुटुंबातील मुलांच्या संख्येच्या वाढीबरोबर शिक्षणविषयक दृष्टिकोनात अनुकूलतेच्या विरुद्ध बाजूने (नकारात्मक) दृष्टिकोन व्यक्त झाल्याचे आढळून आले. मुलींच्या प्राथमिक शिक्षणाबद्दल अनुकूल मत व्यक्त केलेल्या एकूण स्त्रियांत कमी मुले असलेल्यांची संख्या अधिक असल्याचे प्रकर्षाने जाणवले. त्या दृष्टीने खालील कोष्टक मार्गदर्शक ठरेल.

मुलांच्या संख्येनुसार स्त्रियांच्या दृष्टिकोनातील बदल

मुलांची संख्या	स्त्रिया	अनुकूल दृष्टिकोन व्यक्त करणाऱ्या स्त्रियांची टक्केवारी
१–३	१८	९४.४ (१७)
४–५	२०	५०.० (१०)
५ पेक्षा जास्त	१२	४१.७ (५)

कंसातील आकडे स्त्रियांची संख्या दर्शवितात.

याचा अर्थ, कुटुंबाचा आकार वाढला आणि दोन मुलांमध्ये अंतर कमी असले, तर मुलींच्या शिक्षणाबद्दल ग्रामीण महिलांमध्ये उदासीनतेची प्रवृत्ती दिसते, असे म्हणता येईल.

वरील निष्कर्ष हे प्रातिनिधिक व मर्यादित संशोधनावर आधारित असले तरीही मुलींच्या प्राथमिक शिक्षणाचा वेग वाढविण्याच्या दृष्टीने व शिक्षणविषयक धोरण ठरविण्यासाठी ते दिशा देणारे आहेत. त्या अनुमानाच्या आधारे पुढील विवेचन शैक्षणिक क्षेत्रांत मार्गदर्शक तत्त्वे म्हणून उपयुक्त ठरेल.

१) ग्रामीण स्त्रियांच्या मुलींच्या प्राथमिक शिक्षणाकडे बघण्याच्या दृष्टिकोनात पूर्वीपेक्षा अनुकूल बदल झालेला आहे. खेडोपाडी घरापासून जवळच्या अंतरावर प्राथमिक शाळांचा विस्तार झाल्याने दारापर्यंत शिक्षण पोहोचले आहे. मोफत शिक्षणाबरोबर सरकारने शिक्षणविषयक धोरण आखताना खेडे व वाडी, वस्ती व तांडा हा केंद्रबिंदू मानून शिक्षणाचा विस्तार करण्याची आवश्यकता आहे. त्याबरोबर शिक्षक नेमणूक, शाळेची इमारत व इतर खर्चात काटकसर कशी करता येईल, याचा आराखडा शिक्षणतज्ज्ञांनी व ग्रामीण शिक्षणक्षेत्रात प्रत्यक्ष काम करणारे शिक्षक, पालक, कार्यकर्ते यांनी व्यवहार्य अडचणी लक्षात घेऊन करावा.

२) निवड केलेल्या पन्नास टक्के ग्रामीण स्त्रियांच्या शिक्षकांबद्दलच्या प्रतिकूल दृष्टिकोनाची दखल घेणे जरुरीचे आहे. शिक्षकांची वेळेवर उपस्थिती आवश्यक आहे. त्यांनी पालकांशी संपर्क साधून शिक्षणविषयक जागरूकता निर्माण करण्याचे प्रयत्न करायला हवेत. शिक्षकांनी शैक्षणिक व नैतिक मूल्ये पाळून, शिक्षकी पेशाशी प्रामाणिक राहून शैक्षणिक पात्रता वाढविण्याचा प्रयत्न करावा. शिक्षक-पालक संघ स्थापन करून पालकांशी सुसंवाद साधण्याचा प्रयत्न व्हावा. मुलींच्या शिक्षणाच्या दृष्टीने स्त्री-शिक्षकांच्या नेमणुकीस प्राथमिक शिक्षण स्तरावर प्राधान्य देणे उपयुक्त ठरेल.

३) सदरच्या पाहणीनुसार, मुलींच्या शिक्षणाकडे पाहण्याचा अनुकूल दृष्टिकोन निरक्षर स्त्रियांपेक्षा साक्षर स्त्रियांमध्ये जास्त असल्याचे दिसते; यावरून खेड्यापर्यंत महिलांसाठी प्रौढ शिक्षण वर्ग असण्याची गरज आहे. म्हणून प्राथमिक शिक्षणाच्या विस्ताराच्या धोरणाबरोबर प्रौढ महिलांना, लग्न लवकर वयात झाल्याने शिक्षणापासून वंचित झालेल्या निरक्षर मुलींना शिक्षण देण्यावर भर दिला जावा; त्यामुळे आजच्या निरक्षर, तरुण, विवाहित स्त्रिया ह्या जन्माला येऊ घातलेल्या व ६वर्षांखालील वयोगटातील मुलींना शिक्षणापासून वंचित न ठेवण्याचे जागरूकतेचे प्रयत्न करतील.

४) राष्ट्रीय धोरण म्हणून कुटुंब नियोजनाच्या कार्यक्रमाला महत्त्व आहेच.

आर्थिक, सामाजिक व राजकीय दृष्टीने हा प्रश्न महत्त्वाचा आहे. कुटुंबाचा आकार वाढल्याने आणि दोन मुलांमध्ये योग्य ते अंतर नसल्याने मुलींच्या शिक्षणात खंड पडतो. लहान भावंडांना सांभाळण्यासाठी व किरकोळ घरकामात मुलगी अत्यंत उपयुक्त व तिचे शिक्षण दुय्यम व अती गौण ही दृष्टी. घरकामातूनच गरोदरपण, बाळंतपण व आजारपण या चक्रात सापडलेल्या ग्रामीण स्त्रियांना ५ ते ६ वर्षांची मुलगी 'अॅसेट' ठरते त्यामुळे शिक्षणासाठी तिला 'स्पेअर' करणे अशक्य होते. दोन मुलांमध्ये अंतर ठेवण्यावर अधिक भर देऊन, मुलींच्या शिक्षणाच्या दृष्टीने कुटुंब नियोजनाचे धोरण सर्वांगीण माध्यमांनी, सर्वपक्षीय कार्यक्रम म्हणून राबविणे अत्यावश्यक व परिणामकारक ठरेल, हे निर्विवाद.

५) 'मोफत शिक्षण' हा मुलींच्या शिक्षणाच्या प्रगतीच्या दृष्टीने उपयुक्त घटक आहे. ग्रामीण भागात तर फी देऊन शाळेत येण्याची सक्ती ही शाळेची पायरी न चढण्याची संधी देण्यासारखी होय. केवळ प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत, दहावीपर्यंत मुलींना मोफत शिक्षण हे धोपट मार्ग स्वीकारणे उपयोगाचे नाही. ही समस्या केवळ आर्थिक आहे असे नसून ती सामाजिक व सांस्कृतिक आहे; म्हणून पालकांचा मुलींच्या शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अनुकूल व्हायला हवा. ह्या दृष्टीने त्यांची जागरूकता व वैचारिक बैठक तयार व्हायला हवी. त्यासाठी सामाजिक प्रबोधनाची गरज आहे. तसेच ग्रामीण भागात शिक्षणाचा विस्तार, शिक्षकांचा दर्जा सुधारणे, शिक्षणविषयक सोयींची उपलब्धता, स्त्री-शिक्षकांच्या नेमणुकीस प्राधान्य, कुटुंब नियोजन कार्यक्रम व प्रौढ शिक्षण वगैरेंचा कालबद्ध व जिल्हानिहाय कार्यक्रम आखला जाणे आवश्यक आहे.

स्त्री-शिक्षणाची वाटचाल : समस्या व उपाय

'न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते' असे ग्रंथ सांगतो. ज्ञानावाचून मनुष्याला श्रेष्ठत्व नाही, ज्याला ज्ञान नाही त्याला पशूहून श्रेष्ठ का समजावे ? ज्ञानार्जनाने मनुष्य आपली मानवी बुद्धी व सदसद्विवेकशक्ती यांना योग्य वळण लावू शकतो व स्वत:चे जीवन उज्ज्वल करून आपल्या अंतेवासियांच्या जीवनास कर्णधारवत होतो, हे तत्त्वज्ञान मान्य होऊनही स्त्रीशिक्षणाच्या बाबतीत फार मोठी अपेक्षा सहन करावी लागली. ब्रिटिश काळात हिंदुस्थानचे पालकत्व आपल्या शिरावर घेतलेल्या इंग्रजांनी राष्ट्राविषयीचे पवित्र काम म्हणून तत्त्वत: पण मुख्यत्वे आपल्या राज्याचा गाडा हाकण्याचे नुसते भारवाही काम करण्यास इथल्या इथेच सुशिक्षित नोकर तयार झाल्यास जास्त सोयीचे पडेल, या पोक्त विचाराने

हिंदुस्थानसाठी एक शिक्षण योजना आखण्याचे इंग्रज सरकारने ठरविले. १८२६ मध्ये सर थॉमस मेन्रोसाहेबांनी मद्रास इलाख्यापुरती एक शैक्षणिक योजना आखून ती ईस्ट इंडिया कंपनीच्या डायरेक्टरांना सादर केली होतीच; पण सर्व हिंदुस्थानसाठी एक शैक्षणिक योजना आखणे हे परिणामी आपणास फायद्याचेच आहे, हे ओळखून राज्यकर्त्यांनी तशी योजना आखण्यास सुरुवात केली व १८३५ साली मेकॉलेसाहेबांचे शिक्षणविषयक प्रसिद्ध टिपण बाहेर पडले. त्या वेळी शिक्षणाच्या सोयी व शाळा नव्हत्या असे नाही; परंतु स्त्रियांच्या शिक्षणाबद्दल कुणाला कसलीच आपुलकी नव्हती. 'जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उद्धरी' ही म्हण ब्रिटिशांच्या काळात पोकळ ठरली. हिंदुस्थानच्या राजकीय पारतंत्र्यामुळे सर्व बाजूंनी स्त्रियांची कुचंबणा केली. अर्थात इंग्रजी अंमलाच्या सुमारासही मुलींच्या शाळा गावोगावी तुरळक होत्याच. दिल्लीत ब्रिटिश अंमल सुरू होण्याच्या सुमारास पंजाबी स्त्रियांनी चालविलेल्या सहा मुलींच्या शाळा होत्या, असे म्हणतात; पण इंग्रजी कारकीर्द सुरू झाल्यावर सरकारी प्रोत्साहनाच्या अभावी या सर्व शाळा बंद पडल्या.

ब्रिटिश कारकीर्दीत स्त्रियांच्या शिक्षणास उत्तेजनात्मक परिस्थिती नसल्याचे लक्षात येते. सकृत्दर्शनी ही बाब विरोधाभासात्मक वाटेल. ज्या इंग्लंडमध्ये स्त्रिया या फार पुढारलेल्या, स्वतंत्र व कर्तृत्ववान आहेत अशी ख्याती आहे व त्या वेळी तर त्या साम्राज्यावर एक राणी राज्य करीत होती, अशा सत्तेच्या अमलखाली असलेल्या हिंदुस्थानात स्त्रियांच्या कर्तृत्वाला उत्तेजन मिळाले नाही हे कसे काय ? ही गोष्ट विरोधात्मक वाटली तरी इंग्रज राज्याच्या पहिल्या कालखंडात तो घडली हे नाकारता येणार नाही. याची कारणे दोन आहेत. एक तर इंग्रज राज्यकर्ते स्वतःच्या मायभूमीत उदारमतवादी व स्त्रीदाक्षिण्यपूर्ण असले तरी हिंदी संस्कृती, आचार-विचार, श्रद्धा, रूढी व परंपरा यांच्याशी ते पूर्णपणे अपरिचित असल्याने हिंदुस्थानात शिक्षण योजना आखताना त्यांच्या मनात संभ्रम निर्माण झाला व गोंधळ उडाला. अर्थात अशी त्यांची स्थिती होणे स्वाभाविक होते.

सर्व हिंदुस्थानसाठी एक शिक्षणयोजना आखण्याचा उपक्रम सरकारने जेव्हा हाती घेतला, तेव्हा साहजिकच स्त्रीशिक्षणाचा प्रश्न निघाला; परंतु या बाबतीत हिंदुस्थानी जनतेच्या मनोभूमिकेबद्दल अंदाज नसल्यामुळे मध्यवर्ती सरकारने जवळच्या बंगाल देशातील पंडितांसमवेत सल्लामसलत केली. हिंदू स्त्रियांच्या दुर्दैवाने सरकारला पक्के सनातनी, पण वैदिक परंपरा सोडून ब्राह्मणांना प्रमाण मानणारे, पंडितच भेटले व त्यांनी मनूच्या विचाराच्या धर्तीवर स्त्रियांना शिकविणे महापाप आहे असा सल्ला सरकारला दिला. तो सल्ला सरकारने मानला. दुसरे कारण असे की, इंग्रज हिंदुस्थानातील लोकांच्या धार्मिक भावना

दुखविण्यास घाबरत असत. शिवाय स्त्री-शिक्षणाचा प्रश्न हा स्त्रियांशी निगडित असल्याने त्या वेळच्या सामाजिक रूढी व परंपरांच्या लवचिक चौकटीत ढवळाढवळ करण्याची त्यांची तयारी नव्हती. हिंदी स्त्रियांच्या शिक्षणाची तरतूद करण्याचा विचार करण्याम इंग्रज विचकले. त्यांनी स्त्रीशिक्षणाचा विचार आपल्या योजनेतून अजिबात गाळून टाकला. हे धोरण १८५४ पर्यंत म्हणजे सर चार्लस वूडसाहेबांचा प्रसिद्ध शैक्षणिक खलिता बाहेर पडेपर्यंत चालू होते.

ब्रिटिश सरकारच्या व समाजाच्या स्त्रीशिक्षणाच्या औदासीन्याबद्दल तरुण समाजसुधारकांनी निषेध व्यक्त करण्यास सुरुवात केली. तरुणांनी समाजाचा तीव्र विरोध सहन करीत स्त्रीशिक्षणाच्या कार्याच्या प्रगतीच्या दृष्टीने प्रयत्न सुरू केले. कै. रमाबाई रानडेंसारख्या कार्यकर्त्या स्त्रीशिक्षणाच्या कार्याला लाभल्या. सुधारकांनी ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या शाळांचाही फायदा घेण्यास सुरुवात केली; कारण सरकारी व खासगी मुलींच्या शाळा नव्हत्या. सुधारकांना या बाबतीत समाजाचा आत्यंतिक रोष स्वीकारावा लागला. बहुजनसमाजाचा स्त्रीशिक्षणास विरोध, शिकणाऱ्या मुली त्या वेळच्या परंपरागत विचारानुसार 'मोठ्या' व मिशनऱ्यांच्या शाळेतील शिक्षिका झगा घातलेल्या व हातात बायबल घेऊन शिकविणाऱ्या. अशा परिस्थितीत मुलींच्या शिक्षणास होणाऱ्या सामाजिक व धार्मिक विरोधाची तीव्रता कमी करावयाची असेल तर स्त्रीशिक्षण हे खासगी शिक्षणसंस्थांकडून दिल्यास बरे होईल, असा विचार समाजसुधारकांनी केला. स्त्रीशिक्षण समाजाला पटविण्यासाठी व ते निरुपद्रवी आहे हे जाणवून देण्यासाठी स्त्रीशिक्षणाचा प्रसार सरकारला पटवून द्यायला हवा व खासगी प्रयत्नासही प्राधान्य मिळायला हवे, ही भूमिका समाजसुधारकांनी घेतली. खासगी प्रयत्नाला चालना मिळावी म्हणून १८४९ मध्ये तर एल्फिन्स्टन कॉलेजच्या काही उत्साही विद्यार्थ्यांनी स्वत: मुंबईस एक मुलींची शाळा उघडली. त्यात ते स्वत: शिकवीत.

या सर्व बाबींचा सरकारवर इष्ट परिणाम होऊन १८५४ च्या खलित्यात सरकारने आपल्यावरील स्त्री-शिक्षणाची जबाबदारी मान्य करून स्त्री-शिक्षणाचे कलम जाहीररीत्या आपल्या शैक्षणिक धोरणात व योजनेत घातले. या सुमारास संपूर्ण हिंदुस्थानात सुमारे ६५ मुलींच्या शाळा होत्या व त्यांत अंदाजे साडेतीन हजार मुली शिक्षण घेत होत्या. सरकारने या खासगी शिक्षणसंस्थांना मदत देण्याचे व नवीन सरकारी शिक्षणसंस्था उघडण्याचे ठरविले. सरकारच्या या नवीन धोरणामुळे स्त्री-शिक्षणाचे पाऊल भराभर पुढे पडू लागले. खासगी शिक्षणसंस्थांना मिळणारी सरकारी ग्रँट जरी अल्प असली तरी आर्थिक दृष्टीपेक्षा प्रतिष्ठेच्या दृष्टीने स्त्री-शिक्षणाच्या चळवळीवर या सरकारी पाठिंब्याचा अत्यंत अनुकूल परिणाम झाला. पंजाबमध्ये आर्य व ब्राह्मो समाज यांनी काढलेल्या मुलींच्या

शाळांकडे पूर्वी कुणी ढुंकूनही पाहत नसे; पण त्यांच्या शाळांतून मुलींची संख्या वाढू लागली. मिशनऱ्यांनी काढलेल्या शाळा, सरकारी शाळा व समाजसुधारणेसाठी लागणाऱ्या समाजसेवकांचा पुढाकार व त्यांच्या अविश्रांत प्रयत्नाने चालणाऱ्या खासगी शाळा या सर्वांमधून हजारो मुली शिकू लागल्या.

स्त्री-शिक्षणाची प्रगती कशी कशी होत गेली हे उपलब्ध आकडेवारीच्या आधारे लक्षात येऊ शकते. १८७७–७८ मध्ये फक्त ६६,६१५ मुली ब्रिटिश हिंदुस्थानात शिक्षण घेत होत्या. १८८१–८२ मध्ये प्राथमिक शाळेत नाव नोंदविलेल्या मुलींची एकूण संख्या १,१९,६०७ होती व प्रत्येक शंभर मुलांमागे सहा मुली असे प्रमाण होते. १८८२–८३ मध्ये ३,४८७ शाळांतून १,६२,२०७ मुली शिकत होत्या. शिक्षण योजनेत सुधारणा करण्याच्या दृष्टीने नेमलेल्या हंटर कमिशनने स्त्री–शिक्षणाच्या अनेक उपयुक्त सूचना आपल्या अहवालात नमूद केल्या. त्याचा मुलींच्या व शाळांच्या संख्येवर फार इष्ट असा परिणाम झाला. १८९१–९२ मध्ये ३,३१,०४३ मुली खासगी व सरकारी शाळांतून शिकत होत्या. कॉलेजात त्या वेळी फक्त ७६ मुली होत्या. १८८६ मध्ये सहा मुली प्रथम मद्रासच्या मेडिकल कॉलेजमध्ये दाखल झाल्या. १८८१ साली प्रत्येक १८० मुलींत एक मुलगी प्राथमिक शाळेत शिक्षण घेताना आढळे, तर १८८६ साली शेकडा एक आढळू लागली. मद्रास व मुंबई इलाख्यात स्त्री-शिक्षण जास्त पुढे गेले होते.

मुंबई राज्यात भारतीय मुलींसाठी पहिली शाळा उघडण्याचे श्रेय अमेरिकन मिशनरी संस्थेला द्यायला हवे. सन १८२४ मध्ये त्या संस्थेने मुंबईत एक शाळा सुरू केली. श्री. दादाभाई नौरोजी, महात्मा गांधी, जोतिबा फुले, पंडिता रमाबाई, रमाबाई रानडे, प्रा. धोंडो केशव कर्वे वगैरे मंडळींना महाराष्ट्रातील शिक्षणप्रसाराचे श्रेय द्यायला हवे. सन १८५३ पर्यंत त्या वेळच्या इंग्रज सरकारच्या धोरणामुळे एकही स्त्री सरकारी शाळेतून शिक्षण घेऊ शकली नाही. त्यानंतर १८५४ मध्ये ब्रिटिश सरकारने स्त्री–शिक्षणाला मान्यता दिल्यावर मुलींच्या शिक्षणाची सुरुवात झाली. ह्याच काळात मुंबई सरकारच्या बोलावण्यावरून कु. मेरी कार्पेन्टरने मुंबईला भेट दिली. त्यांच्या सांगण्यावरून मुंबई सरकारने १८७०–७१ मध्ये दोन महाविद्यालये सुरू केली. १९०२ सालपर्यंत ह्या संस्थांमध्ये २३४ मुली शिकत होत्या. ह्याच काळातील विशेष गोष्ट म्हणजे १८८४ मध्ये भारतीय मुलींसाठी पुण्याला शाळा सुरू करण्यात आली. माध्यमिक शिक्षणाच्या प्रसारामुळे महाविद्यालयीन शिक्षणाला आपोआप गती मिळाली. १९०२ नंतर महात्मा गांधींच्या चळवळीमुळे समाजाचा पूर्ण कायापालट झाला. स्त्रीला प्रथमच राजकीय हक्क प्राप्त झाले.

१९४७ पर्यंत मुलींच्या शिक्षणाचा प्रसार

संस्था	वर्ष	केवळ मुलींसाठी असलेल्या शिक्षणसंस्था	सर्व संस्थांतून शिक्षण घेत असलेल्या मुली
महाविद्यालय	१९०१–०२	--	७५
	१९३६–३७	--	१,२४५
	१९४६–४७	१	५,१७७
माध्यमिक शाळा	१९०१–०२	६७	४,९३४
	१९३६–३७	१०४	२५,८२०
	१९४६–४७	१८४	६२,६२९
प्राथमिक शाळा	१९०१–०२	७६८	७६,०६३
	१९३६–३७	१,४७८	२,८७,०६१
	१९४६–४७	१,८०४	४,८९,७८९
विशेष शाळा	१९०१–०२	--	--
	१९३६–३७	५१	३,२९१
	१९४६–४७	४०४	१५,४९८

मुंबईत सुधारलेली पारशी मंडळी असल्यामुळें ब्रिटिश काळात मुलींच्या शिक्षणाची प्रगती या इलाख्यात जास्त झाली. मद्रासमध्ये फार पूर्वीपासून मिशनरी लोकांचे शिक्षणप्रसारार्थ कार्य सारखे सुरू होते. त्याचा परिणाम स्त्री-शिक्षणावर होऊन एकंदरीत पाहता स्त्रियांची साक्षरता वाढली असावी. एकंदरीत ब्रिटिश हिंदुस्थानात एक टक्क्याहून कमी स्त्रिया साक्षर होत्या; म्हणजे १९०१ साली घेतलेल्या शिरगणतीत अखंड भारतातील १०० पैकी १० पुरुष साक्षर होते व स्त्रियांची साक्षरता १ टक्क्यापेक्षा कमी, म्हणजे सात दशांश टक्के इतकीच होती. त्यावेळी स्त्री-शिक्षणाच्या बाबतीत झालेली प्रगती अर्थातच शहरात होती. शहरातील श्रीमंत व सुखवस्तू मध्यमवर्ग आपल्या मुलींना शिक्षण देऊ लागला होता. शिकलेल्या मुलांना शिकलेल्या बायका हव्यात. सांपत्तिक दृष्टचा शिक्षण परवडते. शिक्षण घेताना मुलीचे वय वाढले, तरी फारशी फिकीर न बाळगण्याची वृत्ती असलेली मंडळी, जी संपन्न, सुबुद्ध व अल्पसंख्यांक जमातीची होती, ती मुलींना शिक्षण देऊ लागली होती; पण खेडचातून पसरलेला अफाट समुद्रासारखा बहुजन समाज हा बहुतांशी या बाबतीत उदासीन होता. दारिद्र्य,

अज्ञान, धार्मिक समजुती, रूढी, अंधश्रद्धेच्या वेडच्या कल्पना, बालविवाहाची पद्धती, शाळांचा अभाव वगैरे कारणांमुळे स्त्री-शिक्षणाबाबत अनेक अडसर निर्माण होत होते.

स्त्रीशिक्षणाला चालना देऊन स्त्रियांमधील साक्षरतेचे प्रमाण वाढविण्यासाठी अत्यंत निकडीचा उपाय म्हणजे प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करणे हा होय. या बाबतीत ब्रिटिश सरकारने आपली जबाबदारी ओळखली नाही. याला पुरावा असा की, खुद्द इंग्लंडमध्ये १८७० साली सक्तीच्या शिक्षणाची अंमलबजावणी सुरू केली आणि १८८० साली सक्तीचे व मोफत शिक्षण सार्वत्रिक झाले; परंतु तेच धोरण स्वीकारण्याची विनंती महात्मा फुलेंनी आपल्या हंटर कमिशनपुढे झालेल्या साक्षीत केली होती; पण सरकारने ती मान्य केली नाही. त्याच काळात इटली, पोर्तुगाल, फ्रान्स, स्पेन, डेन्मार्क, ऑस्ट्रेलिया, हंगेरी, स्वीडन, नॉर्वे, स्वित्झर्लंड या राष्ट्रांमध्येही प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत शिक्षणाचे धोरण स्वीकारण्यात आले होते; परंतु ब्रिटिश सरकारने हिंदुस्थानबाबत तसे धोरण स्वीकारण्याची तयारी दाखविली नाही. देशोदेशीची उदाहरणे पाहून नामदार गोखले यानी १९११-१२ साली दिल्लीत विधिमंडळात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्याबद्दल ठराव मांडला; तरीही ऐच्छिक तत्त्वावर शिक्षणप्रसार करण्याची दुराग्रही वृत्ती सरकारने सोडली नाही; त्यामुळे स्त्री-शिक्षणाची प्रगती अत्यंत मंद गतीने होत राहिली.

पुन्हा १९१७ साली पटेल यानी म्युनिसिपालिटीच्या हद्दीत सक्तीचे तत्त्व लागू करता यावे म्हणून एक कायदा पास करून घेतला. या कायद्यात स्त्रियांच्या शिक्षणाचा प्रथम निर्देश करण्यात आला. प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्याचा विचार बळावू लागला व तसे धोरण आखण्याचे प्रांताप्रांतांच्या मर्जीवर व सोयीवर सोपविण्याचे ठरले. १९२१ साली या प्रश्नाचा विचार करण्यासाठी चंदावरकर कमिटी नेमण्यात आली व दहा वर्षांत मुंबई प्रांतात सर्वत्र सक्तीचे शिक्षण करण्याबद्दलची योजना या कमिटीने तयार केली. १९२३ चा प्राथमिक शिक्षणाचा कायदा मंजूर करण्यात आला; परंतु पुरेसा पैसा नसल्यामुळे इच्छा असूनही प्रांतोप्राती प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे होऊ शकले नाही. मुलींच्या शिक्षणाचा विचार तर बाजूलाच पडला व त्यांच्या शिक्षणाची प्रगती निराशाजनक राहिली.

१९३२ मध्ये पंचवीस कोटी लोकसंख्येपैकी अडीच कोटी साक्षर होते व त्यांपैकी अर्धा कोटी स्त्रिया होत्या. स्त्री-शिक्षणाबद्दलचे औदासीन्य, सामाजिक मान्यतेचा अभाव, स्त्रीकडे पाहण्याचा परंपरागत दृष्टिकोन, चूल व मूल यापलीकडे तिचे क्षेत्र अमान्य, काही समाजसुधारकांचाही विरोध वगैरेंमुळे तर स्त्रियांच्या

शिक्षणाची हेळसांड झालीच; पण स्त्रीशिक्षणासाठी पैसाही उपलब्ध होऊ शकला नाही. शिक्षणसाधनांचा व पुरेशा शिक्षकांचा अभाव, मुलींच्यासाठी स्वतंत्र शाळांची कमतरता, शिक्षकांची संख्या अत्यंत कमी ही स्थिती बदलण्याच्या दृष्टीने फारसे प्रयत्नही होऊ शकले नाहीत. 'न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते' असा आमचा परमपवित्र ग्रंथ म्हणतो. ज्याला ज्ञान नाही त्याला पशूहून श्रेष्ठ समजण्याचे कारण नाही. ज्ञानासारखे पवित्र दुसरे जगात काही नाही. ज्ञानार्जनाने मनुष्य आपली मानवी बुद्धी, सदसद्विवेकशक्ती यांना योग्य वळण लावू शकतो व स्वतःचे जीवन उज्ज्वल करू शकतो. हे सर्वमान्य होऊनही स्त्री-शिक्षणाच्या-बाबतीत ब्रिटिश काळात झालेला विकास उत्साहजनक व आशादायी नव्हता. ही परिस्थिती, सामाजिक परंपरा–रूढींचा पगडा, राजकीय पारतंत्र्य, सांस्कृतिक मागासलेपणा, धार्मिक भावना, स्त्री-शिक्षणाबद्दल उदासीनता, निरक्षर व दारिद्र्य-पीडित बहुजनसमाज, ब्रिटिश सरकारचे औदासीन्य यांतून उद्भवल्याचे दिसते.

स्वातंत्र्यपूर्व काळात स्त्रीशिक्षणविषयक परिस्थितीचे वस्तुनिष्ठ रीतीनें संक्षिप्त विवेचन केल्यानंतर स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या संदर्भात झालेल्या प्रगतीचा विचार करणे इष्ट ठरेल.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सन १९४९ साली स्वतंत्र भारताची घटना तयार झाली. घटनेने स्त्रीला आर्थिक, सामाजिक हक्क मिळवून दिले. कोणतीही विशेष खटपट न करता मतदानाचा हक्क मिळाला. भारतीय स्वातंत्र्यसंग्रामात स्त्रीने केलेल्या विशेष कार्यामुळे राजकारणाचे नवीन क्षेत्र तिला खुले झाले. स्वातंत्र्योत्तर काळात राष्ट्रीय पातळीवर वेगवेगळ्या समित्या वारंवार स्थापन केल्या गेल्या. १९५९–६९ या काळात केंद्र शासनाने राष्ट्रीय महिला शिक्षण मंडळ स्थापन केले. मंडळाने स्त्री–शिक्षणाच्या कार्याला गती मिळण्यासाठी अनेक शिफारसी केल्या. ह्यांतील काही शिफारसी केंद्र शासनाने मान्य केल्या. कोठारी आयोगाने १९६६ मध्ये जो अहवाल प्रसिद्ध केला, त्यात मुलींचे शिक्षण व स्त्रियांचे शिक्षण यांवर विचार केला. या वेळीही मुलांच्या व मुलींच्या शाळांत प्रविष्ट होणाऱ्या संख्येतील तफावतीची आयोगाने नोंद घेतली. कोठारी आयोगाने मुले व मुली यांच्या प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भात अभ्यास करून असा निष्कर्ष काढला की, खालच्या स्तराच्या प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भात मुलांच्या बाबतीत फारशी कठीण समस्या नाही, कारण ६ ते ११ वयोगटातील मुलांच्या एकूण संख्येपैकी ९० टक्के मुलांनी शाळेत नाव नोंदविले आहे; परंतु मुलींच्या संदर्भात प्राथमिक शिक्षणाच्या १ ते ४ इयत्ता स्तरावर तर ही तफावत आणखी वाढलेली दिसते. १०० मुलांमागे फक्त ४० मुलींनी शाळेत नावे घातलेली आहे.

कमिशनने असेही स्पष्टपणे नमद केले आहे की, देशाच्या घटनेमध्ये घटना

अंमलबजावणीच्या काळापासून दहा वर्षांत प्रत्येक राज्यातील सर्व मुला-मुलींना प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे म्हणून त्यांच्या पंधरा वर्षे वयापर्यंत देण्यात यावे. ही राज्य सरकारांची जबाबदारी यशस्वीरीत्या पार पाडावयाची झाल्यास, मुलींच्या शिक्षणाचा प्रश्न हा त्यांच्यापुढील महत्त्वाचे आव्हान होय. सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाच्या धोरणाचा स्वीकार केल्यानंतर खऱ्या अर्थाने मुलींच्या शिक्षणाची समस्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळातही देशासमोर जाणवू लागली. आपल्या भारतापुढे स्वातंत्र्योत्तर काळात ज्या प्रमुख समस्या निर्माण झाल्या व ज्या आजही पूर्णपणे सुटू शकलेल्या नाहीत, त्यांपैकी एक प्रमुख समस्या म्हणजे स्त्री–शिक्षणाची होय. अर्थात स्त्री–शिक्षणाच्या बाबतीत येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन त्या दृष्टीने प्रयत्नही करण्यात येत आहेत. १९५८–५९ साली स्त्री–शिक्षणाचा अभ्यास करून अनेक शिफारसी केल्या. मुलींच्या शिक्षणाकडे पाहण्याच्या परंपरागत दृष्टिकोनामुळे त्यांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष होत आहे. केवळ मोफत शिक्षण देऊन शिक्षणाची गोडी लागेल असे नाही, तर शिक्षणासाठी फी–माफीबरोबरच पुस्तके, पाटच्या व गरज पडल्यास कपडे पुरविण्याची आवश्यकता आहे. या समितीने असेही सुचविले की, ६ ते ११ वर्षे वयोगटातील ८० टक्के मुलींनी शाळा शिकण्यासाठी नावे नोंदविली पाहिजेत व शिक्षण घेण्यास सुरुवात केली पाहिजे. एवढे प्रमाण गाठण्यासाठी केंद्र सरकारने आर्थिक सहाय्य द्यावे. ज्या मुली शाळा सोडण्याच्या मार्गावर आहेत व ज्यांनी काही कारणांनी शाळा सोडली आहे, अशा ६ ते ११ वर्षे वयोगटातील मुलींना शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी म्हणून हे आर्थिक सहाय्य वापरले जावे.

स्त्रीशिक्षणाबद्दलचा विचार हा सामाजिक संदर्भातच केला पाहिजे. शिक्षणामुळे स्त्रीची होणारी वयक्तिक प्रगती अखेर सर्व समाजाच्याच उपयोगी पडली पाहिजे, हा तिला शिक्षित करण्यामागील प्रमुख हेतू आहे. स्त्रीला एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे आणि त्याचवेळी समाजाची एक घटक म्हणूनही ती महत्त्वाची आहे. एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्त्रीचे स्थान आपण मान्य केले पाहिजे. स्त्री आणि पुरुष हे जन्मतःच व निसर्गतःच समान आहेत, म्हणूनच पुरुषाला जितका शिक्षण घेण्याचा हक्क आहे, तितकाच स्त्रीलाही आहे. हा तिचा हक्क आपण उदार मनाने तिला उपभोगू दिला पाहिजे. स्त्री एक व्यक्ती आहे, तशी ती समाजाची घटक आहे. कुटुंब, समाज आणि आपला देश या समाजाच्या विविध रूपांमध्ये तिचे कोणते स्थान आहे, हे पाहणे आवश्यक आहे.

स्त्री–शिक्षणाबाबत दोन मते आढळतात. पहिल्या मताच्या म्हणण्यानुसार स्त्री ही सर्वप्रथम एक गृहिणी आहे. तिने घर हेच स्वतःचे कार्यक्षेत्र समजले पाहिजे व इतर बाह्य गोष्टी दुय्यम मानल्या पाहिजेत. ती प्रथम एक जबाबदार

माता आहे. शिवाय आपल्या संस्कृतीची व नीतिमूल्यांची जपणूक करणे हे तिचे कर्तव्य आहे.

दुसऱ्या मतानुसार स्त्री पुरुषाची मैत्रीण व सहचारी आहे; तेव्हा तिने प्रत्येक क्षेत्रात पुरुषाला साथ दिली पाहिजे. पुरुषाला जी जी कार्यक्षेत्रे खुली आहेत, ती सर्व स्त्रीला खुली असली पाहिजेत.

पहिला दृष्टिकोन चुकीचा आहे, हे उघड आहे. मुलाला नुसते सतत खायला देणे व त्याच्या शरीराची वाढ करणे म्हणजे आदर्श मातृत्व नसून त्याची बौद्धिक, मानसिक वाढ करणे, त्याला चांगल्या सवयी लावून आदर्श नागरिक बनविणे याला आदर्श मातृत्व म्हणतात आणि ह्यासाठी स्त्री स्वतःच सुशिक्षित असली पाहिजे. मातृत्वासाठी शिक्षण सोडायची गरज नाही; उलट त्यासाठी शिक्षण आवश्यक आहे. स्त्रीला घरात कोंडून ठेवून नीतिमूल्यांची जपणूक होणार नाही. नीतिमूल्यांची जपणूक ही मुद्दाम करावी लागता कामा नये. ती इतकी लेचीपेची असून चालणार नाही. केवळ नीतिमूल्यांसाठी स्त्रीने स्वतःच्या शिक्षणाचे मोल देण्याची आवश्यकता नाही. आर्थिक स्वावलंबनासाठी तर शिक्षण आवश्यक आहेच; पण व्यक्तिविकासासाठी व समाजसेवेसाठी आपल्या देशात स्त्री-शिक्षणाला फार मोठे प्राधान्य देण्याची गरज आहे. भारतीय स्त्रीची परंपराच पुरुषाच्या बरोबरीने काम करण्याची आहे. स्वातंत्र्यलढ्यात स्त्रियांनी गांधीजींच्या नेतृत्वाखाली पुरुषांना साथ दिली आहे. जगाच्या इतिहासात स्त्रीच्या या सहकार्याला तोड नाही. स्वराज्याचे सुराज्य व्हायचे असेल तर स्त्री–शिक्षणाला प्राधान्य द्यायला हवे. देशातील शिक्षणपद्धतीच्या यशस्वितेवर व स्वरूपावर देशाचे भवितव्य अवलंबून असते. लोकसंख्येत निम्म्या स्त्रिया आहेत. त्यांच्या शिक्षणावरच देशाचे भवितव्य अवलंबून आहे. स्वातंत्र्याची, सुराज्याची ही मागणी आहे.

विसाव्या शतकातही कुटुंबात व समाजात स्त्री विमुक्तपणे का जगू शकत नाही, या कारणांचा शोध घेणे आवश्यक आहे. याची काही कारणे तात्त्विक तर काही मानसिक, सामाजिक व सांस्कृतिक आहेत. स्त्री–मुक्तीसाठी आज समाजात अनेकविध कार्यक्रम हाती घेण्यात येत आहेत; परंतु हे उपक्रम अन्य यंत्रणांमार्फत राबविले जाण्यापेक्षा स्त्री स्वतःच जागृत झाली पाहिजे. तिची अस्मिता एकदा जागृत झाली की काही प्रश्न आपोआप मिटतील व जे उरतील ते सोडविणे सोपे होईल. तिच्या कर्तृत्वाला जाग आणणे आवश्यक आहे. तिच्यातील शक्तीची जाणीव तिला करून देणे जरुरीचे आहे. स्वतःमधील सामर्थ्याचा तिला साक्षात्कार झाला पाहिजे. हे काम बिकट आहे. पण स्त्री–शिक्षणामुळे ते साध्य होईल असे वाटते. म्हणून स्त्री–मुक्तीचा प्रश्न स्त्री–शिक्षणाशी निगडित आहे, हे लक्षात घ्यायला हवे. स्त्री–शिक्षण ही स्त्री–स्वातंत्र्यासाठी प्राथमिक, पण अत्यंत भक्कम

अशी आधारभूत बाब आहे, हे स्त्री–विमुक्तीच्या तात्त्विक प्रश्नांच्या चिंतनाने सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ व स्पष्टपणे लक्षात आलेले आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाचा जो प्रचंड विस्तार झाला, त्यामुळे अनेकांच्या मनात स्वयंपुष्टतेची भावना असण्याची शक्यता आहे, परंतु वस्तुस्थिती तशी नाही. आपल्याला ज्या अनेक प्रश्नांशी मुकाबला करावयाचा आहे, त्यांपैकी एक प्रश्न म्हणजे मुलींचे व स्त्रियांचे शिक्षण होय. स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रियांना पोषक असे जे अनेक कायदे झाले आणि स्त्री–शिक्षणाला जी गती प्राप्त झाली, त्यामुळे स्त्री–शिक्षणाचा प्रश्न राहिलेला नसावा असे सामान्यपणे मानले जाण्याची शक्यता आहे; पण वस्तुस्थिती तशी नाही. मुलींच्या शिक्षणाबद्दलची स्थिती लक्षात घेत जातानाही स्वातंत्र्योत्तर काळात अजूनही त्यांच्या शिक्षणाचे स्वरूप किती गंभीर आहे, हे लक्षात येईल.

एखादा समाज सुधारलेला आहे किंवा सुसंस्कृत व पुरोगामी आहे हे ठरविण्याचे प्रमुख साधन म्हणजे त्या समाजामध्ये स्त्री–शिक्षणाला देण्यात आलेले महत्त्व व करण्यात येत असलेले प्रयत्न होय. स्त्रियांच्या विकासावरच समाजाचा विकास अवलंबून असतो. त्यांच्या सक्रिय सहभागाशिवाय कोणतीही विकासाची योजना यशस्वी होणार नाही; कारण पुरुषांचे शिक्षण हे व्यक्ती म्हणून त्यांच्या-पुरतेच मर्यादित असते; परंतु स्त्रियांचे शिक्षण कुटुंबव्यापी राहते. स्त्री कुटुंबातील सर्वांशी पत्नी, आई, बहीण इत्यादी नात्याने जवळचा संबंध ठेवते. साहजिकच मुलींच्या शिक्षणाला मुलांच्या शिक्षणापेक्षाही अधिक प्राधान्य मिळणे आवश्यक आहे. सार्वत्रिक शिक्षणाच्या धोरणाचा स्वीकार होऊनही आपल्या देशात मुलींच्या शालेय शिक्षणाची प्रगती फार मंद आहे, हे पान १३२ वरील कोष्टकातील आकडे-वारीवरून लक्षात येईल.

(कोष्टक पान क्र. १३२ वर पहा.)

आजपर्यंतच्या मुलींच्या शिक्षणाबाबतच्या प्रगतीचा आढावा घेतलेल्या कोष्टकातील आकडेवारीवरून असे दिसून येईल की, विद्यार्थिनींचे सर्वांत जास्त प्रमाण प्राथमिक स्तरावर, तर सर्वांत कमी प्रमाण उच्च माध्यमिक स्तरावर दिसून येते. शिवाय कोष्टकातील आकडेवारी नाव नोंदविलेल्या मुलींची संख्या दर्शविणारी आहे. नाव नोंदणी केल्यानंतर शाळा सोडलेल्या मुलींची संख्या आणि वरच्या इयत्तेत गेलेल्या मुलींच्या संख्येबद्दलची आकडेवारी क्रमवारीनुसार उपलब्ध नाही; परंतु स्त्री-शिक्षणातील गळतीचा प्रश्न फारच गंभीर व महत्त्वाचा आहे, हे अनेक शिक्षणतज्ज्ञांनी दाखवून दिले आहे.

मुलींचे शाळेतील हे प्रमाण कमी असण्याची कारणे स्त्री-शिक्षणविषयक

भारतातील मुलींची शिक्षणविषयक प्रगती

वर्ष	१ ते ४ इयत्तांमधील मुलींची नावनोंदणी (हजारात)	नावनोंदणी केलेल्या मुलींचे त्या वयोगटातील एकूण लोक-संख्येशी प्रमाण	५ ते ७ इयत्तांमधील मुलींची नावनोंदणी (हजारात)	नावनोंदणी केलेल्या मुलींचे त्या वयोगटातील एकूण लोक-संख्येशी प्रमाण	८ ते १० इयत्तांमधील मुलींची नावनोंदणी (हजारात)	नावनोंदणी केलेल्या मुलींचे त्या वयोगटातील एकूण लोक-संख्येशी प्रमाण	११ ते १२ इयत्तांमधील मुलींची नावनोंदणी (हजारात)	नावनोंदणी केलेल्या मुलींचे त्या वयोगटातील एकूण लोक-संख्येशी प्रमाण
१	२	३	४	५	६	७	८	९
१९५०–५१	३,५४९	२०.१	५५९	४.६	२०४	१.८	३७	०.५
१९६०–६१	७,८२६	३५.०	१,८७६	१२.५	७४१	५.४	१३२	१.६
१९७०–७१	२६,८५०	६८.६	६,७८५	३३.०	२,२५९	१२.२	३९१	३.५
१९८०–८१	३८,५१५	११०.७	१८,४५६	७४.०	५,२८५	२२.६	१,०८९	७.४
१९८५–८६	३६,७३०	११०.०	२३,५००	९०.०	७,८४२	३०.९	१,८६९	११.४

आधार – रिपोर्ट ऑफ एज्युकेशन कमिशन

राष्ट्रीय आयोगाने (नॅशनल कमिशन ऑन वुमेन एज्युकेशन) दिलेली आहेत ती अशी –

पालकांचे दारिद्र्य, कुटुंबात स्त्रीला मिळणारे दुय्यम स्थान, स्त्री-शिक्षणाकडे पाहण्याचा पालकांचा परंपरागत दृष्टिकोन, बालविवाह, स्त्री-शिक्षणविषयक गैर-समजुती, मुलींना करावे लागणारे घरातील काम, शाळांत शिक्षणांचा अभाव इत्यादी.

भारतामध्ये मुलींच्या शिक्षणातील गळतीची (वेस्टेज) कारणे शोधण्या-साठी जे संशोधनात्मक अभ्यास हाती घेण्यात आले, त्यावरून असे लक्षात आले को, ६५ टक्के गळती आर्थिक कारणांमुळे म्हणजे दारिद्र्यापोटी निर्माण होते. त्या खालोखाल मुलींच्या शिक्षणाकडे पाहण्याचा परंपरागत सामाजिक दृष्टिकोन व पालकांची उदासीनता ह्या बाबीही मुलींच्या शिक्षणात खंड पडण्यास कारणीभूत ठरतात. मुलींच्या संदर्भात उद्भवणाऱ्या वेगवेगळ्या समस्यांचे वर्गीकरण पुढील-प्रमाणे करता येईल.

१. **कौटुंबिक समस्या** : कुटुंबातून सर्रास मुलींना अत्यंत गौण स्थान दिले जाते. ती परक्याचे धन समजले जाऊन, चूल व मूल हेच कार्यक्षेत्र मानून घरकाम व भावंडांना सांभाळणे ही पारंपरिक कामे त्यांच्यावर पूर्णपणे सोपविल्याने त्यांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष होते. मुलींच्या आई–वडिलांचे त्यांच्या शाळेकडे दुर्लक्ष हा एक पारंपरिक शापच आहे. हा दृष्टिकोन बदलण्यासाठी खेड्यातील लोकांचे सामाजिक प्रबोधन होण्याची गरज आहे. मुलीचे कुटुंबातील स्थान व सामाजिक प्रतिष्ठा वाढविणे आवश्यक आहे. कामाची विभागणी, मुला–मुलींना समान दर्जा यांविषयी जन्मल्यापासूनच संस्कार केले जावेत, ही दिशा महिला–शिक्षक संघटना स्थापन करून त्यांनी जबाबदारीने द्यावी.

२. **सामाजिक** : मुलांना शिक्षणात जेवढ्या संधी मिळतात, तेवढ्या ग्रामीण मुलींना मिळत नाहीत. मुलगा मुलीपेक्षा श्रेष्ठ, वंशाचा दिवा म्हणून वरिष्ठ असा सामाजिक दृष्टिकोन दिसून येतो. मुलींना शिक्षण नसले तरी चालते. तिच्या शिक्षणावरील खर्च अनावश्यक. शिक्षण घेतलेल्या मुलींना जास्त शिकलेला नवरा शोधावा लागेल व हुंड्याचाही खर्च, तसेच कन्या परक्याचे धन म्हणून त्यांच्या शिक्षणाची उपेक्षा केली जाते. धर्म, जात, पंथ, संस्कृती व नीतिमत्तेच्या कल्पनांमुळेही त्यांना शाळेत पाठविण्यावर बंधने येतात. बालवयात लग्न, दहा वर्षांनंतर शाळेत पाठविण्यासाठी पालकांची नाराजी वगैरे रूढींमुळे शाळा बंद करून घरकामात गुंतविले जाते. हळूहळू या परिस्थितीत सुधारणा होत असली तरी खेडेगावात अजून वैचारिक गोंधळ दिसून येतो. अमेरिकेत ९० टक्क्यांपेक्षा

जास्त स्त्रिया प्राथमिक शाळेत काम करताना दिसतात. प्राथमिक शाळेत काम करणें हा एक स्त्रियांचा नैतिक हक्क समजला जातो. तशा प्रकारे प्राथमिक शाळांतून जास्तीत जास्त महिला शिक्षक नेमल्या जाव्यात, म्हणजे मुलींची उपस्थिती वाढून गैरसमज दूर होण्यास मदत होईल.

३. प्रशासन : आजचे ग्रामीण शिक्षणाचे प्रशासन प्रामुख्याने जिल्हा परिषद व पंचायत समितीकडे जाते. मला वाटते, या ठिकाणी काम करणारी मंडळी पुरुषच असतात. क्वचित एखादी स्त्री–सभासद असते. तीसुद्धा पुरुषांच्या मेहरबानीने होय. या ठिकाणी जर शिक्षण समिती सदस्य, अधिकारी, पदाधिकारी म्हणून महिलांची संख्या जास्त असेल तर मुलींच्या शिक्षणाला चालना मिळेल. शाळांच्या शैक्षणिक आणि व्यवस्थापकीय तपासणीची व्यवस्था वाढून त्यात सुधारणा व्हावी. वेगळी व परिणामकारक व्यवस्था व यंत्रणा उभारून मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य द्यावे. बढतीत, बदली, पगार व इतरत्र ॲडमिनिस्ट्रेशनच्या कामात गुंतून पडलेल्या प्रशासनाचे, त्यातून बाहेर येऊन मुलींच्या शिक्षण विस्ताराच्या दृष्टीने उद्‌बोधन, प्रशिक्षण, उद्दिष्ट, अध्यापनाचे चर्चासत्र, शिबिरे वगैरेंत लक्ष केंद्रीत करावे. आजच्या प्रशासकीय यंत्रणेत बदल करून त्यासाठी राज्य पातळीवर स्वतंत्र स्त्री–शिक्षण विभाग उघडावा. राज्य स्तरावर जिल्हा व तालुका पातळीपर्यंत या विभागीय मुलींच्या शिक्षणाची सर्व प्रशासकीय कामे पाहावीत.

४. अंशकालिक शिक्षण : आजचे प्राथमिक शिक्षण पूर्ण वेळाचे आहे. खेड्यातील मुली पूर्ण वेळ शाळेत राहू शकत नाहीत. त्यासाठी अंशकालिक शिक्षण देणाऱ्या शाळा सुरू कराव्यात. १ ते ४ इयत्तांच्या अभ्यासासाठी अंशकाल वर्ग सहज सुरू करता येतील. हा अभ्यासक्रम या पद्धतीने निश्चित पूर्ण होऊ शकेल. स्थानिक परिस्थितीनुसार दुपारी अगर सकाळी ३ ते ४ तास शाळा चालविता येतील. हा प्रयोग करून पाहावा असा माझा आग्रह आहे. मुलींना शिक्षणाची आवड निर्माण व्हावी, शाळेची गोडी वाटावी आणि घरापेक्षा शाळेत राहणें बरे वाटावे, या दृष्टीने शाळेची भौतिक रचना व अभ्यासक्रमात पुनर्रचना करण्यात यावी. त्यांची नैसर्गिक प्रकृती व कल पाहून सुट्टीच्या वेळात गाणी, शिवण, आहार, पाककृतींचे शिक्षण द्यावे.

५. आर्थिक : गरिबी हा खेड्यातील जीवनाला शाप आहे. आजच्या एकूण शिक्षणातील हा एक प्रमुख अडसर आहे. त्यामुळे पालकांना कळतं पण वळत नाही अशा कचाट्यात अडकून पडावे लागते. विशेषत: मुलींच्या शिक्षणावर एकही पैसा खर्च करण्याची ऐपत नसणाऱ्यांची संख्या मोठी. शिवाय मुलाचे शिक्षण की मुलीला शाळेत घालावे यामध्ये मुलास प्राधान्य देऊन मुलीला घरकाम व इतरही

अर्थार्जनाच्या दृष्टीने वापरले जाते; त्यामुळे त्यांच्या शिक्षणाची आबाळ होत आली आहे. या बाबतीत शासनाने पुढाकार घेतला पाहिजे. सर्वांगीण राष्ट्रीय विकासासाठी स्त्री-शिक्षणाला प्राधान्य देऊन पुरेशी आर्थिक तरतूद करायला हवी. त्यासाठी पुढील सूचनांवर विचार व्हावा.

अ) खेड्यातील गरीब कुटुंबातील सर्व मुलींना पाटी, पुस्तके, वह्या व गणवेष मोफत पुरवावेत.

ब) मोठ्या गावातील शाळांतून मुलींचे वर्ग ५ वी ते १० वी साठी स्वतंत्र भरवावेत. वाचनालये चालवावीत. त्यासाठी आर्थिक सहाय्य मिळावे.

क) तालुक्याच्या ठिकाणी मुलींच्या मोफत वसतिगृहाची सोय व्हावी.

ड) सुट्टीत मुलींसाठी शिवण, भरतकाम, विणकाम, बांबू व वेतकाम, खाद्यपदार्थ वगैरेंचे वर्ग चालवावेत. शिक्षकांना याबद्दल मानधन द्यावे.

इ) सर्व माध्यमे व साधने (व्यक्ती, संस्था, संघटना, शासन) वापरून स्त्री-शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी सामाजिक प्रबोधन करण्यावर प्राधान्य द्यावे.

फ) मुलींच्या शिक्षणाच्या विस्ताराच्या दृष्टीने काम करणाऱ्या शाळांना उत्तेजनार्थ आर्थिक लाभ म्हणून, विकास फंड, तसेच आदर्श शिक्षक पुरस्कार देताना मुलींच्या सार्वजनिक शिक्षणाबद्दलच्या कामाचा प्राधान्य-पूर्वक विचार व्हावा.

वरील कारणांमुळे प्राथमिक व पूर्व माध्यमिक स्तरांवरील गळतीचे प्रमाण फार मोठे आहे. उदा. इयत्ता १ ते ४ मध्ये ६२ टक्के मुली या चार वर्षांत शाळा सोडतात, तर ४ ते ७ मध्ये ३४ टक्के मुली शाळा सोडतात हे विदारक व भयंकर सत्य आहे. वरील अडचणी व ढोबळ उपायांचा अजूनही सखोल, सूक्ष्म पातळीवर, जिल्हानिहाय अभ्यास व संशोधन व्हायला हवे. राजकीय नेते मंडळींनी या दृष्टीने पुढाकार घेतला पाहिजे. त्यांच्या ध्येयधोरणांवर शिक्षणाचा रथ ओढला जातो. लोकशाहीप्रधान देशात राजकीय तत्त्वप्रणालीला महत्त्व राहते; म्हणून राजकीय पक्षांनी स्त्री-शिक्षण हा आपला पक्षीय उपक्रम म्हणून हाती घेतला पाहिजे. जे सत्ताधारी असतील त्यांनी आपल्या विकास कार्यक्रमाचा पाया म्हणून स्त्री-शिक्षणाला प्राधान्य दिले पाहिजे. नवा राष्ट्रीय कार्यक्रम म्हणून राबविला पाहिजे; कारण विकासकार्याला स्त्रियांच्या सक्रीय प्रयत्नांशिवाय यश मिळत नाही, याची जाणीव सातत्याने ठेवून देश उभारणीचे काम म्हणून मुलींच्या शिक्षणाची समस्या हाती घ्यावी. अन्यथा शिफारशी केवळ कागदावर राहतात हे सांगणे नकोच. मुलींच्या सार्वत्रिक शालेय शिक्षणासाठी स्त्री-शिक्षण दशकाचा

नियोजनबद्ध कार्यक्रम हाती घेऊन ग्रामीण मुलींचा यामध्ये प्राधान्यपूर्वक विचार व्हावा.

आज मुलींच्या शिक्षण समस्यांवर खरोखरच उपाय करावयाचा असेल तर सुरुवातीस राज्य पातळीवर स्त्री–शिक्षणाचा विभाग सुरू करावा. त्याची रूपरेषा पुढीलप्रमाणे त्रिसूत्री असावी.

१. स्त्री-शिक्षण संचलनालय, महाराष्ट्र राज्य

।

।

महिला शिक्षण समिती

।

।

महिला शिक्षण संचालिका

।

।

२. जिल्हा स्त्री–शिक्षण कार्यालय

।

।

जिल्हा महिला शिक्षण समिती

।

।

जिल्हा महिला शिक्षणाधिकारी

।

।

३. तालुका स्त्री-शिक्षण कार्यालय

।

।

तालुका महिला शिक्षण समिती

।

।

महिला शिक्षण निरीक्षक

।

।

१) स्त्री-शिक्षण प्रबोधन २) मुलींची वसतिगृहे ३) मुलींचे स्वतंत्र वर्ग

५ तरुणींविषयी थोडेसे...

विवाह कसे व्हावेत ?
महाविद्यालयीन तरुणींच्या अपेक्षा

गारगोटीहून नैऋत्येला २४ मैलांवर पाटगाव हे गाव. निसर्गरम्य परिसर. गारगोटीच्या हिरे महाविद्यालयातील काही तरुणी नुकत्याच एके दिवशी तिथे गप्पांत रंगून गेल्या होत्या. विषयच तसा जिव्हाळ्याचा होता, ' महाविद्यालयीन युवतींचा विवाहविषयक दृष्टिकोन. ' या विषयावर मी तयार केलेली प्रश्नावली अगोदरच चार दिवस या मुलींकडून भरून घेतलेली होती. त्यामुळे या प्रश्नाविषयी थोडाफार विचार मुलींनी केलेला होता. पण चार भिंतींच्या वर्गात, अपुऱ्या वेळात व थोडक्याशा दडपणाखाली भरलेल्या प्रश्नावलीपेक्षा निसर्गरम्य व अत्यंत मोकळ्या वातावरणात झालेली चर्चा खूपच उपयुक्त झाली.

बहुसंख्य तरुणींना बोलतं करण्यासाठी पहिल्यांदा साधाच प्रश्न उपस्थित केला की, मुलींची विवाह वयोमर्यादा कायद्याने ठरविली ती पाळली जातेच असे नाही. तेव्हा मुलींची विवाह वयोमर्यादा किती वर्षे असावी ? सर्व मुलींच्या मते २० ते २२ व्या वर्षी मुलींचा विवाह झाला पाहिजे. त्या अगोदर मुळीच नको. एकीने सांगितलं : वैवाहिक जीवनाची संपूर्ण जबाबदारी पेलण्याची वैचारिक ताकद आल्यावरच लग्न करावं. सर्व प्रकारची जाण आली पाहिजे. दुसरी म्हणाली, लहान वयात लग्न केल्यानं कसलंच समाधान मिळत नाही. घाण्याला जुंपलेला बैल तशासारखी स्थिती. तिसरीचं मत : लहान वयात लग्न करणे म्हणजे शारीरिक व मानसिक हाल करून घेणे. मी माझ्या मैत्रिणीची कुतरओढ डोळ्यांनी पाहिलीय. सर्वांच्या मते, किमान २० व्या वर्षानंतर विवाह व्हावा.

प्रेमविवाहात ' थ्रिल '

प्रेमविवाह की ठरवून विवाह ? या प्रश्नाचं उत्तर बहुसंख्य मुलींच्या मते,

विवाह हा ठरवून व्हावा. सर्वसाधारणपणे असा सूर दिसला की, आई-वडिलांवर ही जबाबदारी टाकणं हिताचं. आई-वडील आपलं भलं करणार, या विश्वासाने पालकांवर विसंबणाऱ्या फार जणी निघाल्या. यात निर्णय घेण्याची जबाबदारी टाळणंही होतं. आई-वडिलानी निर्णय घ्यावा या विचारापाठीमागे यशापयशाचे श्रेय या मुलींना पेलता येत नाही हेच सत्य दिसून आले. पुढे काही प्रश्न निर्माण झाल्यास आपण जबाबदार राहणार नाही, या भावनेने पळवाट म्हणून या मार्गाशी त्या चिकटून राहिलेल्या दिसल्या.शिवाय आई-वडील आपले हित करतील व योग्य स्थळ शोधतील. मग त्यात नुकसान काय? अशी भूमिका त्यांच्यामध्ये दिसून आली. मात्र तीन मुलींनी प्रेमविवाह पसंत करू असा विचार मांडला. त्यांच्या मते, प्रेमविवाह म्हणजे एक प्रकारचं ' थ्रिल ' आहेच; पण पूर्ण ओळखीनं, एकमेकांचा विश्वास पटल्यावर व आवडीनिवडी जुळल्यावर असा विवाह सुखी व समाधान देणारा ठरेल. प्रथमदर्शनीचं प्रेम मात्र कोणत्याही दृष्टीनं वैफल्याचं ठरेल याचीही त्यांना कल्पना होती. प्रेमविवाहात कसलेही पाप नाही व अहित नाही; असेही त्यांनी सांगितलं.

आंतरजातीय विवाह नको

आंतरजातीय विवाहाला एकाही मुलीची संमती दिसली नाही. एकीनं मत मांडले : आंतरजातीय विवाहामुळे विवाह करणारी कदाचित सुखी होईल; पण लहान बहीण, भावंडांच्या लग्नात अडचणी येतात व घरातील स्वास्थ्य संपते. दुसरीच्या मते, महत्त्वाची बाब म्हणजे दुसऱ्या जातीतील चालीरीती व पद्धती माहीत नसतात. सासरी बोलणी व टोमणे खावे लागतात व त्यामुळे पती-पत्नीचे बिनसत जाते. तिसरीच्या मते, दुसऱ्या समाजातील मुलांशी विवाह म्हणजे दोन्हीकडची मंडळी नाराज. त्यातून संघर्ष व वादावादी. शिवाय दुसऱ्या जातीतल्या सुनेबद्दल घरात त्याना तितकी आपुलकी वाटणारच नाही. चौथीच्या मते, आंतरजातीय विवाहामुळे महत्त्वाची अडचण म्हणजे आपल्या मुला-बाळांना पुढच्या आयुष्यात त्रासच. हा धोका अजूनही आहे. केवळ विवाह झाला; पण पुढे मुलांचे भवितव्य नको का बघायला ? पाचवी गंभीरपणे म्हणाली, ' बाई, समजा एखादीनं आंतरजातीय विवाह केला, आई-वडील राग विसरून आपले मानतील हो; पण आपला समाज एवढा कुठं पुढं गेलाय ? आंतरजातीय विवाहाचे महत्त्व, फायदे व त्यासंबंधी उच्च विचार हे फक्त भाषणात व लेखात. प्रत्यक्षात जाणूनबुजून कशाला नसती वाट धरा ?'

आई-वडिलांच्या मनाविरुद्ध विवाह व्हावा अशी कुणाचीही इच्छा दिसली नाही. निदान दोघांच्यापैकी एका कुटुंबाचा लग्नाला पूर्ण पाठिंबा असला पाहिजे

असे स्पष्ट मत अनेक मुलींनी व्यक्त केले. विवाह केल्यावर निदान सुरुवातीला तरी माहेर किंवा सासर जवळचं राहिलंच पाहिजे, सर्व प्रकारच्या आधारासाठी. वडीलधाऱ्या मंडळींचा आधार हवा; पण छत्र, आशीर्वाद, कृपा असे शब्द चर्चेत कुठे आले नाहीत.

लग्नात हुंडा देण्याचा प्रश्न निघाला तेव्हा बहुसंख्य मुलींनी हुंडाविरोधी मते मांडली. हुंड्याशिवाय लग्न होईल तर आई-वडिलांवर मुलींच्या जन्मापासून निर्माण होत असलेली चिंता दूर होईल असं एकीचं मत, तर दुसरीच्या मते, 'लग्न लांबणीवर पडणे, योग्य स्थळ न मिळणें, या समस्या केवळ हुंड्यामुळे निर्माण होतात. तेव्हा ही प्रथाच बंद व्हावी.' तिसरीने सांगितले, 'हुंडा व याद्या करणे म्हणजे गंभीर व तणावाचे वातावरण. आतून बैठकीच्या खोलीतील चर्चा पडद्या-आडून ऐकताना आईच्या चेहऱ्यावरील भाव, वडिलांची व मध्यस्थांची तडजोडीची, अजीजीची भाषा. नुकतीच समज आलेल्या लहान भावंडांचा केविलवाणा चेहरा हे मी माझ्या मैत्रिणीच्या 'पाहणे व ठरविणे' कार्यक्रमात बऱ्याचदा पाहिलंय. मी तर हुंड्यापायी अडून बसणाऱ्याशी लग्नच करणार नाही.' चौथी म्हणाली, 'हुंडा म्हणजे वधुपित्यावर अन्याय. काहीजणींच्या मते, मुली शिकत आहेत, त्या मिळवत्या होत आहेत, त्या स्वतःच्या पायावर उभे राहण्याची आर्थिक कुवत त्यांच्यात आली आहे; त्यामुळे या बाबतीत तरी हुंडा ही बाब गौण समजली जावी. एका जैन मुलीचे मत, 'वडिलांजवळ पैसा असेल तर चांगल्या स्थळाकरिता हुंडा देणे अयोग्य नाही. ते देणारच व त्यात गैर काहीच नाही.'

हुंड्याच्या अनिष्ट प्रथेची झळ वाचनाने व समाजातील अनेक उदाहरणांनी या मुलींना पटलेली होती. हुंडा म्हणजे सरळसरळ सौदा. तेव्हा ही प्रथा नष्ट व्हावी असा सूर होता. या पद्धतीविरुद्ध तुम्ही स्वत: काही करू शकणार आहात काय ? असे विचारले तेव्हा मात्र त्याविषयी त्या साशंक दिसल्या. आमच्या हातात काहीच नाही. आई-वडील ठरवतील तेच. आमच्या मताप्रमाणे थोडेच होणार ? अशी असहाय्य उत्तरे त्यांच्याकडून आली.

मुलगा पदवीधर हवा

भावी पतीच्या शैक्षणिक दर्जाबद्दल बहुसंख्य मुलींचे मत : किमान पदवीधर किंवा पदव्युत्तर शिक्षण घेतलेला मुलगा हवा. शिवाय कुटुंब पोसण्याची आर्थिक कुवत हवी. एकीच्या मते मात्र सैन्यातील अधिकारी किंवा मोठ्या हुद्द्यावरील हवा, तर पाच जणींच्या मते इंजिनियर मुलगा पती म्हणून निवडण्याची इच्छा. तीन मुलींना कर्तृत्ववान डॉक्टर हवा, तर एका मुलीला डॉक्टर मुळीच नको; कारण काय तर म्हणे त्याला खासगी आयुष्य नसते.

दुसऱ्या एकीला प्रवासाची व बदल्यांची आवड म्हणून तिला बँकेत नोकरी करणारा मुलगा पती म्हणून आवडेल. खेळाडू, नट, गायक वा लेखक अशा-सारख्या मुलाची पती म्हणून निवड कुणालाही करावीशी वाटली नाही. तसेच स्वत:पेक्षा कमी शिकलेला नवराही कुणाला नको वाटला; कारण उगीच पुढे न्यूनगंड निर्माण होतो व घरात संशयी वातावरण निर्माण होते. म्हणजे पती हा आपल्यापेक्षा जास्त शिकलेलाच असावा, हे मत सर्वांचेच.

सुंदर पण अशिक्षित पती अशी निवड कुणालाही करायची नाही. तसेच कुरूप पण श्रीमंत मुलगा सर्वांनाच अमान्य. दिसण्यास सर्वसाधारण पण शिकलेल्या पतीची निवड बहुसंख्य मुलींना मान्य झाली. मात्र सुशिक्षित, समजून घेणारा व संशय न घेणारा असा मुलगा चांगला. आपली मते नेहमीच बायकोवर लादणारा मुलगा अजिबात नको, असे स्पष्ट मत एकीने मांडले. दुसरीच्या मते तो सोशल हवा. तिसरी म्हणते, तो थोडासा रिझर्व्ह हवा. सदोदित गप्पांच्या व मित्रांच्या टोळक्यात फिरणारा नको. बाकी खास अशी दिसण्याबद्दलची व स्वभावाबद्दलची अट व विचार कुणीही व्यक्त केला नाही. फार फॅशनेवल राहणी नको, पण व्यवसायाला शोभेल असे व्यवस्थित कपडे व अप–टु–डेट राहणारा सर्वांना हवा. नोकरी व स्वभावाव्यतिरिक्त एखाद्या खास गुण, छंद वा आवड असणारा पती निवडावा, याविषयी कुणीही चर्चेत उल्लेख केला नाही.

लग्नानंतर नोकरी

लग्नानंतर तुम्ही नोकरी करणे पसंत कराल काय ? या प्रश्नावर त्या म्हणाल्या, नोकरी मिळेल अशी परिस्थिती आज तरी दिसत नाही; पण नोकरी मिळाली तर निश्चित करू. लग्नाआधी नोकरी करीत असल्यास लग्नानंतरही ती करण्याचा विचार बहुतेकजणींचा दिसून आला. दोन मुलींनी मात्र नोकरी करण्याची इच्छा नाही; कारण संसाराकडे व मुलांकडे दुर्लक्ष होते, असे मत मांडले.

नात्यातील मुलाशी विवाह व्हावा असे म्हणणाऱ्यांची संख्या कमी दिसली. मात्र निम्म्याहून अधिक मुलींना परिचय आवश्यक वाटला. स्वभावाने अपरिचित व अगदीच अनोळखी मुलापेक्षा परिचयातील मुलगा निवडणे आवडेल, असे मत त्यांनी व्यक्त केले. मात्र अगदीच परिचय नसला तरी विवाह करण्यात एक प्रकारचे नावीन्य व अर्थ असतो; म्हणून अनोळखी मुलगा निवडण्याची पसंतीही बऱ्याच मुलींनी दर्शविली. शिवाय यामध्ये असाही दृष्टिकोन की आई–वडील पूर्ण चौकशी करूनच योग्य मुलाची निवड करतात; त्यामुळे अनोळखी मुलगा पती म्हणून निवडण्यात त्यांना मजा वाटते.

नोंदणी पद्धत योग्य

नोंदणी पद्धतीने विवाह करणे निम्म्या मुलींना अधिक पसंत वाटले. धार्मिक विधी पद्धतीनेच विवाह व्हावा, असे मत व्यक्त करणाऱ्या मुलींनी आपली बाजू पटवून देण्याचा प्रयत्न केला तो या आधारावर की, लग्न हा संस्कार आहे. विधी, पूजा व घराण्यातील प्रथेनुसार विवाह केल्याने भावी वैवाहिक आयुष्य सुखी होईल, तेव्हा सर्व विधी यथासांग झालेच पाहिजेत. सुखी संसार व लग्नातील धार्मिक विधी यांचा संबंध नसतो असे तुम्ही कशावरून मानता ? असे विचारले तेव्हा मात्र त्या गोंधळल्या. त्यांनी त्या दृष्टीने खोलवर विचार केलेलाच नव्हता. नोंदणी पद्धतीचा पुरस्कार करू इच्छिणाऱ्या धिटाईनं बोलल्या. एकीला वाटतं या पद्धतीमुळं पैशाचा अपव्यय होत नाही. दुसरीचे मत, हाच पैसा लग्नानंतर घर सजविण्यासाठी व अन्य खरेदीसाठी उपयोगी पडेल.तिसरी अर्थशास्त्राची विद्यार्थिनी म्हणाली : बाई, तुम्ही अनुत्पादक खर्चाचा जी व्याख्या सांगितली ना वर्गात, त्यातलाच हा खर्च. मला तर अजिबात पसंत नाही. चौथी म्हणाली : नोंदणी पद्धतीनं विवाह म्हणजे मुलीकडच्यांना केवढा रिलीफ मिळेल. धावाधाव, जमवा-जमव, पळापळ व अनावश्यक खर्च वाचेल. पाचवीच्या मते : धार्मिक विधी पद्धतीत उद्भवणारे रुसवे–फुगवे टाळता येतील. मानपान नाही व दमणूक नको.

वेगळं व्हायचंय मला !

कुटुंबपद्धती विभक्त की एकत्र ? तुम्हाला अधिक काय पसंत पडेल ? असा प्रश्न उपस्थित केला. एकीच्या मते, एकत्र कुटुंबात सर्वांच्या आवडी–निवडींचा विचार करावा लागतो. स्वतः पती व मुलाबाळांचा खास विचार करणे जमत नाही. दुसरीची प्रतिक्रिया अशी की, एकत्र कुटुंबात नव्या सुनेला बिचकूनच राहावं लागतं. शिवाय स्वतंत्रपणे निर्णय घेता येत नाहीत. तिसरी बोलली की, संख्या अधिक असल्याने अधिक संघर्षाला तोंड लागते. शिवाय घरातल्या स्त्रियांमध्ये सासू-सून, काकू, नणंद, भावजय यांचा एकोपा राहतोच असे नाही. चौथीच्या मते, आई-वडील व मुलं यांच्यात सुसंवाद राहिला पाहिजे व जवळीक निर्माण झाली पाहिजे, यासाठी विभक्त कुटुंब योग्य. पाचवीच्या मते, नोकरी करणाऱ्या स्त्रीचे एकत्र कुटुंबात फार हाल, तिला अनेकांची मते, टोमणे, टाकून बोलणी व दबाव सहन करावे लागतात. ती कुठं चुकते यावर सर्वांचा डोळा. सहावी बोलली की, विभक्त कुटुंबात नोकरी करणारी स्त्री स्वतंत्रपणे निर्णय घेऊ शकते. नोकरी, घर, मुले-बाळे व पती यांच्याकडे समर्थपणे लक्ष देऊ शकते. एकत्र कुटुंबात हे जमत नाही.

याचा अर्थ, हल्लीच्या मुलींना मतस्वातंत्र्य व निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य हवे.

तेच नेमके एकत्र कुटुंबात मिळत नाही. कामाचा ताण पडतो हा दोष त्यांच्या मानाने गौण आहे. त्यावरून त्यांच्या विचारसरणीत प्रगल्भता जाणवली. ज्यांनी एकत्र कुटुंब असावं या बाजूनं मत व्यक्त केलं, त्या सुशिक्षित व श्रीमंत कुटुंबातील होत्या, त्यामुळे त्यांना घरात कसलीच अडचण भासत नाही व त्यांच्या मताला योग्य ती किंमत मिळतेच असे दिसून आले.

धार्मिक गोष्टी, पूजाअर्चा, व्रतवैकल्ये व उपास यांवर बहुसंख्य मुलींचा विश्वास नव्हता व श्रद्धाही नव्हती. पण त्या आई-वडिलांच्या समाधानासाठी उपास व व्रतवैकल्ये करतात असे दिसले. हरतालिका, वट-सावित्रीची पूजा, संकष्टी, लक्ष्मीपूजा व उपवास, संतोषी मातेचा शुक्रवार वगैरे त्या करीत असल्याचे आढळले. खास श्रद्धा नसूनही आईला व वडीलधाऱ्यांना दुखवायचं नाही, म्हणून आम्ही ते करतो, असे बहुसंख्य मुलींचे मत दिसले.

शिक्षणाचा, वाचनाचा, समाजातील बदलत्या घडामोडींचा व सामाजिक परिवर्तनाचा अंशतः तरी परिणाम या मुलींवर झालेला दिसला. याचा अर्थ असाही निश्चितपणे जाणवला की, सुशिक्षित मुली व आई-वडील यांच्यात वैचारिक देवाणघेवाण व मनमोकळ्या गप्पा होतच नाहीत. किंबहुना अशा विषयावर मुलींशी बोलणे व चर्चा करणे पालकांना आवश्यक वाटतच नसावं. हे दोन पिढ्यांतील अंतर कधी कमी होणार ? हा प्रश्न मात्र सतावत राहिला.

सुशिक्षित तरुणी सुयोग्य वधू होतील काय ?

शिक्षण घेतलेल्या तरुणी लग्नानंतर कुटुंबव्यवस्थेत गृहिणीची भूमिका चांगल्या रीतीने पार पाडू शकतील की नाही, ह्याबद्दल साशंकता व्यक्त केली जाते. विशेषतः महाविद्यालयीन शिक्षण घेतलेल्या युवती ह्या सुयोग्य वधू होऊ शकतील की नाही, ह्याविषयी द्विधा मनःस्थितीत सापडलेल्या तरुणांनी विचार करताना उच्चभ्रू स्तरातील, श्रीमंत व लाडावलेल्या, मन मानेल तसे वागणाऱ्या, अगदीच हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्या उच्च शिक्षित तरुणी लक्षात घेऊ नयेत; कारण त्या सुशिक्षित बहुसंख्य तरुणींचे प्रतिनिधित्व करणाऱ्या तर ठरत नाहीत; शिवाय त्यांची वर्तणूक ही विकृती ठरू शकते. ती नैसर्गिक प्रवृत्ती आणि सर्वमान्य वर्तणूक ठरू शकत नाही; म्हणून कॉलेज शिक्षण घेतलेल्या तरुणी याचा अर्थ उच्च मध्यम वर्ग, मध्यम वर्ग आणि शेतकरी व कष्ट करणाऱ्या कुटुंबातून शिकणाऱ्यांचाच प्राधान्यपूर्वक समावेश असाच घ्यायला हवा.आज तालुक्याच्या ठिकाणी महाविद्यालयीन शिक्षणाची सोय होत आहे; त्यामुळे शहरी भागात असे शिक्षण

घेणाऱ्या मुलींची संख्या वाढत आहेच; पण निम्न शहरी व ग्रामीण भागात हळूहळू ते प्रमाण वाढल्याचे जाणवत आहे.

असे शिक्षण घेत असलेल्या तरुणींबद्दल अनेक प्रकारचे गैरसमज व्यक्त केले जातात. त्यांच्याकडून कौटुंबिक जबाबदाऱ्या योग्य रीतीने पार पाडल्या जातील की नाही, याविषयी शंका बोलून दाखविल्या जातात. तशी चर्चा महिला मंडळे, तरुण व प्रौढ पुरुषांच्या समुहात, पेन्शनर मंडळींत चाललेली ऐकू येते. महिलांतूनच तशी चर्चा चालते असे नाही, तर पुरुष वर्ग, तरुण मंडळी, विवाहोत्सुक युवक, विद्यार्थी अशाच अर्थाने व या तऱ्हेने कॉलेज युवतींच्या कुवतीबद्दल धाकधूक बाळगून असल्याचे दिसते. अशा तऱ्हेची साशंकता, समज व गैरसमज निर्माण होण्यास अनेक बाबी कारणीभूत आहेत, हे मान्य करावे लागेल, पण त्या बाबींचा विचार खोलवर जाऊन केल्यास सुशिक्षित तरुणींबद्दल धाकधूक कमी होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

पोशाखावरून 'कुवत' नको

महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या तरुणींची प्रवृत्ती पोशाखी असते अथवा आहे हे मान्य. म्हणजे आधुनिक फॅशनची राहणी त्यांना आवडते. अर्थात अंगप्रदर्शन करणारे कपडे घालण्याचे समर्थन कुणी करणार नाही व ते तरुणांनीही करू नये. अगदीच भडक व तारुण्याचे प्रदर्शन करणारी पोशाखी वृत्ती असमर्थनीय व त्याज्य ठरविली जावी; परंतु असे कपडे घालणाऱ्या तरुणींची संख्या फार मोठी नसते. बहुसंख्य तरुणी चालू फॅशनचे कपडे व नीटनेटकेपणाबद्दल जागरूक राहतात. दुसरे असे की, त्यांची राहणी आधुनिक असली तरी वर्तणूक कनिष्ठ प्रतीची व सैल असतेच असे नाही. शिक्षण घेताना जबाबदाऱ्या नसतात. तारुण्यात वावरत असणाऱ्या मुलींचे पोशाखी प्रवृत्तींचे मर्यादित आकर्षण नैसर्गिक मानावे लागेल. अगदी पाश्चात्त्य तरुणीप्रमाणे तोकडे कपडे व नको तितका उघडेपणा करणाऱ्या तरुणींची संख्या तुरळक; त्यांमुळे चांगली राहणी, आधुनिक प्रसाधने व सौंदर्याची जपणूक करणाऱ्या व त्यात रस असणाऱ्या तरुणी संसाराच्या जबाबदाऱ्या पेलण्यात कमी पडतील, असा ग्रह करून घेणे चुकीचे होईल.

मध्यम वर्गातील कुटुंबातून शिक्षण घेणाऱ्या मुलींची संख्या वाढते आहे. भावंडांची देखभाल, आजाऱ्यांची शुश्रूषा, पाहुण्यांची व्यवस्था, मोलकरणीच्या गैरहजेरीत धुणं-भांडी, रोजची साफसफाई या कामांतून त्यांची सुटका नसल्याचे आजूबाजूच्या अनुभवावरून लक्षात येते. ग्रामीण भागातून ज्या मुली शिकताना आढळतात, त्यांनाही घरकाम आणि प्रसंगी शेतीभातीची कामंही करावी लागतात. अशा तरुणींची आधुनिक राहणी विवाहानंतरच्या जबाबदाऱ्या घेण्यात अडसर

ठरेल असे म्हणणे तर्कसंगत तर ठरणार नाहीच; पण असंयुक्तिक म्हणावे लागल. आज घरकामाला येणाऱ्या मोलकरणीच्या मुली व त्या स्वतःसुद्धा स्वच्छ व नीटनेटका पोशाख घालत असल्याचे प्रकर्षाने जाणवते व तो बदल उत्साहवर्धक व योग्य असेच आपण मानतो. त्यामुळे कॉलेज युवतींच्या पोशाख व फॅशनवर टीका करून, नाक मुरडून त्यांच्या भवितव्यावद्दल काळजी व्यक्त करणाऱ्या मंडळींची कीव करावीशी वाटते.

आत्मविश्वास हा अहंभाव नव्हे

शिक्षण घेताना मुलींना घराबाहेरच्या जगात व समाजात मिसळण्याची संधी मिळते. निरनिराळे स्वभाव, व्यक्तिमत्त्वे व विचार असणाऱ्या समवयस्क व प्रौढ मंडळींचा सहवास व संपर्क मिळतो. विचारांची कळत नकळत देवाणघेवाण होऊ लागते. काही वेळा इतरांचे म्हणणे पटवून घ्यावे लागते, तर प्रसंगी स्वतःचासुद्धा मुद्दा पटवून देण्यासाठी कौशल्य वापरावे लागते. मानापमानाच्या कल्पना बदलतात. आपल्याही स्वभावाचे कंगोरे गुळगुळीत होऊ लागतात.

सहशिक्षणामुळे समवयस्क तरुणांमध्ये मिसळण्याची व वावरण्याची शक्यता असते; त्यामुळे एक प्रकारचा धीटपणा अंगी येतो. निःसंकोचपणे व स्वच्छ मनोवृत्तीने वागण्याचा अनुभव येतो. स्त्री–पुरुषांमध्ये असलेल्या नैसर्गिक आकर्षणाला विकृत स्वरूप येण्याची शक्यता असते; परंतु सहशिक्षणाने संयम आणि सुसंस्कृतपणाची वर्तणूक करण्याची जबाबदारी अंगी येते.

आजचे शिक्षण पुस्तकी, व्यक्तीच्या वृत्ती–विकसनाला फारसे खतपाणी घालणारे नाही हे खरे असले तरी त्यांचा आत्मविश्वास वाढविण्यास ते उपयुक्त ठरते. स्वतंत्रपणें विचार करण्याची त्यांची क्षमता वाढते; परंतु विवाहानंतर त्या आत्मविश्वासाला अहंभाव आणि स्वतंत्रपणे विचार करण्याच्या व मते मांडण्याच्या प्रवृत्तीस उद्धटपणा म्हणून त्यांच्यावरच टीकेची झोड उठविल्यास त्या तरुणींचा नाइलाज आहे. प्रत्येक व्यक्तीच्या, मग ती स्त्री असो अथवा पुरुष असो; त्याच्या वाटचाला अनेक न आवडणाऱ्या गोष्टी येत असतात. नको असलेल्या गोष्टी सहन करताना मनात ज्या भावना निर्माण होतात, त्या बोलून दाखविणे ही सर्वसाधारण प्रतिक्रिया समजायला हरकत नाही; पण सुशिक्षित तरुणी त्या व्यक्त करू लागल्या की माणसे दुखावली जातात. सुशिक्षित तरुणी जर 'माझे मत असे नाही,' 'मला हे आवडत नाही,' 'तुमचा विचार जुना आहे' असे म्हणू लागल्या तर त्या कुटुंबात वादविवाद व संघर्षास कारणीभूत ठरल्या असे समजणें कितपत योग्य आहे ?

सुशिक्षित तरुणी बोलक्या, विचार व्यक्त करण्याइतपत धीट आणि आत्मविश्वासाने घरचा कारभार पाहू लागल्या तर त्या अहंभावी आणि स्वैराचारी विचाराच्या आहेत, असे मानणे गैर ठरेल. लग्नानंतर कुटुंबसंस्थेचे विघटन करण्यास त्यांची स्वतंत्र विचारशक्ती व निर्णयशक्ती कारणीभूत ठरते अशी भीती बाळगण्याचे कारण नाही.

स्वतंत्र विचार म्हणजे विरोध नव्हे

शिक्षण घेताना मिळणारे ज्ञान व अनुभव यांमुळे आणि इतरही सामाजिक कारणांमुळे तरुणींना स्वतंत्रपणे विचार करण्याची क्षमता येते. त्यांचे संवेदनशील मन व बुद्धिमता त्यांची स्वत:ची ठाम मते बनविण्यास कारणीभूत ठरते. विवाहानंतर घर कसे सजवायचे ? कोणत्या वस्तू घ्यायच्या ? मनोरंजनाचे मार्ग कोणते ? खाण्यापिण्याबाबत आवडी कोणत्या ? मूल कधी होऊ द्यायचे ? दोन मुलांमध्ये किती वर्षांचे अंतर असावे ? मुलाला इंग्रजी की मराठी माध्यमाच्या शाळेत प्रवेश घ्यायचा ? वगैरे अनेक बाबींविषयी त्यांचा पूर्वविचार व निश्चित कल्पना असू शकतात. काही वेळा सिनेमा पाहून, कादंबऱ्या वाचून वैवाहिक जीवन व संसाराबद्दलच्या अवास्तव व फिल्मी कल्पना असण्याचीही शक्यता नाकारता येणार नाही; पण तो शिक्षणाचा परिणाम तर मुळीच म्हणता येणार नाही. उलट अर्धवट शिक्षण घेतलेल्या तरुणींचे विचार काहीसे अपरिपक्व व एकांगी असल्याचा अनुभव जवळपासच्या नवविवाहित मुलींच्या वागण्यावरून येत राहतो.

स्वतंत्र विचार, निश्चित मते आणि न पटलेल्या घटनांविषयींची नकारात्मक वैचारिक भूमिका घेण्याचा सुशिक्षित तरुणींचा प्रयत्न म्हणजे त्यांची उद्धट प्रवृत्ती असे मानले जाऊ नये. स्वतंत्र विचाराला जर विशेष करण्याची प्रवृत्ती असे मानून तरुणींच्या प्रत्येक वृत्तीचा अर्थ लावला तर तो अन्यायी ठरेल. गप्प बसून ऐकून घेण्याचा स्वभाव, विशेष न करण्याची प्रवृत्ती, चुकीचे असेल तर नेहमीच पडते घेण्याचा कल, सांभाळून घेण्याची, नमून वागण्याची वृत्ती अशा तरुणींमध्ये नसते. त्यामुळे कौटुंबिक जीवन व वैवाहिक आयुष्य स्वास्थ्याचे व आनंददायी ठरणार नाही, असाही त्यांच्याबद्दलचा विचार; परंतु सुशिक्षित तरुणींनी अत्यंत शामळूपणाने, गप्पबशा वृत्तीने व मनाविरुद्ध बाबींचाही आनंदाने स्वीकार करायचे ठरविले तर त्या आदर्श पत्नी होऊ शकतील, संसार सुखाचा होईल असे म्हणता येणार नाही. तशा वर्तणुकीची अपेक्षा त्यांच्याकडून करूनही चालणार नाही. सहजीवनाची वाटचाल करण्यासाठी सुशिक्षित तरुणींची प्रत्येक गोष्टीत बरोबरीने निर्णयात सहभागी होण्याची प्रवृत्ती आवश्यक ठरेल. शिवाय शिक्षणाने येणाऱ्या विचारशक्ती व निर्णय घेण्याच्या कुवतीला योग्य वाव मिळाला

तर पुरुषांवरच्या अनेक जबाबदाऱ्या विवाहानंतर त्या समर्थपणे घेऊ शकतात. आकस्मिक संकट, आजारपण अथवा घरगुती प्रश्नांमध्ये अशा शिक्षित तरुणींचा पतीला फार मोठा आधार मिळत असल्याची उदाहरणे समाजात दिसतात. स्वभाव आणि प्रवृत्ती ही शिक्षणाने तिरकस आणि विरुद्ध बनते असे म्हणणे चुकीचे ठरेल.

छंद म्हणजे अपव्यय नव्हे

सुशिक्षित तरुणींना शिक्षणाव्यतिरिक्त इतरही गोष्टींची आवड असू शकते. एन. एस. एस., एन. सी. सी., गॅदरिंग, मॅगेझीन, वाङ्मय मंडळे, गेम्स, गिर्यारोहण इत्यादींमध्ये सहभागी होता येते. निरनिराळ्या प्रकारच्या उपक्रमांत सहभागी झाल्याने सुप्त कलागुणांना वाव मिळतो. त्यातून वाचनाची आवड, लिखाणाचा छंद, कविता करण्याची कला, खेळात कौशल्य, ड्रॉईंग व पेंटिंग, भरतकाम यांमध्ये विशेष रस निर्माण होतो. परंतु त्याकडे फारसे कौतुकाने पाहिले जात नाही. प्रौढ मंडळी व तरुण वर्गात त्यांच्या छंदाबद्दल व प्राविण्याविषयी कुतूहल आणि उत्सुकता असते. पण संधी मिळेल तेव्हा कौतुकाऐवजी संसाराला त्याची उपयुक्तता काय ? हा निकष मानून त्या आधारे त्या छंदाची टिंगल होते. वेळेचा अपव्यय मानला जातो. शिवाय उत्कृष्ट खेळाडू, उत्तम चित्रे काढणारी, लिखाणात कुशल, गिर्यारोहणाची आवड व धाडस करणारी महाविद्यालयीन युवती विवाहानंतर आपापले छंद जोपासण्यासाठी स्वयंपाक न करता बसू शकेल काय ? हा विचार करायला हवा.

विवाहाअगोदर अभिनयाबद्दल पारितोषिक मिळालेल्या तरुणीला ती कला पुढे चालू ठेवायची असते. महाविद्यालयात नृत्यामध्ये प्रमाणपत्रे मिळवूनही ती साधना लग्नानंतर कौतुकाने पुढेही करण्याची परवानगी मिळावी अशी अपेक्षा असते. गिर्यारोहणाचा अभ्यासक्रम पूर्ण करण्याची कुणाची मनीषा असते, तर कुणाला दलितांवरचा अन्याय दूर करण्याचे समाजकार्य हाक घालीत राहते. वाचनाची आवड तशीच ठेवावी वाटते. परंतु विवाहानंतर नव्या आयुष्याची घडी बसविताना, पत्नी म्हणून घरात वावरताना, सून म्हणून जबाबदाऱ्या स्वीकारताना नववधूच्या लक्षात येते की, आपण फार बदललो आहोत, रिते झालो आहोत. त्यातून ती बेचैन व तिला समजून घेणारे कुणीच सापडत नाही तेव्हा त्रस्त होऊन जाते. आपल्या छंद जोपासण्याच्या अट्टाहासात पतीशी विसंवाद झाला तर भावी संसाराची वीण उसवेल असा धोका दाखविणारे अनेकजण पदोपदी भेटू लागतात, तेव्हा सुशिक्षित तरुणी नवऱ्याच्या विचाराने आणि कलाने वागण्याचा प्रयत्न करते. अशा अनेक तडतोडी स्वीकारताना करावा लागणारा मानसिक झगडा, वादविवाद

आणि संघर्ष हादेखील टीकेचा बनतो. मग निष्कर्ष काढला जातो की चार इयत्ता शिकलेली सून करून आणली असती म्हणजे सुशिक्षित तरुणींचे विकसित व्यक्तिमत्त्व, सुसंस्कृत वागणूक आणि आधुनिक विचार ही वैवाहिक जीवनात व कौटुंबिक बाबींमध्ये जमेची बाजू ठरली असती; पण त्याकडे निरुद्योगीपणा व संसाराबद्दल उदासीनता अशा अर्थाने पाहिले जाते. हा दोष तरुणीचा की पाहणाऱ्यांचा ? असा प्रश्न पडतो.

महाविद्यालयीन तरुणींचा विचार करताना बहुसंख्य मुलींची प्रवृत्ती व वर्तणूक ह्यांची दखल घ्यायला हवी. ती घेतल्यास असे जाणवते की, परिस्थिती, घटना व प्रसंग जाणून घेण्याची त्याची कुवत अशिक्षित तरुणीपेक्षा जास्त आहे. महाविद्यालयाच्या अभ्यासक्रमात बालसंगोपनाचे धडे नाहीत, पाककलेची कृती शिकविली जात नाही, धुण्या-भांड्यांचे शास्त्रीय शिक्षण दिले जात नाही, अथवा नवऱ्याला जिंकण्याचे आणि सासूची मनधरणी करून खूष ठेवण्याचे ज्ञानही मिळत नाही; त्यामुळे विवाहासाठी सुयोग्य वधू याचा अर्थ आपली कोणतीच भावना न सांगणारी स्त्री, पतीला जिंकणारी लाडकी राणी, घर सांभाळणारी गृहिणी, मुलांच्या संगोपनात आणि पाहुण्यांच्या आदरातिथ्यात गुंतलेली बाई, नवऱ्याच्या इच्छेनुसार वागणारी विवाहिता, असाच अर्थ मान्यता पावलेला आहे. त्या चौकटीत काढलेल्या वर्तुळात तिने फिरले पाहिजे. परिघाच्या बाहेर जाण्याची नुसती इच्छा प्रदर्शित करण्याने तिचे वधू अथवा पत्नी म्हणून असलेले 'क्वालिफिकेशन' कमी होते. पदवीधर मुलींना शैक्षणिक पदवी असल्याने तेवढ्याच परिघात फिरण्याची त्यांनी कुरकूर केली की त्याचे खापर सुशिक्षितपणावर फोडले जाते.

स्वयंपाक–पाणी, घर लख्ख ठेवणे, लोणची–पापड करणे वगैरे म्हणजे आदर्श संसार आणि नवऱ्याच्या इच्छा–आकांक्षा जपत, नटून–सजून त्याची वाट पाहत त्याला खूष ठेवण्याची मादीची भूमिका म्हणजे सुयोग्य वधू अथवा आदर्श पत्नी नव्हे, असा विचार करणाऱ्या सुशिक्षित तरुणींची मनोभूमिका समजून घ्यायला हवी. शिक्षणाने विवाहानंतरच्या जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडण्याचे सामर्थ्य व कुवत नक्कीच येते. कुटुंब हे त्या दृष्टीने संस्कारकेंद्र आहेच. पुस्तकी ज्ञान जरी व्यवहारात उपयुक्त ठरत नसले तरी विविध अनुभव, निरीक्षण शक्ती, वाचनाने येणारी जाणीव व जागरूकता यांमुळे त्या योग्य–अयोग्याचा विचार, चांगल्या–वाईटाची दखल, इष्ट–अनिष्टतेची निवड करू शकतात.

वैवाहिक जीवन व कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडण्यास उपयुक्त ठरेल असा अभ्यासक्रम महाविद्यालयात शिकविला जात नाही हे मान्य. पुस्तकी ज्ञान व्यवहारात फारसे उपयुक्त ठरत नाही, हेसुद्धा मान्य. तरीही अयोग्य वधू,

बेफिकीर गृहिणी, बेजबाबदार माता आणि कुटुंब विघटनास कारणीभूत ठरणारी सून तयार करण्याचे ते कारखाने नव्हेत. तडजोडीची वृत्ती, जबाबदारीची जाणीव व जाणून घेण्याची कुवत सुशिक्षित तरुणींमध्ये नसते, असे म्हणणे एकांगी व अविचारी ठरेल. पती-पत्नीचे प्रेमाचे व जिव्हाळ्याचे नाते विश्वासाने जपण्याची कला, मुलांच्या संगोपनाची आधुनिक व शास्त्रीय माहिती घेऊन वाढविण्याची जिद्द, कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडण्याची हौस असणाऱ्या अशा तरुणींना फक्त समजून घ्यायला हवे. त्यांच्याकडे पूर्वग्रहदूषित दृष्टिकोनातून पाहत नवरा, घर व सामाजिक प्रतिष्ठेसाठी नेहमीच क्षमाशील राहायचे, राग आलाच तर शब्दाबाहेर व्यक्त करायचा, जमवून घ्यायचे अशीच अपेक्षा त्यांच्याकडून ठेवल्यास त्यांच्याकडून थोडासाही अपेक्षाभंग झाल्यास त्यांच्या शिक्षणाचा उद्धार केला जातो. मग उद्धार करणाऱ्यांचा व परिस्थितीचा दोष की सुशिक्षित तरुणींची चूक ? हा प्रश्न अभ्यासायला हवा.

तरुणींना निखळ आरोग्याची जाण हवी

बाल्य मागे टाकून मुली जेव्हा तारुण्यात पदार्पण करू लागतात तेव्हा त्यांच्या शारीरिक व मानसिक प्रकृती आणि प्रवृत्तीमध्ये फरक पडतो. स्वभावातला अल्लडपणा लोपून त्या जराशा प्रौढपणे वा शिष्टपणे वागू लागतात. स्वत:च्या कपड्यांबद्दल बेफिकीर असलेल्या मुली आता नीटनीटकेपणा आणि टापटिपीकडे लक्ष देऊ लागतात. डोळ्यांतील निर्व्याजता, बालसुलभ निरागसता नाहीशी होऊन त्यांच्यात आलेली 'समजूत' जाणवू लागते. मोकळीक व धुसमुसळेपणाने वागणाऱ्या या मुली बेताने, तोलून-मापून वागताना दिसतात. तारुण्यातील स्वप्नरंजकतेत गढून जाण्याचे हे वय ! हे सगळे नैसर्गिक असले तरी हल्लीच्या बहुसंख्य तरुण मुली निस्तेज, बारीक व अगदीच ॲनिमिक दिसत असल्याचे जाणवते.

सौंदर्यप्रसाधनांच्या अद्ययावतपणात आपण मागे राहू नये, आधुनिक प्रवाहानुरूप असावे, या दृष्टीने त्या काळजी घेताना दिसतात.वजन कमी झाल्याने येणारा निस्तेजपणा त्या लक्षात घेत नाहीत. बहुसंख्य तरुण मुलींच्या, विशेषत: सुशिक्षित व शिकत असलेल्यांच्या सहवासात राहिल्याने लक्षात येणारी बाब म्हणजे त्यांच्या पोशाखात, राहणीत व वेशभूषेत आधुनिकता आल्याचे जाणवते; परंतु शारीरिकदृष्ट्या पाहता सुदृढ व आरोग्यदायी स्त्रियांची संख्या कमीच असल्याचे प्रकर्षाने लक्षात येते. बाह्य सौंदर्यदर्शनाची व चेहऱ्याची निगा त्या कसोशीने व डोळ्यांत तेल घालून ठेवताना दिसतात. परंतु सुंदर दिसण्यास मूळ शरीर निरोगी पाहिजे

याबद्दलची त्यांची जागरूकता कमी तर आढळतेच, पण त्याविषयीच्या त्यांच्या कल्पनाही निकोप व वास्तववादी नसल्याचे त्यांच्याशी केलेल्या चर्चेवरून लक्षात येते. माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या १५ ते २२ वर्षे वयोगटातील मध्यमवर्गीय मुलींशी या विषयावर बोलताना आणि निरीक्षणाने येणाऱ्या अनुभवाच्या आधारे विचार मांडण्याचा हा प्रयत्न आहे.

सडपातळपणाचे खूळ

हल्लीच्या सुशिक्षित तरुणींना आपण स्लिम किंवा सडपातळ दिसले पाहिजे असा हव्यास असतो. स्लिमनेसच्या नावाखाली त्या आपल्या वजन, उंची व अवयवांची ठेवण यांच्यामध्ये हव्या त्या बांदेसूदपणाचाही विचार करीत नाहीत. ब्लाऊजचे गळे मोठे व त्यामुळे दिसणारी हाडे, ताणलेल्या शिरा हे तारुण्याचे अथवा आरोग्यदायित्वाचे लक्षण नाही, याचेही भान त्यांना दिसत नाही. शिवाय हाताची बोटे लांब, नखे योग्य आकार देऊन नेलपेन्ट लावून सजविलेली, पण मनगट व दंड यांत मुळीच जोर नाही. तो पीळदार व टणक नसल्याने हालचालीत गोंडसपणा न जाणवता एक प्रकारची निर्जीवता आल्याचे दिसते. काही मुली उंच काठीसारख्या व उंच टाचांची पादत्राणे घालण्याची हौस भागवून आणखी काटकुळ्या भासतात. बहुसंख्य मुलींची जोडी एकापेक्षा अधिक व घोळदार कपडे घातल्याने बऱ्यापैकी व निदान डोळ्यांना सुसह्य वाटते; मात्र डोळ्यांतील निस्तेजपणा, बसलेले गाल व मान, गळ्याचो हाडे ही सूक्ष्म निरीक्षणाने व तुलनात्मक जाणीवपूर्वक लक्षवेधी दृष्टिक्षेपातही जाणवत राहतात.

पालकांची मुलांपेक्षा मुलांकडे दुर्लक्ष करण्याची वृत्ती, पौगंडावस्थेतील प्रश्न व त्यातून येणारा एकलकोंडेपणा, मानसिक कोंडी, आरोग्यसंपन्नतेचे महत्त्व लक्षात न घेता स्लिमनेसचे फॅड, उपासतापास व धार्मिक दडपणे,स्त्रीत्वाच्या नैसर्गिक बदलामुळे निर्माण झालेल्या शारीरिक तक्रारी सांगण्याचा संकोच, लग्नाच्या बाजारात ' सडपातळ ' असण्याचा ' प्लस पॉईंट, ' जाडी वाढल्यास पुन्हा ती कमी न होण्याचा धोका व घेतलेली धास्ती, त्यातून असमतोल आहाराची जडत गेलेली सवय, घरकामाची जबाबदारी, अभ्यासासाठी जागरण वगैरे कारणे त्यामागे दिसतात.

सौंदर्यप्रसाधनांचे वेड

आजच्या बहुतेक तरुण मुलींचे लक्ष आरोग्यदायी होण्याऐवजी सौंदर्यप्रसाधनांकडेच अधिक गुंतलेले दिसते. केवळ बाह्य रंगरंगोटीने तात्पुरत्या दिखाऊ सुंदर दिसण्याला प्राधान्य देण्याची प्रवृत्ती अपायकारक हे लक्षातच घेतले जात नाही. शिवाय गर्दीच्या ठिकाणी, बाजारपेठा व मार्केटमधून फिरायला जाणे हाच

त्यांचा व्यायाम, तेही सावकाश व रमतगमत. विशिष्ट वेळी व्यायाम व ठराविक खेळ खेळण्याची आवड तारुण्याची चाहूल लागते न लागते तोच हळूहळू कमी होऊ लागते. शिवाय हल्ली घरकामेही फार कष्टाची राहिलेली नाहीत. धुणी–भांडी, विहिरींचे पाणी ओढणें, दळण वगैरे कामेही आजच्या यांत्रिक युगात नाहीशी झाली आहेत. त्यामुळे शरीराला आपोआप घडणारा व्यायामही कमी झाला आहे. अशा शारीरिक कष्टामुळे येणारी शक्ती व घोटीव, धारदार बनविणारे श्रमही फारसे उरलेले नाहीत; कारण नळ, गिरण्या, सडलेली धान्ये मध्यमवर्गीयांनाही उपलब्ध होत आहेत. शारीरिक श्रमाचे महत्त्वही हल्ली कमी होऊन ते सुशिक्षितपणाचे व प्रतिष्ठेचे लक्षण मानले जात नाही. एकंदरीत तरुणींच्या बाबतीतही शारीरिक श्रमाची बाजू कमी झालेली आहे. पूर्वीचे झिम्मा, फुगड्या, पिंगा हे खेळाचे प्रकार कालबाह्य ठरल्याने व हल्लीचे टेबल–टेनिस, बॅडमिंटन वगैरे नवे खेळ त्याना झेपत नसल्याने पद्धतशीर व्यायाम हा भाग दैनंदिन जीवनात विसरत चालला आहे.

आर्थिक ओढाताण

काही सुशिक्षित मुलींच्या घरची आर्थिक परिस्थिती ओढाताणीची असते; पण तसे बाहेर दिसू नये म्हणून त्या पोशाख व प्रसाधने यांनाच प्राधान्य देतात. पोशाखापेक्षा त्यातल्या त्यात दूध, सकस जेवण, सत्त्वयुक्त आहार यावर भर देण्याची प्रवृत्ती अजिबात दिसत नाही. त्यांच्या अट्टाहासामुळे चारचौघांसारखे छानछोकी राहण्यासाठी पालकांनाही नाइलाजास्तव त्यावर खर्च करणे भाग पडते. परिणामी या विकासकालात सत्त्वयुक्त खाणे मिळेल याकडे कटाक्षाने लक्ष पुरविता येत नाही. आज बदाम खाणे परवडणार नाही हे तर खरेच; पण भुईमुगाचे दाणेसुद्धा न परवडण्याइतपत परिस्थितीतून जाणाऱ्या कुटुंबांना तरुणींच्यावर पोशाखी खर्च करणे भाग पडते. मग दूध, भाजी, फळे, सत्त्वयुक्त धान्य व कसदार अन्नाच्या बाबतीत हात आखडता घ्यावाच लागतो. शिवाय मुलांपेक्षा मुलींना कनिष्ठ लेखण्याची प्रवृत्ती, त्यांच्या खाण्यापिण्याकडे नकळत व काही कुटुंबात जाणीवपूर्वक तौलनिकदृष्ट्या होणारे दुर्लक्ष, त्याही स्वत: होऊन उपेक्षा सहन करण्यात, धन्य मानण्यात व त्यागाच्या भूमिकेत जाऊन स्वत:ची आबाळ करून घेताना दिसतात. सुशिक्षित कुटुंबांतूनही मुलींची उपेक्षा व अनास्था होत असल्याचे प्रकर्षाने जाणवते.

व्यायाम का जमत नाही ?

हल्लीच्या सुशिक्षित मुलीही आरोग्यसंपन्नता व सुदृढता यांकडे दुर्लक्ष करताना आढळतात. वाटेल तितक्यांदा चहा घेणे, बारीक दिसावे म्हणून आहार

मर्यादित करणे, विनाकारण व अभ्यासासाठीही न झेपणारी जागरणे करणे, सिनेमाचा नको तितका छंद वगैरेंचा प्रकृतीवर अनिष्ट परिणाम जाणवतो. मोकळ्या हवेत भरपूर व्यायामाचे तंत्र जमत नाही व त्यांना जमविण्याची तीव्र इच्छा व मनापासून फारशी आवडही नसते. मग जागा नसते म्हणा, लाज वाटते म्हणून, वेळ नसण्याचे कारण पुढे करून, आराम व आळसापोटी त्याकडे प्राधान्यपूर्वक पाहिजे जात नाही.

कुटुंबांची जबाबदारी

काही तरुण मुलींना घरची कामे करून शिकावे लागते. आजारी आई, लहान भावंडे, रिटायर्ड वडील, उनाड भाऊ यांमुळे अशा वयात काही जणींना न झेपणाऱ्या जबाबदाऱ्या घ्याव्या लागतातही. घरकाम अटळ असले व आरोग्यास अपायकारक नसले तरी 'पोरीची जात, उद्या सासरी जायची. मग सगळं यायला नको का?' हा अंतस्थ हेतू ठेवून परीक्षेच्या काळातही कामांतून सुटका न मिळाल्याची उदाहरणे दिसतात. मुलांची 'पुरुष' म्हणून सर्व कामांतून सुटका व मुलींवर अनेक कामांच्या जबाबदाऱ्या असेही घडत राहते. काही मुली सोळाव्या वर्षातच चरकातून ओढून काढल्याप्रमाणें सत्त्वहीन, किडकिडीत, दुर्बल अशा दिसत राहतात.

मुलींचे आरोग्यविषयक बाबींबद्दल अज्ञान व चुकीच्या कल्पनाही या परिस्थितीस जबाबदार आहेत. पौगंडावस्थेत ऋतुप्राप्तीनंतर होणारे शारीरिक बदल यांविषयीची माहिती त्यांना जाणीवपूर्वक व शास्त्रीय पद्धतीने मिळते असे नाही. त्या दृष्टीने त्या वाचन, विचार व सल्ला घेताना आढळत नाहीत. आई व कुटुंबातील मोठ्या मंडळींकडून ती समजून घ्यायला व घ्यायला हवी इतपत मैत्रिणीसारखी नाती असत नाहीत. त्यामुळे अशा वयात उद्भवणाऱ्या आरोग्य-विषयक तक्रारी त्यांच्याकडून दाबून ठेवल्या जातात. त्याचाही शारीरिक वाढीवर अनिष्ट परिणाम होतो. काही भावनाशील व अर्धवट ज्ञान असणाऱ्या मुली सुरुवातीलाच एक प्रकारचा धसका घेतात. वाकून व पोक काढून, खाली मान घालून चालण्याच्या सवयी लागतात. खुजेपणा, उंची न वाढणे, खांदे झुकवून चालणे, पाठीची विचित्र ठेवण वगैरे गोष्टी यांतूनच उद्भवतात. शिवाय त्यामुळे येणाऱ्या न्यूनगंडामुळे त्यांच्या मोकळेपणाने वागण्यावर व मित्रमैत्रिणींमध्ये मिसळण्यावर मर्यादा पडतात. त्या एकलकोंड्या व 'मूडी' बनण्याचा धोका असतो.

आदर्शही सिनेनटयांचे !

उत्कृष्ट खेळाडू, स्ट्राँग व स्टाऊट अशा मुली, उत्तम शरीरसौष्ठव असलेल्या

तरुणींविषयी थोडसे । १५१

ॲथलिट्स अशांचे आदर्श मानणाऱ्या तरुणींची संख्या कमी. उलट सिनेमा नटी, जाहिरातीतील नखरेल स्त्रिया, पोस्टर्सवरील तरुणी वगैरेंचे आकर्षण त्या वयात वाजवीपेक्षा जास्त असल्याने व तेच योग्य वाटल्याने अनुकरणप्रियतेच्या पोटी आरोग्यसंपन्नतेकडे नकळत दुर्लक्ष होते. शिवाय त्याचे महत्त्वही त्या वेळी लक्षात घेण्याइतपत कुवत व प्रगल्भता आणि जाण व भानही नसते. नटचा, नायिका, मॉडेल्स ह्या मेकअप, वेषभूषा व फोटोग्राफी यांमुळे तशा दिसतात. हे फसवे चेहरे व शरीरे तरुणींना स्लिमनेसचे नको तितके फॅड व डाएटिंगच्या अतिरेकाकडे वळवितात. तशाच आहाराची सवय अंगवळणी पडल्यास पचनशक्ती कमी होऊ लागते. पोटाचे विकार उद्‌भवण्याचा धोका असतो. अर्थात बहुतेक नवतरुणी पिटुकल्या अशाच असतात असे नाही; पण अशांची संख्यादेखील वाढत असल्याचे जाणवते.

मानसिक विकासाचा काळ

सोळा ते बावीस वर्षे वयाच्या दरम्यान मुलींचा मानसिक विकास होतो असे मानले जाते. या विकासाच्या काळात विचार, आवडी–निवडी, मते, भावना, प्रवृत्ती व कल या दृष्टीने ठामपणा येतो. न पटणाऱ्या गोष्टी, नावडत्या घटना, नको ते प्रसंग कुटुंबात निर्माण झाल्यास यांच्या दृष्टीने अस्वस्थता येते. अशा तरुण मुलींवर काही पालक नको तितकी बंधने घालून सर्वार्थाने कुचंबणा करतात व आयुष्यातील महत्त्वाचा काळ बोअर असा घालविण्यास भाग पाडतात. तर काही जण त्यांना नको तेवढे स्वातंत्र्य देतात. या वयातील त्यांची मानसिक अवस्था लक्षात न घेता, समजूतदारपणाने त्यांच्या नैतिक जबाबदारीची जाणीव करून न घेता, सहानुभूतिपूर्वक व विश्वासाने चर्चा न करता केवळ सतत त्यांच्या उणिवा व वर्तणुकीतील दोष काढत राहिल्याने मतभेद व वाद उद्‌भवतात. आई–वडील व तरुणी यांच्यातील 'जनरेशन गॅप,' कौटुंबिक स्वास्थ्य व सौहार्द बिघडून टाकते. कन्यकांचे मन घोटाळ्यात, संभ्रमात, कोंडीत पडून तराजूच्या अस्थिर काट्याप्रमाणे आंदोलन करीत राहते. त्यातून मनस्ताप होऊ लागतो. परिणामी तरुणींच्या मनाचे गुंते त्यांच्या आरोग्यावर ठसे उमटवितात. अलीकडच्या मुली म्हणजे अमर्याद वागणाऱ्या, चालरीत, शालीनता यांविषयी बेफिकीर, स्वतंत्र वागणुकीने बिथरलेल्या व वेगळ्या विचारांनी भारलेल्या असा विकृत दृष्टिकोन स्वीकारणारी प्रौढ मंडळी त्यांच्या क्लेशास व संघर्षास वाव देतात. परिणामी उचित कोणते ? नव्या–जुन्यातील उत्तम ग्राह्यांश कोणता ? टाकाऊ काय व निवड कशाची ? या दृष्टीने कर्त्या चालकांनी मार्गदर्शन करण्याची, निकोप अन् निर्मळ दृष्टिकोनातून त्यांच्याकडे पाहण्याची वृत्ती स्वीकारण्यास तरुणींचे मानसिक आरोग्य जपण्याची आवश्यकता आहे.

अशा वयात विवाहविषयक अनेक छोटे-मोठे प्रश्नही भांबावून टाकतात. तरुणांचा सहवासही हवाहवासा वाटतो. काही तरी थ्रिलिंग घडावे असे वाटते. तर एकदम उदासीनता व पोकळी जाणवणारी स्थितीही उद्‌भवते. कळत व नकळत एखाद्यामध्ये मन गुंतण्याची शक्यता नाकारता येत नाही. नैतिकतेच्या रुळलेल्या पाऊलवाटांवरून पाय घसरण्याचे क्षणही येतात. त्यामुळे निर्माण होणारी रुखरुख, त्यासाठी द्यावा लागणारा मानसिक झगडा, चुकून व अज्ञानापोटी होणारी फसवणूक तरुणींना निस्तेज करण्यासही काही वेळा कारणीभूत ठरते. अश्लील साहित्य, उत्तान चित्रपट, सभोवतालची अनीतीचे उदाहरणें, शृंगारिक वर्तणूक व चोरट्या संबंधाचे दर्शन, नको ते दृष्टीस पडण्याच्या संधी वगैरेंमुळेही त्यांच्या मनात एकीकडे पुरुषांच्या सहवासाचे आकर्षण आणि दुसरीकडे समाजाची भीती अशा द्विधा मनःस्थितीत काही जणींची प्रकृती हळूहळू ढासळते.

अशा रीतीने बालिकेच्या जीवनात येणारा नैसर्गिक टप्पा म्हणजे तारुण्य. त्या काळात आई-वडिलांनी अत्यंत जागरूकतेने त्यांचे मानसिक व शारीरिक आरोग्य जपण्याच्या दृष्टीने लक्ष दिले पाहिजे. तरुण वयात आरोग्यविषयक काळजी व शरीराची योग्य वाढ ही भावी आयुष्यातील जबाबदाऱ्या पेलण्यासाठी आवश्यक आहे हे त्यांनीही स्वतः लक्षात घेऊन मुलींच्या पाल्यांच्या लक्षात आणून द्यायला हवे. खेळाचे महत्त्व, योग्य आहार, व्यायामाची गरज, तारुण्यसुलभ भावनांवर मर्यादा घालण्याची वृत्ती, विविध नैसर्गिक आसक्तींवर बंधने घालण्याचा संयम व त्या दृष्टीने विविध छंद व क्रियात्मक उपक्रम हाती घेण्याचा ध्यास घेऊन आपले मन सतत विधायक विचार व कृतींमध्ये गुंतविल्यास आरोग्यसंपन्नता प्राप्त होईल. या दृष्टीने तरुणींचे उद्‌बोधन व भावनाविकारांचे उदात्तीकरण व्हायला हवे. सकस वाचन, बौद्धिक खाद्य, महत्त्वाकांक्षी उपक्रम, स्नेहसौहार्दाचे कौटुंबिक वातावरण, आई-मुलीचे मैत्रिणीसारखे नाते, समाजकार्य व शिक्षणेतर उपक्रमाची गोडी त्यांना सुरुवातीपासून लागेल, या दृष्टीने पालक, शिक्षक, समवयस्क मंडळींनी प्रयत्न करायला हवेत.

स्वतःच मार्गदर्शक

तारुण्यात पदार्पण करणाऱ्या सुशिक्षित मुलींनीही इतरांचे मार्गदर्शन व सल्ला यांच्या आधाराची वाट पाहत न राहता स्वतः आरोग्यसंपन्नतेला प्राधान्य देऊन, त्या दृष्टीने माहिती घेऊन, मन व शरीर ताजेतवाने व रसरशीत ठेवून जीवनातील निर्भेळ आनंद उपभोगायला शिकले पाहिजे. हा प्रश्न केवळ व्यक्तिगत नसून तो सामाजिक बनत आहे; कारण आजच्या तरुणी उद्याच्या चतुर गृहिणी, सुजाणमाता, कर्तृत्ववान नागरिक आणि कार्यक्षम उत्पादक-घटक आहेत हे

समाजाने लक्षात घेऊन दक्षता या दृष्टीने उपायात्मक बाजू मांडायला हवी. माध्यमिक व महाविद्यालयीन पातळीवर शिक्षणक्रमात याचा विचार केला गेलेला नाही. आरोग्यविषयक सर्वसाधारण पथ्ये, सुदृढतेच्या दृष्टीने इष्ट गोष्ट व घटक, मुलींच्या बाबतीतील खास प्रश्न व घ्यावयाची काळजी आणि दक्षता वगैरेंचा समावेश अभ्यासक्रमात नसला तरी तात्पुरता उपाय म्हणून लेडीज असोसिएशनस्, एन. एस. एस., एन. सी. सी., अभ्यास मंडळें यांमार्फत या विषयांवर व अनुषंगिक बाबींवर व्याख्याने, प्रात्यक्षिके व परिसंवाद आयोजित केले जावेत.

ज्यूदो, योगासन यांचे महत्त्व लक्षात घेऊन ते त्यांना देण्याचा प्रयत्न व्हायला हवा. लेडी डॉक्टर्स, क्लब्ज, मंडळे, संघटना यांनी पुढाकार घेऊन ह्याबाबत जागरुकता निर्माण करायला हवी. नाक, घसा, डोळे यांची मोफत तपासणी व शिबीरे आयोजित केली जातात, त्याप्रमाणे शैक्षणिक संस्थांच्या मदतीने वा डॉक्टर मंडळींनी अशा मुलींची तपासणी करून सल्ला व मार्गदर्शन करण्याचे उपक्रम हाती घ्यावेत. स्वयंसेवी संस्था, शिक्षक संघटना, पालक मंडळींनी मुलींच्या आरोग्यसंपन्नतेच्या दृष्टीने जागरूक राहून त्यांच्या खोटचा व फसव्या कल्पना मोडून काढल्या पाहिजेत. अगदीच अडाणी, वयाने अल्लड आणि बुद्धीने व्रात्य नसलेल्या तरुणींनीच याचा गंभीर विचार करण्याची गरज आहे. सुज्ञपणे व जाणीवपूर्वक आरोग्याची काळजी घेण्यास सर्वाधिक प्राधान्य देण्याची आवश्यकता आहे.

हुंडाविरोधात तरुणींचेही बंड आवश्यक

कुटुंबात मुलगी जसजशी मोठी होत जाते, तसतसे बहुसंख्य माता–पित्यांसमोर तिच्या लग्नाचे प्रश्नचिन्ह आकाराने मोठमोठे होत जाते. हल्ली सर्वसाधारणपणे मध्यमवर्गीय मुलींनाही शिक्षण देणे शक्य झाल्याने आणि बाजारात 'सुशिक्षित मुलगी' हा एक अनुकूल घटक ठरत असल्याचा अनुभव येत असल्याने, माध्यमिक व शक्य झाल्यास पदवीपर्यंतच्या शिक्षणाचा टप्पा बिनधोकपणे गाठू देण्याची आईवडिलांची तयारी असते. शिवाय आर्थिक कोंडी सोडविण्यास हातभार म्हणूनही शिकल्यावर मुलीला नोकरी लागेल या हेतूने जाणूनबुजून शिक्षण बंद केले जात नाही. नोकरी करणाऱ्या मुलीचे लग्न जमविणे सोपे जाते.

हुंडा ही अत्यंत जाचक, पिळवणूक करणारी व मुलीच्या मातापित्याची झोप उडविणारी पद्धत आहे. हुंड्याची तरतूद करता न आल्याने मुलींचे विवाह लांबणीवर पडतात. हुंडा कमी दिल्याने विवाहानंतर सासरच्या मंडळींकडून

विवाहित मुलीचा छळ केल्याच्याही बातम्या नवीन नाहीत. हुंडा हे शोषण आहे. ते परावलंबित्वाचे द्योतक, लांच्छनास्पद बाब आहे. त्यामुळे वैयक्तिक, कौटुंबिक व सामाजिक जीवनात अनिष्ट परिणामांना तोंड द्यावे लागते. हुंड्याची अमानुष प्रथा बंद व्हावी म्हणून सरकारने कायदा केला; पण तो केवळ कागदावर राहिला आहे. हुंड्याच्या बाबतीत तर हल्ली चढाओढ सुरू झाली असून ती प्रथा अधिकच रूढ होत असल्याचा अनुभव येत आहे.

हुंड्याच्या बाबतीत विचार करता असा प्रश्न निर्माण होतो की, विवाहेच्छू तरुणींना तरी हुंडा न देणे पूर्णपणे पसंत आहे काय? याचे उत्तर होकारात्मक मिळेलच, असा भरवसा राहिलेला नाही. सामाजिक जाणिवा असलेले व रूढीच्या शृंखला तोडण्याची जिद्द असलेले पुरोगामी विचारांचे तरुण हुंडा न घेता लग्न करण्याची शपथ घेतल्याच्या बातम्या वाचनात येतात. गारगोटी येथील आचार्य जावडेकर विनय भवन या बी. एड्. कॉलेजातील विद्यार्थ्यांनी हुंडा न घेण्याची शपथपूर्वक प्रतिज्ञा केल्याचा प्रसंग अजूनही स्मरणात आहे; पण त्याच वेळी विद्यार्थिनी मात्र तसा निश्चय करून प्रतिज्ञा करण्यास पुढे आल्या नाहीत. अर्थात त्यांना हुंड्याविषयी विचारले असता त्या म्हणाल्या, 'ते आम्ही कोण ठरविणार? आईवडील बघतील.' असे सोयीस्कर उत्तर देऊन त्यांनी पळवाट काढली. विद्यार्थ्यांपैकी किती जणांनी आपला निश्चय शेवटपर्यंत पाळला याचा मागोवा घेतलेला नाही. पण ज्यांना हुंडा ही प्रथा अत्यंत जाचक व शोषक वाटली पाहिजे, त्या तरुण मुलींनी त्या प्रश्नाचा निषेध करायला हवा. प्रखर प्रतिक्रिया व्यक्त करायला हव्यात. पण तशी बहुसंख्य जणींची तयारी असत नाही, हे खरे दुर्दैव आहे. याला अपवाद असतीलही; पण तुरळक. बहुसंख्य तरुणींबाबतीत एकूण निराशाजनक अनुभव येतो.

हुंडाविरोधी विचार मांडून त्या दिशेने कृती करण्याचे धाडस नसल्याने व जुळत आलेले लग्न आपल्या विचारामुळे मोडेल असे भय असल्याने बहुसंख्य तरुणी आपला विरोध नोंदवीत नसतील, पण या रूढीविरुद्ध सामुदायिक आवाज व संघटित विरोध करण्याची गरज आहे हे तरी अमान्य होण्यासारखे नाही. अशा तरुणींशी चर्चा करता, हुंड्याला त्यांचा विरोध नसल्याचे त्यांच्या बोलण्यातून जाणवले. वारसा कायद्याने मुलीला वडिलांच्या संपत्तीवर हक्क सांगण्याचा अधिकार प्राप्त झालेला आहे. कायदा केलेला असला तरी तशी वाटणी मागण्याचे धाडस मुलींमध्ये नाही व त्या विचाराला व कृतीला अजूनही सामाजिक मान्यता मिळालेली नाही. तेव्हा कायद्याने हिस्सा मागण्यापेक्षा समानतेचा हक्क हुंड्याच्या मार्गाने तो मिळविण्याचा त्या प्रयत्न करतात, असे सुशिक्षित मुलींच्या विचारसरणीच्या आधारे म्हणता येईल.

हुंड्याला कडाडून विरोध न करण्याच्या प्रवृत्तीमागे आणखी एक कारणही असेल असे वाटते. ते म्हणजे लहानपणापासून भावांवर अधिक खर्च करण्यात येतो. मुलगी म्हणून आपल्याकडे दुर्लक्ष केले जाते. नेहमीच मुलगा-मुलगी यांच्यात 'डावे–उजवे' होऊन मुलाकडे झुकते माप पडते. तेव्हा आता तरी संधी मिळतेय असा विचार करून त्या हुंड्याला तर विरोध करीत नाहीतच; पण मानपान, रुखवत, भांडी, गोदरेज, स्कूटर वगैरेंचीही मागणी त्यांना अस्थायी वाटत नाही. या बाबतीत विनासंकोच आपली मते व्यक्त करताना त्या आढळतात. तिसरे कारण असे की, एकदा लग्न झाल्यावर आपल्याला माहेरच्या घरी हक्काने काही मागता येईल की नाही, याविषयी त्या साशंक असतात. विशेषत: भावाचे लग्न होऊन वहिनी घरी आल्यावर तर माहेर व भाऊसुद्धा दुरावणार आणि 'भाऊबीज' धोक्यात येणार या जाणिवेने लग्नातच अधिकाधिक मिळविता आले व आपल्या संसाराला ते उपयुक्त ठरले तर बरे, हा विचार करणाऱ्या व्यवहारी तरुणींची संख्या कमी नाही.

असेही दिसते की, जितका हुंडा जास्त, तितके सासरी आपले वर्चस्व अधिक राहील अशी त्यांची सुरुवातीला दृढ कल्पना असते. हुंडा जास्त दिल्याने व आंदण म्हणून स्कूटर, भांडी, गोदरेज वगैरे वस्तू दिल्याने नवरा आपल्या ताब्यात राहील या भ्रमात असणाऱ्या तरुणी हुंड्याला विरोध दर्शवीत नसाव्यात. काही वेळा स्वतंत्र ब्लॉक घेऊन राहण्याची सोय करून देणारे सासरे आपल्या जावयाला कन्येच्या शब्दात ठेवण्यात यशस्वी होतात, असे अनुभव पाहण्यात येत असल्याने विवाहेच्छू तरुणींना वाटते की, माहेरकडून अधिक हुंडा देणे आपल्या वैवाहिक सुखाला कारणीभूत ठरेल.

श्रीमंत स्थळाकडे कल

एखादा गरिबीतून वर आलेला, जिद्दीचा व प्रामाणिक तरुण पती म्हणून निवडण्याऐवजी श्रीमंत व विशेषत: एकटा मुलगा असल्यास त्याची निवड करण्याचा बहुसंख्य तरुणींचा कल असतो. लग्न व विवाहसुख याविषयीच्या उथळ व बेगडी कल्पना त्यांच्या डोक्यात बसलेल्या असतात. श्रीमंत स्थळ हे वैवाहिक सुख मिळविण्याचे एकमेव साधन मानून त्या दृष्टीने त्या विचार करतात. 'श्रीमंती' चा निकष महत्त्वाचा मानला जात असल्याने, त्यांच्या मनात हुंड्याविषयी घृणा नसते; कारण अधिक हुंडा हे श्रीमंत स्थळ मिळविण्याचे परिणामकारक साधन असल्याने त्यांना हुंड्याविषयी एक प्रकारचा जिव्हाळा वाटत राहतो. कारण दागिने, कपडालत्ता व श्रीमंतीचे प्रदर्शन करण्याची हौस लग्नानंतर अधिक उफाळून येते. ती हौस भागविण्यासाठी श्रीमंत सासरचे आकर्षण वाटते. त्यातूनच

त्या हुंड्याचे समर्थन करीत राहतात. श्रीमंत सासरच्या अटींची पूर्तता झाल्यास शरीराने किरकोळ मुलगा नवरा म्हणून पसंत करण्याची प्रवृत्तीही काही जणींच्यात दिसून येते.

अनावश्यक तुलना

काही कुटुंबांत दोन-तीन मुली असल्यास मोठ्या बहिणीच्या लग्नात जितका खर्च केला असेल तितकाच खर्च आपल्या लग्नात झाला पाहिजे, असा अट्टाहास धरण्याची प्रवृत्ती दिसते. कुटुंबातील मोठी मुलगी म्हणून तिच्यावर असलेल्या जबाबदारीमुळे ती फार शिकलेली नसेल, अथवा दिसायला थोडी डावी असेल किंवा तिच्या लग्नाच्या वेळी कुटुंबाची आर्थिक परिस्थिती चांगली असेल, म्हणून तिच्या लग्नात हुंडा देऊन मानपान करण्यासाठी पैसा खर्च करावा लागला तर पुढे आईवडिलांना ते जाचक ठरते; कारण खालचे नंबर तोच आदर्श मानून त्या दृष्टीने बरोबरी करण्याची आग्रही भूमिका स्वीकारतात.

लग्नाला बाजारी स्वरूप येण्यास पुरुषप्रधान संस्कृती कारणीभूत आहे, हे जरी मान्य असले तरी त्या प्रवृत्तीला खतपाणी घालण्याचे कामही वधू व संबंधित मंडळींकडून होत असते, हे नाकारता येत नाही. फक्त हुंडा देण्या-घेण्यावरून लग्न मोडले की, हुंड्याचे अनिष्ट परिणाम जाणवू लागतात. पण सौदा पटला व आवाक्यातला असला की ती प्रथा जाचक वाटत नाही. लग्नासाठी वधू-वरविषयक जाहिराती पाहिल्या की देखणेपणा, उत्पन्न, व्यवसाय, उंची, स्वभाव वगैरेंविषयी स्पष्ट अपेक्षा व्यक्त करून जाहिरात दिली जाते. योग्य निवडीसाठी व माहिती या स्वरूपाचे जाहिरातीचे माध्यम लग्न जमविण्यासाठी उपयुक्त ठरते हे मान्य; पण अमुक इतका पगार, डॉक्टर, इंजिनिअर, आय. ए. एस. ऑफिसर, प्राध्यापक असा व्यवसायाचा क्रम लावून शहरात राहणारा, चष्मा नसलेला, शक्यतो स्वतंत्र असल्यास प्राधान्य वगैरे स्वरूपाच्या जाहिरातींची वाढती संख्या पाहिली की, तरुणींची लग्ने लांबणीवर पडण्यास व त्यांना कौटुंबिक संघर्षाचा, सामाजिक असमतोलाचा व त्यास बाजारी स्वरूप येण्यास मुली व तिचे पालकही जबाबदार ठरतात. जेव्हा उत्पन्न व पेशा यांना प्राधान्य देऊनच पतीची निवड करणाऱ्या व त्याच विचाराला मनापासून किंवा अनिच्छेने पाठिंबा देणाऱ्या आईवडिलांना, त्याच धर्तीवर हुंडा मागण्यास वर किंवा वराकडील मंडळींना अनैतिक व अपराधी वाटत नाही. तेही आपल्या बाजूने या सौद्यात प्रबळ प्रश्न म्हणून विनासंकोच अटी घालतात. परिणामी वधु-वरांच्या एकमेकांच्या पसंतीनंतर प्रत्यक्षात ते पक्के होण्याच्या दृष्टीने बसलेल्या बैठकीवर आणि वधू ही बाजारातील वस्तू मानून, भाव कमी-अधिक करून त्यास व्यावसायिक स्वरूप आणले जाते.

पूर्वीपेक्षा आजची सामाजिक परिस्थिती, मुलीकडे पाहण्याचा दृष्टिकोन यात बदल जाणवत आहे. स्त्री–शिक्षणाचा प्रसार, समाज परिवर्तनामुळे स्त्रियांना येऊ लागलेले आर्थिक स्वातंत्र्य, समाजप्रबोधन व स्त्री–मुक्ती चळवळीचे उमटू पाहत असलेले पुसट पडसाद, विविध माध्यमांद्वारे तरुणी व स्त्रिया यांच्यात येऊ लागलेली जागरूकता यांचा फायदा विवाह करू इच्छिणाऱ्या तरुणींनी घ्यावा. सामाजिक रूढी व परंपरा यांविरुद्ध आग्रही मते मांडावीत. लग्नाच्या संदर्भात जात, हुंडा, श्रीमंती, घराणे हे वर्षानुवर्षे जबरदस्त महत्त्व प्राप्त झालेले निकष विवाहोत्सुक तरुणींच्या विरोधामुळे निष्प्रभ ठरतील असे नाही; पण ते अधिकाधिक दृढ होऊ नयेत व स्त्रियांचे आर्थिक, सामाजिक व कौटुंबिक स्थान आणखी दुय्यम करण्याचे हत्यार किंवा साधन बनू नयेत, याची दक्षता घेतली जावी.

स्त्री–स्वातंत्र्य, स्त्री–मुक्ती यांविषयी विचार मांडले जात आहेत. महिला संघटित होत आहेत. राष्ट्रीय पातळीवर परिषदा आयोजित करून स्त्रियांचे प्रश्न चर्चिले जात आहेत. या वातावरणाचा फायदा घेऊन हुंड्यासारख्या प्रथांना आळा घालण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत. नव्या जाणिवा जागृत करण्याचे व समाज परिवर्तन घडवून आणण्याचे प्रयत्न या ना त्या स्वरूपात सर्व आघाड्यांवर चालू आहेत. तरुणींनीसुद्धा सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेतील आपला वाटा यथाशक्ती उचलण्याची जिद्द बाळगली पाहिजे.

आजच्या तरुणींची कोंडी

'आजच्या तरुणींची दुःखे किंवा कोंडी' ह्याविषयी लिहिताना 'तरुणी' हा शब्द सर्वसाधारणपणे मध्यमवर्गीय व बहुसंख्य तरुण वर्गाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या युवती यांच्यासाठी वापरला आहे. शिवाय आधुनिकतेच्या नावाखाली कामप्रधान व स्वैर जीवनाची चव तामसीपणाने चाखणाऱ्या, सिगरेट, मद्यपान करणाऱ्या उच्चभ्रू समाजाच्या तरुणींच्या दुःखांचा विचार या ठिकाणी केलेला नाही. अविवाहित पण शारीरिकदृष्ट्या विवाहास पात्र ठरणाऱ्या म्हणजे मासिक पाळी सुरू झाल्यानंतर ते विवाह होईपर्यंतच्या वयोमानातील तरुणींची दुःखे सांगण्याचा हा अल्पसा प्रयत्न आहे. शिवाय प्रत्येक दुःख किंवा कुचंबणा हा स्वतंत्र लेखाचा विषयही होऊ शकतो; पण पृष्ठसंख्येची मर्यादा लक्षात घेऊन आजच्या तरुणींची दुःखे मांडण्याचा हा प्रयत्न.

आजच्या तरुणींच्या मनातील खळबळ नव्हे जित्या-जागत्या मनाची तळमळ व तगमग लक्षात घेण्यासही वडीलधाऱ्या मंडळींना सवड नाही, किंबहुना तशी

गरज वाटत नाही. तरुणींच्या मनाचे दु:ख हे आहे की, आम्ही पालक, शिक्षक, समाजकर्ते, नेते मंडळी, शासन त्यांना समजून घेण्यात कमी पडत आहोत हे मान्य करण्याची तयारीही त्यांच्याकडून दाखविली जात नाही. स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वीही तरुणींच्या समस्या होत्या. त्यांनाही संघर्षाला सामोरे जावे लागले. कौटुंबिक विरोध सहन करावा लागला. सामाजिक तणावातून जावे लागले. पण आजच्या तरुणींचे दु:ख अपेक्षाभंगाचे आहे. स्वातंत्र्यानंतरच्या काळात तरुणींची पिढी अधिक सुज्ञ, संवेदनाशील व बोलकी बनली आहे. मात्र स्वातंत्र्यानंतरच्या गेल्या पस्तीस वर्षांनंतर आजूबाजूला पाहिले तर स्वातंत्र्यसूर्याच्या उन्हाचे चटकेच बसत आहेत. फुलण्याऐवजी कोमेजण्याचे, रसरसण्याऐवजी शोषणाचे, बहरण्याऐवजी कुचंबण्याचे दिवस येत आहेत. आजची तरुणींची कुचंबणा घरात, घराबाहेर, कुटुंबात, समाजात, शिक्षणात, नोकरीत वेगवेगळ्या प्रकारे होत आहे.

आज शिक्षण घेणाऱ्या तरुणींची संख्या वाढत आहे; पण शिक्षण देताना त्यांच्या आवडीनिवडीचा विचार गौण. मुलगा असेल तर तो मनाप्रमाणे कोर्स निवडील. त्याला बुद्धिमत्ता असेल तर ठीक; पण मेरीट नसेल तरीही डोनेशनची तयारी ठेवायला पालक नाना मार्ग धुंडाळतील. तरुण मुलीच्या बाबतीत मात्र दुजाभाव. भाऊ-बहीण यांना पदोपदी वेगवेगळी वागणूक सहन करावी लागते आहे. अभ्यासासाठी वेळ, शैक्षणिक साधने व सुविधा, ट्यूशन, कपडे, शिक्षण घेताना उपक्रमातील सहभाग, छंद जोपासणे या व अशा अनेक बाबतींत त्यांच्या मनाचा विचार केला जात नाही. तरुणींचे दु:ख असे की, घरकाम करून उत्तम गुणाने पास होणारीपेक्षा उनाडक्या करून सेकंड क्लासमध्ये कसाबसा उत्तीर्ण होणारा मुलगा कौतुकास पात्र !

शिक्षणाच्या बाबतीतच नव्हे तर इतर अनेक घटना व प्रसंग असे उद्भवतात की, तरुणींना निराशा सहन करावी लागत आहे. आज बुद्धी, मन व शक्ती यांच्या सहाय्याने तरुणांच्या बरोबरीने प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर जाण्याची जिद्द बाळगणाऱ्या तरुणींचा बुद्धिभेद केला जात आहे. त्यांची मने कमकुवत बनविली जात आहेत आणि शक्ती विधायक नव्हे तर कुजेल कशी या दृष्टीने परिस्थिती निर्माण होत आहे. आजच्या तरुणींची पिढी स्वतंत्रपणे विचार करणारी आहे; पण तिच्या स्वतंत्र विचाराची खोली व मनोभूमिका जाणून घेण्याअगोदरच स्वैराचाराचे 'लेबल' लावून, त्यांना बदनाम करून आम्ही मोकळे होत आहोत. आजच्या तरुणींसमोर आदर्श नाहीत. शिवाय आजच्या सामाजिक, आर्थिक तसेच राजकीय व शैक्षणिक कोंडीची झळ प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे त्यांना पोहोचत आहे.

हल्ली घराघरांतून दोन पिढ्यांत जास्त दुरावा, वादविवाद, गैरसमज वाढत आहेत. आज त्याला 'जनरेशन गॅप' म्हटले जाते. प्रश्न असा आहे की,

पूर्वीही जनरेशन गॅप होती; पण त्या वेळी मोठ्यांची शिकवण प्रमाण मानून वागणारी लहान मंडळी होती; पण आजच्या तरुणींची पिढी निमूटपणे परंपरागत विचार, जुने संकेत व अन्यायी रूढी-प्रथा मान्य करण्यासारखी राहिलेली नाही; पण त्यामुळे ती उद्धट, बेजबाबदार व चैनी बनलेली आहे, असे म्हणून चालणार नाही; कारण यापूर्वीही असे वाद, संघर्ष व गैरसमज चालू असायचे; पण ते उघड मोठ्यांसमोर निःसंकोचपणे मांडले जात नसत. आज सामाजिक स्थित्यंतरे, व्यक्तिस्वातंत्र्याची चाहूल, अनुभवांची विविधता, शिक्षण, वाचन यांमुळे तरुणी डोळे उघडून जीवनाची वाटचाल करीत आहेत. त्यामुळे प्राप्त परिस्थिती व समोर आलेले व्यवहार यांतून जुन्या व नव्या पिढीत दुरावा निर्माण होत आहे.

अभया ही एका सुशिक्षित कुटुंबातील व आर्थिकदृष्ट्या बऱ्या स्तरातील तरुणी. घरी हुंडाविरोधी व आंतरजातीय विवाहाच्या समर्थनाची चर्चा चालायची. आई-वडील शिकलेले व सुधारलेल्या विचारांचे. शिक्षण पूर्ण होताच तिने परजातीतील मुलाशी विवाह करण्याचा आपला मनोदय नम्रपणे व्यक्त करताच कुटुंबात तप्त वातावरण. आईची जीव देण्याची धमकी तर वडिलांचा घर सोडून जाण्याचा निर्वाणीचा इशारा. अभया संभ्रमात. तात्त्विक चर्चा करणारे, पुरोगामी म्हणवून घेणारे, मित्र-मैत्रिणींच्या बैठकांत हिरीरीने आधुनिक विचार मांडणारे पप्पा-मम्मी हे तिच्या विश्वासास पात्र राहिले नाहीत. त्यांच्या ढोंगी वृत्तीच्या, खोट्या प्रतिष्ठेच्या आहारी जाणाऱ्या व पलायनवादी विचारांच्या निर्णयामुळे ती वैतागली.

रूपाली. मध्यमवर्गीय कुटुंबातील एक तरुण मुलगी. स्मार्ट व हुशार. पदवी हाती पडताच वडिलांना मदत म्हणून नोकरीला लागली. वैवाहिक आयुष्याची स्वप्ने पाहणारी व टवटवीत विचारांची मुलगी. सुरुवातीला पगाराचे पैसे जन्मदात्यांना देऊन खूष करण्यात त्यागाचे समाधान; पण हळूहळू कुटुंबाला तिच्या पैशाची चटक. वाढत्या गरजा भागविण्याची हाव. तिच्या लग्नाची आर्थिक तरतूद व इतर काळजी करण्याची गरज फारशी कुणाला वाटेचना. रेडिओ, फॅन, टेप, डायनिंग टेबल, गोदरेज, सहली, करमणूक यांकडे अधिक लक्ष पुरविणारी भावंडे व वडील. रूपालीच्या विवाहाची घाई कुणालाच उरली नाही. तिची सर्वार्थांनी कुचंबणा, मग तिला आई-वडिलांचा अनादर वाटणार नाही तर काय ? ती दुरुत्तरे दिल्याशिवाय राहील काय ? वय वाढेल तसे स्वतःला घराबाहेर इतर मौजमजेत गुंतवून घेणार नाही तर काय ? मग तरुण रूपालीवर रोष समाजाचा. आई, वडील, कुटुंबातील मंडळी ही वडीलधारी. त्यांचा दोष उघडपणे सांगणारे उद्धट ठरतील काय ?

मोहनराव हे उच्चशिक्षित, महात्मा फुलेंच्या विचाराने भारलेले. पुरोगामी

विचार मांडून नामवंत व विचारवंत म्हणून मान्यता पावलेले; पण आपल्या मुलीला महाविद्यालयात शिक्षण घेताना फक्त घर ते कॉलेज असा मार्ग आखून दिला. कसल्याही कार्यक्रमात सहभाग नाही. भाषणात स्त्री-स्वातंत्र्याचा हात आपटून विचार मांडणारे, हुंडाविरोधी बोलणारे आणि तशी आपल्या महाविद्यालयातील मुलांना शपथ घेण्याचा कार्यक्रम घडवून आणणारे मोहनराव, घरात पत्नीला बरोबरीची वागणूक तर नाहीच; पण मुलीचे लग्न ठरविताना बडा जमीनदार शोधून, चाळीस हजार हुंडा व दहा तोळे सोने देऊन मुलगी उजविली; तिच्या पसंतीचा मुद्दा गौण.

अशा वडीलधाऱ्या मंडळींकडून तरुणींनी काय शिकावं ? विचार व कृती यांमध्ये प्रचंड विसंवाद. बोलणे व वर्तन यांची इतकी दरी मोठ्यांच्या वागण्यात पदोपदी दिसत असेल तर ती मंडळी तरुणींना जवळची वाटणार कशी ? रमाबाई अत्यंत शांत व प्रेमळ आई. अभय तिचा लाडका मुलगा व किमया लाडकी मुलगी. अभयचे लग्न होऊन अभया हसतमुख व कष्टाळू सून घरात आली. किमयाला तर अभयाचे कोण कौतुक ! रमाबाईंनी सुरुवातीला कौतुक केले; पण अभय बाहेर जाताना, 'अगं, मी बाहेर जातोय' असं पत्नीला उद्देशून म्हणू लागला. तिलाच सारखा 'रेफर' करू लागला. नवविवाहित जोडप्याचे हे मानसिक मिलन हळूहळू रमाबाईना रुचेना. खटके उडायला, शाब्दिक मारहाण व्हायला, अभयला बाईलवेडचाचा शिक्का द्यायला सुरुवात झाली. किमया आश्चर्यचकित. सोज्ज्वळ, शांत व मायाळू आई संतप्त, खाष्ट व कुजकी सासू बनली. परिणामी घराला घरपण उरले नाही. किमयाला तर स्वत:च्या लग्नाबाबतीतसुद्धा धास्ती वाटू लागली, इतका धसका घेतला तिने आईच्या वागण्याचा. मग अशा वेळी तरुणींचा दोष म्हणायचा का ? समजा, अभया चुकत असेल तर रमाबाईनी तिला समजून घ्यायला नको का ?

सासू-सुनांचे संघर्ष, वहिनी-दादांचे मतभेद, आई-वडिलांचे खटके, कुटुंबात नुकत्याच वयात आलेल्या तरुणींच्या मनावर काय परिणाम करतील याचे भान या मंडळींनी ठेवायला नको का ? ते न ठेवल्याने कित्येक घरातील तरुण मुली कुढ्या वृत्तीच्या, एकलकोंड्या व दुर्मुखलेल्या बनतात. नाहीतर घराबाहेरच जास्त रमू लागतात. त्यांची घराबाहेर भटकण्याची वृत्ती शेजाऱ्या-पाजाऱ्यांना नामंजूर; 'भटकभवानी' व 'बिघडलेली तरुणी' अशाच नजरेने त्यांच्याकडे पाहणाऱ्यांनी तिच्या वर्तणुकीमागील कारणांचा विचार नको का करायला ? घरातील मंडळींनी त्यांच्याशी जवळीक नको का साधायला ? आई-वडील म्हणून केवळ जन्म देऊन भागणार नाही; पैसा पुरवून चालणार नाही, तर त्यांची मानसिक जपवणूक व्हायला हवी.

आज सामाजिक स्थित्यंतरे, व्यक्तिस्वातंत्र्याची चाहूल, अनुभवाची विविधता, शिक्षण व वाचनाने येणारी जाण, पाश्चात्त्य संस्कृतीचे आकर्षण, एकत्र कुटुंब-पद्धतीचे विघटन, यांत्रिक नाती व पैसाधिष्ठित जिव्हाळ्याचे संबंध, सांस्कृतिक पथ्यांचे बदलते स्वरूप, संभ्रमात टाकणारे घटनांचे फेर वगैरेंमुळे तरुणींची दोलायमान परिस्थिती निर्माण झालेली आहे आणि चांगले व वाईट यांतील संदिग्धता वाढून निर्णय घेण्यात अडचणी येत आहेत; पण त्या निःसंकोचपणे बोलून दाखविण्याची जवळची अशी व्यक्ती व विश्वासाचे स्थान उरलेले नाही. वडीलधाऱ्या मंडळींचा त्यांना भरवसा वाटेनासा झाला आहे, हेच त्यांचे दुःख आहे.

हुंडा, विवाह, फॅशन, करमणूक, अभ्यास, कपडे, पॉकेटमनी अशा अनेक संदर्भांत आई-वडील व तरुणींच्या बाततीत विसंवाद निर्माण होत आहेत. आज वटसावित्रीचा उपवास करून 'सात जन्मी हाच पती लाभू दे' म्हणणारी आई येता-जाता वडिलांचा पाणउतारा करते व सतत भांडत राहते. सत्यनारायणाची पूजा न चुकता दरवर्षी घालणारे वडील सत्याचा कास धरताना आढळत नाहीत. 'श्राद्ध' करणारी वडीलधारी मंडळी ती माणसे जिवंत असताना त्यांना अत्यंत तुच्छतेने वागतात. शिक्षकांना त्यांच्यामागे वाटेल ते शब्द वापरून निर्भर्त्सना करणारे पालक शिक्षक-पालक मेळाव्यात शिक्षकांची स्तुती करताना दिसतात. शिक्षक-शिक्षकेतर उपक्रमात रस घेऊन पैशाच्या पाठीमागे लागलेले आढळतात. या व अशा प्रकारच्या वागण्याने तरुणींचा मोठ्यांवरचा विश्वास उडण्याची परिस्थिती निर्माण होत आहे. अशा अनेक प्रसंगी घटना घडतेवेळी आजच्या तरुणी मुकाट्याने बघ्याची भूमिका स्वीकारू शकत नाहीत. त्या वडीलधाऱ्यांच्या वागण्यातील विरोधाभास दाखवू लागल्या की त्यांना उद्धट व बेताल म्हणण्यास आम्ही मागेपुढे पाहत नाही. हीच तर तरुणींची मानसिक व व्यावहारिक कुचंबणा आहे.

धोतराऐवजी पॅन्ट, बाराबंदीऐवजी शर्ट, शेंडीऐवजी केस वाढलेले, अंबाड्याऐवजी वेणी, नऊवारीऐवजी सहावारी, चोळीऐवजी ब्लाऊज ही आजोबा-आजीची फॅशन धुडकावून लावलीच की नाही आईवडिलांनी? मग बॉबकट, सलवार-खमीस, मॅक्सी, पंजाबी ड्रेस, कुंकू-बांगड्यांना रजा या फॅशन्सवर घसरून सतत तरुणींचा पाणउतारा करून बोलण्याची अंगवळणी पडलेली पद्धत तरुणींना रुचत नाही. त्यांच्या मेंदूत अनेक परस्परविरोधी विचारांची कोंडाळी आणि असंख्य प्रश्नांची गर्दी झालीय की ज्या प्रश्नांचे समाधानकारक उत्तरं शिक्षक, पालक यांच्याकडून मिळत नाहीत. त्याचीच तर रुखरुख तरुणींना वाटत राहते; त्यामुळे पालक व तरुणी यांच्यात उभयपक्षी असमाधान खदखदत राहते.

संवेदनाशील मनाने व डोळसपणे जेव्हा निरीक्षण करीत राहण्याचा प्रयत्न केला तेव्हा सतत दुसऱ्याशी तुलना करून तरुणी म्हणून घरात असलेल्या आपल्या मुलीला कमी लेखण्याची वडीलधाऱ्यांची प्रवृत्ती दिसते. अभ्यास, काम, हुशारी, व्यवहार, वळण, संस्कार, पैसा मिळविणे, शिवण–टिपण या संदर्भात तरुणी कमी आहेत हे दाखवून देण्याच्या संधी ते शोधत राहतात. त्यामुळे दोन्ही बाजूंनी मनःस्ताप होत राहतो. प्रौढ मंडळींना त्यांच्या लहानपणी किंवा तरुण वयात जी कामे करावी लागली, ज्या पद्धतीने जगावे लागले, ज्या जीवनप्रणालीचा अवलंब नाइलाजाने करावा लागला, त्याचे वारंवार दाखले देऊन 'आमच्यासारखं तुम्हाला काय जमतंय?' असे सतत त्यांच्यावर वाक्प्रहार करीत राहण्याने तरुणींची मनःस्थिती दुखावते. 'आम्ही दररोज दोन मैल चालत जाऊन शिकलो,' 'कंदिलावर अभ्यास करून पास झालो,' 'ट्यूशन शब्द काढायची आमची हिंमत नव्हती,' 'एकच ड्रेस धुऊन घालावा लागे;' या व अशा तऱ्हेचे उद्गार काढून आजच्या पिढीचा एकसारखा धिक्कार, उपदेश करणे, टाकून बोलणे, तुलना करणे खरे तर अयोग्य; कारण आज बसची सोय असताना चालत जाण्याची अपेक्षा अवाजवी, लाईट असताना कंदिलाच्या उजेडात अभ्यासाची गरज काय? ट्यूशन त्या वेळी लावण्याची पद्धत नव्हती व गरजही नसेल; पण सध्या त्याची आवश्यकता आहे. एकदा ट्यूशन देण्याचा निर्णय घेतल्यावर पुन्हा त्याच विषयावर बोलून 'बोअर' करण्यात अर्थ काय? एकच ड्रेस घालून शाळा शिकण्याने शिक्षणाची उदात्तता वाढते असे नाही. परिस्थितीत बदल झालेले आहेत ते प्रौढांनी जाणून घ्यायला हवेत. प्रोत्साहन, उत्तेजन, सहानुभूती, विश्वास, अनुभवाचा आधार व मदत मिळावी अशी अपेक्षा धरणाऱ्या तरुणींना तशी साथ न मिळाल्याने त्या दुःखी होतात.

विवाह न झालेल्या पण वयात आलेल्या तरुणींची अवस्था व प्रश्न जुनी पिढी विचारात घेतेच असे नाही. पौगंडावस्थेत शरीर व मन यांच्यात जे बदल होतात, त्याची पूर्वकल्पना कित्येक माता आपल्या मुलींना देतातच असे नाही. आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक ती स्वच्छता व इतरही माहिती याबद्दल आईजवळ उघडपणे बोलण्याइतपत जवळीक किती मातांनी निर्माण केलीय? ह्याचा विचार व्हायला हवा. मुली वयात आल्यानंतर, तारुण्यात पदार्पण केल्यानंतर तरुणांविषयीच्या नैसर्गिक आकर्षणातून त्यांच्या वागण्यात होणाऱ्या फरकाची दखल घेऊन त्यांना बोलके करण्याची जबाबदारी पालकांनी घ्यायला हवी. अज्ञान, उत्सुकता, थ्रिल यांतून अनेक वेळी नको ते घडून गेल्यावर जागे होऊन तरुणींना दोष देण्यासाठी सरसावण्यात अर्थ तरी काय? आज समाजात अनेक कारणांनी तरुणींचे विवाह उशिरा होत आहेत; पण त्यांचे कामविकार जागृत होतात.

त्यातच अश्लील वाङ्मय, उत्तान व भडक चित्रपट, वडीलधाऱ्यांची सैल वागणूक, नीतिमूल्यांची उलथापालथ, अनैतिकतेच्या संकल्पनांतील बदल, स्वातंत्र्याचा स्वैराचार असा लावला गेलेला सोयीस्कर अर्थ आहे. पण अशा वेळी 'तरुणी बिघडल्या' असे संबोधून आपण तोंडसुख घेतो, कुचेष्टा करतो.

त्यांच्या वागण्याची जुन्या पिढीकडून अशी अपेक्षा नाही; मात्र त्यांचे मानसिक ताण व कुचंबणा लक्षात घ्यायला हवी, ही त्यांची आंतरिक व्यथा आहे. त्या आपली खरी गरज दाखवू शकत नाहीत. सांगून, बोलून उपयोग होत नाही असा त्यांचा अनुभव आहे. या विषयावर बोलण्याइतपत त्यांचा विनासंकोच जवळीक कुणाशी असत नाही; त्यामुळे अनेक दुष्परिणाम पाहावयास मिळतात. तरुण वयात होणाऱ्या शारीरिक व मानसिक बदलाची शास्त्रीय माहिती व विश्लेषण करून देण्यात वडीलधारी मंडळी कमी पडतात. त्यातून लैंगिक विकृतीची, चोरटेपणा व अयोग्य गुप्तता पाळण्याची, उत्सुकता व आकर्षणापोटी नको ती पुस्तके चोरून वाचण्याची आणि दडपणाखाली वावरण्याची प्रवृत्ती तरुणींमध्ये वाढत जाण्यात आपण नकळत कारणीभूत ठरतो, ते मान्य करण्याचा प्रामाणिकपणा दाखविण्याची गरज आहे व ते सुधारण्याची आवश्यकता आहे. तरुण–तरुणींना आपुलकीने जवळ घेणाऱ्यांची संख्या रोडावत आहे. ह्या वयात वडिलांनी मुलाचा मित्र व आईने मुलीची मैत्रीण बनायला हवे. त्यांची नाती बरोबरीची, मित्रत्वाची, रक्ताच्या नात्याहूनही मनाने जवळ येणारी असली पाहिजेत; तसे घडत नाही. तारुण्यात स्वातंत्र्य व संस्कार यांत झगडा सुरू असतो. अशा वेळी वडीलधाऱ्यांची जवळीक, आधार व विश्वास मिळाला तर स्वातंत्र्याची जागा स्वैराचाराने घेतली जात नाही; ह्याची जाणीव ठेवणारी मंडळी रोडावत आहेत, हेच त्यांच्या मनीचे दुःख होय.

सामाजिक परिवर्तनास कारणीभूत ठरणाऱ्या अनेकविध सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय बदलांमुळे समाज तळापासून ढवळून निघत आहे. सच्चाई, कष्ट व त्याग यांमुळे मनुष्याला चांगले जीवन जगता येत नाही. त्याऐवजी खोटेपणा, लाचलुचपत, दांभिकता व लाचारीने जगणाऱ्यांची चंगळ आहे, हे दाखवून देणारी प्रौढ पिढी आहे. मग तरुणींनीही कोणती दिशा निवडायची ? कोणते मार्ग स्वीकारायचे ? त्यामुळे त्या द्विधा मनःस्थितीत व भांबावलेल्या आहेत. विवाहाची वाट पाहत राहणे, त्यासाठी अनेकांच्या डोळ्यांखालून स्वतःच्या शरीराला 'दाखवून' घेण्याच्या दिव्यातून जाणे, होकारानकाराच्या प्रतीक्षा व त्याचा घरातील मंडळींकडून पाडला जाणारा कीस व नको तेवढी चर्चा, लग्न जमेपर्यंत चेहरा चांगला राहावा, स्थूलपणा वाढू नये यासाठी प्रसाधनांचा वापर व जिभेवर ताबा ठेवता ठेवता व लग्नाळू कुमारिका दिसण्यासाठी सगळे 'मेन्टेन'

करीत राहण्याचे टेन्शन पूर्वीच्या पिढीने समजून घ्यायला हवे. नोकरी करणाऱ्या तरुणींना निदान स्वतःच्या एक्स्प्रेशनला वाव तरी मिळत राहतो; पण शिक्षण घेत राहणाऱ्या व घेऊन घरी बसणाऱ्या, शिक्षण अर्धवट सोडलेल्या तरुणींना सर्वांत स्वस्त व परवडणारा मार्ग म्हणजे मनोरंजनासाठी सिनेमा पाहत सुटणे अथवा घरकाम करून, कुणाचीही तक्रार चालणार नाही अशा बेताने, रोज मैत्रिणींच्या घोळक्यातून फिरायला जाणे व मंदिरांचा आधार घेऊन भाविकपणे पुढच्या टप्प्यासाठी आशीर्वाद मागण्याशिवाय गत्यंतर उरत नाही.

सामाजिक रूढी व परंपरेचा फोलपणा लक्षात आल्याने तरुणींची त्यास विरोध करण्याची प्रवृत्ती वाढत आहे. वटसावित्रीचा सण, भावाचा उपवास, हळदी–कुंकू समारंभ, हरतालिका यांत त्यांना पूर्वीइतका रस वाटेनासा झाला आहे. सन्माननीय (?) अपवाद वगळता बहुसंख्य तरुणी व्रतवैकल्ये, सण व रूढीने आलेल्या प्रथा पाळण्याच्या बाबतीत उदासीन बनत आहेत. त्यांची ही प्रवृत्ती वडीलधाऱ्यांना फारशी न रुचणारी आणि लग्नानंतर त्यांचे कसे होईल ही चिंता व त्यातून सतत त्यांच्यापुढे उपदेशाची बोलणी. खरे तर वडीलधाऱ्या पिढीच्या अगोदरच्या पिढीने ज्या परंपरा पाळल्या, ज्या तीव्रतेने रूढी जपल्या; त्या वडीलधाऱ्यांनी सोयीनुसार योग्य दिशेने बदलून घ्या त्या स्वरूपात स्वीकारल्या. त्याच क्रमाने आजच्या तरुणींनी तर जाणीवपूर्वक व तर्कशुद्ध विचाराने त्या रूढी–परंपरेची कालबाह्यता पटवून देण्याचा प्रयत्न केल्यास त्यांना सुसंस्कारहीन म्हणणे इष्ट ठरेल काय ?

जर मोठी बहीण वडीलकीच्या जबाबदाऱ्या घेऊन, नोकरी करून धाकट्या भावाला पोसत असेल व दोघांच्या वयात फारसे अंतर नसेल तरीही त्याला 'राखी' बांधून संरक्षण मागण्यात तिला स्वारस्य वाटेल काय ? शिवाय आजच्या समाजात केवळ भाऊ बहिणीला संरक्षण देऊ शकत नाही हे तिने ओळखलेले आहे. तेव्हा भावा–बहिणीच्या नात्यातील गोडी व आपुलकी जपली जावी, मग बाकी भाग गौण. या आणि अशा तऱ्हेच्या तरुणींच्या वर्तणुकीचा अर्थ गैर घेतला जाऊन कुटुंबात, नातेवाईक व पालकांची मित्रमंडळी व समाजात त्यांच्याविषयी अनुद्गार काढण्याची स्पर्धा सुरू होत राहते; पण नात्याची बांधिलकी मानण्याच्या कृतीचा आदर करण्याचे भान जास्त प्रकर्षाने ठेवायला हवे ते प्रौढ मंडळींनी. याचा अर्थ तरुणींची प्रत्येक कृती आदरास पात्र ठरणारी, योग्य निर्णयाने घेतलेली व बिनचूक असेल असे नाही व तरुणींचाही तसा दावा नसावा; पण शिक्षक आपल्या अर्थकारणात, शिक्षणसंस्था राजकारणात, राज्यकर्ते खुर्च्या सांभाळण्यात, सामाजिक संस्था व कार्यकर्त्यांचे हात अनेक मर्यादांनी बांधलेले, पालक आपल्या आर्थिक विवंचनेत अशा स्थितीचा तरुणींवर परिणाम होणार

नाही म्हणणेच गैर ठरेल. त्यांचे त्यांनी निवडलेले मार्ग दिशाहीन मानणे अयोग्य.

आमच्या पिढीनं तरुणींच्याकडे बघण्याची दुराग्रही वृत्ती सोडली पाहिजे. त्यांच्या बुद्धी व शक्तीबद्दल विश्वास बाळगायला हवा, त्यांच्या प्रश्नांना पटतील अशी उत्तरे शोधायला हवीत. धाक दाखवून, गप्प करून तरुणी दबावाखाली फार काळ राहतील अशी अपेक्षाच न ठेवता त्यांच्याशी जवळीक साधून, त्यांना बोलके करून, विश्वासात घेऊन त्यांची कोंडी, गुंतागुंत, समस्या सोडविण्याचा प्रयत्न करायला हवा. नुसता उपदेश करून व त्यांना बेजबाबदार म्हणून टीका करण्यापेक्षा त्यांचे प्रश्न सहानुभूतिपूर्वक हाताळण्याचा प्रयत्न व्हावा. वडीलकीचा वृथाभिमान बाजूला ठेवून तरुणींचे मन समजून घ्यायला हवे. एकसारखा धिक्कार न करता, अनावश्यक तुलना टाळून त्यांच्यावर विश्वास दाखविला, जरूर तिथे मदतीचा, आपल्या अनुभवी हातांचा आधार दिला तर तरुणी बेजबाबदार ठरणार नाहीत. नाउमेदीऐवजी उत्तेजनाचे शब्द वापरले तर तरुणी निश्चितच जबाबदारीने वर्तणूक व भरीव असे कार्य करू शकतील.

वासनातृप्ती हे ज्या तरुणींच्या जीवनाचे एकमेव मूल्य आहे, ज्या आधुनिकतेच्या नावाखाली स्वैर जीवनाच्या ओढीने अनिष्ट मार्ग बेधडकपणे स्वीकारीत आहेत, त्यांच्या कुचंबणांचा विचार करण्याची गरज नाही. अशा तरुणींची संख्याही कमी आहे. शिवाय त्यांची दुःखे बहुसंख्य तरुणींचे प्रतिनिधित्व करणारी ठरत नाहीत. मात्र ज्या जीवनमूल्यांचा विचार करतात, ज्यांच्याजवळ चांगल्या-वाईटाची निवड करण्याची कुवत आहे व ज्या सर्वसाधारण परिस्थितीत जीवन जगत आहेत, त्या तरुणींच्या ह्या व्यथा आहेत. समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेत डोळसपणे जगण्याचे सामर्थ्य, तरुणांच्याबरोबरीने प्रत्येक क्षेत्रात पदार्पण करण्याची जिद्द, कुटुंबरचनेत मानाचे स्थान व समाजजीवनात आत्मविश्वासाने वाटचाल करण्याच्या दृष्टीने आजच्या तरुणींना सहाय्य करण्याचे प्रयत्न प्रत्येक समाजघटकाने करायला हवेत.

□

६ स्त्री-मुक्तीविषयी अल्पसे

स्त्री-मुक्ती म्हणजे काय ?

आज स्त्री-मुक्ती हा शब्द अगदीच अपरिचित राहिलेला नाही. स्त्री-स्वातंत्र्याची टिंगल करणाऱ्यांनीसुद्धा तो संकुचित अर्थाने मान्य करण्याची भूमिका स्वीकारलेली दिसते. त्या निमित्ताने स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्याचे प्रयत्न होत आहेत. एकूण समाजाच्या संदर्भात विचार करता, मर्यादित अर्थाने भीत भीत, गंभीरपणे नसले तरी स्त्री-मुक्तीची वाच्यता करण्याचा प्रयत्न होत आहे. त्यासाठी परिषदा, मेळावे व चर्चासत्रे आयोजित केली जात आहेत. स्त्रियांच्या प्रश्नांची जाणीव निर्माण करून देण्याच्या दृष्टीने ते उपयुक्तही ठरत आहे. मात्र स्त्री-मुक्तीचा आशय, त्या दृष्टीने वाटचाल करण्याची वैचारिक रूपरेषा, सामाजिक परिवर्तनाचे मार्ग, स्त्री-पुरुषांची मनोभूमिका तयार करण्याची पद्धत व साधने वगैरे बाबतींत अजूनही म्हणावा तसा स्पष्टपणा जाणवत नाही. किंबहुना यासंबंधीच्या विचारात नेमकेपणा नसल्याने संभ्रम निर्माण होत असल्याचे आढळते.

अर्थात स्त्री-मुक्ती हा नियोजनबद्ध विकासाचा आराखडा नव्हे की जो पैसा उपलब्ध झाला की यशस्वी करता येतो. आज मांडलेले विचार बदलत्या काळात व गतिशील समाजव्यवस्थेत कालबाह्य ठरतीलही आणि त्या विचारात अपुरेपणा जाणवेलही; पण स्त्रियांनी या बाबतीत आपले मन, विचार व कृती बदलल्याशिवाय स्त्री-स्वातंत्र्याचा पाया भक्कम होणार नाही. शिवाय प्रामुख्याने सुशिक्षित व आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी असलेल्या स्त्रियांनी यात पुढाकार घ्यायला हवा. स्त्री-मुक्तीविषयी उदासीन असलेल्या स्त्रियांच्या मनात काही गैरसमज असल्याचे जाणवते.

स्त्री-मुक्तीला विरोध करणाऱ्या व त्याबद्दल नाके मुरडून बोलणाऱ्या महिलांनी ह्या प्रश्नाचा खोलवर विचार केलेला दिसत नाही. स्त्री-मुक्तीचा,

स्वातंत्र्याचा अर्थ संकुचितपणे व उथळपणे लावल्याने त्याची टिंगल केली जाते. स्त्री–स्वातंत्र्याबद्दल अनेकांच्या मनात वैचारिक गोंधळ, मानसिक संघर्ष व कृतीमध्ये विसंगती निर्माण होत आहे. स्त्री–स्वातंत्र्याविषयीचे जे गैरसमज आहेत व या चळवळीविषयी जो सुशिक्षित महिलांतही अलिप्तपणा आहे तो अज्ञानापोटी आहे, असेच म्हणावे लागेल.

कारण ही चळवळ मोठ्या शहरांपुरती व विशिष्ट गटापुरती मर्यादित राहिली आहे. ती प्रसारित होण्याचा प्रयत्न करणे जरुरीचे आहे. स्त्री–मुक्ती कशासाठी हवी ? त्याचा नेमका आशय कोणता ? त्यासाठी सामाजिक परिवर्तनाचे मार्ग कोणते ? वगैरे लक्षात घेणे आवश्यक आहे.

निर्भेळ कौटुंबिक सुखासाठी

स्त्री–स्वातंत्र्य म्हणजे पाश्चात्त्य संस्कृतीचे अनुकरण असा अर्थ आपण लावत आहोत, तोही अत्यंत वरवरचा, बिनबुडाचा व तर्कसंगत विचारांचा आधार नसलेला. काही विचारवंत व उच्चशिक्षित स्त्रियांनाही असे वाटते की, स्त्री–मुक्ती हे एक आपल्या संस्कृतीला काळिमा फासणारे व विवाहसंस्था मोडकळीस आणू पाहत असलेले विशिष्ट वर्गाने पुढाकार घेतलेले फॅड आहे. स्त्रियांना स्वातंत्र्य मिळाले की त्या विवाहबंधनात राहणार नाहीत. ज्याप्रमाणे पाश्चात्त्य देशात विवाह हा करार ठरलेला असून घटस्फोटाचे प्रमाण वाढत आहे, त्याप्रमाणे आपल्या देशात स्त्री-स्वातंत्र्यामुळे काया-माया-मने परिपरायण करणारी कुटुंबसंस्था मोडकळीस येईल. त्याग, वात्सल्य, कष्ट करण्याची जिद्द, समजूतदारपणा आणि सहनशीलता या संस्कारांमुळे स्त्रियांमध्ये आढळणाऱ्या गुणांनी कुटुंबसंस्था टिकून आहे.

कौटुंबिक आपुलकीचे बंध हे मातेमुळे गुंफलेले दिसतात. स्त्री-स्वातंत्र्य म्हणजे ह्या पवित्र कुटुंब संस्थेवर घाला आहे. असा विवाह अयशस्वी होतो, घटस्फोटाची प्रवृत्ती दिसते; परंतु केवळ स्त्री–स्वातंत्र्यामुळे विवाह अयशस्वी होणे, घटस्फोटाचे प्रमाण वाढणे, कुटुंबसंस्था मोडकळीस येणे इत्यादी घटना घडतात असे म्हणणें चुकीचे आहे. शहरीकरण, आर्थिक कोंडी, व्यक्तिस्वातंत्र्य, भोवतालची परिस्थिती, सामाजिक वातावरण, वैचारिक स्थित्यंतरे इत्यादी अनेक कारणांमुळे कुटुंबाची शिकवण व परंपरागत संस्कृतीची मूल्ये कुचकामी ठरत आहेत. मग स्त्री-स्वातंत्र्य नाकारून कुटुंबाचे विघटन, विवाहाचे बंधन टिकेल याची शाश्वती देता येणें शक्य आहे काय ? याचाही विचार करायला हवा.

पाश्चात्त्य देशातील बलात्कार, खून, घटस्फोट, कुटुंबसंस्थेचा होत गेलेला

ऱ्हास, आई, वडील व मुले यांच्यातील पैसाधिष्ठित व यांत्रिक नाती, नीतिमत्तेचे अधःपतन, जिव्हाळ्याचा अभाव व कृत्रिमतेचा शिरकाव इ. समाजवैशिष्ट्यांमुळे तिथें सामाजिक, सांस्कृतिक, नैतिक असे गंभीर प्रश्न निर्माण होत आहेत. पण ते केवळ स्त्री-स्वातंत्र्यामुळे निर्माण होतात असे समजून व तसा सोयीस्कर अर्थ लावून आपल्या देशात जर तशी चळवळ आली तर धर्म, संस्कृती लोपेल, स्त्री–जीवन निरर्थक ठरेल, समाजाचे अधःपतन होईल, अशी ओरड केली जाते. स्त्री–स्वातंत्र्य म्हणजे व्यभिचारी पापकल्पना वाटून आपण जो विरोध करू लागलो तो रानटी, अडाणीपणाचा अतिरेक व बिनडोकपणाचा ठरेल.

स्त्री–स्वातंत्र्यामुळे विवाहाचा खरा अर्थ व आनंद उपभोगता येईल. संशय व गैरसमजामुळे निर्माण होणारे पतीपत्नीमधील मानसिक संघर्ष व परिणामी होणारा मनस्ताप कमी होईल. दोघांचे स्थान समतेवर व स्वातंत्र्यावर आधारल्याने कुटुंबातील वातावरण दबावाचे न राहता समाधान व समाज सहभागाचा आनंद लुटता येईल; त्यामुळे बौद्धिक भूक भागविण्यासही स्त्रिया समर्थ ठरतील. स्वातंत्र्यामुळे स्त्रियांचे व्यक्तिमत्त्व विकसित होऊन खऱ्या अर्थाने त्याचा लाभ त्यांच्या कुटुंबातील सर्वांना मिळेल. त्याचप्रमाणे स्त्रियांचे कौटुंबिक स्थान व दर्जा वाढल्यास त्यांचे व त्याचबरोबर कुटुंबाचे सामाजिक स्थान व प्रतिष्ठा वाढेल. स्वातंत्र्यामुळे स्त्रियांचे शोषण थांबेल.

समानतेसाठी

पुरुषप्रधान संस्कृतीमुळे, लिंगभेदावर आधारित श्रमविभागणीमुळे आणि संस्कृती व संस्कारामुळे स्त्रियांचे कार्यक्षेत्र मर्यादित झाले. स्त्री म्हणजे अबला, परावलंबी व नाजूक असा ठसा पक्का करण्यात आला. चूल व मूल हे त्यांचे क्षेत्र. त्या रिंगणाबाहेर पडूच नये त्यांनी, अशी वैचारिक तटबंदी उभी करण्यात आली. नीती, त्याग, पावित्र्य, सहनशीलता, कुलीनता, शालिनता या गुणांचा मक्ता त्यांच्याकडें देण्यात आला. त्यामुळे स्त्रियांचे दास्य, परावलंबी वृत्ती, निर्णयात कमकुवतपणा, वैचारिक गुलामगिरी, व्रतवैकल्यांचा पगडा घट्ट झाला. स्त्रियांना स्वतत्त्व शोधण्याच्या संधी नाकारण्यात आल्या. परिणामी कौटुंबिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय क्षेत्रांत त्याचे स्थान त्यांना ठरविण्याची, हक्क बजावण्याची व स्वातंत्र्य उपभोगण्याची प्रवृत्ती संकुचित झाली.

सामाजिक परिवर्तने, शिक्षणाचा प्रसार, आर्थिक स्वातंत्र्य व विचारांची पुरोगामी दिशा, सामाजिक चळवळी, दुर्बल घटकांचे अस्तित्व व दखल घ्यावी या

दृष्टीने येऊ लागलेली जागरूकता, वाढता संघटितपणा वगैरे कारणांमुळे स्त्रियांच्या प्रश्नांचा विचार होऊ लागलेला आहे. परिषदा, मेळावे आयोजित करून तो समाजापुढे आणला जात आहे. पण त्या विचाराला विरोध करण्याची प्रवृत्तीही बळावण्याचा धोका आहे; कारण स्त्रियांना स्वातंत्र्य, म्हणजे पुरुषांशी लढा असे चुकीचे समीकरण मांडले जात आहे.

असे कोणतेही क्षेत्र नाही की जिथे पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांनी कामे केली नाहीत. डॉ. आनंदीबाई जोशी यांच्या रूपाने धाडस, बुद्धिमत्ता, तिचे नैतिक सामर्थ्य व सामाजिक बांधिलकी यांचे अभूतपूर्व चित्र समाजाला नाकारता येणार नाही. पंडिता रमाबाई, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, रमाबाई रानडे वगैरे अनेक स्त्रियांचे चरित्र म्हणजे आत्यंतिक जिद्द, रूढींविरुद्ध आवाज उठविण्याचे मनोधैर्य आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव यांचा संगम होय. रशियातील व्हेलेंटिना अंतराळात झेपावू शकते. चिनी स्त्रिया वादळी समुद्राचे आव्हान स्वीकारून अचाट धीटपणा दाखवू शकतात, व्हिएतनाम मुक्तिलढ्यात लाखो स्त्रियांची वेगवेगळ्या स्तरांवरील भागीदारी व स्फूर्तिदायक कार्य पाहिले की त्यांना अबला म्हणण्यास जीभ उचलू शकणार नाही. ही व अशी उदाहरणे समाजात दिसतात; म्हणून स्त्री-पुरुष समानतेवर आधारित असे स्त्री–स्वातंत्र्य बिनधोकपणे मान्य करणे आवश्यक आहे. पुरुषापेक्षा स्त्रिया श्रेष्ठ असा दावा नसून स्त्री-स्वातंत्र्य म्हणजे स्त्री-पुरुषांचा संघर्ष असे नसून तो रूढीपरंपरांविरुद्ध लढा आहे असे मानले पाहिजे. मग जे जे या रूढी व परंपरांच्या बंधनांच्या बाजूने असतील त्यांच्याविरुद्ध तो आहे; असा त्याचा उघड अर्थ आहे.

स्त्रियांचे स्वातंत्र्य म्हणजे पुरुषांची गुलामगिरी असे मानणे खुळेपणाचे ठरेल. स्त्री–मुक्ती म्हणजे स्त्री–पुरुषांना समान दर्जा होय. तो अनिष्ट व अनारोग्य स्पर्धेचा बाजार नसून, वैचारिक बैठक असलेली वाटचाल होय. स्वैरता, कुरघोडी, माजोरीपणा म्हणजे स्वातंत्र्य नव्हे, तर समानता आणि स्वातंत्र्य ही एकमेकांपासून अलग न करता येणारी अंगे आहेत, हे लक्षात घेऊन केवळ स्त्रियांनी नव्हे तर पुरुषांनीही ह्या स्त्री–मुक्ती लढ्यात भरीव कार्य करण्याची जिद्द बाळगली पाहिजे.

सौभाग्य अलंकाराचे स्तोम

पुरुषांचे वर्चस्व दाखविणारे व सौभाग्य अलंकाराच्या आधारे स्वतःचे रक्षण करण्याचे, परावलंबित्वाचे द्योतक म्हणजे मंगळसूत्र, कुंकू, बांगड्या होय. ते घालण्याची आवश्यकता नाही असाही विचार मांडला जातो. काही विवाहित

स्त्रियांनी ते घालण्याचे सोडून दिलेले आढळते. अर्थात त्याचा त्याग केल्याने स्त्रिया वैचारिक गुलामगिरीतून मुक्त होऊन स्वतंत्र झाल्या असे नाही. ते घातल्याने त्या पारंपरिक आचारविचारांच्या आहारी गेल्या असेही नाही. हल्ली तर कुंकवाचे रंग मॅचिंगनुसार बदलले, शिवाय मंगळसूत्राचा आकार आधुनिक झाला आहे. कित्येक गरीब स्त्रियांना मंगळसूत्राच्या दोन वाट्या घेणे परवडत नाही, तर शेतात, घरादारात राबता राबता कुंकवाची दखल घेण्यास उसंत मिळत नाही. म्हणजे त्या स्वतंत्र आहेत का ? किंवा श्रीमंत स्तरातील महिलांना दागिन्यांचे असे वेगवेगळे सेटस् असतात की मंगळसूत्र आहे की नाही ही बाब 'मायनर' ठरते. त्यामुळे कुंकू, बांगड्या, मंगळसूत्र घालणे न घालणे याचा व स्त्रियांच्या मानसिक मुक्तीचा संबंध जोडून निरर्थक वाद घालण्यात अर्थ नाही. तूर्त तरी हा वाद बाजूला ठेवून स्त्री-मुक्तीची चळवळ पोशाख, दागिने, बोलण्याची पद्धत या बाह्य गोष्टींशी निगडित ठेवण्यात हशील नाही. साडीऐवजी शर्ट-पॅन्ट घालणें, अय्या-इश्शऐवजी साला, आयला, मारो गोली, भंपक वगैरे शब्दांचा वापर करणे, पुरुषी राहणी, पोशाख व चालण्याची ढब स्वीकारणें म्हणजे स्त्री-स्वातंत्र्य समजण्याचा उथळपणा केला जाऊ नये; किंबहुना त्यामुळेही स्त्री-मुक्तीविषयीचा गैरसमज वाढून सर्वसामान्य स्त्रिया त्यापासून दूर जाण्याचा धोका निर्माण होत आहे. तो टाळण्याची नितांत गरज आहे. असा वाद फोल तर ठरेलच. सध्या तरी तो ह्या चळवळीला मारक ठरण्याची शक्यता आहे.

आज मोठ्या शहरांत व सुशिक्षित स्त्रियांमध्ये स्त्रियांच्या प्रश्नांवर विचार केला जात आहे. त्या ठिकाणी महिला संघटित होऊन अन्यायाविरुद्ध प्रतिकार करीत आहेत. विभागीय महिला परिषदा आयोजित करून प्रश्नांची चर्चा व उकल केली जात आहे. अर्थात त्याही मुंबई, पुणे, नागपूर, दिल्ली अशाच ठिकाणी आयोजित केल्या जातात.

ही केवळ श्रीमंत व उच्चवर्गीय महिलांची मोहीम आहे असा गैरसमज काढून टाकण्यात यावा. सामाजिक परिवर्तनाच्या व मंथनाच्या जाणीव असलेल्या जागरूक स्त्रियांनी यामध्ये रस घेतला आहे. सामाजिक बांधिलकी मानणाऱ्या, लोकशाही, समता व स्वातंत्र्याची मूल्ये जोपासणाऱ्या प्रवृत्ती व धैर्य असणाऱ्या आणि अन्याय व शोषणाविरुद्ध पोटतिडकीने आवाज उठविणाऱ्या स्त्रियांचा हा विचार आहे. अर्थात अजूनही ग्रामीण भागात कष्टकरी, कोंडीत सापडलेल्या अज्ञानी स्त्रियांपर्यंत स्त्री-स्वातंत्र्यविषयीचे विचार पोहोचले नाहीत. शिक्षण व आर्थिक स्वावंलबनाशिवाय स्त्री-स्वातंत्र्याची पहिली पायरी चढणें कठीण आहे.

तरीही बलात्कार, विवाहित महिलांचा छळ व खून, बालविवाह, सती जाणें

वगैरे प्रश्नांची दाहकता व अमानुषपणा लक्षात घेऊन बहुसंख्य स्त्रिया त्याविरुद्ध आवाज उठविण्यात सामील होताना दिसतात. हे जागरूकतेचे चांगले लक्षण मानून त्यांच्या विचाराला दिशा देण्याचे काम समाज कार्यकर्त्या व सुशिक्षित स्त्रियांनी करायला हवे.

अशा तऱ्हेने स्त्री–मुक्ती, स्त्री–स्वातंत्र्य, स्त्री–पुरुष समानता यांविषयी विचार करताना त्या विचारांत नेमकेपणा येण्यासाठी त्यासंबंधीचे गैरप्रवाह, मारक विचार, उथळ प्रवाह अगोदर खोदून काढले पाहिजेत. स्त्रीला माणूस म्हणून जगता आले पाहिजे. स्वतःचे स्वत्व कशात आहे ? याचा विचारपूर्वक शोध घेऊन त्याप्रमाणे जगण्याचे स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. स्त्री म्हणजे माता, बहीण, बायको या नात्याच्या रूपातच न पाहता तिला नेता, अधिकारी, सहकारी, सल्लागार, संघटक याही दृष्टीने मान्यता मिळाली पाहिजे. मानसिक मुक्ती, वैचारिक स्वातंत्र्य आणि पुरोगामी प्रवृत्ती अंगी बाणण्याचे धैर्य स्त्रियांनी दाखविल्याशिवाय खऱ्या अर्थाने स्त्रियांचे प्रश्न सुटणार नाहीत. बायकीपणा, दागदागिन्यांची हौस, नटणे, मुरडणे, व्रतवैकल्यांतच रस, हेवेदावे व चंचलता, मातृत्वाचे स्तोम व पुरुषाच्या संरक्षणाची कृत्रिम गरज दाखवून स्त्रीत्व जपण्याची हौस सोडून दिल्याशिवाय स्त्री–स्वातंत्र्याच्या वाटचालीची दिशा स्पष्ट होणार नाही.

स्त्री-मुक्ती : पण कुणापासून ?

'अहो, आमचे 'हे' मला व्याख्यानासाठी एकटीला जायला परवानगी देत नाहीत हं ! स्वतः बरोबर असले तर जायचं नाही तर...' हे सुविद्य, सुप्रसिद्ध लेखिका असलेल्या प्राध्यापिकेचे कौतुकमिश्रित उद्‌गार !

पंचवीस वर्षे नोकरी करून शैक्षणिक वातावरणात राहणाऱ्या, मुलगा डॉक्टर झालेल्या प्राध्यापिका म्हणतात, 'मी कोल्हापूरला सेमिनारला जाणार होते; पण हे ऐनवेळी आजारी. मुख्य म्हणजे रिझर्व्हेशन, रिक्षा, परतीचा प्रवास, दगदग कशाला म्हणून मी बाई कॅन्सल केलं. मस्तपैकी आराम केला.' पगारात पुरुषांची बरोबरी व कामात बाई म्हणून सवलत व औदासिन्याची वृत्ती.

एका वकील बाईने आपल्या लेटरपॅडवर स्वतःच्या नावाखाली आपल्या पतीचे 'केअर ऑफ' नाव घालून त्यांची आदर्श पत्नी असल्याचा केलेला केविलवाणा प्रयत्न. तिला स्वतंत्रपणे कुणीच का ओळखत नाही ? तिचे स्वतंत्र अस्तित्व तिलाच मान्य नाही का ? तसेच प्रवासात पती बरोबर असल्यास कसलाच धोका

नसतो का ? मग डॉक्टर पती–पत्नी दवाखाना बंद करून जात असताना पतीला ढकलून स्कूटरसह डॉक्टरणीला घेऊन तिच्यावर बलात्कार होतोच तेव्हा पती का संरक्षणास धावून येत नाही ? म्हणजे असे प्रसंग स्त्रीला पुरुषाच्या आधाराने टाळता येत नाहीत, तर मग स्त्रियांनी सतत पुरुषावर अवलंबून राहण्याचा व स्वत:ला दुर्बल व असहाय्य समजण्याचा अट्टाहास का करावा ?

वरील उद्‌गार ऐकले की हे व अशा प्रकारचे विचाराचे तरंग मनात उठतात. विशेषत: सुशिक्षित, सुसंस्कृत वातावरणात वाढलेल्या आणि वाचनाने ज्यांची प्रगल्भता व वैचारिक पातळी वाढावी अशी अपेक्षा असलेल्या स्त्रियांनी आपल्या उद्‌गाराचे व विचाराचे आत्मपरीक्षण व मूल्यमापन करण्याची गरज आहे.

' मला जागच आली नाही. आज आमच्या ' ह्यानी ' पिंपात दोन घागरी टाकल्या. उठल्यावर मला इतकं लाजल्यासारखं वाटलं. मी ह्याना शपथ घालून सांगितलं की उद्यापासून मला हाक मारायची, ' अशी पदवीधर गृहिणीची लाजत–ओशाळत ऐकलेली अमृतवाणी !

' मी आजारी. ह्यांनी कुकर लावला. मला आता पडून राहवणारच नाही. डॉक्टर काहीही म्हणोत, मी बाई उठणारच. ' मध्यमवर्गीय स्त्रीचे प्रतिनिधित्व करणारी प्रौढ स्त्री या व अशा धर्तीवर बोलताना आढळते.

शिक्षणाचा प्रसार व आर्थिक कोंडी सोडविण्यासाठी महिलांच्या नोकरीला मान्यता देऊन व घरच्या व बाहेरच्या जबाबदाऱ्या वाढवून तिचे बेगडी स्वातंत्र्य समाजाने मान्य केले आहे. महिलांची गुलामी जीवनातून सुटका व्हावी म्हणून कायदे करण्यात येत आहेत. हिंदू विवाह व पोटगी कायदा, हुंडाविरोधी कायदा, वारसा हक्क व दत्तक विधानाची तरतूद, घटस्फोट व गर्भपातास कायदेशीर मान्यता इ. कायदे करण्यात आले आहेत. समान वेतनाचे तत्त्वही मान्य करण्यात आले आहे. अत्याचार बलात्काराविरुद्ध महिलांनी संघटित उठाव केल्याने तोही प्रश्न कायदेशीररीत्या सोडविण्याचा प्रयत्न होत आहे.

पण या स्वरूपाच्या कायद्यांनी महिलांच्या समाजातील स्थानामध्ये मूलभूत स्वरूपाचा बदल होणार आहे काय ? की फक्त कागदावरच राहणार ? ते जाणून घेण्याची उत्सुकता तर किती महिलांमध्ये आहे ? कायद्यांची माहिती करून घेण्याचा प्रयत्न महिला जाणीवपूर्वक करतात का ? कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि ' गृहिणी' म्हणून जागत न राहता स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाचा विकास व्हावा म्हणून अस्वस्थता त्यांच्यामध्ये आहे का ? अन्याय व पारतंत्र्यामुळे त्या घुसमटतात का ? की महिलांनाच खऱ्या अर्थाने आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व वैचारिक स्वतंत्र दर्जा व व्यक्ती म्हणून वेगळे स्थान व स्वातंत्र्य नकोच आहे ? महिलांनी आपल्या

वर्तणुकीतून स्वतःचे स्वातंत्र्य मर्यादित केले आहे काय ? स्त्रीला स्त्रीनेच ओळखले नसल्याने त्यांची कुचंबणा होते, याचीही जाणीव त्यांना झालेली आहे काय ? असे अनेक विचार व प्रश्न वरील उद्‌गार ऐकले की सतावत राहतात.

पिता, पती, पुत्र अशा नात्यातील पुरुषांनी तिचे रक्षण करायचे हा ' न स्त्री स्वतंत्रमर्हती ' या मनूच्या वचनाचा मतितार्थ. या ' रक्षिता ' स्त्रीच्याभोवती पुरुषी अभिमानाचे जाळे विणले गेले. रक्षिता, अबला म्हणून मनूच्या इतर दंडकांप्रमाणे तिला रुग्ण, बाल, वृद्धा यांच्या बरोबरीने काही मवाळीने दयेचे माप मिळून गेले. यातून सामाजिक व्यवहारात पुरुषप्रधानता टिकून राहण्याचे आधार भक्कम झाले.

महिलांना अवलंबून राहणे योग्य व सुखाचे वाटू लागले. या त्या वेळच्या प्रवृत्तीतून आजच्या महिला तरी बाहेर पडायला तयार आहेत काय ? महिलांनी पुरुषी अहंकाराचे कोंब जोपासत राहण्यात धन्यता मानून शरीर, मन व बुद्धीची पिळवणूक व शोषण करून त्यालाच त्याग मानावे ही अत्यंत दुर्दैवाची बाब आहे. ही त्यागाची कल्पना बदलायला त्यांची तयारी आहे का ?

स्त्रीचे ' स्वत्व, ' ' मीपण ' कशात आहे ? ते स्त्रीजातीमध्ये शोधण्याची प्रवृत्ती सोडून देऊन हा स्वत्वाचा शोध मानव म्हणून, व्यक्ती म्हणून घ्यायला हवा. तो तसा घेण्यात स्त्री कमी पडते.

स्त्री म्हणून सर्व स्तरांतील स्त्रियांनी आपल्या स्वतंत्र अस्तित्वास बाधा आणणाऱ्या गोष्टी कटाक्षाने टाळायला हव्यात.

स्त्रीचा देह असा आहे की, त्यामुळे तिच्याकडे पुरुषापेक्षा वेगळ्या दृष्टीने पाहिले जाते. परिणामी स्त्रियांना अनेक प्रकारच्या मानसिक संघर्षाला व शारीरिक अत्याचाराला सामोरे जावे लागते. निसर्गतः पुरुषाच्या मानाने स्त्रियांच्या शरीराची घडण वेगळी व डोळ्यांना सुखविणारी असली तरी पुरुषापेक्षा आपण फार वेगळे, नाजूक व संरक्षणाची आवश्यकता आणि जपवणुकीची गरज आहे असा आव आणून वागणाऱ्या स्त्रियांची संख्या मोठी आहे. सार्वजनिक ठिकाणे, बस स्टॉप, बाजार, दुकाने, सिनेमागृहे, कार्यालये वगैरे ठिकाणी स्त्रियांचे बोलणें, आविर्भाव, विभ्रम, हालचाली पाहिल्या की वाटते, याच गोष्टी त्यांच्या दुय्यम स्थानाला कारणीभूत आहेत.

मन, बुद्धी, विचार, कृती व वर्तन यांबाबतीत ती पुरुषापेक्षा वेगळी व कमकुवत ठरवावी असे नाही. पोशाखात पुरुषीपणा येत आहे; पण त्या पोशाखातील चाल व हालचाल बायकी असेल तर त्याचा उलट परिणाम होण्याची भीती अधिक, नाजूक, कृत्रिम आवाज, पदराची चाळवाचाळव, भिरभिरते डोळे, इश्श–अय्याची

खैरात व तीच आपली नैसर्गिक वागणूक समजण्याची प्रवृत्ती बदलण्याची गरज आहे.

पदोपदी पुरुषांचा आधार घेण्याची वृत्ती ही गरजेतून निर्माण होण्यापेक्षा बाह्यांगी स्त्रीत्व जपण्याच्या अनावश्यक व पारंपरिक मनोवृत्तीतून निर्माण झाल्यास त्यांचे कौटुंबिक, सामाजिक, सांस्कृतिक स्थान उंचावण्याऐवजी ते अधिक कनिष्ठ व पराधीन होण्याचा धोका आहे. स्त्रियांची ही वृत्ती, त्यांचे स्वातंत्र्य मर्यादित करण्यास कारणीभूत ठरत आहे.

स्त्रियांनी सौंदर्याची काळजी घ्यायला हवी व त्याबद्दल कुणाचेही दुमत नसावे. नैसर्गिक भावना म्हणून रसिकता, सौंदर्यवृत्ती, नीटनेटकेपणा यांकडे त्यांनी लक्ष पुरविणे आवश्यक; पण केवळ स्त्रीत्वाच्या नावाखाली उत्तानपणा, पुरुषांसाठी सुंदर दिसण्याचा अट्टाहास, पुरुषी अहंकारास खतपाणी घालणाराच ठरेल याचेही भान ठेवायला हवे.

शारीरिक पातळीवर मुलगी या नात्याने त्यांच्यावर संस्कार होत असले तरी त्यातूनच बलात्कारासारखे भयानक प्रसंग ओढवतात. उच्च वर्गातील महिलेला 'शो–पीस' म्हणून वावरावे लागते. तिच्या शारीरिक सौंदर्याला व मादीपणाला महत्त्व दिले जाते. मध्यमवर्गीय महिला त्याचे अनुकरण करण्यात धन्यता मानतात. अत्यंत खालच्या वर्गातील महिलांना शरीर हे श्रम करण्याचे आणि भोग देण्याचे यंत्र म्हणून वापरावे लागते. पुरुषाला रिझविणारी, खुलविणारी व तक्रार न करता देहाच्या जोरावर त्याला आकर्षून घेणारी स्त्री ही प्रतिमा बदलण्याची गरज आहे.

आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक परिस्थितीमुळे नोकरी, व्यवसाय करण्यासाठी बाहेर पडणाऱ्या बायकांची सख्या वाढणारच. मात्र ते काम करतानाही महिलांनी आपल्या लिंगभेदाचा फायदा करून घेण्याचा मोह टाळला पाहिजे. कौटुंबिक जबाबदाऱ्या, मुलांचे संगोपन, घरगुती अडचणी व करिअरविषयक उदासीनता, गृहिणीपदाचा कैफ इत्यादींमुळे पुरुषाच्या बरोबरीने काम करण्यामध्ये अडचणी येतात. पण त्या स्त्रियांनी किती प्रमाणात जोपासाव्यात ?

अडचणी सांगणे, त्या मार्गाने नोकरीनिमित्त येणाऱ्या जबाबदाऱ्या टाळणे किंबहुना त्या टाळण्यासाठीच बायकी कामाचा डोंगर वाढविणे हाच मार्ग संयुक्तिक व रुटिन आहे, असे समजण्याची वृत्ती कमी व्हायला हवी.

'समान काम, समान वेतन' हे तत्त्व अमलात आल्याने स्त्रीचा पुरुषाच्या बरोबरीचा दर्जा आर्थिक दृष्टीने मान्य होऊन उपयोगी नाही; तर कामातही कार्यक्षमता दाखविता यायला हवी. त्यात कुचराई करणे म्हणजेच पुरुषापेक्षा स्त्रियांचा दर्जा कमी आहे ही गोष्ट मान्य करणे होय. तशी तर स्त्री ही कार्यक्षम, सर्जनशील व चिवट आहे; त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या अंगिकारलेल्या कामात

तिने केवळ स्त्री म्हणून मागे पडू नये.

'मी स्त्री आहे' या सबबीवर कोणत्याही कामातून सुटका करून घेण्याची प्रवृत्ती ही तिच्या अकार्यक्षमतेची द्योतक ठरेल, समानतेस बाधा आणील; म्हणून पुरुषाच्या बरोबरीने पगार घेण्याच्या अधिकाराला सामाजिक व नैतिक वजन यावे यासाठी नोकरी करणाऱ्या स्त्रीने घराबाहेर नोकरीच्या ठिकाणी स्त्री म्हणून न वावरता व्यक्ती व कर्मचारी वा अधिकारी या नात्याने वागायला हवे.

प्रशिक्षण व कामगार संघटनांत सहभाग ह्या नोकरीच्या अनुषंगाने येणाऱ्या व अपेक्षित असणाऱ्या कामातही तिचा सहभाग हवा. अशा वेळी कौटुंबिक अडचणींवर मात करून व पुरुष मंडळींवर त्यासाठी जबाबदारी टाकून बाहेर पडायला हवे. संघटनांच्या मीटिंग्ज, मोर्चे व इतर कार्यांत रस घ्यायला हवा. त्या वेळेत घरी जाऊन मनोरंजन करण्याचा मोह टाळला पाहिजे.

स्त्रियांनी कौटुंबिक जबाबदाऱ्यांतून मुक्त होण्याची मनाची तयारी ठेवायला हवी. याचा अर्थ कुटुंबात अस्वास्थ्य व कुटुंबाचे विघटन अशी भूमिका त्यांनी घेतली पाहिजे असे नव्हे. पण 'तू म्हणजे प्रेमसिंधू. तुझ्या मायेची पाखर आम्हांला हवी. तुला आमचे सारे काही न सांगता समजते. तुझ्या नजरेतील कौतुकाने आम्हाला बळ येते. तुझ्यावर आम्ही कायम विसंबून आहोत. तू गृहलक्ष्मी, तुझे हसतमुख म्हणजे घराचे वैभव, तू सोशिक, सहनशील व समजूतदार राहावीस म्हणजे पुरुषाच्या कर्तृत्वाला उधाण येईल. मातृत्वाचे सार्थक होईल,' वगैरे शब्दांतून स्त्रियांचे पत्नी, गृहिणी, माता ह्या भूमिकांबद्दल गौरवोद्गार काढले जातात.

प्रेम, समज, कदर व जबाबदारी या आपुलकीच्या नात्यांची जपणूक करण्याची धुरा बायकांवर सोपवलेली; पण त्यातून केवळ अर्धांगी व मादी, बिनपगारी राबणारी हक्काची सोबतीण आणि मातृत्वाच्या महतीसाठी अन्यायाला निमूटपणे सामोरी जाणारी स्त्री ही दास्याचे प्रतीक आहे.

जीवन सार्थकतेचे निकष बायकांनी बदलायला हवेत. त्यासाठी त्यांनी जागे होण्याची गरज आहे. आपण आपले जीवन दुसऱ्यासाठी जगणे, शरीर झिजविणे, मन मारून–घुसमटून परंपरागत आलेल्या मूल्यांची जपणूक करणे योग्य की अयोग्य याचा विचार त्यांनी करायला हवा. आपले आयुष्य दुसऱ्या कुणाच्या तरी मर्जीवर अवलंबून ठेवणे चुकीचे आहे. आपल्यासमोरचे प्रश्न आपण सोडवू शकतो. त्यासाठी आपली निर्णयशक्ती वापरली पाहिजे.

आजही बहुसंख्य बायकांना नव्या विचारांचे व निकषांचे आकर्षण वाटत नाही. दागदागिने, हुंडा, मानपान, साड्या, घरातील गृहिणींच्या वस्तू हेच त्यांच्या आस्थेचे विषय, सुशिक्षित बायकाही बायकीपणाचा आव आणूनच बोलतात.

चूल गेली, गॅस आला; पण मुलींना इंजिनियरिंगपेक्षा होम–सायन्स बरे हे मात्र चालूच आहे. किती तोळ्यांच्या पाटल्या केल्या याऐवजी फ्रिज कोणत्या कंपनीचा व दर्जेदार मिक्सरची कंपनी कोणती ? याच प्रश्नांचा ओलावा अधिक. नवऱ्याच्या पगाराचा आकडा सांगून त्या जोरावर टेंभा मिरविण्याऐवजी 'आमचे 'हे' अमुक दर्जाचे ऑफिसर आहेत,' अशा 'व्हाईट कॉलर' भाषेत 'इगो' दाखविण्याची फसवी वृत्ती अजूनही बदललेली नाही.

बायकी विषयांबद्दल नावड नसावी; पण त्यातच रमणे व त्यातून हेवेदावे, मत्सर, तुलना व अनावश्यक द्वेष यांकडे वळणे घातक आहे.

विणकाम, भरतकाम, होम–सायन्स, दागदागिने, साड्या, पतीचा पगार; कपडे, उन्हाळी कामे वगैरे संभाषणविषय आपण जणू काही या 'बायकी' क्षेत्रासाठीच जन्मलो आहोत, याची साक्ष देतात.

मुलगी जन्माला आली की पतीपेक्षा पत्नी अधिक नाराज. मुलीला फक्त देहात्मक पातळीवरच वाढविण्याच्या प्रयत्नात आई म्हणून स्त्रियांचा पुढाकार बहुसंख्य परिवारांतून दिसतो. लहानपणापासून विविध सण, समारंभ, व्रतवैकल्ये यांचा त्यांच्यावर मारा केला जातो. मुलगी म्हणून घरकामात तिनेच मदत करायला हवी आणि तिच्या भावाने मात्र कसल्याच प्रकारचा हातभार लावण्याची गरज नाही, असे बिंबवणारी आई हीच स्त्रीमुक्तीच्या मार्गातली धोंड आहे. घरकाम, वेळेची बंधने, भावंडांचे संगोपन, आजाऱ्याची काळजी वगैरे बाबतींत मुलींवर कठोरपणाने संस्कार करणाऱ्या बायका मुलगा व मुलगी यांच्या संगोपनात फरक करून त्यांच्या विकासात दरी निर्माण करतात.

स्त्री–पुरुष समानतेची भावना रुजविण्याऐवजी जन्मापासून मुलगा श्रेष्ठ व ती कनिष्ठ अशी भावना निर्माण केली जाते. स्त्री व पुरुष यांच्यामध्ये शारीरिक फरक जन्मतःच असतो. मुलगी असे न मानता जन्माला आलेली मानवी घटक म्हणून तिला स्वतंत्रपणे विकासाची संधी द्यायला हवी. अन्यथा आजची मुलगी उद्याची गृहिणी ही तितकीच दुर्बल व दडपलेली राहील, याची जाणीव पुरुषांपेक्षा स्त्रियांनी ठेवायला हवी.

हुंड्याला मान्यता, घटस्फोटित बाईविषयी तिरस्काराची भावना, विधवांना मिळणारी तुच्छतेची वागणूक, प्रौढ कुमारिकांची अत्यंत दयनीय स्थिती, मातृत्वाचा अवास्तव गौरव व वांझपणाबद्दल स्त्रियांनाच जबाबदार धरून त्यांचा मानसिक छळ करण्याची वृत्ती, अनैतिकतेचा बाऊ व बलात्काराबद्दल बाईलाच होरपळून काढण्याची वृत्ती वगैरे बाबतींत स्त्रियाच पुढाकार घेतात. स्त्रियांचे प्रश्न लक्षात घेऊन ते सोडविण्यात स्त्रियांनीच पुढाकार घ्यायला हवा.

आत्मविश्वासाच्या जागी अहंभाव, पुरुषांच्या बरोबरीच्या दर्जाऐवजी वरचढपणा व शिरजोरी, समन्वयाऐवजी एक घांव दोन तुकडे, सामंजस्याऐवजी स्वैराचार म्हणजे स्त्रीच्या स्वतंत्र अस्तित्वाला मान्यता असे नव्हे. संस्कारातून घडलेले दुबळे मन बदलण्याची जिद्द व चिकाटी स्त्रियांनी धरायला पाहिजे.त्यासाठी त्यांनी संघटित व्हायला हवे. विसाव्या शतकासुद्धा पुरुषांच्या आधाराशिवाय जीवन जगता येत नाही, असा आक्रोश स्त्रीने केला तर मग समाजाला त्या बाबतीत दोषी धरण्याचे कारण काय ?

स्त्री–स्वातंत्र्याची दिशा

स्त्रियांचे प्रश्न हे सर्वच समाजघटकांच्या सहकार्याने, सामाजिक संस्थांच्या कार्याच्या मदतीने आणि शासनाच्या सल्ल्याने सोडविण्याच्या सर्वस्तरीय आणि सर्वसमावेशक प्रयत्नांची गरज आहे. त्या दृष्टीने विचार करता, पुढील काळात स्त्रियांच्या प्रश्नांची उकल व्हावी आणि स्त्री–पुरुष समानतेचे युग निर्माण होण्याच्या दृष्टीने अनुकूल सामाजिक परिस्थिती व पोषक वातावरणनिर्मिती व्हावी म्हणून खालील विचार लक्षात घेतले जावेत.

१) सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे स्त्रियांचे प्रश्न, दर्जा व आर्थिक स्थान यांचे स्पष्ट स्वरूप व वास्तव परिस्थिती लक्षात घेणे जरुरीचे आहे. केवळ सर्वसाधारण विधाने–विचार मांडले जाणे उपयुक्त; नाहीतर त्याला आकडेवारीचा आधार व स्पष्टीकरण असण्याची जरुरी आहे, म्हणून सोशल वेल्फेअर बोर्ड, कुटुंबनियोजन व आरोग्य खाते व लेबर प्लॅनिंग अॅण्ड एम्प्लॉयमेंट खाते यांनी एकत्र येऊन संशोधन विभाग किंवा केंद्र स्थापन करावे. त्यामार्फत स्त्रियांच्या प्रश्नांसंबंधीचे संशोधन हाती घेतले जावे. प्रशिक्षित कर्मचारी व प्रामुख्याने त्यामध्ये स्त्रियांचा समावेश करून शास्त्रीय पद्धतीने व हेत्वाधिष्ठित पद्धतीने ते केले जावे. स्त्रियांचा दर्जा, आर्थिक परिस्थिती, नोकरीचे स्वरूप, मिळणाऱ्या सवलती, कल्याणकारी योजनांचा लाभ वगैरेंसंबंधी माहिती गोळा केली जावी. तिचे स्वरूप केवळ आकडेवारीचे न राहता प्रश्नांची उकल व्हावी, या दृष्टीने ते केले जावे. पूर्वग्रहांची आणि वैयक्तिक मतांची त्यावर छाप पडू नये. त्या दृष्टीने दक्षता घेतली जावी.

२) केंद्र सरकारने स्वतंत्र आयोगाची नेमणूक करावी. त्या केंद्रीय आयोगाने प्रत्येक राज्यात राज्य आयोगाची स्थापना करावी. त्यांच्यामार्फत स्त्रियांच्या प्रश्नांचा सखोल अभ्यास केला जावा. हा अभ्यास करताना स्त्रियांबाबतीत

निर्माण होणारे बलात्कारासारखे प्रसंग, विवाहित स्त्रियांचा छळ व खून, विधवांना नवऱ्याच्या मालमत्तेत कायदेशीररीत्या मिळणाऱ्या हिश्श्यामध्ये येणाऱ्या अडचणी, घटस्फोटाच्या, गर्भपातासंबंधीच्या कायद्यातील अडचणी, बालविवाह आणि हुंडा पद्धतीचा अवलंब इत्यादी बाबींचा विचार करून ते दूर करण्याच्या दृष्टीने उपाय सुचवावेत. स्त्रियांना कायद्याने दिलेले संरक्षण, त्यातील पळवाटा व कायद्याचे ज्ञान असणारी व पुरोगामी विचारांची मंडळी यात समाविष्ट करण्यात यावीत.

३) सोशल वेल्फेअर बोर्डाची पुनर्रचना करण्यात येऊन त्या संस्थांना स्वायत्तता देण्यात यावी. स्त्रियांसाठी आवश्यक अशा कल्याणकारी कार्यक्रमांची रूपरेषा, नियोजन, सुसूत्रता आणि व्यवस्थापन यासंबंधीची जबाबदारी त्या बोर्डावर सोपविण्यात यावी. केंद्र पातळीवर सेंट्रल सोशल वेल्फेअर बोर्ड व प्रत्येक राज्यासाठी स्टेट सोशल वेल्फेअर बोर्डात स्त्रियांना मार्गदर्शन व सल्ला मिळण्याच्या दृष्टीने स्वतंत्र सल्ला विभाग सुरू करण्यात यावेत: कायदेविषयक सल्ला, अनाथगृहे, महिलाश्रम, वृद्धाश्रम, नोकरीसंबंधीच्या संधीच्या उपलब्धतता, त्यांच्यासाठी असलेले विकास कार्यक्रम व सवलती वगैरेंची माहिती पुरविण्यात यावी. शिवाय स्त्रियांचे विशिष्ट प्रश्न, ज्यांची उघडपणे वाच्यता करता येत नाही, त्याबाबत मानसशास्त्रीय सल्ला देण्याचे व त्यांना सावरण्याची कामेही करण्याचा प्रयत्न व्हावा. विशेषत: सामाजिक कार्यात रस असणाऱ्या आणि मानसशास्त्राचा अभ्यास व अनुभव असणाऱ्यांनी हे कौन्सिलिंगचे काम हाती घ्यावे.

४) राष्ट्रीय पातळीवर महिला संघटना स्थापन करण्यात यावी. ज्याप्रमाणे पक्षीय संघटनेची केंद्र पातळीतरून तालुका पातळीपर्यंत सुसूत्ररीतीने रचना व बांधणी केली जाते व ती लोकशाही तत्त्वावर आधारित असते, त्याप्रमाणे स्त्रियांच्या प्रश्नावली सोडवण्यासाठी महिला संघटित तर झाल्याच पाहिजेत. त्या केवळ शहराशी व विशिष्ट गटाशी संबंधित न राहता त्यांचे राज्यभर जाळे विणले पाहिजे. अर्थात स्त्रियांची या बाबतीतील उदासीनता, महिला कार्यकर्त्यांची कमतरता, सुशिक्षित स्त्रियांचे अल्प प्रमाण, पैशाचा तुटवडा व नेतृत्वाचा अभाव, हेवेदावे व अनिष्ट स्पर्धा, संघटनांमध्ये राजकारणाच्या शिरकावाचा धोका वगैरे अनेक अडचणी उद्‌भवणारच; पण त्या दिशेने पाऊल टाकल्याशिवाय स्त्री–मुक्ती चळवळीचा पाया भक्कम होणार नाही. राज्य, जिल्हा व तालुका हे घटक मानून, त्यांमध्ये सुसूत्रता व संपर्क ठेवून कार्य करण्याची गरज आहे. केवळ एखादा बलात्काराचा प्रसंग घेऊन मेळावा आयोजित केला अथवा परिषद भरविली, फार तर मोर्चा काढून निवेदन सादर केले की काम संपले असे म्हणून चालणार नाही. त्यामध्ये सातत्य हवे. शिवाय संघटित प्रयत्नाने अन्यायाचा वारंवार प्रतिकार केल्यास सामाजिक दबाव निर्माण होऊन इष्ट तो परिणाम साधता येईल.

५) स्त्रियांवर होणारे अन्याय, त्यांची वैचारिक गुलामगिरी, त्यांची शारीरिक व मानसिक पिळवणूक, कनिष्ठ दर्जा, कार्यक्षेत्रावर मर्यादा, सामाजिक प्रथांचा अनावश्यक भार, सांसारिक जबाबदाऱ्यांचा अवास्तव भार, बलात्कार वगैरे प्रश्नांसंबंधी थोडीफार जाणीव सुशिक्षित व शहरातील स्त्रियांना झालेली असल्याचे दिसते. त्यांचे प्रमाण फार मोठे नाही. बहुसंख्य स्त्रिया या बाबतीत उदासीन, अज्ञानी व अनेक कारणांनी अलिप्त राहणेच पसंत करतात. त्यांच्यामध्ये जागरूकता निर्माण व्हावी, या दृष्टीने महिला संघटनांनी प्रयत्न करायला हवेत. हे करताना प्रामुख्याने मेळावे, परिषदा आयोजित केल्या पाहिजेत. यामध्ये प्रामुख्याने हुंडा पद्धती व बालविवाह या अनिष्ट प्रथांची उदाहरणांसह चर्चा व्हावी. प्रत्येक मातेला वाटते की, आपण मुलीचे हुंडा देऊन लग्न केले व मुलांच्या लग्नात हुंडा घेतल्याने फारसे बिघडत नाही.

प्रत्येक जण व्यक्तिगत पातळीवर स्वतःपुरता विचार करतो व आपल्या एकट्याच्या कृतीने प्रचंड समाजावर त्याचा कितीसा परिणाम होणार आहे ? असा विचार करतो; पण एकेकांची कृती सामूहिक बनते व त्याचे सामाजिक प्रथेमध्ये रूपांतर होऊन त्या प्रथा लग्नाला बाजारी स्वरूप व मुलीचा दर्जा अत्यंत कनिष्ठ बनविण्यास कारणीभूत ठरतात हे त्यांना जाणवून दिले पाहिजे. तसेच बलात्कारासारख्या अमानुष घटनेने ती स्त्री सर्वार्थाने आयुष्यातून उठते. कौटुंबिक व सामाजिक दृष्टया, नैतिक संस्कारांच्या मूल्यांच्या दृष्टीने टाकाऊ ठरते. ती मानसिक धक्क्यापासून सावरू शकेलच असे म्हणता येणार नाही. म्हणून बलात्कार करणाऱ्यांना कडक शासन, जी स्त्री पुरुषाच्या वासनेचा बळी पडलेली आहे, तिच्याबद्दल सहानुभूती व तसे प्रसंग येऊ नयेत, म्हणून घ्यावयाची काळजी यांचा सखोल व चर्चात्मक विचार केला जावा. अजूनही सती जाण्याच्या पद्धती समारंभपूर्वक घडतात, विधवेचे केशवपन केले जाते, या रूढींविरुद्ध संघटितरीत्या आवाज उठविण्याचे महत्त्व पटवून दिले जावे. विवाहित स्त्रियांचा सासरच्या मंडळींकडून होणारा छळ, मारहाण, काही प्रसंगी केले जाणारे खून, आत्महत्या करण्यास भाग पाडणारे मानसिक व शारीरिक हाल वगैरे प्रकारांची दखल घेण्याची गरज लक्षात आणून दिली पाहिजे. व्रतवैकल्यांना कसलाही शास्त्रीय, वैधानिक आधार नाही हे पटवून देण्यात यावे. केवळ रूढ व अंधश्रद्धा म्हणून आवश्यक सण–समारंभ करून अनुत्पादक खर्च व शारीरिक कष्टाच्या ओझ्याखाली स्त्रिया वाकतात. त्यांचा फोलपणा लक्षात आणून दिला जावा. धर्म, संस्कृती व घराण्याची परंपरा म्हणून जे जे स्त्रियांवर लादले जाते ते कसे अन्यायकारक आहे व तर्कसंगत विचाराला धरून नाही, हे लक्षात आणून दिले जावे. तसेच स्त्री-स्वातंत्र्य म्हणजे पुरुषांचे दास्य नसून किंवा स्त्री–मुक्ती म्हणजे पुरुषांशी लढा नसून तो स्वतःवर लादून घेतलेल्या रूढी, परंपरा व अनिष्ट

प्रथांच्या विरुद्ध लढा आहे, हे समजावून दिले जावे. स्त्रीचे स्वातंत्र्य म्हणजे तिच्या स्वतंत्र अस्तित्वाला मान्यता मिळणे होय. 'स्वत्व' शोधण्याचे स्वातंत्र्य तिला मिळावे, वैचारिक गुलामगिरीतून व मानसिक दबावातून ती मनाने मुक्त व्हावी या दृष्टीने विचार मांडला जावा.

या व अशा विविध विषयांवर चर्चा केली जावी. स्त्रियांचे शिक्षण, आरोग्य, नोकरी, व्यवसाय व कौटुंबिक कामे या संदर्भात पुरोगामी विचारांचा मागोवा घेण्यात येऊन ते कसे पटतील या दृष्टीने विचार मांडले जावेत.

परिषदा, मेळावे व सेमिनार्स प्रासंगिक कारणाने आयोजित केले जाऊ नयेत; तर विशिष्ट कालावधी ठरवून घ्यावेत. सर्वच विषयांचा घाईगर्दीने एकाच वेळी परामर्श घेण्याची पद्धत स्वीकारली जाऊ नये. शिवाय विशिष्ट ठिकाणीच आणि शहरी भागातच आयोजित केले न जाता हळूहळू ते अर्धशहरी व ग्रामीण भागात घेतले जावेत. छोटे छोटे मेळावे व परिषदा घेण्यासही हरकत नाही. ठराव करून शासनाकडे पाठविणे यावर भर न देता स्त्रियांमध्ये जागरूकता कशी निर्माण होईल ? स्वत:च्या प्रश्नांची जाणीव निर्माण होऊन ते दूर करण्याचे महत्त्व त्यांना पटले की नाही ? स्वतंत्रपणे विचार करण्याची प्रवृत्ती व सारासार विचाराने त्यांची निर्णयशक्ती वाढविण्याचे कार्य केले पाहिजे.

६) स्त्रियांच्या शिक्षणास प्राधान्य देण्याचे धोरण स्वीकारले पाहिजे. त्याचबरोबर अनौपचारिक आणि व्यावसायिक शिक्षणाची खास तरतूद केली जावी. पालकांनी मुलींना किमान प्राथमिक शिक्षण तरी दिलेच पाहिजे. ते न दिल्यास त्यांच्यावर दंड बसविला जावा. मुलींच्या शिक्षणास उत्तेजन देण्यास खास प्रयत्न व्हावेत. ज्याप्रमाणे मागासलेल्या जातीजमातींसाठी खास आर्थिक सवलती देण्यात येत आहेत, त्याप्रमाणे शिक्षणाच्या सर्व प्रकारच्या संधी त्यांना उपलब्ध झाल्या पाहिजेत. मुलींच्या शिक्षणाकडेही समाजाने दुर्लक्ष केले, कौटुंबिक, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक दृष्ट्या मुलींचे स्थान मुलांपेक्षा कनिष्ठ समजून त्यांच्यावर शिक्षणाच्या बाबतीत अन्याय करण्यात आला; म्हणून त्यांना सामाजिकदृष्ट्या दुर्बल घटक मानून विशिष्ट वर्षे, नेहमीसाठी नव्हे, आर्थिक सहाय्य म्हणून स्कॉलरशिप्स देण्यात याव्यात. शिक्षण व आर्थिक स्वावलंबन असल्याशिवाय स्त्रियांचे प्रश्न सुटणार नाहीत.

७) ग्रामीण भागात स्त्रियांच्या प्रश्नांची तीव्रता जाणवते. शारीरिक कष्ट करणाऱ्या, अज्ञानी आणि घरकामाच्या रगड्यात गुंतलेल्या स्त्रियांना सर्व प्रकारचे शोषण सहन करावे लागते. रूढी आणि परंपरा, अंधश्रद्धा आणि देवदेवर्षी, व्रतवैकल्ये आणि पूजा यांचा जबरदस्त पगडा त्यांच्यावर आहे. आरोग्य,

मुलांचे संगोपन वगैरेंसंबंधी आत्यंतिक अडाणीपणा दिसून येतो. म्हणून अशा भागात स्त्रियांचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने खास कार्यक्रम हाती घेतले पाहिजेत. मुलींना शिक्षण, धंदेवाईक शिक्षण मिळाले पाहिजे. जुन्या रूढी, कल्पना, चालीरीती यांच्या बेडचा तोडण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न झाले पाहिजेत. ग्रामीण भागातही या ना त्या कारणाने सुशिक्षित स्त्रिया व पुरुषांचे वास्तव्य वाढत आहे. शहरांशीही संपर्क येत आहे. म्हणून सुरुवातीला विशिष्ट उद्दिष्ट, पार्श्वभूमी या दृष्टीने वातावरण निर्मिती करण्याच्या हेतूने सभा, मेळावे घेतले जावेत. केवळ भाषणे देऊन हे काम होणार नाही. आरोग्य व कुटुंबनियोजन खाते, समाजकल्याण खाते यांच्या सहकार्याने चित्रपट, पत्रके, पुस्तिका यांच्या माध्यमाने प्रयत्न करण्यात यावेत. शिवाय ग्रामसेविका, प्राथमिक शिक्षिका, भजनी मंडळातील स्त्रिया यांच्यामार्फत आचारविचारांमध्ये बदल करण्याचे महत्त्व पटवून द्यावे.

ग्रामीण भागात स्त्री–जागृतीचे काम हे तर बिकट आहेच आहे. पण समाजाचा प्रखर विरोध सहन करावा लागेल. तरीही पूर्वीपेक्षा राजकारण, सहकार व शिक्षणाचा प्रसार यांमुळे घर, गाव व पुरुष यांच्या विचारात व दृष्टिकोनात फरक पडला आहे. त्याचा फायदा घेऊन स्त्रियांच्या बरोबरीने, किंबहुना अगोदर, पुरुषांचे प्रबोधन केले जावे. शहरात स्त्री–स्वातंत्र्याच्या विचाराला मान्यता व स्त्री–पुरुष समानतेच्या दृष्टीने वाटचाल सुरू झाली की हळूहळू ही लाट ग्रामीण भागापर्यंत पोहोचते असे समजले आहे. ग्रामीण भागासाठी कृतिबद्ध, व्यवहार्य आणि विशिष्ट उद्दिष्ट व काळ ठरवून कार्यक्रम हाती घेतला पाहिजे, ग्रामीण पुनर्रचना हा विकासाचा एक अविभाज्य भाग मानला जाऊन त्यावर लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे. सरकारला या दृष्टीने विचार करायला भाग पाडण्यासाठी व स्त्रियांसाठी खास विशिष्ट कलमी कार्यक्रम आखून देऊन तो राबवणाच्या दृष्टीने दबाव आणण्याच्या कामी महिला संघटनांनी कार्यकर्त्यांनी व या चळवळीत नेतृत्व करणाऱ्या स्त्रियांनी हे कार्य हाती घ्यावे.

८) स्वातंत्र्यानंतरच्या काळात हिंदू विवाह कायदा (१९५५), हिंदू वारसा हक्क कायदा (१९५६), हिंदू अज्ञान व पालकत्वाचा कायदा (१९५६) आणि गर्भपातविषयक कायदा (१९७१), शेतमंजूर किमान वेतन कायदा (१९७४), वगैरे कायदे करून स्त्री–समस्यांची दाद घेतली गेली, परंतु इतके कायदे आहेत व त्यांची स्त्रियांना जाण असत नाही. ती करून देण्याचे कार्य (काम) महत्त्वाचे आहे. ग्रामीण व शहरी भागात कायद्यांची जाणीव करून देण्याच्या दृष्टीने प्रचार व प्रसाराची सर्व प्रकारची माध्यमे वापरली जावीत. आरोग्य, कुटुंबनियोजन, प्रौढ व अनौपचारिक शिक्षण, आधुनिक शेतीविषयाची माहिती सर्व स्तरांपर्यंत

पोहोचविण्यासाठी ज्या यंत्रणा वापरल्या जातात, त्या यंत्रणांचा वापर करून स्त्रीविषयक कायद्यांची माहिती स्त्रियांपर्यंत पोहोचविण्याची नितांत गरज लक्षात घेतली जावी. कायद्याच्या आधारे मिळणाऱ्या फायद्यावर आधारित असे लघुचित्रपट काढून ते दाखविले जावेत; म्हणजे प्रसाराच्या दृष्टीने ते साधन प्रभावी ठरू शकेल.

शिवाय महिला मंडळे, संघटना, लेडीज क्लब्ज, शिवणकामाचे वर्ग, प्रशिक्षण शिबिरे यांच्या माध्यमाने या कामावर भर दिला जावा.

९) कामकरी, शेतमजूर, मोलकरीण, विडी कामगार, चहाच्या मळ्यात काम करणाऱ्या, काजू कारखान्यात गुंतलेल्या व इतर क्षेत्रांत नोकरी व व्यवसाय असणाऱ्या असंघटित स्त्रियांनी संघटित होऊन आपले वेतन, कामाचे तास, इतर प्रकारच्या सवलती, कल्याणकारी योजना यांबाबत न्याय मिळवला पाहिजे. स्त्री-मुक्तीच्या चळवळीचा एक महत्त्वाचा भाग म्हणून कामकरी स्त्रियांनी संघटित झाले पाहिजे. केवळ उत्तेजन देऊन उपयोग नाही तर प्रत्यक्षात तिथे राहायला जाऊन, मालकांच्या विरोधाला मोडता घालून, संघटना प्रस्थापित करण्याची जागृती करून ती उभी करण्याचे प्रयत्न व्हावेत. त्यासाठी वेळ व शक्ती दिली पाहिजे. मात्र एकदा त्या संघटित झाल्या की त्या संघटनांच्या आधारे स्त्री-स्वातंत्र्य व स्त्री-पुरुष समानतेचे विचार त्या ठिकाणी व त्यांच्यामध्ये पोहोचविणे शक्य होईल.

१०) कायदेविषयक सल्ला देण्याची चळवळ उभी केली पाहिजे. स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्य करणाऱ्या संघटना, कार्यकर्ते, समाजकल्याण खाते, सरकार, महिला मंडळे व संघटना यांनी एकत्र येऊन अशा प्रकारच्या चळवळीला मते, स्वरूप देण्याचा दृष्टीने संघटना उभी करण्याचा विचार व कृती करण्याची नितांत आवश्यकता आहे. त्या दृष्टीने पुढील मुद्दे उपस्थित ठरू शकतील.

अ) मोफत कायदाविषयक सल्ला केंद्रे सुरू करण्यात यावीत. त्यास राज्य, जिल्हा व तालुका पातळीवर संस्थात्मक स्वरूप देऊन विकेंद्रीकरण करण्यात यावे. अशा प्रत्येक केंद्रामध्ये समाजशास्त्राचा अभ्यास करणाऱ्या तज्ज्ञ व्यक्ती, समाज कार्यकर्ते, प्रोबेशन ऑफिसर्स व त्या त्या स्तरावरील अनुभवी व ज्यांना सामाजिक कार्याची आवड व जाण आहे अशा एखाद्या ॲडव्होकेटचा समावेश असावा.

ब) ज्याप्रमाणे फिरती आरोग्य सेवा केंद्रे ही झोपडपट्ट्या व मागासलेल्या भागासाठी अत्यावश्यक समजली जातात, त्याचप्रमाणे फिरती मोफत कायदाविषयक सल्ला केंद्रे अथवा युनिटस जरुरीची आहेत. अज्ञानी, गरीब व दुर्लक्षित अशा महिलांचे वास्तव्य अधिक प्रमाणात आहे अशा भागात या केंद्रांनी विशिष्ट दिवसांनी भेट द्यावी. त्यांच्यात मिसळून, त्यांना बोलते करून त्यांच्या हक्कांची माहिती द्यावी.

क) गृहिणी, विद्यार्थीवर्ग, समाजसेवा करणारे कार्यकर्ते, स्वयंसेवी संस्था, महिला मंडळाचे सभासद, सरपंच व ग्रामपंचायतीचे सदस्य, स्थानिक नेते मंडळी वगैरेंना कायदेविषयक माहिती, तांत्रिक बाबी, तरतुदी, संपर्क व सल्ला मिळू शकेल अशा संस्थांची माहिती इत्यादी प्रकारचे प्रशिक्षणाचे अल्प मुदतीचे वर्ग चालविण्यात यावेत.

ड) कायद्यांचा फायदा स्त्रियांना न मिळण्यामध्ये महत्त्वाचा घटक म्हणजे अडचणीत सापडलेल्या, असुरक्षित बनलेल्या, अन्याय झालेल्या स्त्रिया ह्या पोलिसांपर्यंत जाण्याचे टाळतात. गुन्ह्यांची नोंद होत नाही, अन्यायाविरुद्ध दाद मागितली जात नाही; त्यामुळे कायदे फक्त कागदावरच राहतात. दुसरेही असे की, नोंद करताना ती पुरेशा पुराव्यानिशी करण्याची पद्धत पाळली जात नाही. शिवाय अधिकारीही नीट लक्षपूर्वक नोंद करून घेत नाहीत. सामाजिक दबाव, आर्थिक कमकुवतपणा, स्त्रियांची बदनामी व अब्रूविषयक संकुचित कल्पना व रूढी–परंपरांचा पगडा यांमुळे स्त्रियांवरील अत्याचाराच्या घटना दाबून टाकल्या जातात, उजेडात आणल्या जात नाहीत. हुंडा, बलात्कार, मारहाण अशांबाबतीत तर क्वचितच कायद्याचा आधार घेतला जातो. अर्थात हल्ली काही महिला कार्यकर्त्यांच्या पुढाकारामुळे व समाजसेवी संस्थांच्या आधाराने अशा घटना उजेडात आणल्या जाऊन, वर्तमानपत्रातून त्यांविरुद्ध आवाज उठवून गुन्हेगाराला शासन केले जात आहे; परंतु अजूनही कायद्याच्या मार्गाचा अवलंब करण्याचा रास्त मार्ग सामाजिक मान्यता पावलेला नाही. तो रीतसर व सामाजिक सुधारणा व परिवर्तनास आवश्यक आहे, ह्याची जाणीव करून देण्याची गरज आहे. हे काम चित्रपट, शाहिरी कलापथके, प्रदर्शने, रेडिओ व लिखाणाच्या माध्यमांद्वारे व्हायला हवे.

इ) स्त्रियांवर होणारे अन्याय दूर व्हावेत. विशेषतः हुंड्यासाठी नवविवाहित स्त्रियांचा होणारा छळ, मारहाण व प्रसंगी खून यांपासून त्यांना संरक्षण मिळावे म्हणून स्वयंसेवा संस्थांच्या प्रतिनिधींनी व कार्यकर्त्यांनी पुढाकार घ्यावा.

ई) प्रत्येक घरात जाऊन, कुटुंबाला भेटून कायदेविषयक माहिती, तरतुदींबद्दलचे ज्ञान देणे अशक्य आहे व त्याची गरजही नाही. पण ज्या ठिकाणी महिला एकत्रित येतात, अशा सार्वजनिक व संघटित कार्यक्रमाच्या वेळी याविषयीची चर्चा उपस्थित केली जावी.

फ) केवळ कायदे करून, त्यांची माहिती देऊन स्त्रियांवरील अन्याय कमी होतील व स्त्रीचा दर्जा उंचावेल असे समजून चालणार नाही. स्त्रियांची प्रतिष्ठा, दर्जा व त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला पाहिजे. जुन्या रूढी, कल्पना, चालीरिती यांच्या बेड्या तोडल्या पाहिजेत. पुरुषांकडून हक्क मिळण्याची वाट

बघता कामा नये. या उलट त्यांनाही या सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रित सामील करून घेऊन स्त्री–स्वातंत्र्य आणि स्त्री–पुरुष समानता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने पावले उचलली पाहिजेत.

स्त्री ही असहाय्य, अबला व दुबळी अशी जी प्रतिमा पूर्वापार चालत आलेली आहे, ती कशी बदलता येईल ? या दिशेने स्त्री–आंदोलनाने प्रयत्न करणे जरुरीचे ठरेल. मानसिक गुलामगिरी, संस्कृतीच्या नावाखाली रूढी व परंपरांचे ओझे, व्रतवैकल्यांचा अनावश्यक भार यांतून स्त्रियांनी मुक्त व्हायला शिकले पाहिजे, समता, स्वातंत्र्य व सन्मान ह्यांसाठी स्त्रियांनी झगडले पाहिजे, तरच कायदे व न्यायालये ही स्त्रियांना समर्थपणे संरक्षण देण्याचे काम करू शकतील.

अंधश्रद्धेच्या अंधारात

ग्रामीण स्त्री–कामगारांचे शिबीर गारगोटी येथील मौनी विद्यापीठात काही महिन्यांपूर्वी घेण्यात आले. कर्मवीर हिरे महाविद्यालयाच्या पुढाकाराने व कामगार शिक्षण केंद्र, कोल्हापूर यांच्या सहकार्याने शेतमजूर स्त्रियांसाठी हे शिबीर झाले. ५० स्त्रिया गारगोटीच्या जवळपासच्या खेड्यांतील होत्या. २५ ते ५१ वयोगटातील आणि शेतावर राबणाऱ्या अशा या स्त्रियांच्या सतत सहवासात राहण्याची संधी मला मिळाली. पूर्वपरिचयातून त्या माझ्याशी मोकळेपणाने बोलू शकल्या. त्यांना बोलके करण्यात मला पूर्वीपेक्षा अधिक यश आले.

प्रश्नावलीच्या सहाय्याने त्यांच्याबद्दलची माहिती, त्यांची मते ऐकून घेऊन संकलित करण्याचा मी प्रयत्न केला. या प्रयत्नाला त्यांनी पूर्णपणे मनापासून व मोकळेपणाने सहकार्य दिले. ५० पैकी १३ जणी मागासलेल्या वर्गातील व बहुसंख्य निरक्षर. फक्त चौघी चौथीपर्यंत शिकलेल्या व दोघींच्या शिक्षणाची मजल सातवीपर्यंत गेलेली. जमिनीच्या मालकीविषयीची माहिती गोळा केल्यावर असे दिसून आले की ५६ टक्के (३२ स्त्रिया) स्त्रियांना अजिबात शेती नसल्याने त्या कुटुंबांना उदरनिर्वाहासाठी पूर्णपणे शेतमजुरीवर अवलंबून राहावे लागते. २४ टक्के स्त्रियांना एक एकरापेक्षा कमी शेती होती. ती शेती कोरडवाहू, त्यामुळे स्त्रियांनीसुद्धा मजुरीसाठी बाहेर पडल्याशिवाय चूल पेटण्याची शक्यता नसते, असा त्यांचा अनुभव. सहा स्त्रियांच्या कुटुंबाच्या मालकीची तीन–चार एकर जमीन आहे. पण मोठे कुटुंब, खाणाऱ्यांची तोंडे जास्त व पाणी नसलेली शेती, भात व नाचणे ही पिके घेता येतात; त्यामुळे शेतमजुरी करण्याशिवाय अन्य मार्गच नाही; अशी एकंदर आर्थिक ओढग्रस्तीची परिस्थिती. आर्थिकदृष्टचा दुर्बल,

शैक्षणिकदृष्टचा मागासलेल्या, सामाजिकदृष्टचा दुर्लक्षिलेल्या व बाहेरच्या जगातील बदलांचा व परिवर्तनाचा फारसा ठसा न उमटलेल्या या स्त्रिया. त्यांच्या सहवासात घालविलेल्या पाच दिवसांतील ही निरीक्षणे.

कुटुंबनियोजन

कुटुंबनियोजन हा विषय त्यांच्या जिव्हाळचाचा, लाजरेपणाचा व संकोच न बाळगता बोलण्याचा विषय आहे, एवढी त्यांच्या मनाची तयारी दिसली. कुटुंबनियोजन त्यांना मनोमन पटले असले तरी एक बाब स्पष्ट दिसून आली व ती म्हणजे एकच मूल असावे हे सर्वांना पूर्णपणे अमान्य. शिवाय मुलगा असलाच पाहिजें, याबद्दल ठामपणे सर्वांची एकमुखी मान्यता. मात्र तीन मुलांपेक्षा अधिक मुले नको, असे म्हणणाऱ्या ऐंशी टक्के स्त्रिया. राहिलेल्यांच्या मते चार मुले हवीत. विशेषत: दोन मुली हव्यातच; म्हणजे सात–आठ वर्षांच्या होताच ' हाताबुडी कामाला, ' ' विसावा द्यायला ' बऱ्या पडतात.

सर्वच स्त्रियांना मुलगी हवी ती त्यांना त्यांच्या काबाडकष्टातून थोडासा विसावा देण्यासाठी.

कुटुंबनियोजनाच्या अडचणी त्यांच्या शब्दांत अशा :

' बाई, दाल्ल्याला समजवणार कोण ? पुरुषापुढं चालतंय काय ? असलं काई बोलायला जायचं म्हंजे लाथा खायची पाळी ! '

' सासू–सासऱ्यांचं ' व्हय ' घेतल्याबिगर आपरेशनचं नाव काढतोय कशाला ? ते बी बोलायची चोरी. नवऱ्यानं तंबाखू चोळीत विषय काढायचा. मग देवाचा इचार घ्यायचा. जोगतिणीला इचारायचं, शेतीभीतीची काम नसावी. पै–पाहुण्याची वाट नसावी. मग मूल बंद व्हायच्या आपरेशनचा विचार. '

' आमाला सात–आट वेळा ह्या फेऱ्यात अडकायचं म्हंजे सुख नाय. पण दाल्ल्याचा राग वंगाळ. नात्रं तुटायची येळ इल म्हणून त्वांडाला मिट्टा. मोलमजुरी जन्माला लागलीय. घरात राबायचं, पोरांचं कष्ट उपसायचं. '

ऑपरेशन हा उपाय सर्वांच्या मते योग्य. पण ते पुरुषांनी करावे अशी इच्छा सर्वच स्त्रियांनी व्यक्त केली. कारण त्यांच्या मते, ' ऑपरेशनमुळे अधूपणा येतो. कंबर दुखते. काम होत नाही. ' अर्थात ही भीती निराधार असल्याचे मी पटवून सांगण्याचा प्रयत्न केला; मात्र त्यांना तो कितपत पटला हे अजमावता आले नाही. त्यांचा अनुभव मात्र असा आहे की, पुरुषमंडळी ऑपरेशनला तयार नसतात; कारण त्यांनाही तशाच प्रकारची भीती वाटते. शिवाय या स्त्रियांनी नवऱ्यांपेक्षा आपणच ऑपरेशन करून घेण्याची तयारी दर्शविली ती या अर्थी (अर्थात वेळ

आल्यास) की, नवरा धडधाकट हवा. बरे--वाईट झाले तर ते आपल्याला व्हावे.

कुटुंबनियोजनाचे महत्त्व ग्रामीण स्त्रियांना पटलेले आहे. एक तर मुलगा हवाच. यामुळे कुटुंबनियोजनाचा सोयीस्कर स्वीकार. शिवाय पुरुषप्रधान कुटुंब-पद्धतीची घट्ट पकड. सामाजिक रूढी व परंपरांचा पगडा. लहान वयात लग्न; अज्ञान व खेड्यातील वातावरणाची छाप, सर्वार्थाने स्त्रियांचा अत्यंत कनिष्ठ दर्जा वगैरे कारणांमुळे कुटुंबनियोजनात अडचणी निर्माण होत आहेत. शासनाचे अन्य कोणतेही कायदे व कार्यक्रम आणि योजनांपेक्षा कुटुंबनियोजनाची मोहीम खेड्यातच नव्हे, तर तेथील अडाणी स्त्रियांच्या विचाराला स्पर्शून गेली आहे. मात्र कौटुंबिक पार्श्वभूमी अनुकूल नसल्याने तिला यश मिळण्यात अडचणी येत आहेत.

हुंडा पद्धती

या स्त्रियांची मुलाखत घेताना त्यांना हुंड्याची, अनिष्ट परिणामांची जाणीव असलेली दिसली. एवढेच नव्हे तर हुंड्यावरून विवाहित स्त्रियांचा होणारा छळ व प्रसंगी आत्महत्या अथवा खून यांविषयीच्या वर्तमानपत्रातील बातम्याही त्यांना माहीत होत्या. मात्र त्यांच्या बोलण्यातून हतबलपणा असा दिसला की, हुंडा समाजाला मान्य असल्याने व्यक्तिगतरीत्या त्या काही करू शकत नाहीत. त्या अत्यंत कळकळीने व मनापासून बोलत होत्या.

' हुंडा दिल्याशिवाय गाय ' इकल ' कशी वो ?'

' वाडवडिलांपासून चालत असलेली व्हाय मोडून चालंल कसं ?'

' पोटाला मुलगी आली, देणं दियाला हवं न्हवं. हुंडा द्यायची बी, पोरगी पदरात घ्यायची, इनवीण करायची, बाईची जात. '

हुंड्याला फक्त स्वतःला मुलगी असेल तर विरोध नोंदविण्याची सर्वच स्त्रियांची प्रवृत्ती दिसून आली. विशेषतः सामाजिक रूढी व वाडवडिलांपासून सर्वच स्तरांत, जातीजमातींत हुंडा मान्यता पावल्याने त्याबद्दल वैयक्तिक विरोध करण्याची त्यांची तयारी मुळीच दिसली नाही.

हुंडा का दिला जावा ? तर २१ स्त्रियांच्या (४२ टक्के) मते, ' मुलीला दिल्या घरी मिळाले पाहिजे व तिला त्या कारणामुळे सासरघरी त्रास होऊ शकत नाही. ' ' हौस झाली पाहिजे, म्हणून हुंडा द्यावा.' ४० टक्के स्त्रियांच्या मते, हुंडा ही सामाजिक प्रथा आहे, म्हणून ती आपण पाळली पाहिजे. हुंड्याशिवाय लग्न, ही कल्पनाच त्यांना अजिबात पटत नाही. मुलगी म्हणजे हुंडा हा त्यांचा ठाम समज व दृढ श्रद्धा. दहा टक्के स्त्रियांच्या मते नवऱ्या मुलाचा शिक्षणाचा खर्च

भरून निघावा, म्हणून हुंडा देण्याची गरज आहे. पण मुलींच्या शिक्षणाचा खर्च येत नाही का ? असा प्रतिप्रश्न केला असता त्यांचे विनाविलंब उत्तर असे की, 'मुलीला फार शिकवायचं नाही.' खर्चाशिवाय शिक्षण जमेल तेवढे द्यावयाचे. मुलाएवढा खर्च मुलीच्या शिक्षणावर होतच नाही व केला जात नाही. आणखी चार टक्के स्त्रियांचे म्हणणे असे की, मुलीचे आई-वडील आपली इस्टेट मुलासाठी म्हणून राखून ठेवतात. ती परंपरेने मुलाला मिळते. मग आर्थिक कुवत असताना हुंड्याच्या रूपाने मुलीच्या लग्नात खर्च करण्यास मागेपुढे पाहू नये. उरलेल्या फक्त चार टक्के स्त्रियांच्या मते 'हुंडा पद्धत सर्वस्वी अयोग्य आहे. कर्जबाजारीपणा, सावकारांच्या तावडीत सापडणे, लग्न लांबणीवर पडणे वगैरे अनिष्ट परिणामांचा विचार करून हुंड्यावर कायदेशीर बंदी घातली पाहिजे.' सारांश, बहुसंख्य स्त्रियांनी विविध कारणांचा आधार घेऊन हुंडा-पद्धतीचे समर्थन केले. ज्यांनी हुंडा अयोग्य वाटतो असे मत मांडले, ते केवळ तो देण्याची ऐपत नसल्यानेच.

समजुती, लोकभ्रम, अंधश्रद्धा

ग्रामीण भागात तर्कापेक्षा श्रद्धेला जास्त महत्त्व देणे, शहानिशा न करता परंपरेने गोष्टी मान्य करणे, नैसर्गिक आपत्तीत ईश्वरपूजा, धार्मिक अनुष्ठाने करणे, जुने ते सोने मानणे, शकून-अपशकुनाचा पगडा यांचा प्रभाव दिसून येतो. वैज्ञानिक दृष्टिकोनातून कारणमीमासा ते करीत नाहीत. जादूटोणा, भूतबाधा, भानामती व चमत्कार यांवर विश्वास आणि पूजा, प्रार्थनादान, बळी अशा कर्मकांडाने त्यांचे जीवन भरलेले असते. ही भारतीय खेडचांची वैशिष्टचे लक्षात घेऊन आज त्यांचा कितपत प्रभाव आहे, हे जाणून घेण्याचा मी प्रयत्न केला. निश्चित प्रश्नावलीच्या सहाय्याने स्त्रियांना बोलके केले. त्या मोकळेपणाने बोलल्या. अजूनही आपल्या समाजातील स्त्रिया सर्वार्थाने किती मागासलेल्या आहेत, हेच त्यातून दिसून आले.

देवऋषी, भविष्य बघणारे आजार बरा करू शकतात, त्यांचे मार्गदर्शन उपयोगी ठरते, यावर विश्वास. त्याचे समर्थन करताना त्यांचा विचार असा की, देवाचा कोप झाला की, आजारपण येते. त्याची इच्छा पूर्ण करायला हवी. देवऋषी-बाबाकडे केव्हाही जाता येते. पैसे फारसे लागत नाहीत. रोग्यालाच नव्हे, तर कुटुंबाला सुख मिळते. डॉक्टरची भीती वाटते. शिवाय खर्च फार. खाण्यापिण्यावर बंधन. रोख पैसे हवेत. आजारपण देवाच्या अवकृपेमुळे येते. म्हणून डॉक्टराचे औषध लागू पडेलच, असे नाही. अशा तऱ्हेचे समर्थन पन्नासपैकी ४३ स्त्रियांनी केले. उरलेल्या सात जणींच्या मते आजारपणासाठी डॉक्टरांकडे गेले पाहिजे. त्याशिवाय रोग बरा होत नाही. मात्र देवदेव केल्याने व देवऋषीकडे, जोगतिणीकडे गेल्याने कसलेच नुकसान होत नाही, असा त्यांचा विचार.

नवस केल्यावर आजार बरा होतो, असे म्हणणाऱ्या व त्याचे उदाहरणासह समर्थन करणाऱ्यांची संख्या ४७. फक्त तिघींचा अपवाद. त्याचबरोबर एकापेक्षा अधिक नवस करण्याचे मत व्यक्त करणाऱ्या स्त्रिया अशा –

आजारपण जाण्यासाठी नवस करणे योग्य	होय	नाही
	४७	३
नवस म्हणून देवाला –		
अ) नारळ–उदबत्ती	४१	
ब) नैवेद्य व नारळ	३२	
क) घंटा	५	
ड) साडी–चोळी, नवे कपडे	२	
इ) कोंबडा	२८	
फ) बकरे	८	

नवस बोलण्याची पद्धत अशी की आजारपणात उतार पडावा म्हणून सुरुवातीला नारळ–उदबत्ती द्यायची. प्राथमिक स्वरूपाची लाच म्हणा ना. घरातला रोगी बरा झाला की व कामधंद्याला जाऊ लागला की सवडीनं जास्त खर्चाचा नवस फेडायचा. मग कुणी यात्रेच्यावेळी देवळात घंटा बांधील, तर कुणी कोंबडा बळी देईल. शिवाय घरातल्या पुरुषांच्या आजारासाठी मोठा नवस व बायकांच्या आजारपणात कमी खर्चाचा नवस असाही त्यामध्ये फरक केला जातो. नवस बोलला की फेडलाच पाहिजे, नाही तर देव आणखी खर्चात टाकतो, याच्या अनेक कथा अनेकजणींनी सांगितल्या. 'डॉक्टर शेवटी माणूस. औषध देईल; टोचेल; पण देवाची मर्जी नसेल तर तो काय करणार ?' अशा अंधश्रद्धा व देवभोळेपणा या शेतमजूर स्त्रियांच्या मनात पुरेपूर भरलेला.

देवाला व यात्रेला जाणाऱ्यांची संख्या मोठी. कर्ज काढून यात्रा केलेल्यांची गतवर्षीची आकडेवारी अशी –

देव	स्त्रियांची संख्या
पंढरपूरचा विठोबा	९
जोतिबा	२
यल्लमा	२३
इतर	४

वाडवडिलांनी घराण्याचा देव मानलेला, त्या देवाच्या यात्रेला गेले पाहिजे, अशी गाढ श्रद्धा. या भागात यल्लमाला जाण्याची प्रथा असल्याने कर्ज काढून जाणारी कुटुंबे अधिक प्रमाणात आढळून आली. कर्ज आज ना उद्या फिटेल, ते फेडायला देव हातभार लावतो, असा विश्वास. त्यांचा आचारात अत्यंत काटेकोरपणे त्या पालन करताना दिसल्या. स्त्रियांचा याविषयीचा विचार मांडण्यासाठी ठळक उदाहरणे अशी –

	होय	नाही
रात्रीच्या वेळी विरजण देऊ नये	५०	०
रात्रीच्या वेळी कात देऊ नये	४८	२
रात्रीच्या वेळी मीठ देऊ नये	५०	०
रात्रीच्या वेळी चुना देऊ नये	४७	३
दिवेलागणीनंतर पैसे देऊ नयेत	४६	४
हातावर मीठ देऊ नये	५०	०
घरात भांडण होईल म्हणून कडी वाजवू नये	४९	१

या आणि अशा प्रकारच्या अनेक लोकभ्रमांचे त्या मनःपूर्वक पालन करताना आढळतात. वाडवडिलांपासून चालत आलेल्या या गोष्टी पाळल्याच पाहिजेत, नाहीतर विपरीत घडेल, अशी सतत भीती त्यांच्या मनात असते. दिवे लागणीनंतर पैसे दिल्यास घरातली लक्ष्मी जाते, मीठ दिल्यास देणाऱ्याची मीठ घेणाऱ्या व्यक्तीवरची माया कमी होते, विरजण रात्री दिल्यास दूधदुभते कमी होते व संपन्नता कमी होते वगैरे कारणे सांगून त्यांनी अशा कल्पनांचे जोरदार समर्थन केले.

शकून–अपशकुनाच्या बाबतीतही यापेक्षा वेगळी अशी त्यांची मनोभूमिका नाही.

मुंगसाचे तोंड दिसणे, कुक्कुट कोंबडा दिसणे, डावा डोळा लवलवणे, दोन साळुंख्या दिसणे, भरलेली पाण्याची घागर घेऊन विवाहित स्त्री सामोरी येणे, देवाला वाहिलेले फूल उजवीकडे पडणे या गोष्टी शुभ असा त्यांचा समज. त्यामुळे चांगले काही तरी घडते. या उलट उजवा डोळा लवलवणे, डावा बाहू स्फुरण पावणे, रात्री कुत्रे रडणे, नारळ उभा फुटणे, रिकामी घागर घेतलेली स्त्री समोर येणे, घुबड ओरडणे, स्वप्नात गोड जेवणे, अंगावर पाल पडणे वगैरे गोष्टी अशुभ व अनिष्ट मानल्या जातात. अशांपैकी एखादी गोष्ट घडली, तर त्याची त्यांना

दिवसभर रुखरुख लागून राहते. भटजीकडे जाऊन त्यावर उतारा म्हणून काहीतरी देवधर्म केल्याशिवाय चैन पडत नाही, असे त्यांनी सांगितले.

त्यांचा आणखी एक पक्का समज म्हणजे लहान मुलाला दृष्ट लागतेच. सर्वच्या सर्व स्त्रियांनी आवाजी मत देऊन हा विचार सर्वमान्य असल्याचे घोषित केले. दृष्ट लागली, असे लक्षात येण्याची त्यांनी विविध लक्षणे सांगितली. एकापेक्षा अधिक लक्षणे सांगणाऱ्या स्त्रियाही आढळून आल्या. त्यांची त्याबद्दलची मते अशी :

मुलांना दृष्ट लागल्याची लक्षणे

	सहमत स्त्रिया
तिन्हीसांजेला मुलाने किरकीर करणे	३८
ताप येणे	२२
पापण्या लांब होणे	१८
झोपेतून दचकून उठणे	१३
भूक मंदावणे	१९
दूध पाजल्यास ओकणे	२३
अंग न धरणे	१७
पुरळ उठणे	८

शारीरिक बिघाड, आरोग्याची तक्रार, अपचन, हवेतील बदल, कपडे घट्ट घालणे अथवा अन्य कारणाने मुलांचे आरोग्य बिघडते असा विचार त्यांना किरकोळ आजारपणाच्या संदर्भात अजिबात सुचत नाही. परिणामी मुलांची निकोप वाढ होऊ शकत नाही.

दृष्ट काढून टाकण्यासाठी म्हणून देवधर्मापेक्षा परंपरेने चालत आलेले उपाय त्या करीत राहतात. मीठ उतरून पाण्यात टाकणे, मीठ–मिरची उतरून विस्तवावर टाकणे व खाट आला नाही तर दृष्ट निघाली व खाट आला व ठसके लागले तर दृष्ट निघाली नाही, असे आडाखे. लिंबू कापून उतरून टाकणे, भाकरीला काळे लावून उतरून टाकणे, बिबा विस्तव उतरून तीन रस्ते मिळतात त्या तिठ्यावर टाकणे असे आलटून पालटून दृष्ट काढण्यावर म्हणून उपाय केले जातात. दृष्ट काढण्यासाठी अमावास्या, बुधवार व शनिवार हे वार आवश्यक मानले जातात. दृष्ट लागू नये म्हणून काजळ घालणे, काळा दोरा बांधणे, तळपायाला काळे लावणे, बिबा बांधणे वगैरे उपायही करीत असल्याचे त्यांनी सांगितले. दर अमावास्येला नारळ देण्याची प्रथा पाळणाऱ्या स्त्रियांची संख्या तेवीस असल्याचे आढळले.

गर्भपात

अत्यंत अतार्किक व अशास्त्रीय, गाढ अज्ञानाचे घोतक अशी त्यांची समजूत म्हणजे लहान मुलाला अंगावर पाजेपर्यंत दुसरा गर्भ राहत नाही. या विचाराशी सहमत असलेल्या स्त्रियांची संख्या ३४ होती. सर्वच स्त्रियांच्या मते दोन वर्षाचे मूल होईपर्यंत अंगावर पाजले पाहिजेच. त्या त्याप्रमाणे पाजतात. सध्या लेकुरवाळचा असलेल्या एकवीस स्त्रियांना ' किती वर्षे मूल अंगावर पाजले ? ' असे विचारले असता, आलेल्या उत्तरांचे वर्गीकरण असे :

मुलांचे वय	अंगावर पाजणाऱ्या स्त्रिया
दोन वर्षे	५
तीन वर्षे	७
चार वर्षेपर्यंत (शेवटचे मूल)	९

मुलाला पाजण्यामुळे त्यांच्या आरोग्याला ते बाधक ठरते आणि स्त्रियांच्या तब्येतीलाही हानिकारक असते, हे त्यांना अजिबात पटले नाही. उलट दुधाचा प्रश्न, मुलांची रडारड थांबविणे, आईला आडवे व्हायला व विसावा घ्यायला संधी, मुलावरची माया वाढते, अशा विचारांनी त्या भारलेल्या दिसल्या.

गर्भपातविषयक चर्चा करताना शारीरिक कमतरता, आजारपण, आरोग्यातील बिघाड, अशक्तपणा व अन्य अपेक्षित कारणांची पुसटशी जाणीव त्यांना दिसली. फक्त तीस टक्के स्त्रियांनी गर्भपात होणे ही शारीरिक व आरोग्यविषयक घटना आहे असे मान्य केले. मात्र उरलेल्यांच्या मते –

गर्भपाताची कारणे	सहमत स्त्रिया
नवस न फेडल्याचा परिणाम	५
पूर्वजन्मीचे पाप	८
नशिबाचा भोग	७
देवाची अवकृपा	५
करणी, भूतबाधा	१०

गर्भपात होणे ही दैवी बाब आहे, तो नशिबाचा भोग आहे, असे समजण्याची वृत्ती त्यांच्या अज्ञानातून व अंधश्रद्धेतून निर्माण झाली आहे. महत्त्वाची बाब अशी की, पुरुष डॉक्टरांकडून तपासून घेणे लाजेचे व संकोचाचे वाटत असल्याने त्या डॉक्टरांकडून तपासून घेण्याची शक्यता ठामपणे नाकारतात. शिवाय खेड्यात स्त्री

डॉक्टर नसल्याने तपासून घेण्याचा विचारही त्यांच्या मनात येत नाही. परिणामी गर्भपातामुळे त्यांच्या तब्येतीवर अनिष्ट परिणाम होत राहतो.

कायदे

हिंदू विवाह कायदा (१९५५), हिंदू वारसा हक्क कायदा (१९५६) हिंदू अज्ञान व पालकत्वाचा कायदा (१९५६), हिंदू दत्तक व पोटगी कायदा (१९५६), गर्भपातविषयक कायदा (१९७१), शेतमजुरीचा किमान वेतन कायदा (१९७४) या कायद्यांची ढोबळमानाने रूपरेषा व तरतुदी मी त्यांना समजावून दिल्या. कायद्यांची भली मोठी यादी व त्यांतील तरतुदी ऐकून स्त्रियांना आश्चर्य वाटले. पण त्यांविषयीचे गाढ अज्ञान दिसले. मात्र त्यांचे उद्‌गार असे –

' बाई, कायदा बुकं शिकलेल्या बायकास्नी; आमाला त्येचा उपेग काय ? '

' गर्भपाताचा कायदा म्हणातव, गोष्ट न्यारी हाया. पर समाजात आपल्या डाकतर व दवाखाना गाठतोय कोण ? सुईण बरी. कायद्याची दखल समाजात बापेय घेतात व्हय्. '

' अडाणी माणसं. कायद्याचा कागूद त्यांच्यासाठी कोराच की हो. '

अशा शब्दात त्यांनी आपली मते व्यक्त केली. सर्वच स्त्रियांनी कायद्याच्या माहितीमध्ये रस घेतला. त्यांच्या चेहऱ्यावर आश्चर्य व डोळ्यांत नवीन काहीतरी ऐकल्याचा आनंद स्पष्ट दिसत होता. समाज आपल्या बाजूने नाही; त्यामुळे कायद्याच्या फोलपणाची जाणीव त्यांना होत होती व ती त्यांनी आपल्या बोलण्यातून वारंवार व्यक्त केली. कायद्याच्या आधाराबद्दल सर्वजणी साशंक दिसल्या. शिवाय किमान वेतन कायद्यानुसार शेतमजुरीचा समान दर स्त्री–पुरुषांना मिळावा, ही तरतूद त्यांना अमान्य.

शेतमजूर स्त्रियांना अत्यंत हीन दर्जाचे व पशुसमान आयुष्य घालवावे लागते. त्यांच्या अज्ञानामुळे, रूढी व परंपरांच्या दडपणाखाली वागण्याने व अत्यंत जुन्या व बुरसटलेल्या विचारांची घट्ट पकड असल्याने त्यांच्यात सुधारणा व्हायची कशी ? हे प्रचंड काम करायचे कसे ? कुणी ? अशी अनेक प्रश्नचिन्हे आहेत. या शिबीरातील चर्चेत अस्वस्थ करणारी. त्यांचाच प्रत्यय येत राहिला. स्त्री-मुक्ती चळवळीने याची नोंद घ्यायला हवी. तेवढे सामर्थ्य निर्माण होईल हा आशावाद.

निषेध